**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी**

**सभापती** :सन्माननीय विरोधी पक्ष नेता आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे नियम 289 अन्वये एक नोटीस दिलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये जी नोटीस दिलेली आहे, त्यामधील विषय अत्यंत महत्वाचा आहे. तेव्हा आपण माझी नोटीस मान्य करुन मला या ठिकाणी तो विषय मांडण्याची संधी द्यावी.

**सभापती** :अधिवेशनच्या पहिल्याच दिवशी दि. 5 डिसेंबर, 2005 रोजी याच त-हेची जी नोटीस आपण दिली होती...

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, ही नोटीस वेगळी आहे.

**सभापती** : दिनांक 5 डिसेंबर, 2005 रोजी आपण निर्णय घेतला आणि प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या विषयावर चर्चा घेतली आहे. तेव्हा आज मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर औचित्याचा मुद्दा मांडण्यास मी आपल्याला परवानगी देतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण मला औचित्याचा मुद्दा मांडायला परवानगी द्यावी पण मी या ठिकाणी नियमानुसार जी नोटीस दिलेली आहे त्या नियमानुसार मला तो विषय या ठिकाणी रेज करु द्यावा. सभापती महोदय, एक हजार आत्महत्त्या झालेल्या शेतक-यांच्या विधवांचे धरणे आज नागपूरमध्ये सुरु आहे. अत्यंत महत्वाचा हा विषय आहे. शासनाने पॅकेज जाहीर केल्या नंतरही एक हजार आत्महत्त्या झालेल्या आहेत.
शेतक-यांच्या विधवा येथे येऊन उपस्थित आाल्या असून शासनाने पॅकेज जाहीर केल्या नंतरही आत्महत्त्या झालेल्या शेतक-यांची कुटुंबे समाधानी नाहीत. शेतक-यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचा आणि महत्वाचा असा हा प्रश्न आहे. म्हणून हा विषय मांडण्याची आपण मला परवानगी द्यावी.

**सभापती** :संसदीय लोकशाही पध्दतीने अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आपण हा मुद्दा याठिकाणी उपस्थित केला होता. त्यावेळी प्रश्नोत्तराचा तास न घेता या विषयावर चर्चा केलेली आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शासनाला जे करणे शक्य आहे त्या पध्दतीचे पॅकेज त्यांनी जाहीर केलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे खरे आहे. या दरम्यानसुध्दा 12 शेतक-यांच्या आत्महत्त्या झाल्या, ही वस्तुस्थिती आहे. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या विषयावर चर्चा घेण्याची आपली विनंती आहे पण तसे न करता आता आपण प्रश्नोत्तराचा तास घेऊ या. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी आपल्याला औचित्याच्या मुद्यावर बोलण्याची परवानगी देतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्यावर मी प्रश्नोत्तराच्या तासानंतर बोलेन पण मी नियम 289 अनव्ये जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन चर्चा करण्याची परवानगी द्यावी. याचे कारण असे आहे की, या संदर्भात शासनाने जे पॅकेज जाहीर केले आहे ते अपुरे आहे. विदर्भातील धान उत्पादकांचा प्रश्न त्यामध्ये सामील झालेला नाही. धान उत्पादक शेतक-यांकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. विदर्भातीलन 11 जिल्हयांपैकी 6 जिल्हयांचा उल्लेख त्यामध्ये नाही. मराठवाडा तसेच खानदेशचाही त्यामध्ये उल्लेख नाही. म्हणून अत्यंत महत्वाचा असा हा प्रश्न आहे. तेव्हा नियम 289 नुसार आपण आम्हाला बोलण्याची परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

**सभापती** : मला असे वाटते की, पहिल्याच दिवशी याबाबतीत आपल्या तीव्र भावना होत्या त्या भावना समजून घेऊन मी त्या दिवशी प्रश्नोत्तराचा तास तहकूब केला आणि अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून आपल्या भावना या ठिकाणी मांडण्याच्या दृष्टीने आपल्याला बोलण्याची संधी दिलेली आहे. आज नियम 289 अन्वये दिलेली सूचना महत्वाची आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास पूर्ण करुन औचित्याच्या मद्याद्वारे मी ती सूचना माडंण्यास माननीय विरोधी पक्ष नेत्यांना संधी देईन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही समजू शकतो की, प्रश्नोत्तराचा तास झाला पाहिजे पण प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर तरी नियम 289 अनव्ये चर्चा उपस्थित करु द्यावी. दोन दिवसात 12 शेतक-यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. सरकारचे पॅकेज जाहीर झाल्या नंतरही शेतकरी आत्महत्या करतात याचा अर्थ हा विषय गंभीर झालेला आहे. विदर्भात दिवसेंदिवस तो विषय गंभीर होत आहे. हा प्रश्न अत्यंत तातडीचा असून विदर्भातील सर्व जिल्हयातील शेतक-यांना दिलासा देण्याच्यादृष्टीने ही चर्चा अत्यंत महत्वाची आहे. एक हजार विधवांनी नागपूरमध्ये पांचशील चौकामध्ये महात्मा गांधींच्या पुतळयासमोर आंदोलन सुरु केलेले आहे.....

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

धरणे धरुन बसलेले आहेत आणि म्हणून ज्यावेळी 1000 कुटुंबातील महिला येतात, आणि त्याला आपण मदत केली नाही तर त्यांच्यावर अन्याय झाल्यासारखे होईल. म्हणून आमची विनंती आहे की, अरापण आम्हाला नियम 289 अन्वये हा प्रश्न मांडण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून संरक्षण द्यावे व बोलण्याची परवानगी द्यावी, अशी आमची विनंती आहे.

**सभापती** : अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आपल्या तीव्र भावना आणि दुर्देवाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात असा ज्यावेळी प्रश्न आला त्याच दिवशी प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन आपण तातडीने चर्चा घेतली होती. त्यानंतरच्या काळात शासनाने पॅकेज जाहीर केले. आपले म्हणणे बरोबर आहे की, पॅकेज जाहीर केल्यानंतरच्या काळात सुध्दा 12 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या ही वस्तुस्थिती आहे. पण याबाबतीत वस्तुस्थिती जाहीर केल्यानंतर पुन्हा नियम 289 अंतर्गत आपण चर्चा घेण्याचा आग्रह करीत आहात त्याऐवजी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन त्या माध्यमातून आपला मुद्दा मांडण्यासाठी मी आपल्याला पाच ते दहा मिनिटांचा वेळ देईन. कृपया आपण खाली बसावे. आता आपण तारांकित प्रश्न क्र. 9288 चर्चेसाठी घेऊ.

--------------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा खुलासा**

**(1) * 9288 प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. सुधाकर गणगणे : तारांकित प्रश्न क्रमांक 5577 ला दिनांक 15 जुलै 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) उच्च शिक्षण संचालकांच्या परिपत्रकामध्ये वरिष्ठश्रेणीत 5 वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर निवडश्रेणीत स्थान निश्चिती करण्यात येईल, या वाक्याऐवजी वरिष्ठश्रेणीत 5 वर्षाची अट असण्याची आवश्यकता नाही, अशी सुधारणा करण्यात आल्यानंतर व शासनाने सुध्दा दिनांक 17 जून 2005 च्या पत्रान्वये तसा खुलासा करणा-या सूचना दिल्यानंतरही या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजाणी अजूनही झालेली नाही हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत विलंब होण्याची निश्चित कारणे काय आहेत,

(3) नसल्यास, या शासन खुलाशाप्रमाणे आतापावेतो विभागवार किती प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत,

(4) प्रलंबित असलेल्या विभागवार प्रकरणांची संख्या किती आहे ?

**श्री. सुरेश शेट्टी,श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (1), (2) व (3) शासनाने दिनांक 17.6.2005 च्या पत्रान्वये केलेल्या खुलाशानुसार संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कार्यवाही सुरु केली आहे. दिनांक 31.8.05 पर्यंत विभागीय स्तरावरुन महाविद्यालयाकडून प्रकरणांची माहिती घेण्यात आली. त्यानुसार 8069 अधिव्याख्यात्यांची माहिती महाविद्यालयांनी सादर केलेली आहे. छाननीअंती त्यापैकी सुमारे 4660 अधिव्याख्यात्यांना लाभ मिळेल. या अधिव्याख्यात्यांची प्रकरणे त्यांच्या सेवापुस्तकानुसार तपासून त्यांचे निवडश्रेणीतील स्थान निश्चितीचे आदेश देण्यात येतील. प्रकरणांची संख्या जास्त असल्याने विलंब होत आहे.

(4) मुंबई 728, पुणे 1042, कोल्हापूर 1061, औरंगाबाद 363, जळगांव 410, नागपूर 573, अमरावती 251, नांदेड 232 अशी एकूण 4660 प्रकरणे आहेत.

----------

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो :--

" प्रश्न क्र. 4 च्या उत्तरामध्ये सुरुवातीला एकूण प्रस्ताव 4660 असून त्यातील 1981 प्रकरणांमध्ये कार्यवाही झालेली आहे व 2679 प्रकरणे प्रलंबित आहेत" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

प्रा. बी.टी. देशमुख : महोदय, माझी जी मागणी आहे त्याप्रमाणे एकाही बाबतीत करेक्शन होऊन या शिक्षकांचे वेतन सुरु झालेले नाही. खरे म्हणजे मागील वेळी 15 जुलै, 2005 रोजी

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....... ता.प्र.क्र.**9288**.........

माननीय मंत्री महोदयांनी एक महिन्यात आंत हे प्रकरण निकाली काढून एक महिन्यात तशी सुधारित वेतनश्रेणी देण्यात येईल असे सांगण्यात आले. त्याच थकबाकी दिली जाणार काय, असा प्रश्न विचारला होता त्याला "होय" असेही उत्तर माननीय मंत्री महोदयांनी त्यावेळी दिले होते. आज मंत्री महोदय म्हणतात की, 1981 प्रकरणांमध्ये अंतिम यादी प्रकरणी निर्णय दिला आहे परंतु राज्यात तो निर्णय एकाही ठिकाणी लागू झालेला नाही. याबाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, मंत्रिमंडळाने दिनांक 7.12.1999 ला निर्णय घेतला आहे. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "Government of India's suggestion on "revision of pay scale of teachers in Universities and Colleges following the revision of pay scale of Central Government employees on the recommendations of the 5th Central Pay Commission" dated 27th July, 1998 amended vide a letter dated 6th November, 1998 including UGC's notification dated 24th December, 1998 would be implemented by the State Government with recommended scales of pay as composite scheme with effect from 1.1.1996". आता 24 डिसेंबरचे नोटिफिकेशन कॅबिनेटने मंजूर केले त्यामध्ये ती समग्रसेवा धरली गेली पाहिजे. निवडश्रेणी मध्ये स्थाननिश्चिती करण्यासाठी वरिष्ठश्रेणीमध्ये 5 वर्षे सेवा झाली नसली तरी चालेल व त्याप्रमाणे जी.आर.काढला परंतु संचालकांनी 14 फेब्रुवारी रोजी एक चुकीचे परिपत्रक काढले. शासनाने ते परिपत्रक एक महिन्यात दुरुस्त करतो असे म्हटले पण आजपर्यंत एकही प्रकरण दुरुस्त केले नाही. मंत्री महोदयांनी त्यांच्या टेबलवरच फिक्सेशन करुन दिले आहे त्या प्रकरणांची संख्या 1981 एवढी सांगितली. त्या प्रकरणांचे फिक्सेशन झालेले आहे, अरिअर्स द्या असे मी म्हणत नाही, परंतु सन 1981 चे फिक्सेशन केलेले आहे. म्हणून आमची मागणी अशी आहे की, आठ दिवसात या शिक्षकांच्या वेतन पत्रकात दुरुस्ती केली जाईल काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 9288.....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते खरे आहे. शासनाने या सभागृहात 15 जुलैला आश्वासन दिले होते की, एक महिन्यामध्ये काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. परंतु यासंदर्भातील प्रक्रिया सुरु झाल्यानंतर अशी माहिती मिळाली की, यामध्ये खूप जास्त काम आहे तसेच यासंदर्भात पेंडींग केसेस 8000 होत्या. यासंदर्भात आम्ही स्क्रुटीनी केली, कॉलेजकडे यासंदर्भात मागणी करुन सुध्दा कॉलेजकडून माहिती वेळेवर आली नाही. त्यानंतर आम्ही फिल्डवर सर्व माहिती गोळा केली. आतापर्यंत खात्याकडे 8869 केसेस आलेल्या आहेत. त्यामध्ये आम्ही 4660 प्रपोजल क्लिअर केलेली आहेत. यामध्ये 2600 प्रकरणे बाकी आहेत ती 3 महिन्यात ती पूर्ण केली जातील. कार्यवाही पूर्ण करण्याच्या संदर्भातील काम जोरात चालू आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय मंत्रीमहोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात थोडासा गोंधळ घातलेला दिसतो. ज्या कॉलेजांनी माहिती वेळेवर पाठविली नाही त्या संदर्भात मी बोलत नाही कारण ती त्यांची चूक आहे. आपण सांगितले की, हे काम एक महिन्यात पूर्ण करु पण मी त्यासंदर्भात काही बोलत नाही. आपण मघाशी असे सांगितले की, आम्ही 1981 प्रकरणे क्लिअर केलेली आहेत. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी मुद्देसुद उत्तरे दिली पाहिजेत. परंतु तुम्ही एक महिन्यात काम पूर्ण करु असे सांगितल्यानंतर महाराष्ट्रात एक सुध्दा प्रकरण क्लिअर झालेले नाही. जी 1981 प्रकरणे क्लिअर झालेली आहेत ती तुमच्या टेबलावरच आहेत. आपण जी 1981 प्रकरणे क्लिअर केलेली आहेत त्या प्रकरणांच्या संदर्भात 8 दिवसात वेतनश्रेणी देऊन त्यांची सर्व अडचण दूर करावी.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, आठ दिवसात नाही, परंतु पुढच्या महिन्यापासून सुरु होईल.

प्रा. बी.टी.देशमुख : 1981 प्रकरणे आपण क्लिअर केलेली आहेत त्यांना पुढच्या महिन्यापासून लाभ मिळेल असे आता सांगितलेले आहे ना?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

प्रा. बी.टी.देशमुख : मग माझा प्रश्न असा आहे की, अजूनपर्यंत 2680 लोकांच्या बाबतीत निर्णय झालेला नाही. याच्यदृष्टीने जी प्रकरणे फिट आहे, आपल्याकडे 7-8 जॉईट डायरेक्टर, डायरेक्टर बसलेले आहेत. या प्रकरणाच्या संदर्भात अगोदरच 6-7 वर्षे अगोदरच विलंब झालेला आहे, यामध्ये चुकीची पत्रके सुध्दा काढण्यात आलेली आहेत खरे म्हणजे या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 9288.....

प्रा. बी.टी.देशमुख ........

प्रश्नाच्या संदर्भात आपण प्रायश्चित करुन घेतले पाहिजे. आपल्या टेलबलावर आता जी प्रकरणे आहेत त्या प्रकरणांच्या बाबतीत अजून काहीच झालेले नाही. या 1981 प्रकरणाच्या संदर्भात एक दोन महिन्यात कार्यवाही पूर्ण होईल असे आपण सांगितलेले आहे. परंतु या प्रश्नाच्या संदर्भातील कार्यवाही एक दीड महिन्यात पूर्ण करावी.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भातील काम जोरात चालू आहे. ही प्रपोजल क्लिअर होण्यासाठी 3 महिन्याचा कालावधी लागेल.

श्री. मधुकर चव्हाण :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो बरोबर आहे. आपल्याकडे जे नवीन डायरेक्टर आलेले आहे त्यांचे काम अतिशय चांगले आहे. यासंदर्भात मला सांगावयाचे आहे की, रिझर्व्हेशनच्या ज्या पोस्ट आहेत त्या अपडेट करण्यासाठी त्यांना 5-10 वर्षे लागली. परंतु सिलेक्शन ग्रेड करतांना ती रिझर्वेशन अगेन्ट दी पोस्ट धरली जाते असे जॉईट डायरेक्टर सांगतात त्यामुळे अशा त-हेच्या तांत्रिक मुद्यावर छोटया मोठया गोष्टी असतील तर त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशा प्रकारचा निर्णय आणि आदेश दिला जाणार आहे का?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या सदनात 15 जुलैला उत्तर देण्यात आले होते त्यामध्ये असे सांगण्यात आले होते की, ज्या टेक्नीकल महत्वाच्या केसेस असतील आणि त्यांच्या संदर्भात चुकीची ऑर्डर काढली गेली असेल तर त्यासाठी एक कक्ष निर्माण केला गेला तसेच एक कमिटी डायरेक्टर ऑफ हेल्थ एज्यूकेशन यांच्या अध्यक्षतेखाली 5 सदस्यांची एक कमिटी नेमली गेली असून अशी प्रक्रिया पुढे येणार आहे व ही कमिटी यावर योग्य तो निर्णय करेल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9288

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 2679 प्रकरणांच्याबाबत 3 महिन्यामध्ये कारवाई करू असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे हे. यामध्ये अस्पष्टता राहू नये असे मला वाटते. मंत्रिमहोदयांनी काही कारण नसताना 3 महिन्यांचा कालावधी लागेल असे सांगितले आहे. या विषयी पण मी वाद घालत नाही. 2679 प्राध्यापकांच्या प्रकरणी निर्णय करण्याचे काम तीन महिन्यामध्ये पूर्ण केले जाईल असे मंत्रिमहोदय म्हणाले ते बरोबर आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : होय.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मग माझा शेवटचा प्रश्न हा या लोकांच्या फरकासंबंधीचा आहे. म्हणून मी मंत्रिमहोदयांना मुद्दामहून प्रश्न विचारणार आहे. कारण या प्रकरणाच्या थकबाकीसंबंधी देखील ते वेळ मागून घेतील. म्हणून थकबाकीचे प्रकरण केव्हा अंतिम केले जाईल ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, टोटल केसेसेची स्क्रूटीनी झाल्यानंतर एक्झॅक्ट फिगर समोर आल्यानंतर पुढच्या बजेटमध्ये यासंबंधी तरतूद केली जाईल.

श्री.नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, निवडश्रेणीत स्थान निश्चिती करण्याबाबतचा प्रश्न आहे. या संपूर्ण प्रकरणासाठी किती रकमेची तरतूद केली आहे व ती केव्हा उपलब्ध होणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, टोटल केसेसची स्क्रूटीनी झाल्यानंतर आम्हाला संपूर्ण प्रकरणांचा निश्चित आकडा समजणार आहे. त्यानंतर मग पुढील बजेटमध्ये तरतूद केली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, करेक्शन न झाल्यामुळे थकबाकी राहिली आहे. माझे असे म्हणणे आहे की, कारण नसताना ही थकबाकी मागे रेंगाळत आहे. चूक केल्यामुळे करेक्शन निघत आहे. त्याची तरतूद करून पुढच्या बजेट नंतर ही व्यवस्था आपण कराल ही गोष्ट खरी आहे ना ? श्री.सुरेश शेट्टी : होय.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9288

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत श्रेणीत स्थाननिश्चिती करण्यासंबंधीचा प्रश्न आहे. यासंबंधी एक महिन्यामध्ये कारवाई केली जाईल असे योग्य उत्तर मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. या संदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली 5 सदस्यांची एक समिती नियुक्ती करण्यात आली होती. जी गोष्ट संचालक किंवा त्यांचे अधिकारी स्वत: तपासणी करून करू शकतात त्या गोष्टीसाठी पाच जणांची कमिटी नेमून त्यास विलंब लावण्याचे कारण काय आहे ? सदर प्रश्न टोलवण्यासाठी शासनाने समिती नेमली नाही का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, तीन महिन्यामध्ये काम पूर्ण करणार आहोत. एकूण किती प्रकरणे आहेत, त्यांची छाननी करण्यासाठी समिती नेमलेली आहे. सदर समिती चांगल्या प्रकारे काम करीत आहे. येत्या 2-3 महिन्यामध्ये संपूर्ण कार्यवाही पूर्ण होईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सभागृहात थातूरमातूर उत्तर देता कामा नये. एक महिन्यामध्ये, 30-35-40 दिवसामध्ये काम पूर्ण करू असे ठोस उत्तर दिले पाहिजे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, तीन महिन्यामध्ये काम पूर्ण करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थान निश्चिती प्रकरणासंबंधीचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही प्रश्न मंत्रिमहोदयांनी आपल्या टेबलावर डिस्पोज ऑफ केले आहेत, काही बाकी आहेत. शासन निर्णय चुकीचा केल्यामुळे किंवा शासकीय अधिकाऱ्यांनी चुकीचा अर्थ लावून निर्णय घेतल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे हे खरे आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये या विषयावर एक तास चर्चा झाली. जी.आर.मध्ये त्रुटी होत्या म्हणून ही परिस्थिती निर्माण झाली.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 34 वर असलेल्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. टप्प्याटप्प्याने अनुदानवर येणाऱ्या महाविद्यालयांच्या संबंधीचा प्रश्न आहे. सन 1998-99 साली टप्प्याटप्प्याने



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9288

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे......

अनुदानावर आलेल्या महाविद्यालयांना अद्यापि अनुदान मिळालेले नाही. सन 2002-2003 मध्ये 100 टक्के महाविद्यालये अनुदानावर आली आहेत. परंतु, त्या महाविद्यालयातील कर्मचारी, प्राध्यापक यांना अनुदान दिलेले नाही. तेव्हा येत्या बजेटमध्ये यासंबंधी तरतूद केली जाईल का ?

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9288..

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्नांशी संबंधित प्रश्न विचारलेला नाही. मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मला दालनात भेटल्यास मी त्याचे उत्तर देईन.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 11816 - ( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराच्या तासाला हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईट ऑफ इन्फर्मेशन आहे. ज्या सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारलेला आहे त्यापैकी एकही जण आज सभागृहात उपस्थित नाहीत. ते आज सभागृहात उपस्थित राहणार नाहीत याबाबत आपल्याला पत्रान्वये कळविले होते काय ? कारण अशा अनुपस्थितीमुळे सन्माननीय सदस्यांची बदनामी होते. हे घडता कामा नये. एवढेच मला म्हणावयाचे आहे.

**सभापती** : प्रश्न विचारलेल्या चारही सन्माननीय सदस्यांनी मला ते अनुपस्थित राहणार आहेत याबाबत कोणतेही पत्र वा पूर्वकल्पना दिलेली नाही. मी यापूर्वी सुध्दा सर्व सन्माननीय सदस्यांना सांगितले होते की, एखाद्या सन्माननीय सदस्याला काही अपरिहार्य कारणास्तव सभागृहात येता आले नाही तर त्याबाबतची कल्पना मला देणे आवश्यक आहे. कारण आपण प्रश्नोत्तरासाठी बराच खर्च करतो. जो प्रश्न येथे उपस्थित झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी गैरहजर राहणे हे योग्य नाही याची सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी. मी आता पुढील प्रश्न पुकारीत आहे.

-----------

.....3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आयुर्वेद-होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या खाजगी संस्थांच्या मॅनेजमेंट कोट्याच्या फी रचनेच्या स्वरुपाबाबत**

(3) * 9354 डॉ. दीपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनंत तरे , श्री. अरविंद सावंत श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब , डॉ. अशोक मोडक , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. रामनाथ मोते , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मेडिकल व डेंटल अभ्यासक्रमाप्रमाणे आयुर्वेद व होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या खाजगी वैद्यकीय कॉलेजच्या मॅनेजमेंट कोट्याची फी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार गठीत केलेल्या शिक्षण शुल्क समितीने ठरविल्याप्रमाणे आकारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आयुर्वेद व होमिओपॅथीच्या खाजगी संस्थांचा मॅनेजमेंट कोटा व राज्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या 10 % कोट्यासाठी आकारण्यात येत असलेल्या फी रचनेचे स्वरुप काय आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (1) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार गठीत केलेल्या शिक्षण शुल्क समितीने ठरविल्याप्रमाणे सन 2003-04 व सन 2004-05 या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क आकारण्यात येते. सन 2005-06 या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून मा.सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेल्या योजनेनुसार शैक्षणिक शुल्क आकरण्यात येते.

(2) आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन कोट्यातील 40 टक्के जागांचे शुल्क अनुक्रमे रु. 90,000/- आणि रु. 45,000/- तसेच 10 टक्के राज्याबाहेरील जागांचे शुल्क अनुक्रमे रु. 1,80,000/- आणि रु. 90,000/- इतके शुल्क ठरविण्यात आले आहे. ज्या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता 50 किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा महाविद्यालयांना सदरहू शैक्षणिक शुल्कामध्ये अधिक 15 टक्के शुल्क घेण्याच्या योजनेस मा.सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9354.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आयुर्वेद आणि होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या खाजगी वैद्यकीय कॉलेजच्या मॅनेजमेंट कोट्याच्या फी संदर्भातील हा प्रश्न आहे. ही फी पंडित शुल्क समितीने निर्धारित केलेली आहे. ही फी होमिओपॅथीच्या 43 कॉलेजेस आणि आयुर्वेदच्या 53 कॉलेजेसना लागू केलेली आहे. ही फी लागू करताना पंडित शुल्क समितीने त्या त्या कॉलेजेसमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर आहे की नाही हे पाहिले होते. हे सर्व पाहिल्यानंतर पंडित शुल्क समितीने फी निश्चित करण्यात आली होती. त्या समितीने ही फी निश्चित करुन दिल्यानंतर देखील त्यामध्ये 15 टक्के सूट दिलेली आहे याचे कारण काय ? तसेच या सर्व कॉलेजेसमध्ये प्रयोगशाळांसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा तसेच क्वॉलिफाईड स्टाफ उपलब्ध आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपण मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासंबंधी गेल्या दोन वर्षात याठिकाणी खूप चर्चा केलेली आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, पंडित शुल्क समिती ही कोर्टाने नेमली होती आणि त्या समितीने फी निश्चित केलेली आहे. या समितीपुढे मेडीकल, आयुर्वेद तसेच होमिओपॅथी कॉलेजच्या अधिकाऱ्यांनी कॉलेजमध्ये कोणकोणत्या सुविधा पुरविण्यात येतात यांसबंधी माहिती दिली होती. या सर्व माहितीवर पंडित शुल्क समितीने फी निश्चित केली होती. परंतु जी खाजगी कॉलेजेस होती त्यांनी ही फी मान्य केली नाही. कारण या फी प्रमाणे विद्यार्थ्यांना ॲडमिशन दिल्यास ते लॉसमध्ये जाणार असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे ती कॉलेजेस कोर्टामध्ये गेली. त्यानंतर दिनांक 24.7.2005 रोजी महाराष्ट्र शासनाने असोसिएशन ऑफ प्रायव्हेट मेडिकल कॉलेजेस बरोबर एक ट्रायपार्टाईट एम.ओ.यु.साईन केला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9354....

श्री.सुरेश शेट्टी....

तसेच आयुर्वेद आणि होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या शुल्कासंदर्भात दिनांक 26 ऑगस्ट, 2005 रोजी एम.ओ.यु. झाला. मेडिकल कॉलेजच्या अभ्यासक्रमासंदर्भात ॲव्हरेज फी 2 लाख 30 हजारपर्यंत निश्चित केली आहे. डेंटल अभ्यासक्रमासाठी 1 लाख 65 हजार, आयुर्वेद कॉलेजसाठी 90 हजार, होमिओपॅथीसाठी 45 हजार रुपये या करारानुसार शुल्क ठरविण्यात आले होते सन्माननीय मंत्रिमहोदय, विरोधी पक्षनेते, गटनेते या सर्वांना विश्वासात घेऊन एम.ओ.यु. साईन करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दुसरा प्रश्न फी ठरविल्यानंतर त्या ठिकाणी स्टाफ आहे की नाही यासंदर्भात विचारलेला आहे. मी त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, एक वर्षापूर्वी यासंदर्भात तक्रार आल्यानंतर महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्रात जितके मेडिकल आयुर्वेद कॉलेजेस आहेत त्यांची तपासणी करुन, अहवाल सादर करण्यासंदर्भात डायरेक्शन्स दिल्या होत्या. त्यानुसार कॉलेजेसची तपासणी केल्यानंतर कन्सॉलिडेटेड रिपोर्ट माननीय राज्यपाल महोदयांना सादर करण्यात आला. त्या रिपोर्टच्या कॉपीज ऑल इंडिया मेडिकल कौन्सिल आणि संबंधित ॲथॉरिटींना दिल्या गेल्या. त्या रिपोर्टमध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या त्रुटी सुधारण्यासंदर्भात त्या कॉलेजेसना 6 महिन्यांची वेळ देण्यात आली. महोदय, ती मुदत आता संपलेली आहे. असोसिएशन ऑफ मेडिकल कॉलेजच्या वतीने एक चिठ्ठी आली आहे की, त्रुटी दूर करण्यासाठी एक जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. जानेवारीपर्यंत सर्व त्रुटी दूर करु असे त्यांनी कळविले आहे.

श्री.विलास अवचट : महोदय, होमिओपॅथीक आणि आयुर्वेद अभ्यासक्रमासाठी राज्य शासन आणि केंद्र सरकार यांच्याकडून दरवर्षी अनुदान प्राप्त होते. पोतदार कॉलेजला 2 कोटी रुपयांचे अनुदान दिले गेले होते, परंतु त्या कॉलेजने त्या अनुदानाचा वापर केला नाही. अनुदान देत असताना शासनाने काही टर्म अँड कंडिशन्स घालून दिल्या होत्या काय ? जर घालून दिल्या असतील तर या अनुदानाचा वापर न केल्यामुळे आपण याबाबत काय कार्यवाही करणार आहात ? मेडिकल होमिओपॅथीसाठी कोणतीही नियमावली ठरविलेली नसताना कॉलेजने 20 लाख रुपये कोणत्या आधारावर जमा केले ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी जे प्रश्न विचारले आहेत ते या प्रश्नाशी निगडीत नाहीत. तरीसुध्दा मी त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती घेऊन सांगतो.

डॉ.दीपक सावंत : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मी हरकतीच्या मुद्याला परवानगी देणार नाही.

ॲड.अनिल परब : आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, पंडित शुल्क समितीसमोर जी माहिती आली ती तपासून त्याबाबतचा अहवाल राज्यपाल महोदयांकडे पाठविला आहे. परंतु..

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी दोन इश्यू आहेत. पंडित शुल्क समितीकडे जो प्रश्न आहे तो फी फिक्सेशन करण्यासंदर्भातील आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी इन्फ्रास्ट्रक्चरच्या त्रुटीसंदर्भात प्रश्न विचारला होता, त्या प्रश्नाच्या अनुषंगानेच मी माननीय राज्यपाल महोदयांचा उल्लेख केला आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, पंडित शुल्क समितीसमोर इन्फ्रास्ट्रक्चरसंदर्भात जी माहिती येते त्या माहितीची तपासणी केली जाते काय ? कारण बऱ्याचदा कॉलेजने पाठविलेली माहिती ग्राहय धरुन पुढील काम केले जाते. फेरतपासणी केल्यानंतर किती कॉलेजमध्ये गैरव्यवहार आढळला आहे? किती कॉलेजवर कारवाई केली आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पंडित शुल्क कमिटी कोर्टाच्या आदेशानुसार झालेली आहे. या समितीचे जे काम आहे त्यामध्ये शासन इंटरफेअर करु शकत नाही.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र...9354..

ॲड.अनिल परब : सभापती महोदय,या संस्थांकडून जी माहिती पाठविण्यात येते त्या माहितीची फेर तपासणी केली जाते काय ? आणि जर ती केली जात असेल तर एखाद्या संस्थेच्या बाबतीत पाठविण्यात आलेली सर्व माहिती बरोबर असू शकते परंतु काही संस्थांच्या बाबतीत तृटी असू शकतात तेव्हा ज्या संस्थांच्या माहितीमध्ये तृटी आहे त्या बाबत शासन काय कारवाई करणार आहे ? असा मला माननीय मत्रिमहोंदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे .

श्री.सुरेश शेट्टी : शासनाकडे जितक्या तक्रारी आलेल्या आहेत वा जितकी माहिती आलेली आहे ती माहिती वा प्रत्येक कॉलेजेसच्या माहितीमध्ये जो ड्रॉ बॅक आहे त्यासंबंधीची सर्व माहिती पंडित समितीकडे पाठविण्यात आलेली आहे आणि त्याबाबतीत योग्य ती कारवाई करण्याची विनंती शासनाने त्यांना केलेली आहे.

ॲड.अनिल परब : कारवाई करण्याचे अधिकार शासनाला आहेत की पंडित समितीला आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी :कारवाई करण्याचे अधिकार शासनाला आहेत परंतु फी ठरविण्याच्या बाबतीत ...

ॲड.अनिल परब : माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. कारवाई करण्याचे अधिकार जर शासनाला असतील तर माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये दुरुस्ती करावयास पाहिजे.मघाशी उत्तर देत असतांना माननीय मत्रिमहोदयांनी असे सांगितले की ,कारवाई करण्याकरिता पंडित समितीकडे माहिती पाठविण्यात आलेली आहे. तेव्हा कारवाई करण्यासबंधीचा अधिकार शासनाला आहे की या पंडित समितीला आहे ? शासन आणि पंडित समिती या दोन्ही पैकी नक्की कोण कारवाई करणार आहे ? या बाबतीत मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री.सुरेश शेट्टी :जी.आर.मध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, त्या संस्थेचे इनफ्रास्ट्रक्चर व्हेरिफाय करण्याचे काम पंडित समितीचे आहे....

ॲड.अनिल परब : एखाद्या संस्थेच्या विरुध्द कारवाई करावयाची असेल तर ही कारवाई शासन करणार आहे की पंडित समिती करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : कॉलेजेसकडून जी माहिती येते ती माहिती व्हेरिफाय करण्याचे काम या पंडित समितीचे आहे. एखाद्या संस्थेने चुकीची माहिती दिलेली असेल तर त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9354 .....

ॲड..अनिल परब :सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. आता माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे पंडित समितीने कॉलेजेसचे मूल्यमापन केलेले आहे.एखाद्या कॉलेजला परवानगी देत असतांना काही अटी घालण्यात येतात. उदाहरणार्थ त्या ठिकाणी 100 कॉटस असलेले हॉस्पिटल असले पाहिजे. त्या कॉलेजेसमध्ये क्वालिफाईड स्टाफ असला पाहिजे वगैरे वगैरे.काही कॉलेजेसमध्ये क्वालिफाईड स्टाफ नसतो किंवा हॉस्पिटलसुध्दा नसते.या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब जो प्रश्न विचारत आहे तो अगदी बरोबर आहे. एका एका विद्यार्थ्याकडून 45 हजार रुपये फी घेण्यात येते. एखाद्या संस्थेमध्ये 100 विद्यार्थी असतील तर 45 हजार रुपयाप्रमाणे या सर्व विद्यार्थ्याकडून 45 लाख रुपयाची फी सबंधित संस्थेचे चालक वसूल करीत असतात आणि हा अभ्यासक्रम चार वर्षाचा असेल तर जवळजवळ अडीच कोटी रुपयाची फी संस्थाा चालक वसूल करतात. त्यापैकी 30 ते 35 लाख रुपये पगारासाठी खर्च करतात आणि बाकीचे सगळे पैसे हे संस्था चालक खातात. त्यामुळे अशा संस्था मधील विद्यार्थ्यांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळत नाही. अशा कॉलेजेसच्या विरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, मी अगोदरच त्याबाबतीत सांगितलेले आहे.....

श्री.जयंत प्र.पाटील : माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. या अभ्यासक्रमांची फी किती असावी हे ठरविण्याच्या बाबतीत हायकोर्टाने या समितीला सांगितलेले आहे. मला माननीय मत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, एखादे कॉलेज सुरु करण्याची परवानगी देत असतांना काही अटी व शर्ती त्या संस्थेवर घालण्यात येतात परंतु त्याचे पालन या संस्था करीत नाहीत तेव्हा अशा संस्थेच्या विरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : मेडिकल कॉलेजेसचे इन्सपेक्शन करण्याचे काम मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाचे आहे. मेडिकल कॉलेजेस सुरु करीत असतांना मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाकडून काही अटी व नियम घालण्यात येत असतात त्याप्रमाणे एम.सी.आय.कडून त्याबाबतीत तपासणी केली जात असते.त्यासंदर्भात जर एखाद्या संस्थेमध्ये काही त्रुटी आढळून आली असेल तर एम.सी.आय.सबंधित संस्थेला नोटीस पाठवून त्रुटी दूर करण्याच्या बाबतीत कळवत असते .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या नंतरसुध्दा जर त्या संस्थेने त्रुटी दूर केल्या नाहीत तर एम.सी.आय. त्यांच्याविरुध्द कारवाई करीत असते.एखाद्या संस्थेची मान्यता काढून घेणे किवा त्यांच्या विरुध्द जी काही कारवाई करावी असेल ती कारवाई एम.सी.आय.कडून केली जाते. एखाद्या संस्थेमध्ये त्रुटी आहेत अशा प्रकारची जर शासनाकडे तक्रार करण्यात आली असेल तर आम्ही एम.सी.आय.ला कळवितो आणि त्या तृटी दूर करुन घेण्यास सांगतो व त्याप्रमाणे एम.सी.आय. ॲक्शन घेत असते.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आयुर्वेद आणि होमिओपॅथी कॉलेजेसमध्ये विद्यार्थ्याकडून जी फी घेण्यात येते त्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती दिलेली आहे. या बाबतीत माझा प्रश्न असा आहे की,आयुर्वेद आणि होमिओपॅथी कॉलेजेस काढण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे . तेव्हा कोणत्या कॉलेजेसना ही परवानगी देण्यात आलेली आहे त्यासबंधीची तपशीलवार माहिती माननीय मत्रिमहोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी....

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.गोऱ्हे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 9354 ...

बऱ्याच वेळेस जास्त फी घेण्याचा प्रसंग परत परत उद्भवतो. त्यामध्ये पालकांची फसवणूक होत असते. तेव्हा या संबंधात आपण काय उपाय योजना केलेली आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नासंबंधीची सर्व माहिती माझ्याकडे आहे आणि ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. त्यानंतर त्यांच्या दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगू इच्छितो की, कॉलेजांची फी ठरविल्यानंतर त्याबाबतची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वेबसाईटवर आपण देऊ. जेणे करून लोकांना ती सहज उपलब्ध होऊ शकेल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही अनेक प्रश्न माननीय राज्यमंत्र्यांना विचारले पण त्यांनी त्यासंबंधात गोल गोल उत्तरेच दिली आहेत. तेव्हा आता मी त्यांना आपल्यामार्फत नेमका प्रश्न विचारतो, त्याचे त्यांनी नेमके उत्तर द्यावे अशी विनंती करतो. सभापती महोदय, मध्यंतरी मुंबईतील चंदाबेन होमिओपॅथी मेडिकल कॉलेजची आपण चौकशी लावली होती. तेव्हा त्या मेडिकल कॉलेजच्या शिक्षकांना वगैरे पाचवा वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जात आहे किंवा काय याची माहिती आपल्या त्या चौकशी मध्ये आली आहे काय ? तसेच इतर जी होमिओपॅथी आणि आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजेस आहेत त्यातील शिक्षक आणि शिक्षकेतरांना पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन दिले जात आहे काय ? हे मी यासाठी विचारतो आहे की, पंडित समितीसमोर या सर्वच कॉलेजांच्या व्यवस्थापनांनी खोटी माहिती दिलेली आहे की, आम्हाला आमच्या शिक्षकांना वगैरे पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन द्यावे लागते आहे त्यामुळे आमचा खर्च वाढलेला आहे आणि त्यामुळे आम्हाला अमुक इतकी फी वाढवून दिली पाहिजे. तेव्हा आपण स्वत: चंदाबेन होमिओपॅथी मेडिकल कॉलेजची चौकशी केली होती त्यामध्ये आपल्याला याबाबत काय आढळून आले ? तसेच अशा प्रकारच्या कॉलेजांमध्ये शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगा नुसार वेतन मिळेल अशी भूमिका आपण घेणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, विलेपार्ले येथील होमिओपॅथी कॉलेजसंबंधी दीड दोन वर्षापूर्वी चौकशी लावली होती हे बरोबर आहे. परंतु ही चौकशी आपण तेथे पाचवा वेतन आयोग लागू आहे किंवा काय या संबंधात नव्हती तर तेथे शासनाचा दवाखाना आहे त्यासंबंधात चौकशी लावली होती. दुसरे असे की, आम्ही सर्वच मेडिकल कॉलेजांना कळविले आहे की, त्यांनी त्यांच्याकडील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग लागू केला पाहिजे. आता पंडित समितीपुढे येऊन

..... एच 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (पुढे चालू...) ता.प्र.क्र.9354 ...

सर्वांनीच मान्य केले आहे की, आम्ही पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन देतो आहोत. तेव्हा अशा एखाद्या स्पेसिफिक संस्था आमच्यासमोर आली की, अमुक कॉलेज हे पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन देत नाही तर आम्ही त्यांच्यावर त्याबाबत योग्य ती कारवाई करू.

****

**तारांकित प्रश्न क्रमांक 11456**

सन्माननीय सदस्य अनुपस्थित.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जाणुन बुजून प्रश्नाला अनुपस्थित रहात आहेत. आपण त्यांना त्याबद्दल ताकीद दिली पाहिजे. ....

( काही विरोधी पक्ष सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा द्यद्य )

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे. मी यापूर्वी अनुक्रमांक 2 वर असलेल्या ता.प्र.क्र.11816 च्या बाबतीत जे सांगितले आहे त्याच पद्धतीने आताच्या अनुक्रमांक 4 वरील ता.प्र.क्र.11456 च्या बाबतीत देखील प्रश्न देणारे जे सदस्य आज सभागृहामध्ये उपस्थित नाहीत, त्यांच्याबाबतीत सांगू इच्छितो. त्यांच्या पक्ष प्रतोदांना मी असे सांगून की, त्यांची सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना प्रश्नाचे वेळी सभागृहामध्ये हजर राहण्यास सूचना द्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, तशी सूचना सन्माननीय सदस्यांना आम्ही देऊ.

**सभापती** : त्यांना तसे लेखी कळविण्याची काही आवश्यकता नाही. ठीक आहे. आता मी या पुढील प्रश्न पुकारतो.

***

..... एच 3 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सोलापूर विद्यापीठाला शासनाकडून न मिळालेला निधी**

**(5) * 9588 श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, डॉ. अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. सुधाकर गणगणे, मेजर सुधीर सावंत, श्रीमती सुधा जोशी, श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी : तारांकित प्रश्न क्रमांक 7113 ला दिनांक 22 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 22 जुलै, 2004 रोजीपासून सुरु करण्यात आलेल्या सोलापूर विद्यापीठास, उद्‌घाटन प्रसंगी घोषीत केलेल्या रु. 8 कोटी 75 लाख पैकी आतापर्यंत किती निधी प्रत्यक्ष देण्यात आला आहे,
(2) निधी अभावी सदर विद्यापीठाची अनेक महत्वपूर्ण कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,
(3) सन 2005-2006 या वित्तीय वर्षात तरतूद करण्यात आलेल्या निधी व्यतिरिक्त,सोलापूर विद्यापीठास अतिरिक्त निधी देण्याबाबतची शासनस्तरावर सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(4) सोलापूर विद्यापीठास खऱ्या अर्थाने स्वायत्त बनविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांचेकरिता** : (1) सोलापूर विद्यापीठास सन 2004-05 या वित्तीय वर्षात रु. 1.00 कोटी मंजूर करण्यात आले आहेत. तसेच विद्यापीठास संरक्षक भिंत बांधण्याकरीता रु. 2.00 लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे.
(2) विद्यापीठात पदनिर्मिती करण्यासाठी व इमारत बांधकामासाठी निधी मिळणेसाठी विद्यापीठाने मागणी केली आहे.
(3) व (4) सन 2005-06 या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पामध्ये रु. 1.00 कोटीची तरतूद करण्यात आली असून या व्यतिरिक्त सन 2005-06 या वित्तीय वर्षात इमारत बांधकामासाठी रु. 2.00 कोटीची तरतूद पुरवणी मागणीद्वारे करण्यात आली व ती विद्यापीठाला मंजूर करण्यात आली आहे. सोलापूर विद्यापीठाला पूर्वीच्या शिवाजी विद्यापीठाच्या सोलापूर येथील उपकेंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची 62 पदे देण्यात आलेली आहेत. विद्यापीठासाठी आवश्यक असलेली 5 संविधानिक पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. विद्यापीठासाठी नवीन पदनिर्मितीचा व जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... आय 1 ..

ता.प्र.क्र. 9588..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अशाचप्रकारचा प्रश्न 22 जुलै 2005 ला विचारला होता. आणि त्यावर अशाचप्रकारचे उत्तर दिले होते. हे जे सोलापूर विद्यापीठ आहे. त्याचा उद्घाटन समारंभ 22 जुलै 2004 रोजी झाला आहे. आणि 2004 ते 2005 मध्ये हे विद्यापीठ सुरु झाले आहे. आज 12 डिसेंबर 2005 हा दिवस आहे, परंतु आजपर्यंत या विद्यापीठाला अनुदान मिळाले नाही. छापील उत्तरावरुन असे दिसते की, 8 कोटी 75 लाखाची घोषणा केली असतांना प्रत्यक्षात 3 ते 4 कोटी या विद्यापीठाला दिले आहेत. त्याचा परिणाम असा झाला की, हे विद्यापीठ सुरु झाल्यानंतर त्या ठिकाणी बांधकामे करणे, पदे भरणे निधीच्या अनुपलब्धतेमुळे होऊ शकेलेले नाही. त्यामुळे हे विद्यापीठ अजून अपूर्ण अवस्थेत आहे. 22 जुलै रोजी प्रश्न विचारला होता की, यासंबंधीची कार्यवाही केव्हा पूर्ण होणार आणि उर्वरीत निधी विद्यापीठाला केव्हा उपलब्ध करुन देणार? तोच प्रश्न मी पुन्हा आपणास विचारीत आहे?

श्री. सुरेश शेट्टी : मागील अधिवेशनामध्ये सोलापूर विद्यापीठासंबंधी चर्चा झाली होती. त्यानंतर 7 नोव्हेंबर 2005 रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी स्वत: वित्त व इतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निर्णय घेतला. एकूण 8.60 कोटींच्या निधीचा प्रस्ताव असून त्यापैकी 4 कोटींचा निधी उपलब करुन दिला आहे. बाकीचे पैसे फेज्ड मॅनर्समध्ये द्यावेत असा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाला 95 पदे भरण्यासाठी परवानगी दिली आहे. तसेच, विद्यापीठाला गृह विभागाकडे असलेली जमीन मिळेल असे वाटत होते.परंतु ती जमीन विद्यापीठाला मिळणार नाही असे समजले आहे. म्हणून दुसऱ्या एक-दोन ठिकाणी जागा शोधण्याचे काम चालू आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे विद्यापीठ सुरु होऊन दीड वर्षे झाले. तेव्हापासून या विद्यापीठाला पुरेसा निधी दिला जात नाही, जमीन उपलब्ध करुन दिली जात नाही, पदे भरण्याचा प्रयत्न केला जात नाही. तेव्हा विद्यापीठाला किती दिवसात निधी उपलब्ध करुन देणार? जमिनीचे प्रकरण किती दिवसात निकालात काढणार? बांधकाम सुरु करण्यासाठी आपण किती दिवसात निधी देणार?

श्री. सुरेश शेट्टी : विद्यापीठाला 50 टक्के निधी दिला आहे व पदे भरण्यासाठी परवानगी दिली आहे....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदय मोघम उत्तर देत आहेत...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांना प्रश्न विचारण्याचा जरुर हक्क आहे. परंतु आपण मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करण्याची संधी दिली पाहिजे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, विद्यापीठाला पदे भरण्यासाठी परवानगी दिली आहे. पदे भरण्याचे काम विद्यापीठाचे आहे. जमिनीबाबत वाद आहे, त्यामध्ये वेगवेगळया विभागांचा संबंध आहे. माननीय मुख्यमंत्री यामध्ये स्वत: इंटरेस्ट घेऊन यासंबंधी फॉलोअप करीत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर यासंबंधी निर्णय होईल व ते काम सुरु होईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मला मंत्रिमहोदयांना वेगळा प्रश्न विचारावयाचा आहे. प्रश्न 2 मध्ये म्हटले आहे की, "निधी अभावी सदर विद्यापीठाची अनेक महत्वपूर्ण कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय?" या प्रश्नाला उत्तर देतांना "विद्यापीठात पदनिर्मिती करण्यासाठी व इमारत बांधकामासाठी निधी मिळणेसाठी विद्यापीठाने मागणी केली आहे." असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे क्रमांक 17 वरील "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अडचणी"संबंधी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाला सुध्दा अशाच प्रकारचे उत्तर देण्यात आले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/RJW पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:45

ता.प्र.क्र.9588 . . . .

डॉ.अशोक मोडक . . . .

सभापती महोदय, प्रश्न साधा आहे. विद्यापीठाला निधी न मिळाल्यामुळे मग ते सोलापूर विद्यापीठ असेल किंवा नांदेड येथील स्वामी रामानंद तीथ विद्यापीठ असेल, ही दोन्ही विद्यापीठे अडचणीत आली आहेत. पण दुर्दैवाने त्याबाबतीत सरळ उत्तर दिलेले नाही. दोन्ही विद्यापीठांच्या बाबतीत दिलेली उत्तरे सारखीच आहेत की, दोन्ही विद्यापीठांकडून शिक्षकांची पदे मंजूर करण्याच्या संबंधी आणि निधीच्या संबंधीचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. मग चर्चा कशासाठी करावयाची ? गेल्या वर्षापासून आम्ही प्रश्न विचारीत आहोत. ही दोन्ही विद्यापीठे नवीन आहेत आणि तेथील विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना जे भोगावे लागत आहे, त्याला शासन जबाबदार आहे. पण तुम्ही त्यासंदर्भात उत्तर देत नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2004-2005 मध्ये एक कोटी रुपये दिले आहेत आणि 2005-2006 मध्ये परत एक कोटी रुपये दिले आहेत आणि त्यानंतर 2 कोटी रुपये . . . .

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मला क्षमा करावी. ही विद्यापीठे अडचणीत आली आहेत का ? याबाबतीत "होय" किंवा "नाही" एवढेच सांगावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, विद्यापीठाने 8.75 कोटीचे प्रपोजल पाठविले होते, त्यातील 4 कोटी रुपये त्यांना देण्यात आलेले आहेत.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, प्रश्न काय आहे आणि उत्तर काय दिले जात आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य निधीबद्दल प्रश्न विचारीत आहेत आणि आम्ही 50 परसेंट रक्कम दिलेली आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, विद्यापीठ अडचणीत आले आहे का ? हा खरा प्रश्न आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, महाराष्ट्रात विद्यापीठांसाठी पैशाची अडचण आहे असे नाही तर सर्व खातेच पैशाच्या अडचणीत आहे हे सर्वांना माहिती आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना एकदम बोलावयाचे असेल तर मी कोणालाही बोलण्यासाठी परवानगी देणार नाही. सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी प्रश्न विचारावा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9588 . . . .

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून संरक्षण पाहिजे. सोलापूरचे विद्यापीठ असो किंवा नांदेड येथील विद्यापीठ असो, याठिकाणी दोन्हींच्या बाबतीत एकच प्रश्न विचारलेला आहे की, निधी न मिळाल्यामुळे किंवा निधीच्या अभावी ही विद्यापीठे अडचणीत आली आहेत का ? माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत सरळ "होय" असे म्हणावे. मग स्वाभाविक पणे माननीय विरोधी पक्षनेते मघापासून जो प्रश्न विचारीत आहेत, त्याचा रिलेव्हन्स् लक्षात येईल. आम्ही गेले वर्षभर हा प्रश्न उपस्थित करीत आहोत. पण त्याचे उत्तर मिळत नाही. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सोलापूर विद्यापीठाने 8.75 कोटी रुपयांची प्रपोजल पाठविले होते, त्यातील 4 कोटी रुपये रिलीज केले आहेत आणि मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी जी बैठक घेतली होती, त्यामध्ये असा निर्णय झाला की, माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय राज्यपाल यांना पत्र लिहावे. शिवाजी युनिव्हर्सिटीकडे जो रिझर्व फंड आहे, त्याचा काही भाग प्रपोर्शनेटमध्ये नवीन विद्यापीठांना दिला पाहिजे. शिवाजी विद्यापीठाकडील कॉलेजेस या नवीन विद्यापीठांमध्ये आली असल्याने त्या प्रपोर्शनेटमध्ये हा फंड देण्यात यावा यासाठी माननीय मुख्यमंत्री माननीय राज्यपालांना पत्र लिहिणार आहेत. तसे झाल्यानंतर हा निधी नवीन विद्यापीठांना उपलब्ध होईल आणि मग त्यांच्या कामामध्ये काहीही अडचण येणार नाही.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, याठिकाणी जे प्रश्न उपस्थित करीत असताना सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी सोलापूर विद्यापीठाचा आणि नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचा उल्लेख केला. पण ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविज्ञान विद्यापीठाचा उल्लेख करण्यास विसरले आहेत असे वाटते. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी आर्थिक अडचणीबाबत बोलताना सांगितले की, सर्वच विद्यापीठे अडचणीत आहेत. तर शासन यापुढे तरी कुठेही नवीन विद्यापीठ काढले जाणार नाही असा निर्णय घेणार आहे का ?

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, पण जी बाळे जन्माला घातलेली आहेत, त्यांचे संगोपन कधी करणार ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, नवीन विद्यापीठ काढणार की नाही याबद्दल मी आता ऑफहॅन्ड उत्तर देऊ शकत नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9588 (पुढे सुरु..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा साधा आणि स्पेसिफीक प्रश्न आहे की, या विद्यापीठाचे 22 जुलै 2004 ला उद्‌घाटन झाले, उद्‌घाटनप्रसंगी राज्याचे महामहीम राज्यपाल उपस्थित होत. राज्यपालांच्या समक्ष 8 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याबाबत शब्द दिलेला होता. राज्यपाल महोदयांचा मान ठेवणार नसाल आणि निधी उपलब्ध करुन देणार नसाल तर ते बरोबर नाही. जागेसंबंधी गृह खात्याचा नकार आहे. माझ्या माहितीप्रमाणे 400 ते 500 एकर जागेची आवश्यकता आहे. आतापर्यन्त किती जागा यासाठी उपलब्ध झाली आणि अजून किती जागेची आवश्यकता आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : हे खरे आहे की, अजून जागा उपलब्ध झालेली नाही . केगाव, कोंडी गावाजवळील दोन जागा आयडेंटीफाय केलेल्या आहेत. तेथील लवकरात लवकर जागा उपलब्ध झाल्यानंतर फंडस् रिलीज करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : अजून विद्यापीठासाठी किती जागेची आवश्यकता आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : विद्यापीठासाठी कमीतकमी 200 एकर जागा लागणार आहे. जी उपलब्ध जागा होत आहे, ती तपासून घेण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी : उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, सोलापूर विठापीठास सन 2004-2005 या वित्तीय वर्षामध्ये 1 कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत. आता वर्ष तर संपलेले आहे. मंजूर करण्यात आलेले 1 कोटी रुपये विद्यापीठाला उपलब्ध करुन दिले आहेत काय, दिले असल्यास, ते पैसे कशाप्रकारे खर्च केलेले आहेत ? तसेच या विद्यापीठास संरक्षक भिंत बांधण्याकरिता 2 लक्ष रुपये एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. हा 2 लक्ष रुपयाचा निधी विद्यापीठास मिळालेला आहे काय ? संरक्षक भिंतीचे काम झालेले आहे काय, या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे ?

अनेक सन्माननीय सदस्य : अजून जमिनीचाच पत्ता नाही.

श्री.सुरेश शेट्टी : मी मघाशी सांगितलेले आहे.

(अनेक विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकाचवेळी प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एक कोटी रुपये दिलेले आहेत....

....(अडथळा)...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

**सभापती** : विद्यापीठासाठी जमीन मिळविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. दोन ठिकाणच्या जमीनीचे पर्याय आहेत. सन 2004 ला विद्यापीठ सुरु झाले. यासाठी जमीन लगेच मिळणार आहे, असे काही नाही. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे दिसते की,जमीन लगेच उपलब्ध व्हावी आणि विद्यापीठाला लागणारी आर्थिक तरतूद लवकर व्हावी. मला वाटते की, या प्रश्नावर भरपूर चर्चा झालेली आहे.

(विरोधी बाकावरील सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे रहातात.)

...(अडथळा)....

**सभापती** : आता शेवटचा प्रश्न सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे विचारतील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : प्रश्न क्रमांक दोनच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हटलेले आहे की, पद निर्मिती करण्यासाठी आणि इमारत बांधकामासाठी निधी मिळविण्यासाठी विद्यापीठाने मागणी केलेली आहे. निधीअभावी सदर विद्यापीठाची अनेक महत्वपूर्ण कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय ?

...(अडथळा)...

श्री.पांडुरंग फुंडकर : आमच्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

...(अडथळा)...

प्रा.जोगेंद्र कवाडे : या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये बगल दिलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : आमच्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही म्हणून आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

प्रा.जोगेंद्र कवाडे : सोलापूर विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ आणि सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार साहेबांनी सांगितलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रनिकेतन विद्यापीठ यांची महत्वपूर्ण कामे अपूर्ण आहेत. ही विद्यापीठे स्वयंपूर्ण व्हावीत, या दृष्टीकोनातून निधीसहीत आणि जागेसहीत प्रयत्न होऊन या बाबी उपलब्ध व्हायला पाहिजे होत्या. यासाठी प्रयत्न करण्यामध्ये शासन कमी पडणार आहे काय, विद्यापीठे स्वयंपूर्ण होण्यासाठी शासन लवकरात लवकर कठोर अशाप्रकारची कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सोलापूर विद्यापीठाला जागा उपलब्ध होण्याच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री महोदय स्वत: बैठका घेऊन फॉलोअप करत आहेत. जमीन उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासन पूर्णपणे कामाला लागलेले आहे. लवकरात लवकर जागा उपलब्ध झाल्यानंतर हे विद्यापीठ फूल फेज सुरु करु.

---

( यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर येथे स्थापन करण्यात आलेले कृत्रिम अवयव तयार करण्याचे प्रादेशिक केंद्र**

(6) * 11114 **श्री. सुधाकर गणगणे , श्री. यशवंतराव गडाख , श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती मंदा म्हात्रे** : **तारांकित प्रश्न क्रमांक 7640 ला दिनांक 22 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर येथे स्थापन करण्यात आलेले कृत्रिम अवयव तयार करणाऱ्या प्रादेशिक केंद्राच्या कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(2) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. सुरेश शेट्टी श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता**: (1) व (2) नागपूर येथील कृत्रिम अवयव तयार करणाऱ्या प्रादेशिक केंद्राच्या कामासाठी खनिकर्म विकास महामंडळाकडून रु. 91,36,060/- इतका निधी उपलब्ध व्हावा म्हणून अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक 30.5.2005 च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नागपूर यांच्यामार्फत जिल्हा खनिज विकास निधी वितरण समितीला विनंती केली असून त्याबाबत पाठपुरावाही चालू आहे. तथापि, सदर निधी अद्याप मंजूर झालेला नाही.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, कृत्रिम अवयव तयार करणारे प्रादेशिक केंद्र नागपूर येथे स्थापन करण्यात आलेले आहे. त्यासाठी रु. 91,36,060/- इतक्या निधीची मागणी संबंधीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने केलेली आहे. उत्तरात म्हटलेले आहे की, सदर निधी अद्याप मंजूर झालेला नाही. सभापती महोदय, महत्वाचा निधी आहे व तो तातडीने मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणून मंत्रिमहोदयांच्या पातळीवर तो निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील काय आणि किती दिवसाच्या आत हा निधी त्यांना उपलब्ध करुन दिला जाईल ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा.प्र.क्र.11114...

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कृत्रिम अवयव सेंटरसाठी पैसे उपलब्ध करावयाचे होते. जिल्हा खनिज विकास निधी यांना विनंती करुन त्यांच्याकडून पेसे घेण्यात येतील. यासंबंधात श्री. दिलीप वळसे पाटील साहेबांनीा मायनिंग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या अधिका-यांना लवकरात लवकर फंड रीलिज करुन देण्याबाबत विनंती केली आहे. या कृत्रिम अवयम तयार करणा-या प्रादेशिक केंद्राला पैसे द्यावयास पाहिजेत. यासंदर्भात मी स्वत: श्री. अशोक चव्हाण सयांना पत्र लिहिले आहे .त्यासंबंधात लवकरात लवकर प्रपोजल प्रोसेस करुन निधी देऊ.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या ठिकाणी प्रश्न केवळ ९ लाखाचा आहे. माननीय मंत्र्यांनी म्हटले आहे, श्री. अशोक चव्हाण यांना पत्र लिहिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, हे पैसे न मिळण्याचे खरे कारण काय आहे आणि माननीय मंत्रिमहोदयांनी खनिकर्म मंत्र्यांना पत्र कधी लिहिले आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय खनिकर्म राज्यमंत्री माझ्या शेजारीच बसलेले आहेत. त्यामुळे त्यांनी मला आत्ताच माहिती दिली आहे की, ते लवकरात लवकर पैसे रीलिज करणार आहेत.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, विदर्भात अधिवेशन आहे आणि विदर्भाचा प्रश्न आहे. तेव्हा नक्की कोणत्या तारखेपर्यंत हे पैसे रीलिज करण्यात येतील ते मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, संबंधित खात्याच्या राज्य मंत्र्यांनी मला आत्ताच सांगितलेले आहे की, एक महिन्याच्या आत ते पैसे रीलिज केले जातील. सन्माननीय राज्य मंत्र्यांनी सभागृहात बसूनच हा निर्णय घेतलेला आहे. तेव्हा सभागृहाने त्यांचे बाके वाजून अभिनंदन करावे.

( काही सदस्य बाके वाजवितात )

---------

..3..



**जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांच्यामार्फत आरोग्य सेवकाच्या भरतीमध्ये**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीबाबत**

**(७) * ९६४५ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५२०३ ला दिनांक १२ एप्रिल,२००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा आरोग्य, चंद्रपूर यांच्या मार्फत आरोग्य सेवकाच्या भरतीमार्फत झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, चंद्रपूर यांनी दिनांक १७ फेब्रुवारी,२००५ रोजी विभागीय आयुक्त, नागपूर यांजकडे दस्तऐवजांसह सादर केलेल्या अहवालावर विभागीय आयुक्त, नागपूर यांनी चौकशी पूर्ण केली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले,

(३) चौकशी पूर्ण केली नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत,

(४) चौकशी पूर्ण झाली असल्यास, चौकशीच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता**: (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रकरणीच्या चौकशीनुसार आरोग्य सेवक भरती प्रक्रियेत नियमानुसार कार्यवाही झाल्याने पुढे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे आरोग्य सेवक नेमतांना कोणती निवड पध्दती अवलंबिली होती. मल्टिपरपज वर्कर्स टेंपररी होते त्यांना निवड समितीमध्ये प्राधान्य दिले होते काय ? दिले असल्यास किती मल्टिपरपज वर्कर्सनां अशा पध्दतीने प्राधान्य देण्यात आले होते ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांना उपप्रश्न विचारला की, मल्टिपरपज वर्कर्सना प्राधान्य दिले आहे काय? त्यामध्ये 50 टक्के लोकांना घेतले होते. त्याप्रमाणे 8 मल्टीपरपज वर्कर्स होते. यासंदर्भात डिव्हिजनल कमिशनरच्या माध्यमातून चौकशी झाली. जी नियुक्त झालोली आहे ती नियमाप्रमाणे झालेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही भरती झाली त्या विषयी शासनाकडे काही तक्रार प्राप्त झाली होती काय आणि त्यावर आपण काय कारवाई केली ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, तक्रार आली होती त्याबबात कमिशनरच्या माध्यमातून चौकशी झाली आणि त्यामध्ये काही आढळून आले नाही. जी नियुक्ती झाली ती नियमाप्रमाणे झाली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

यानंतर श्री. खर्चे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपणाकडे नियम 289 अन्वये नोटीस दिली होती. ही नोटीस यासाठी दिली होती की, गेल्या आठवडयात अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी एक पॅकेज जाहीर केले. त्यापूर्वी दोन दिवसांपासून पॅकेज जाहीर करणार अशा प्रकारचे एक वातावरण विधानसभेत आणि संपूर्ण राज्यभर पसरविण्यात आले आणि पॅकेज जाहीर झाले. त्या पॅकेजमध्ये केवळ चारच जिल्हयांचा उल्लेख करण्यात आला आहे. खरे म्हणजे या राज्यामध्ये 14-15 जिल्हयांमध्ये कापूस पिकतो, 6-7 जिल्हयांमध्ये धानाचे उत्पादन होते. खरे तर अपेक्षा अशी होती की, कापूस उत्पादक, धान उत्पादक आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या एवढया सर्व बाबी डोळयासमोर ठेवून हे पॅकेज जाहीर केले जाईल. परंतु हे केवळ पॅकेज जाहीर करुन या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची फसवणूक मात्र या सरकारने केली. कारण या पॅकेजमध्ये नाविन्यपूर्ण असे काहीच नाही. पॅकेजमध्ये दिलेला 1000 कोटींचा आकडा फार मोठा आहे परंतु या 1000 कोटीमध्ये 750 कोटीच्या आसपास शेतकऱ्यांकडूनच 3 टक्क्याच्या रुपाने 32 वर्षांपासून वसूल केलेली रक्कम अंतर्भुत आहे. ही 3 टक्के रक्कम यामध्ये देण्याचे अभिवचन सरकारने दिले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील कबूल केले की, राज्यात 1042 आत्महत्या झाला. म्हणून आम्हाला वाटले होते की, या पॅकेजमध्ये शेतकऱ्यांसाठी ठोसपणे काही तरी दिले जाईल पण पॅकेजमध्ये काय सांगितले तर राज्यात झालेल्या आत्महत्यांची पुन्हा चौकशी करण्यात येईल. या चौकशी समितीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांच्यामार्फत पुन्हा या सर्व आत्महत्यांच्या केसेसची चौकशी करण्यात येईल. पण त्याचा परिणाम असा झाला की, राज्यातील, विदर्भातील शेतकऱ्याला वाटले की, या पॅकेजमध्ये शासनाने आपली फसवणूक केली आहे आणि पॅकेज जाहीर झाल्यानंतर देखील दोनच दिवसात विदर्भामध्ये 3 जिल्हयातील 12 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. हया केवळ आत्महत्याच झाल्या नाहीत तर आज नागपूर शहरातील पंचशील चौकामध्ये राज्यातील आत्महत्या केलेल्या 1000 शेतकऱ्यांच्या विधवा महिला शासनाचे दार ठोठावून न्याय मागण्यासाठी आलेल्या आहेत. ज्या शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे, नापिकीमुळे आत्महत्या केल्या त्या शेतकऱ्याला विदर्भाच्याच भूमीत येऊन शासन न्याय देत नाही. या पॅकेजमध्ये आपण पुन्हा गोखले समिती नेमून या आत्महत्यांचा खल

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .........

करणार. अशा प्रकारे या शेतकऱ्यांची "भीक नको पण कुत्रा आवर" अशी परिस्थिती करुन टाकली आहे, शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम शासन या निमित्ताने करीत आहे. म्हणून या औचित्याच्या मुद्याद्वारे आपल्या माध्यमातून मी शासनाला असे सांगू इच्छितो की, शासनाने जे पॅकेज जाहीर केले आहे ते पॅकेज नसून केवळ मृगजळ आहे, त्याचा फायदा कुठल्याही प्रकारे शेतकऱ्यांना मिळणार नाही ; उलट शेतकऱ्यांच्याच हक्काचा पैसा त्याला दोन टप्प्यात देण्याचे शासनाने ठरविले आणि हे दोन टप्पे केंव्हा येणार, या पॅकेजसाठी निधी कोठून आणणार ? हे मात्र शासनाने या पॅकेजच्या माध्यमातून सांगितलेच नाही, म्हणून या पॅकेजमुळे राज्यातील शेतकरी समाधानी नाही. माननीय मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील आपण जर आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींना मदत केली नाही तर उद्या तुमच्या गाडया या विदर्भात हया महिला तसेच राज्यातील जनता फिरु देणार नाही. म्हणून पॅकेजच्या माध्यमातून शासनाने जी फसवणूक केलेली आहे त्यासंबंधी स्पष्ट असे धोरण जाहीर करावे व तसे या विधवा महिलांना सभागृहाच्या माध्यमातून शासनाने सांगितले पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना हे अधिवेशन संपण्यापूर्वी 2 लाख रुपये मदत दिली जाईल आणि कापूस उत्पादक शेतक-याच्या कापसाला भाव वाढवून दिला जाईल असे आश्वासन माननीय मंत्रीमहोदयांनी येथे द्यावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात शासनाने पॅकेज तयार केलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यांनी म्हटले की, आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसाला 2 लाख रुपये मदत देण्यात यावी. यासंदर्भात आपले जे निकष आहेत त्याप्रमाणे शासनाने पात्र केसेसमध्ये 1 लाख रुपये आत्महत्या केलेल्या कुटुंबियांच्या वारसाला मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच या ठिकाणी जो निर्णय घेण्यात आलेला आहे त्याच्या संदर्भात त्वरेने कार्यवाही केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे शासन दंगेखोरांना दोन-दोन लाख रुपये आर्थिक मदत करते परंतु ज्या शेतक-यांनी कर्जबाजारी, नापिकीमुळे आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या बाबतीत मात्र हे शासन 1 लाख रुपये मदत जाहीर करते. हे योग्य नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, शेतक-यांची 3 टक्के रक्कम कपात करण्यात आली होती तीन टक्के प्रमाणे 769 कोटी रुपयांपैकी 385 कोटी रुपये मार्च महिन्यात दिले जातील व उरलेले 385 कोटी जून महिन्यात दिले जातील.

--------------

......2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिली, याबद्दल मी आपला आभारी आहे. सभापती महोदय, विरार ते बोरिवली दरम्यान रेल्वेलाईनचे चौपदरीकरणाचे काम चालू आहे. या ठिकाणी 10 डिसेंबरला अनेक संघटनांनी रेल रोको आंदोलन केले. विरार-बोरिवली दरम्यान 10 ते 12 लाख लोक रोज उपनगरीय रेल्वेने प्रवास करीत असतात. दहीसर,मीरारोड,भाईंदर,नालासोपारा, वसई या ठिकाणी लोकल प्रवाशांच्या प्रदीर्घ काळ रखडलेल्या मागण्यांची तड लावण्यासाठी शनिवारी सकाळी 8 ते दुपारी 2.30 वाजेपर्यंत आयोजित केलेल्या रेल रोको आंदोलनाने अखेर हिंसक वळण घेतल्यामुळे रेल रोको करणा-या लोकांवर पोलिसांनी लाठीचार्ज व अश्रूधुराचा वापर केला. तसेच यामध्ये ब-याच लोकांना अटक देखील झालेली आहे. यासंदर्भात पश्चिम रेल्वेचे पीआरओ श्री. शैलेंद्र कुमार यांनी सांगितले की, चौपदरी करणाचे काम जोरात चालू आहे परंतु बोरिवली ते दहिसर या ठिकाणी जी झोपडपट्टी आहे, तिचे स्थलांतर एमएमआरडीएला करावयाचे आहे. परंतु झोपडपट्टी स्थलांतरणाचे काम त्यांच्याकडून होत नसल्यामुळे रेल्वेलाईनचे चौपदरी करणाचे काम थांबलेले आहे. शैलेंद्र कुमार यांनी आपली बाजू मांडल्यामुळे त्याचा दोष राज्य सरकारवर आलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात राज्य सरकारने निवेदन सादर करावे आणि या गोष्टीचा खुलासा करावा की, चौपदीकरणाचे काम कोणामुळे थांबलेले आहे. तसेच बोरिवली ते दहिसरमधील झोपडट्टीचे स्थलांतर करण्यात यावे

सभापती : शासनाने याबाबत लक्ष घालावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात लक्ष घालण्यात येईल.

----------------------

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या आणि गंभीर प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम केले जात आहे. या सभागृहात मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, मिठी नदीमध्ये जर अनाधिकृत बांधकाम होत असेल तर त्याची गांभीर्याने नोंद घेतली जाईल. परंतु साकीनाका येथे मिठी नदीवर आज एका हॉटेलचे बांधकाम होत आहे. या सभागृहात 7.12. 2005 रोजी माननीय

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण........

मुख्यमंत्री तसेच माननीय मंत्री श्री. राजेश टोपे यांनी प्रश्न क्रमांक 9280 अंतर्गत उप प्रश्नांना उत्तर दिले होते. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, "मिठी नदीच्या पात्रात अतिक्रमणे झ ााल्यामुळे मुंबईचे जीवन उध्वस्त झालेले आहे व याचा अनुभव आपण पावसाळ्यात सर्वांनी अनुभवलेला आहे. त्यामुळे हा विषय शासनाने आणि मी गांभीर्याने घेतलेला आहे".

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

यासंबंधी मंत्रिमंडळामध्ये देखील चर्चा होऊन मिठी नदीच्या सुरक्षिततेसाठी प्राधिकरण स्थापण्याचा निर्णयसुध्दा घेण्यात आलेला आहे. असे असताना तेथे पुन्हा बांधकाम चालू झाले असेल आणि कारवाई झाली नसेल तर ज्या अधिकाऱ्याने चुकीची माहिती पुरविली आहे, त्याच्याविरूध्द कारवाई होणे करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, मी आपल्याला सगळे कागदपत्र देतो. ज्या अधिकाऱ्याने शासनाला चुकीची माहिती दिलेली आहे, त्या अधिकाऱ्याविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना चुकीची माहिती देऊन अधिकाऱ्यांनी दिभाभूल केलेली आहे. याची आपण गांभीर्याने नोंद घेतली पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनामध्ये जे स्टेटमेंट केले आहे, ते अत्यंत महत्त्वाचे असे आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचा मुद्दा गंभीर आहे. मी संसदीय मंत्र्यांना सांगेन की, याबाबतीत संपूर्ण माहिती घेऊन हा प्रकार कशा पध्दतीचा आहे, याबाबत चौकशी करून हा प्रकार गैर असेल तर संबंधितांविरुध्द कठोर शासन होईल अशी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने शासनाने कारवाई करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : होय. यासंबंधीची संपूर्ण चौकशी केली जाईल व योग्य ती कारवाई केली जाईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मिठी नदीच्या पात्राला अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत बांधकामासंबंधीची यादी पटलावर ठेवण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. ती यादी शासनाला पटलावर ठेवण्यास सांगावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यादी पटलावर ठेवण्यात येईल.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवडे (नामनियुक्त) : सभापती महोदय,एक अत्यंत गंभीर अशा विषयाकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. दिनांक 26 व 27 जुलै 2005 रोजी अतिवृष्टी आणि पूर यामुळे परभणी जिल्हयातील पूर्णा येथे जीवित व वित्त हानी जास्त झालेली आहे. यात ज्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना शासनाच्यावतीने सानुग्रह अनुदानाचे वाटप झाले. परंतु, यात मोजक्याच काही लाभार्थींना मदत देण्यात आली आहे व अन्य 400-500 बोगस लाभार्थींना शासनाच्या सानुग्रह अनुदानाचा लाभ देण्यात आलेला आहे. अशापध्दतीने शासकीय निधीचा गैरवापर करून भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे. सानुग्रह अनुदानाच्या वाटपामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. या संदर्भात पूर्णा गावातील आणि शहरातील अनेक संस्थांनी, संघटनांनी मोर्चे काढले होते. दिनांक 21 नोव्हेंबर 2005 रोजी परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते. तसेच, दिनांक 27.11.2005 रोजी उप विभागीय अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे. तथापि, ज्या बोगस पूर पीडित लोकांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे, त्यांच्याविरूध्द अद्यापि, कोणतीही कारवाई झालेली नाही. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी पूर पीडितांसाठी आलेले अनुदान बोगस 400 ते 500 लोकांना वाटप करून शासकीय निधीचा गैरवापर केला आहे,त्यांच्याविरुध्द उच्चस्तरिय चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कठोर कारवाई करावी अशी मी मागणी करीत आहे.

**सभापती** : शासनाने याची नोंद ध्यावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : होय.

**सभापती** : औचित्याच्या मुद्दासंबंधी मी असा निदेश देत आहे की, औचित्याचा मुद्दा ज्या सन्माननीय सदस्यांना मांडावयाचा असेल त्यांनी मांडण्यापूर्वी माझ्या दालनात येऊन मला भेटावे. जर सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्त्वाची घटना, बाब मला पटवून दिली तर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देईन. आज 4 सन्माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे मांडण्यास मी परवानगी दिलेली आहे. आता औचित्याचा मुद्दा मांडण्यास कुणालाही परवानगी मिळणार नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मला दालनात येऊन भेटावे.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन 1998-99 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन 1998-99 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकआयुक्तांचे दिनांक 16 मे, 2001 21 मे 2001, 22 एप्रिल, 2002, 30 एप्रिल, 2002, 6 जून, 2002, 11 जुलै 2002, 12 जुलै 2002, 16 ऑगस्ट 2002, 24 एप्रिल 2003, 14 नोव्हेंबर 2003 तसेच उपलोकआयुक्तांचा दिनांक 18 डिसेंबर 2003 चे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---------------

श्री.बाळासाहेब थोरात ( कृषि मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.पजांबराव देशमुख कृषि विद्यापीठाचा सन 2000-2001 व 2001-2002 चा हिशेब व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा व परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.ओटवणेकर........ 14:15

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृहराज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2005 च्या दुसऱ्या पावसाळी अधिवेशनाच्या दिनांक 11 जुलै, 2005 ते दिनांक 23 जुलै 2005 या कालावधीत माननीय मंत्री / माननीय राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण 608 आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनांची यादी पटलावर ठेवण्यात आली आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मला याठिकाणी एका गोष्टीची माहिती पाहिजे की, पटलावर ठेवल्या आश्वासनांपैकी एखाद्या आश्वासनावरील कार्यवाही राहून गेली असेल तर त्याबाबत मुद्दा उपस्थित करण्याचा अधिकार आम्हाला राहणार का ? कारण मागील अधिवेशनात काही गंभीर विषय चर्चेला आले होते.

**सभापती** : एखाद्या आश्वासनाच्या कार्यवाहीची पूर्तता झाली नसेल तर त्यासंबंधी आपण मला माझ्या दालनात भेटावे. आपण त्यासंबंधी संबंधित विभागाकडून माहिती घेऊ.

( प्रेस : सोबत येथे आश्वासनांची यादी छापावी )

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीची
विवरणपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृहराज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 1993 चे पहिले अधिवेशन ते सन 2005 चे दुसरे अधिवेशन या कालावधीत विधानपरिषद सभागृहात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या मााहितीची एकूण 356 विवरणपत्रे मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेले विवरण छापावे. )

-----------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: श्री.सचिन तेंडुलकर यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

**सभापती** : सन्माननीय संसदीय कार्य मंत्री व सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेते यांनी माझ्याकडे विधानपरिषद नियम 14 अन्वये एक अभिनंदनपर प्रस्ताव दिलेला आहे.

" भारताचा मास्टर-ब्लास्टर फलंदाज श्री. सचिन तेंडुलकर यांनी दिनांक 10 डिसेंबर 2005 रोजी दिल्ली येथील फिरोजशहा कोटला मैदानावर 35 वे शतक झळकावून एक नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. सचिन तेंडुलकर यांनी केलेल्या विश्व विक्रमामुळे तमाम भारतीयांची मान जगात उंच झाली आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशी गौरवास्पद कामगिरी सचिन तेंडुलकर यांनी केली आहे. आपल्या सभागृहाच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन केले जावे यासाठी मी अभिनंदन प्रस्ताव मांडत आहे.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अंदाज समितीच्या अहवालाबाबत</u>

**सभापती** : अंदाज समितीच्या समिती प्रमुखांनी अंदाज समितीचा अहवाल आज ऐवजी उद्या म्हणजे, दिनांक 13 डिसेंबर 2005 रोजी सादर करण्याची परवानगी माझ्याकडे मागितली आहे. मी त्यांना उद्या अहवाल सादर करण्याची परवानगी दिलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर यांनी "राज्यातील अध्यापक विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतरांच्या प्रलंबित मागण्यांसाठी त्यांनी दिनांक 12/12/2005 पासून सुरु केलेले उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधू चव्हाण व इतर यांनी "राज्यातील खाजगी बस वाहतूकदारांनी एका परवान्यावर चार-पाच बस चालविणे, अशाप्रकारे अवैध वाहतूक करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. . तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर सन्माननीय श्री.अनंत तरे यांनी "वांद्रे, मुंबई येथील शासकीय वसाहतीत दिनांक 8/12/2005 रोजी झालेली जबरी चोरी, या वसाहतीत चोऱ्या व घरफोडयांचे वाढत चाललेले प्रमाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. . तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "राज्यामध्ये गेल्या 48 तासांत 12 शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. . तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने दिनांक 14/12/2005 पूर्वी निवेदन करावे.

नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर यांनी "दिनांक 1/12/2005 रोजी डागा रुग्णालय, नागपूर येथील अधीक्षिक डॉ.विमल औतकर यांना लाच प्रकरणी अटक झाली असताना विभागाने अद्यापही त्यांना निलंबित न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. . तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

**सभापती**....

नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे व इतर यांनी "फेब्रुवारी 2004 मध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या विविध पदांसाठी निवड केलेल्या उमेदवारांना अद्यापही नियुक्त्या न मिळाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. . तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व इतर यांनी "सावित्रीबाई फुले हायस्कूल, चेंबूर या शाळेवर गैरव्यवहार प्रकरणी प्रशासक नेमण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

तसेच सन्माननीय सदस्य श्रीमती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "हिवाळी अधिवेशनासाठी आलेल्या डगा बबुला भिल या पोलीस शिपायाचा मृतदेह दिनांक 11/12/2005 रोजी नागपूर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर संशयास्पद स्थितीत आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, शनिवार दिनांक 10 डिसेंबर, 2005 रोजी कल्याण महानगरपालिका जल शुध्दीकरण केंद्रात दुसऱ्यांदा स्फोट झाला आहे. त्या स्फोटात कामगाराचा मृत्यू झाला आहे. आपण या विषयाचे या ठिकाणी वाचन केलेले नाही.

**सभापती** : मी ज्या 93 च्या सूचना वाचलेल्या नाहीत त्या दालनात नाकारलेल्या आहेत. तरी सुध्दा आपल्या दृष्टिकोनातून हा विषय जर महत्वाचा असेल तर आपण मला भेटून सांगा, मी शासनास निवेदन करावयास सांगेन. मला वाटते आता आपण लक्षवेधी क्रमांक-1 वर वळूया.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या निवेदनासंदर्भात</u>

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, आम्हाला नियम 93 ची निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यामुळे लक्षवेधी सूचनेपूर्वी त्यावर प्रश्न विचारण्याबाबत आम्हाला संधी देण्यात यावी.

**सभापती** : मला या निवेदनांसंदर्भात तातडीने माहिती मिळणे आवश्यक होते. माझ्या कार्यालयाने याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. ठीक आहे आता नियम 93 अन्वये आलेली निवेदने पटलावर ठेवण्यात येतील.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** पश्चिम महाराष्ट्र वगळून इतर ठिकाणी करण्यात आलेल्या दूधाच्या दरवाढीबाबत.

**मु.शी.** पश्चिम महाराष्ट्र वगळून इतर ठिकाणी करण्यात आलेल्या दूधाच्या दरवाढीबाबत सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी व इतर वि.प.सदस्यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.अनिस अहमद (दुग्ध विकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी व इतर यांनी "पश्चिम महाराष्ट्र वगळून इतर ठिकाणी करण्यात आलेल्या दूधाच्या दरवाढीबाबत" नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, दूध दराबद्दल मी एका महिन्यापूर्वी शासनाला पत्र दिले होते. काही जिल्हयांमध्ये दूधाची दरवाढ 1 रुपये करण्यात आलेली आहे. शासनाने जो हमीभाव दिला आहे तो 19 जिल्हयांपुरता आहे. त्यातून पश्चिम महाराष्ट्राला वगळण्यात आले आहे. त्यामुळे तेथील जो सामान्य शेतकरी आहे त्याच्यावर अन्याय होत आहे. शासनाने 2001 मध्ये दूधाचे दर जाहीर केले होते, त्यानंतर दूधाच्या दरवाढीसंदर्भात विचार झालेला नाही. शेतकऱ्यांकडून 6 रुपये 75 पैसे दराने दूध घेतले जाते आणि बाजारामध्ये ते 14 रुपये दराने विकले जाते. जवळजवळ 7 रुपये यावर कमीशन आकारले जाते. मी शासनाला दिलेल्या पत्रात प्रामुख्याने दोन बाबी कळविल्या आहेत. त्यात पहिली बाब अशी की शासनाने दूधाच्या दरात दोन रुपयांनी वाढ करावी आणि ती सर्व राज्यामध्ये करावी. ही वाढ करताना ग्राहकांवर एक रुपयांची वाढ करण्यात यावी. यामुळे 7 रुपये खर्चात कपात होऊ शकते.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ...

दूध ग्राहकाना एक रुपयाची दरवाढ आणि दुध उत्पादकांना मात्र दोन रुपयांची दरवाढ याप्रमाणे दुधाची भाववाढ करण्यात यावी अशी मी मागणी केलेली आहे तेव्हा शासन यावर विचार करणार आहे काय ?

श्री.अनिस अहमद :सभापति महोदय, माननीय सदस्य श्री गिडवाणी जी ने यहां जो सवाल रखा है, मैं उसके बारे में यह बताना चाहूंगा कि सरकार विदर्भ के किसानों को फ्लश सीजन में दूध के भाव में एक रुपया ज्यादा दे रही है. विदर्भ के यवलमाल, अमरावती, वाशिम एवं अकोला जिलें के किसानों के लिए सरकार ने एक पॅकेज दिया है. इन जिलों में हम गाय देने के लिए 1 करोड़ रुपये खर्च कर रहे हैं. पश्चिम महाराष्ट्र में 90 प्रतिशत दूध होता है और विदर्भ में 4 प्रतिशत दूध होता है. विदर्भ में पानी की भी दिक्कत है. इसलिए विदर्भ के किसानों को जोड़ धंधा मिलना चाहिए इसलिए उन्हें मदद करने के लिए अक्तूबर से मार्च तक के फ्लश सीजन में हम दूध के भाव में कटोती नहीं कर रहे हैं. हम किसानों को उनके दूध के भाव में 8 रुपये 20 पैसे की बजाए 9 रुपये 20 पैसे यानी एक रुपया ज्यादा दे रहे हैं. पूरे महाराष्ट्र में कृष काल और पृष्ठ काल के आधार पर भाव नहीं होने चाहिए, इस बारे में सरकार जरुर विचार करेगी.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : माझी शासनाला एक विनंती आहे. सध्या विदर्भात अधिवेशन सुरु आहे त्यामुळे विदर्भातील शेतक-यांच्या बाबतीत जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो शासनाने जरुर घ्यावा त्याला माझी काही हरकत नाही. परंतु पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा गेल्या तीन वर्षापासून दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे.त्याची आपणा सर्वाना माहिती आहेच. पश्चिम महाराष्ट्रात जी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती त्या दुष्काळी परिस्थितीला तेथील लोकांना तोंड द्यावे लागले होते.पश्चिम महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर जिल्हयासाठी दुधाचे भाव वाढवून दिले तर त्याला माझी काहीही हरकत नाही परंतु 90 टक्के दूध हे पश्चिम महाराष्ट्रातून येते आणि पश्चिम महाराष्ट्रातील 11 जिल्हयामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : दूध ग्राहकांना एक रुपया आणि दूध उत्पादक शेतक-यांना दोन रुपये या दराने दुधाच्या दरात वाढ करण्यात यावी अशी माझी मागणी आहे तेव्हा त्याबाबतीत विचार करण्यात येईल काय. पश्चिम महाराष्ट्रातून 90 टक्के दूध येत असते तरी

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी....

मी सांगितल्याप्रमाणे दुधाचे भाव वाढवून देण्याच्या बाबतीत शासन विचार करणार आहे काय ?

श्री.अनिस अहमद : त्या संदर्भात विचार करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

पृ.शी : राज्यातील माध्यमिक उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे अतिरिक्त ठरविणे

मु.शी : राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर

क कर्मचा-यांची पदे अतिरिक्त ठरविणे या संबंधी सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे,प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे,नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे,प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे यांनी " राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे अतिरिक्त ठरविणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणें मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

4..



- निवेदना नतर -

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, राज्यातील अशासकीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संदर्भात  चिपळूणकर समितीच्या अहवालाप्रमाणे जो  स्टाफिंग पॅटर्न 1994 साली ठरविण्यात आला होता तो स्टाफिंग पॅटर्न तेव्हा पासून आतापर्यंत सुरु आहे. त्यातील काही पदे रद्द करावीत असे शासनाने गेल्या अनेक वर्षापासून ठरविले होते . 21 नोव्हेंबर 2003 रोजी शासनाने या संदर्भात एक जी.आर.काढला होता आणि त्या जी.आर.अन्वये काही पदे रद्द करण्यात यावीत असे सांगण्यात आले होते. त्या जी.आर.च्या विरुध्द संपूर्ण महाराष्ट्रात आवाज उठविण्यात आला होता. सर्व महाराष्ट्रातील कर्मचा-यांनी त्या जी.आर.च्या विरोधात मोर्चे काढले होते. त्यामुळे शासनाने 21 नोव्हेंबर 2003 चा जी.आर.रद्द केला होता .त्यानंतर दिनांक 25 नोव्हेंबर 2005 रोजी शासनाने पुन्हा हाच जी.आर. काढला होता त्या जी.आर.मध्ये काय म्हटलेले आहे हे मी वाचून दाखवू शकतो परंतु हा जी.आर.फार मोठा असल्यामुळे संपूर्ण जी.आर.वाचण्यात बराच वेळ जाईल त्यामुळे मी तो वाचून दाखवत नाही.महाराट्रातील 50 टक्के शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे या जी.आर.मुळे रद्द होणार आहेत . या जी.आर.मुळे  काही पदे रिक्त होणार आहेत तर काही पदे अतिरिक्त ठरणार आहेत अशा कर्मचा-यांची संख्या 40 ते 45 हजार इतकी असून संपूर्ण राज्यातून नागपूर येथे 20 ते 25 हजार कर्मचा-यांनी मोर्चा काढला होता.एका भव्य मोर्चाचे आयोजन या सगळया कर्मचा-यांनी केले होते. जो जी.आर. काढण्यात आला होता त्याला मॅनेजमेन्टचा विरोध आहे त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचा-यांचा देखील विरोध आहे.या जी.आर.मुळे  काही पदे अतिरिक्त होणार आहेत काही  पदे रिक्त होणार आहेत आणि काही पदे समायोजित होणार आहेत. तेव्हा हजारो कर्मचा-यांवर अन्याय करणारा हा जी.आर............

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांना एक नियम लावला  आणि सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांना दुसरा नियम  लावला आहे  अशा प्रकारे होता कामा नये.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : मी थोडक्यात प्रश्न विचारतो.या जी.आर.मुळे किती पदे रिक्त होणार आहेत  ? किती पदे अतिरिक्त होणार आहेत  ? आणि किती पदे समायोजित होणार आहेत  ? त्याचबरोबर हा काळा जी.आर. आजच्या आज रद्द करण्यात येणार आहे काय ?

नतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, चिपळूणकर समितीने केलेल्या शिफारशी, त्यानंतर शाळा संहितेने केलेल्या शिफारशी, त्यानंतर 21 नोव्हेंबर 2003 मध्ये कोकणे समितीने केलेल्या शिफारशी या आधारे आपण जी.आर. निर्गमित केलेला आहे. असे असतानाही यापूर्वी रद्द केला होता तोच जी.आर. निर्गमित केला असे सन्माननीय सदस्यांनी म्हणणे चुकीचे आहे. साधारणपणे एस.एस.कोडचा आधार घेऊन ही पदे अतिरिक्त ठरणार नाहीत. मात्र मी इतकेच सांगू इच्छितो की, हा जी.आर. 100 टक्के लागू होईल आणि त्याची अमलबजावणी झाल्यानंतर ....

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलू लागतात ... अडथळा .. )

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तरच आलेले नाही. ...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांना बोलण्याची संधी देत आहे.

श्री. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अतिशय गंभीर असा हा विषय असल्याने मी या संदर्भात केवळ दोन प्रश्न विचारणार आहे त्याची नेमकी उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या संदर्भात मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेला निर्णय घेतला ? आणि दुसरा प्रश्न असा आहे की, कोणकोणत्या संस्था चालकांशी आणि नामवंत शिक्षण तज्ज्ञांशी विचार विनिमय करून हा निर्णय घेतला आहे ? सभापती महोदय, मी हे प्रश्न अशासाठी विचारीत आहे की, अशा प्रकारचा जी.आर.काढल्यानंतर या सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांनी तो रद्द केलेला होता. त्यावेळेस त्यांनी दिलेले आश्वासन वाटल्यास मी आपल्याला संबंधित कार्यवाहीतून अगदी पृष्ठ क्रमांकासह वाचून दाखवितो. सभापती महोदय, 11.12.2003 च्या सभागृहाच्या कार्यवाहीतील पृष्ठ क्रमांक इइ-1 वर या संबंधात आम्ही प्रश्न विचारला होता की, मंत्रिमंडळाने याबाबत केव्हा निर्णय घेतला ? त्यावर माननीय मंत्री महोदयांनी तेव्हा उत्तर दिले होते की, त्याची तारीख माझ्याकडे नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे संस्था चालक आणि नामवंत शिक्षण तज्ज्ञ यांच्याबरोबर बसून चर्चा करून याबाबत निर्णय घेतला जाईल. म्हणूनच मी हे दोन प्रश्न विचारले आहेत की, हा निर्णय मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीमध्ये घेतला गेला आहे ? आणि एकदा जी.आर.रद्द केल्यानंतर कोणकोणत्या नामवंत शिक्षण तज्ज्ञांशी तसेच संस्था चालकांशी चर्चा करून आपण हा निर्णय घेतला ?

..... एस 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मंत्रिमंडळाने कधी निर्णय घेतला आहे त्याची तारीख आता माझ्याकडे नाही. मात्र सचिव समिती आणि संयुक्त समिती या दोघांनी आढावा घेतल्यानंतर, शिक्षण विभागातील लोक आणि शिक्षण क्षेत्रातील काही तज्ज्ञ यांच्याबरोबर चर्चा केल्या नंतर ...

श्री. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. मी विचारलेल्या नेमक्या प्रश्नांना मंत्री महोदयांनी नेमकी उत्तरे द्यावीत. ... इतर काही सांगू नये.

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात... अडथळा.. )

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या संदर्भात मंत्रिमंडळाने केव्हा निर्णय घेतला याची तारीख व अन्य माहिती आपल्याकडे आता नसेल तर मग हे निवेदन व त्यावरील चर्चा मला आता तहकूब करावी लागेल. आणि नंतर पूर्ण माहिती आल्यावर यावर चर्चा करणे उचित होईल. तेव्हा मी हे निवेदन तहकूब करीत आहे.

यानंतर नियम 93 खालील पुढील निवेदन घेण्यात येईल.

****

....... एस 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मिरज (जि.सांगली) येथील दै.सनातन प्रभात च्या कार्यालयावर मुस्लिमांच्या गटाने केलेला हल्ला.

**मु.शी.** : मिरज (जि.सांगली) येथील दै.सनातन प्रभात च्या कार्यालयावर मुस्लिमांच्या गटाने केलेला हल्ला याबाबत डॉ.अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.रामनाथ मोते, श्रीमती कांता नलावडे यांनी दिलेलया नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन.

---

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.रामनाथ मोते, श्रीमती कांता नलावडे यांनी "मिरज (जि.सांगली) येथील दै.सनातन प्रभात च्या कार्यालयावर मुस्लिमांच्या गटाने केलेला हल्ला " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

..... एस 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खाली मा. गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदना नंतर ... )

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, पहिल्या प्रथम मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना विचारू इच्छितो की, त्यांना या निवेदनामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, कृपा करून आपण हे समजून घ्या की, 7 नोव्हेंबर ला सनातन प्रभात या वृत्तपत्राच्या व्यवस्थापकांना पोलिसांनी अटक केली. त्यानंतर 25 नोव्हेंबरला या व्यवस्थापकांच्या वकील बाई ॲड. रूपाली सोनी यांनी तेथील स्थानिक पोलीस अधिकारी श्री.बाजीराव पाटील यांचेकडे वारंवार मागणी केली की, आम्हाला या संबंधीची एफआयआर आणि इतर कागदपत्रे उपलब्ध करून द्या. पण पोलिसांनी ती कागदपत्रे त्यांना दिली नाहीतच, उलट पोलिसांनी त्यांना विचारले की, तुम्ही या बातम्या छापताच का ? सभापती महोदय, वृत्तपत्र स्वातंत्र्याची अशा प्रकारे गळचेपी करणारे हे पोलीस असे कोण लागून गेले आहेत ? या 'सनातन प्रभात'च्या कार्यालयावर ज्यांनी हल्ला केला, कार्यालयाची मोडतोड केली त्यातील 7 जणांना पोलिसांनी अटक नंतर जरूर केली., येथ पर्यंत ठीक आहे. पण या सनातन प्रभातच्या व्यवस्थापकांना अटक केल्यानंतर त्यांनी, त्यांच्या वकीलांनी वारंवार मागणी करूनही त्यांना एफआयआर आणि इतर संबंधित कागदपत्रे पोलिसांनी उपलब्ध करून दिली नाहीत. उलट पोलिसांकडून, पोलीस अधिकाऱ्यांकडून त्यांना विचारले जात आहे की, आपण या बातम्या का छापून आणल्या ? तेव्हा यासंबंधात आता आपण काय करणार आहात ?

( **सभापती स्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी** )

( यानंतर श्री.सरफरे ... टी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, सनातन प्रभातमध्ये जी बातमी छापून आली त्यामुळे ही सर्व प्रकरणे घडली आहेत...

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मंत्रिमहोदय आपण समर्थन करु नका. बातमी छापून आली म्हणून मोडतोड करायची कां? कायदा हातामध्ये घेण्याचा अधिकार यांना कुणी दिला? तुम्ही त्याचे समर्थन कशासाठी करता?

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, या सनातन प्रभातमध्ये यापूर्वी सुध्दा महंम्मद पैगंबर, महात्मा फुले, ख्रिश्चन धर्मियांबद्दल लिखाण लिहून आले होते. अशाप्रकारचे लिखाण सनातन प्रभातमध्ये नेहमी छापून येते. तेव्हा आक्षेपार्ह लिखाण केल्यामुळे हे घडले आहे....

डॉ. अशोक मोडक : म्हणून कार्यालयाची, हॉस्पिटलची मोडतोड करणे समर्थनीय आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मी याही गोष्टीचे समर्थन करणार नाही. म्हणून त्यांचेवर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली आहे.

डॉ. अशोक मोडक : म्हणून मी सुरुवातीला आपण निवेदन दुरुस्त करणार काय? असे विचारले होते. सनातन प्रभातच्या व्यवस्थापकाला अटक केल्यानंतर त्यांनी वकील देण्याबाबत वारंवार विनंती करुन देखील त्यांना वकील दिला नाही, कागदपत्रे दिली नाहीत, एफआयआरची प्रत दिली नाही. आणि पुन्हा पोलीस त्यांना विचारतात की, तुम्ही हे छापता कां?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : आपण सांगत आहात त्याप्रमाणे जर त्यांचे वर्तन झाले असेल तर त्यासंबंधी चौकशी करुन कारवाई केली जाईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदया, मुळात ही नियम 93 अन्वये दिलेली सूचना एकांगी आहे. हा सर्व प्रकार कशामुळे घडला, याची सुरुवात कुठे झाली? याची शासनाने कसून चौकशी केली पाहिजे. एक महत्वाची गोष्ट आपल्या निदर्शनास आणतो की, योगायोगाने एकाच वेळी हिंदू धर्मियांची दिवाळी आणि मुस्लिम बांधवांची ईद हे देशातील अत्यंत महत्वाचे दोन सण सुरु असतांना सनातन प्रभात दैनिकामध्ये महंम्मद पैगंबराविषयी बदनामीकारक मजकूर छापण्याचे काम मुद्दाम खोडसाळपणे मिरजमधील मुस्लिम वस्ती असलेल्या भागात सुरु आहे. त्या भागात सनातन प्रभातने अंक वाटले ही गोष्ट खरी आहे काय? आणि महत्वाचा मुद्दा असा की, यामुळे याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील....

सुरुवात झाली याची चौकशी झाली पाहिजे. या सदनाने आणि मंत्रिमहोदयांनी याची पहिल्यांदा दखल घेतली पाहिजे की, हा प्रकार कुणामुळे घडला? चिथावणी देणा-या आणि धार्मिक भावना भडकविणाऱ्या लोकांमुळे हा प्रकार घडला आहे. तेव्हा याबाबत दुसऱ्या कुणीही फिर्याद न देता शासनाने सु-मोटो कारवाई केली पाहिजे. धार्मिक भावना भडकवून समाजामध्ये असंतोष निर्माण करण्याचा धंदा करणाऱ्या सनातन प्रभातचे पब्लिकेशन बंद करण्याची कारवाई केली पाहिजे अशी मी मागणी करतो.

डॉ. अशोक मोडक : आपण विषय डायव्हर्ट कशासाठी करता?

प्रा. शरद पाटील : सभापती महोदया, मला प्रश्न विचारावयाचा आहे. मला माझे मत मांडण्याचा अधिकार आहे. मी शासनाच्या व सभागृहाच्या निदर्शनास वस्तुस्थिती आणीत आहे. मिरजमध्ये ही घटना घडल्यानंतर...

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांना निवेदनावर भाषण करता येणार नाही...

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मी छापील निवेदनामध्ये असलेल्या विसंगतीकडे या सदनाचे लक्ष वेधीत आहे. "महंमद हनिफ अब्दूलकादर शेख" याने तक्रार केल्यानंतर पोलिसांनी कारवाई करुन काही लोकांना अटक केली.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:40

प्रा.शरद पाटील . . . .

सभापती महोदया, निवेदनातील पान क्र. 2 वरील पहिल्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "3-11-2005 रोजी 23.00 वाजताचे सुमारास इद्रीस इलियास नायकवडी, नगरसेवक, सांगली-मिरज कुपवाड महापालिका व इतर मुस्लीम लोकांनी दै.सनातन प्रभात कार्यालयात जाऊन मुस्लीम लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्याबाबत निषेध केला." हे खरे आहे. ही घटना घडलेली आहे. पुढे असे म्हटलेले आहे की," त्यानंतर त्याच दिवशी दुपारी सुमारे 23.50 वा.चे सुमारास इद्रिस इलियास नायकवडी वगैरे 14 मुस्लिम लोकांनी दै.सनातन प्रभातच्या कार्यालयाच्या ठिकाणी दगड, विटा, फरशीचे तुकडे . . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, हे काय चालले आहे ? सन्माननीय सदस्यांनी वेगळी सूचना द्यावी. . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटीलसाहेब, आपण भाषण करु नका. या विषयावर भाषण करु नका.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : 93 च्या सूचनेवरील निवेदनावर केवळ 1-2 प्रश्न विचारता येतात, त्यावर भाषण करता येत नाही.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, त्याठिकाणी एका नगरसेवकांनी . . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

प्रा.शरद पाटील : सभापती महोदया, माझा प्रश्न आहे की, . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, ते सरळसरळ हिंदू धर्माबद्दल बोलत आहेत.

**तालिका सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे, म्हणजे मला त्याबाबत बोलता येईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदया, मी प्रश्न विचारतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विषयाला फाटे फोडू नयेत. याठिकाणी 93 च्या सूचनेबाबत जे निवेदन कलेले आहे, त्यावर एक-दोन प्रश्न विचारता येतात.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदया, त्याठिकाणी सुमारे 23.50 वाजता . . . .

. . . .यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, याठिकाणी कथन सुरु आहे . . . .

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना परवानगी देत नाही. जर त्यांनी एखादा स्पेसीफीक प्रश्न विचारला तरच मी परवानगी देईन.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदया, दि.3-11-2005 रोजी 23.00 वाजताचे सुमारास इद्रीस इलियास नायकवडी, नगरसेवक, सांगली-मिरज कुपवाड महानगरपालिका व इतर मुस्लिम लोक दैनिक सनातन प्रभातच्या कार्यालयात गेलेले होते आणि अशा प्रकारची कृती करु नये असे त्यांनी सांगितले हे खरे आहे का ? तसेच दैनिक सनातन प्रभातवर जी फिर्याद दाखल झाली, त्यावेळी 23.50 वाजता इद्रीस इलियास नायकवडी,नगरसेवक पोलीस स्टेशनमध्ये बसलेले होते हे खरे आहे का ? त्यांना आरोपी केलेले आहे. त्याचबरोबर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ईदच्या दिवशी साधारणपणे 500 मुस्लीम तरुण . . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल प्रश्नोत्तराच्या तासानंतर जेव्हा 93 च्या सूचनांवरील निवेदने सभागृहासमोर आली, तेव्हा सभापतींच्या आसनावर माननीय उपसभापती बसलेले होते आणि त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, कामकाजा सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे 93 च्या सूचनेवर निवेदन झाल्यानंतर त्यावर प्रश्न विचारता येणार नाहीत. पण माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदारसाहेबांनी सांगितले की, कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरलेले आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली असेल, त्यांना एक-दोन प्रश्न विचारता येतील. पण याठिकाणी हे काय सुरु आहे ? जर हे असेच चालणार असेल तर पुढेही 93 च्या सूचनांवरील निवेदनाबाबत असेच कामकाज चालणार आहे का ? जर पुढे असेच चालणार नसेल तर मग आता जे झाले आहे, ते कामकाजातून काढले पाहिजे. ज्या सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली असेल, त्यांनाच प्रश्न विचारता येतात आणि जर तसे झाले नसेल तर मग ते कामकाजातून काढून टाकावे. तसेच आपण जर हे कामकाजातून काढून टाकणार नसाल, तर याठिकाणी याच पध्दतीने कामकाज चालणार आहे का ? याबाबतीत रुलींग द्यावे.

**तालिका सभापती** : मी पहिल्याप्रथमच सांगितले की, 93 च्या सूचनेवरील निवेदनावर एक-दोन प्रश्न विचारता येतात आणि सन्माननीय सदस्य तर भाषण करीत आहेत.

. . . .यु-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, ज्या सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली असेल, त्यांनाच प्रश्न विचारता येतील, असे माननीय सभापतींनी रुलींग दिलेले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.कन्हैय्यालाल गिडवाणी : मला 93 च्या सूचनेवर एकच प्रश्न विचारु दिलेला आहे. अशाप्रकारे मला दोनवेळा नाकारलेले आहे.

**तालिका सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. 93 च्या सूचनेवर एखाददुसरा प्रश्न विचारायचा आहे असा नियम केलेला आहे, तो नियम आपण पाळू या.

श्री.मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी लांबलचक प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केलेला आहे, तो प्रश्न कामकाजातून काढून टाकावा,अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : आता या पुढील निवेदनापासून नियम लागू करते.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदया, माझ्या मतदार संघातील प्रश्न आहे. मला प्रश्न विचारु द्यावा.

**तालिका सभापती** : आपल्याला मी परवानगी दिली होती, परंतु आपण नंतर फार मोठा विस्ताराने प्रश्न उपस्थित करत होता. त्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याला हरकत घेतली. आता मी प्रश्न विचारु देणार नाही. या निवेदनावरील चर्चा संपलेली आहे.

डॉ.अशोक मोडक : माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. दै.सनातन प्रभातच्या व्यवस्थापकाला अटक केली. व्यवस्थापक वारंवार सांगतात की, मला पोलीस स्टेशनकडून कागद मिळलेले नाहीत, त्यावर पोलीस वारंवार सांगतात की, तुम्ही ते का छापता ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी या संदर्भात उत्तर दिलेले आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : श्री.वाजपेयींबद्दल वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर त्यांना क्षमा करण्यात आलेली नाही. आता त्यांच्या बाजूने बोलले जात आहे, हे बरोबर नाही.

**तालिका सभापती** : आता निवेदन चौथे घेण्यात येईल.

डॉ.अशोक मोडक : माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तेथील पी.आय.कडे कागदपत्र मागितल्यानंतर त्यांनी ती दिली नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. तशी त्यांनी कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसतील तर त्यांच्यावर कारवाई करु, असे मी मघाशी उत्तर दिलेले आहे.

-

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

**पृ. शी.** : स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या शाळा, कर्मशाळा, वसतीगृहे, यामधील शिक्षक व शिक्षकतेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत.

**मु. शी.** :" स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या शाळा, कर्मशाळा, वसतीगृहे, यामधील शिक्षक व शिक्षकतेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत", श्रीमती संजीवनी रायकर, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्रीमती संजीवनी रायकर,श्री.व्ही.यू.डायगव्हाणे व इतर वि.प.स.यांनी "स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या शाळा, कर्मशाळा, वसतीगृहे, यामधील शिक्षक व शिक्षकतेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत" नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

SKK/ SBT/ MHM/

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदया, हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीमध्ये विविध मागण्यांसाठी उपोषण, कधी आमरण उपोषण करावे लागते. अपंग शाळा व कर्म शाळांमध्ये काम करणारे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात वर्षानुवर्षे मागणी आहे. ही मागणी विचाराधीन आहे, असे म्हटलेले आहे. हा विचार कधी पूर्ण होणार आहे ? मंत्रीमंडळाकडे फेरविचारार्थ प्रस्ताव सादर केला. उच्च न्यायालयाच्या आदेशाची केव्हा अंमलबजावणी करणार आहात ? अपंगाच्या विशेष शाळा व कर्मशाळेसाठी संहिता प्रसिध्द करण्यासाठी सुधारीत प्रारुप सर्व संबंधित संघटना व तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा करुन शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण यांना कळविण्यात आलेले आहे. हे प्रारुप केव्हा देण्यात येणार आहे ? अतिरिक्त ठरलेल्या 13 कर्मचाऱ्यांना आपण नोकरी देणार आहात. परंतु 50 कर्मचारी अतिरिक्त झालेले आहेत, त्यांना नागपूर विभागामध्ये केव्हा सामावून घेणार आहात ? दरवर्षी आपण अनुज्ञाप्ती देत असतो. यासंबंधाने अनेकदा मागणी केल्यानंतर तीन वर्षांनी ही मागणी मान्य केलेली आहे. तरीसुध्दा त्यांना त्रास देण्याचे काम चाललेले आहे.

यानंतर कु.थोरात...

श्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

अनुज्ञप्ती मिळविण्यासाठी त्यांना आणखी किती पैसे खर्च करावे लागतात. तसेच दर महिन्याच्या पगाराचे पे-बिल वीकारतानासुध्दा त्यांच्याकडून पैसे घेतले जातात. अशा त-हेने अपंगावर जो अन्याय केलो जातो त्याबद्दल शासन काय कारवाई करणार आहे.? तातडीने अपंगाना चर्चेसाठी बोलाविण्यात येणार आहे काय?

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदया, या संदर्भात मंत्रिमंडळाचा निर्णय लवकरात लवकर घेणार आहोत. त्यासंबंधीचा सगळा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. या ठिकाणी पदोन्नतीबद्दलचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. तो प्रश्न सुध्दा अंतिम टप्प्यावर आहे आणि तो प्रश्न सुध्दा लवकरात लवकर सोडविणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,अंतिम कधी दिसत नाही आणि लवकरात लवकर कधी होत नाही .किती दिवसात हे होईल ? अधिवेशन संपल्यावर होईल, एक महिन्याच्या आत होईल कां पुढील अधिवेशनाच्या आत होईल ते सांगावे.

श्री. विनोद तावडे : मघाशी खनिकर्माच्याबाबतीत आपण ताबडतोब चांगला निर्णय घेतला तसाच हाही निर्णय घ्यावा.

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदया, मी जो निर्णय घेईल तो पक्का निर्णय घेईल. त्यामध्ये काही मागेपुढे होणार नाही. ताबडतोब मंत्रिमंडळासमोर जाऊन ती कारवाई पूर्ण करु. एक महिन्याच्या आत करु त्यामध्ये काही अडचण नाही. पदोन्नतीसाठी वेळ लागणार आहे. ते काम तीन महिन्याच्या आत पूर्ण करु. तसेच 50 लोकांचे जे सांगितलेले आहे. जसजशा जागा रिक्त होतील व्हॅकन्सी क्लिअर हातील त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने सीनिऑरिटीप्रमाणे त्यांना घेण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, निवेदनामध्ये राज्यातील अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेच्या संदर्भातील अनेक प्रश्न आहेत प्रामुख्याने नागपूर विभागातील शेकडो प्रश्न प्रलंबित आहेत. काही वैयक्तिक आहेत आणि काही सामुहिक स्वरुपाचे आहेत. काही प्रश्नांच्या बाबतीत मंत्रिमहोदयांनी चांगले उततर दिले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.पण उच्च न्यायालयाचा याठिकाणी संदर्भ देण्यात आलेला आहे. सभापती महोदया, शिक्षकांच्या संदर्भात शाळा आणि कर्मशाळा एकाच संस्थेच्या आहेत. शाळांमधील शिक्षक कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू आहे. पण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्ही. यू. डायगव्हाणे ...

कर्मशाळेतील शिक्षक कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू नाही. यासंदर्भात मंत्रिमंडळापुढे हा प्रश्न नाकारला गेला पण आता याबाबत उच्च न्यायालयाने स्वतंत्रपणे विचार करावा, असे निर्देश दिलेले आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, पेन्शनच्या संदर्भात पॉझिटिव्ह निर्णय एक-दोन महिन्यात घेतला जाईल काय? 50 टक्के डी. पी.आपण दिलेला आहे. त्याचे थकित अजून दिलेले नाही. काही संस्थांना ते लागूही केलेले नाही. म्हणून थकित 50 डी.पी. आणि काही कर्मचा-यांना 50 टक्के डी.पी. लागू करण्याचा प्रश्न आहे.तसेच कर्मशाळेतील कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू होईल काय?

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, कर्मशाळेच्यासंदर्भात शासन पुन्हा मंत्रिमंडळापूढे जाणार आहे. कारण पहिल्यांदा ते रिजेक्ट झालेले आहे.त्यावर पुन्हा विचार करण्यासाठी ते मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात येईल. पेन्शन योजनेचे 1 ऑगस्ट पासून एक वर्षाचे जे ॲरिअर्स आहेत ते पूर्ण पैसे 31 मार्चच्या आत देण्यात येतील.

( काही सदस्य एकाचवेळी बोलण्यासाठी उभे असतात )

**तालिका उपसभापती (श्रीमती सुधा जोशी )** : या निवेदनावर अनेक उपप्रश्न झालेले आहेत. आता मी स्पेशल केस म्हणून या निवेदनावर शेवटचा प्रश्न श्री. रामनाथ मोते यांना विचारण्याची संधी देते.

श्री. रामनाथ मोते :अपंगाच्या विशेष शाळा आणि कर्मशाळेतील प्रवेशासाठी अपंगत्वाची अट 60 टक्के केलेली आहे. यासंदर्भातील परिपत्रक 2 ऑगस्ट, 2002 ला काढलेला आहे. खरे म्हणजे डिसएबल ॲक्टमध्ये अपंगत्वाचे प्रमाण 40 टक्के आहे.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

त्यामध्ये बदल झालेला नाही. 40 टक्क्याचे प्रमाण 60 टक्के करण्याबाबतचा विषय चर्चेला आला परंतु त्याबाबत तसा निर्णयच झालेला नसून हे प्रमाण 40 टक्केच आहे. म्हणून 40 टक्क्याऐवजी 60 टक्के करण्याबाबत ज्या अधिकाऱ्यांनी परिपत्रक काढले त्या अधिकाऱ्यावर शासनाने कारवाई करण्यासंबंधीचे आदेश सन 2001 मध्ये दिलेले असतांना देखील आजही 60 टक्के हेच प्रमाण धरण्यात येत आहे, ते नियमबाहय आहे. यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे ? तसेच जे 60 टक्क्याबाबतचे परिपत्रक काढलेले आहे ते तातडीने रद्द करण्यात येणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, 40 टक्क्याचे परिपत्रक काढल्याचे सांगितले आहे.

---------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ज्ञानेश्वर नगर, शिवडी (मुंबई) येथील संक्रमण शिबीरातील गाळयांची झालेली दुर्दशा.

**मु.शी.**: ज्ञानेश्वर नगर, शिवडी (मुंबई) येथील संक्रमण शिबीरातील गाळयांची झालेली दुर्दशा या विषयासंबंधी श्री. मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे, यांनी "ज्ञानेश्वर नगर, शिवडी (मुंबई) येथील संक्रमण शिबीरातील गाळयांची झालेली दुर्दशा" या विषयासंबंधी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**-- नि वे द न --**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MHM/ SBT पूर्वी कु. थोरात.... 14:55

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, म्हाडाच्या एका इमारतीबद्दल मी प्रश्न विचारला होता. त्या इमारतीमध्ये लिफट सुरु आहे काय ? तसेच तेथे बेकायदेशीर झोपडयांचे बांधकाम झ ालेले आहे काय ? या प्रश्नाला उत्तर देतांना या ठिकाणी सर्व सुविधा केलेल्या आहेत असे उत्तर देण्यात आले होते. तसेच इलेक्ट्रीकचा जो बोर्ड आहे त्याला एनक्लोझर केले आहे काय, या प्रश्नांना सर्व सोयी केलेल्या आहेत असे उत्तर दिले. परंतु प्रत्यक्षात या इमारतीची लिफट सुरुच झ ालेली नाही, इमारत अर्धवट असतांना त्याला ओ.सी. देण्यात आली. ही ओ.सी. 17 जानेवारी, 2005 रोजी देण्यात आली. मी या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो की, या ठिकाणी चवथ्या माळयावर राहणारी व्यक्ती संडासमध्ये बसली असता त्याच्या डोक्यावर पाचव्या मजल्यावरचे घाण पाणी पडते अशी आजची परिस्थिती आहे. स्वयंपाक घराच्या बाहेरुन मुत्रीचा पाईप लावण्यात आला आहे व त्यामुळे स्वयंपाक घराच्या ओटयावर पाणी पडत असल्याची सध्या तेथील परिस्थिती आहे. माझ्याकडे या इमारतीचे मागच्याच आठवडयात शनिवारच्या संध्याकाळी काढलेले फोटो आहेत. अशी परिस्थिती असतांना माननीय मंत्री महोदय सर्व योग्य आहे असे उत्तर देतात. म्हणून माझे यासंदर्भात स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत की, सभागृहाला चुकीची माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार ? आणि मुंबई महानगरपालिकेने इमारत वापरासाठी पूर्ण नसतांना जे कंप्लीशन सर्टिफिकेट दिलेले आहे त्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई शासनाकडून करण्यात येईल ? सदर इमारत राहण्यासाठी योग्य कधी करणार आहात ?

श्री. दयानंद मस्के : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच त्यांच्याबरोबर एक बैठक घेऊन या इमारतीला व्हिजीट देऊन ज्या त्रुटी आहेत त्या पूर्ण करण्यात येतील.

श्री. मधुकर चव्हाण : सभागृहाची चुकीची माहिती देऊन दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द काय कारवाई करण्यात येईल ? कारण एखादया नरकाच्या बाजुला बसता येईल परंतु म्हाडाने बांधलेल्या या इमारतीच्या बाजूला बसणे अशक्य आहे. कोण आर्किटेक्चर होता की, त्याने अशा अवस्थेत असलेल्या इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले, त्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करणार की नाही ?

.......4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के : सन्माननीय सदस्यांचा भावना लक्षात घेऊन हे अधिवेशन संपल्यानंतर बैठक घेण्यात येईल व ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्यात येतील. तसेच चुकीची माहिती देऊन ज्या अधिकाऱ्याने सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला त्यांच्याविरुध्द कारवाई देखील करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात अधिका-यांकडून चुकीची माहिती आलेली आहे असा त्यांनी उल्लेख केलेला आहे. माननीय मंत्रीमहोदय, जागेला भेट देऊन कारवाई करणार आहेत परंतु अधिका-यांनी दिलेल्या चुकीच्या माहिती नुसार मंत्र्यानी या ठिकाणी निवेदन केलेले आहे, भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे त्यामुळे अगोदर चुकीची माहिती दिलेल्या अधिका-यांवर प्रथम कारवाई करुन नंतर जागेची पाहणी केली जाणार आहे काय?

श्री.दयानंद मस्के : ही बाब तपासून कारवाई करण्यात येईल.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:लक्षवेधी सूचना क्रमांक 1व लक्षवेधी सूचना क्रमांक दोन पुढे ढकलण्याच्या संदर्भात.**

**सभापतीस्थानी तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक एक व लक्षवेधी सूचना क्रमांक दोन पुढे ढकलण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी विनंती केलेली आहे....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदया, लक्षवेधी सूचना क्रमांक एक ही अतिशय महत्वाची आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येऊ नये. सन्माननीय सदस्य श्री. पप्पु कलानी यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न होत आहे.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक एक व लक्षवेधी सूचना क्रमांक दोन पुढे ढकलण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी विनंती केलेली आहे. माननीय मंत्रीमहोदय, लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी उपस्थित राहू शकत नाहीत त्यामुळे या दोन लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात याव्यात यासंदर्भात त्यांनी विनंती केलेली आहे.

प्रा. श्री. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, 855 इमारतीमध्ये राहणा-या लक्षावधी लोकांच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. आज जर लक्षवेधी सूचना क्रमांक एक घेता येत नसेल तर ही लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या भावना ओळखून लक्षवेधी सूचना क्रमांक एक ही कधी घेण्यात यावी या संदर्भात माननीय सभापतींना विचारुन निर्णय घेतला जाईल. माननीय सभापतींना विचारुन शक्यतो लक्षवेधी सूचना क्रमांक एक उद्या घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

-----------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिवंडी नागरिक सहकारी बँकेतील रकमेच्या अपहाराबाबत.
**मु. शी** : भिवंडी नागरिक सहकारी बँकेतील रकमेच्या अपहारासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भिवंडी शहरातील (जि. ठाणे) भिवंडी नागरिक सहकारी बँकेतील झालेल्या करोडो रुपयांच्या अपहार प्रकरणी जिल्हा उपनिंबधकानी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याचा नुकताच घेतलेला निर्णय, यात दोषी असणा-या संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन अपहार झालेल्या रकमेची शासनाने वसुली करावी अशी भागधारकांनी माहे ऑक्टोबर, 2005 च्या सुमारास शासनाकडे केलेली मागणी, या मागणीच्या अनुषंगाने अद्यापपर्यन्त कोणताच निर्णय न घेतल्यामुळे भागधारकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, या प्रकरणी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

डॉ. पतंगराव कदम ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----------

यानंतर श्री. ओटवणेकर ....

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, गेल्या वर्षी नागपूर अधिवेशनामध्ये सदर लक्षवेधी आली होती. त्यावेळी तीन वेळा सभागृह तहकूब करण्यात आले होते. दिनांक 7.12.2004 रोजी ज्यावेळी हा विषय चर्चेला आला होता, त्यावेळी कारवाई करण्यासंबंधीचे आदेश मंत्रिमहोदयांनी दिले होते, म्हणून मी डॉ.पतंगराव कदम यांना धन्यवाद देतो. सदर बाब गंभीर आहे आहे. या बँकेमध्ये फ्रॅाड झ ाालेला असल्यामुळे शासनाने बँकेच्या संचालकांविरुध्द गुन्हा दाखल केला असून चौकशी सुरु केली आहे. शासनाच्या लेखी निवेदनामध्ये संबंधित पोलीस ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे नमूद करण्यात आले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, संबंधित संचालकांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवून त्यांच्याकडून रक्कम वसूल करण्यात येणार आहे का ? शासनाच्या लेखी निवेदनामध्ये संचालकांचा कुठेही उल्लेख नाही. डी.डी.आर.ने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केल्यानंतर संचालक मंडळ हायकोर्टात गेले आणि हायकोर्टाने निर्णय दिला की, तातडीने निर्णय घेण्यात यावा. त्यानंतर जॉईंट रजिस्ट्रार यांनी स्थगिती दिली. ती आता उठवून संचालक मंडळ बरखास्त केले आहे. शासनाच्या लेखी निवेदनाच्या पान 2 वरील दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "सदर चौकशीमध्ये बँकेच्या संचालक मंडळाच्या कारभारात अनियमितता असल्याचे आढळून आले. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्थां, ठाणे यानी बँकेचे संचालक मंडळ दिनांक 30.9.2005 रोजी बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती केली." हे संचालक मंडळ दोषी असल्यामुळे ते बरखास्त केले आहे. पण त्यांच्यावर कुठलीही कारवाई केलेली नाही. बँकेत 8 कोटीच्या वर अपहार झाला आहे. या संचालकांकडून किती रिकव्हरी केली, कशा प्रकारे केली व कोणाकडून केली याचा काहीही उल्लेख नाही. या बँकेचा एनपीए 60 टक्क्याच्या वर आहे. त्यामुळे ठेवीदार लोकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. एका वर्षानंतर देखील संचालकांवर कारवाई होत नसेल तर मग आम्ही काय करावे ? रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या चौकशीमध्ये बँकेच्या संचालक मंडळाच्या कारभारात अनियमितता असल्याचे आढळून आले आहे. तेव्हा या बँकेच्या संचालकांनी कोणती अनियमितता केली आहे ? या बँकेच्या संचालकांनी अनियमतता केली असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शासन फौजदारी गुन्हा दाखल करणार आहे का ? त्यांच्याकडून रिकव्हरी करणार आहे का ? शासनाने या बँकेवर

..2..

श्री.अनंत तरे....

प्रशासक नेमला होता. त्याला एक महिन्यामध्ये बाजूला सारण्यात आले व पुन्हा संचालक मंडळ अस्तित्त्वात आले. 4 संचालकांनी बँकेवर प्रशासक रहावा म्हणून अर्ज केला आहे. त्याचा लेखी निवेदनात उल्लेख करण्यात आलेला नाही. तेव्हा माझा दुसरा प्रश्न असा आहे की, बँकेच्या संचालकांनी कोणती अनियमतताता केली आहे व ज्या संचालकांनी अनियमतताता केली आहे, त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करून शासन अपहाराची रक्कम वसूल करणार आहे का ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यात जे कर्मचारी दोषी आहेत, त्यांच्याविरुध्द कारवाई झाली असून त्यासंबंधी चौकशी चालू आहे. या प्रकरणी संचालक मंडळ दोषी असेल तर त्यांच्याविरूध्द देखील कारवाई केली जाईल व आवश्यकता वाटल्यास फौजदारी कारवाई देखील केली जाईल.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. ऑडीट रिपोर्टमध्ये अनियमितता आढळली काय ? असल्यास संचालकांवर कारवाई का झाली नाही ? सभापती महोदया, निवेदनात स्पष्ट म्हटलेले आहे की, बँकेच्या संचालक मंडळाच्या कारभारात अनियमितता असल्याचे आढळून आले आहे. तसेच बँकेच्या संचालक मंडळाने बँक व्यवहार व प्रशासन यावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवले नाही असे नमूद केले आहे. संचालक मंडळ दोषी असताना त्यांचेवर कारवाई का होत नाही ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदया, पहिल्या लेखा परीक्षण अहवालात संचालक मंडळ दोषी आढळून आले नाही. आता दुसऱ्यांदा लेखा परीक्षण अहवाल करण्यास सांगितलेले आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदया, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, बँकेचे ठेवीदार, भागधारक व संचालक यांनी बँकेच्या कामकाजासंबंधात केलेल्या तक्रारीस अनुसरुन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ,भिवंडी यांनी चौकशी केली असता बँकेच्या कारभारात अनियमितता असल्याचे आढळून आले. त्यानंतर संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. संचालक मंडळ बरखास्तीविरुध्द बँकेच्या काही संचालकांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे अपील दाखल केले. तसेच त्यांनी उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले होते. व उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिनांक 28.10.2005 रोजी तात्पुरती स्थगिती दिली होती. तेव्हा पुन्हा एकदा संचालकाच्या ताब्यात बँक गेलेली आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, जे दोषी असतील त्यांचेवर कारवाई केली जाणार आहे का ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदया, आम्ही दुसऱ्यांदा लेखा परीक्षण करण्याचे आदेश दिलेले आहेत. तो रिपोर्ट आल्यानंतर दोषी असलेल्यावर कारवाई केली जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, गेली एक वर्षे ही चौकशी सुरु आहे. जे कोणी असे घोटाळे करतात त्यांना कोणाचे तरी संरक्षण असण्याची शक्यता आहे. ज्यांचेकडे पुरावे असतात त्यांचेवर दबाव आणला जातो. तर काही लोकांकडून साक्षीपुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. या संदर्भातील साक्षी पुरावे नष्ट होऊ नयेत म्हणून आपण गुन्हेगारी स्वरुपाचे खटले दाखल केलेले आहेत काय ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदया, दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई झालेली आहे. या अधिकारी व कर्मचाऱ्यांना संचालकांपैकी कोणाचा पाठिंबा आहे काय हे पहिल्या लेखा परीक्षण अहवालात सिध्द झाले नाही. आम्ही पुन्हा दुसऱ्यांदा लेखा परीक्षण अहवाल करण्याचे आदेश दिलेले आहेत. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, मागील अधिवेशनात ही लक्षवेधी दोन वेळा राखून ठेवण्यात आली होती. या बँकेमध्ये अनियमितता झालेली आहे. बँकेमध्ये पैसे नसताना चेक वटविले गेले आहेत. आय.बी.पी. दिली गेली. माझा प्रश्न आहे की, या गुन्ह्याचे स्वरुप काय आहे ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदया, पहिल्या लेखापरीक्षण अहवालात अधिकारी दोषी सापडले. यामध्ये संचालकांचे काही हितसंबंध आहेत काय ? यामध्ये कोणाचा हात आहे ? हे पाहण्याकरिता पुन्हा दुसऱ्यांदा ऑडीट करण्याचे आदेश दिलेले आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, गुन्ह्याचे स्वरुप काय आहे असा मी स्पेसिफीक प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर आले नाही.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदया, अफरातफर केली अशा स्वरुपाचा कर्मचाऱ्यावर आरोप आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, हे म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी असा प्रकार आहे. माझ्याकडे दोन ॲप्लीकेशन्स आहेत. एक श्रीमती ज्योती गुप्ता आणि श्रीमती मिना बंटीया या दोन्ही महिला महाराष्ट्राच्या बाहेर राहतात. त्या महिला भिवंडीत राहत नाही. असे असून देखील त्या महिलांना प्रत्येकी एक-एक लाख रुपये कर्ज देण्यात आले आहे. माझ्याकडे हा पुरावा आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जर पुरावा दिला तर ताबडतोब ॲक्शन घेतली जाईल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अनंत तरे : महोदया, तेथील संचालक मंडळ बरखास्त झालेले आहे. शासनाकडे पुन्हा अपिल येणार आहे. त्यामुळे सदनामध्ये दिलेली माहिती ग्राहय धरुन, आपण अपिलला स्टे देऊ नये.

डॉ.पतंगराव कदम : संपूर्ण माहिती तपासल्यानंतर सत्यता पाहूनच स्टेबाबत विचार करण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हाजीबंदरात कोळश्याची मोठया प्रमाणावर चढ-उतारमुळे होत असलेले प्रदूषण.

**मु.शी.**: मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हाजीबंदरात कोळश्याची मोठया प्रमाणावर चढ-उतारमुळे होत असलेले प्रदूषण यासंबंधी प्रा.शरद पाटील, सर्वश्री मधुकर चव्हाण, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जयंत पाटील, अनंत तरे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी नियम 101 पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे.मार्केटर लाईन्स लिमिटेड कंपनीस दिनांक 27 एप्रिल, 2005 चे पत्रान्वये व मे.कोस्टल एनर्जी प्रा.लि.कंपनीस दिनांक 11 मार्च, 2005 रोजी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हाजीबंदरात कोळश्याची चढ-उतार करण्यास सशर्त ना हरकत दाखला देणे, त्याप्रमाणे हाजीबंदरात कोळश्याची चढ-उतार होताना, चेंबूर येथे कोळश्याची साठवण करताना व कोळश्याची रस्त्याने वाहतूक करताना मोठया प्रमाणात हवेत प्रदूषण होणे, कोळश्याचे साठयास आग लागण्याच्या धोक्यामुळे मुंबईतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात असल्याची लोकप्रतिनिधी, खासदार, रहिवाशी संघ, अशासकीय संस्था इत्यादींनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी करणे, मुंबई महानगरपालिकेने दिनांक 5 नोव्हेंबर, 2005 च्या सभेत कोळसा हाताळणीस विरोध करणे, यामुळे महाराष्ट्र प्रदूषण् नियंत्रण मंडळाकडून दिनांक 13 ऑक्टोबर, 2005 व दिनांक 16 ऑक्टोबर, 2005 रोजी पाहणी करणे, या पाहणीत हवेत कोळश्याचे धुळीकण मोठया प्रमाणात आढळून आल्याने तसेच कोळश्याची वाहतूक होताना हवेत प्रदूषण होत असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक 18 ऑक्टोबर, 2005 रोजीच्या पत्रान्वये ना हरकत दाखला रद्द करुन तसे मुंबई पोर्ट ट्रस्ट व संबंधित कंपन्यांना कळविले जाणे, तरीही त्यांच्याकडून कोळशाची चढ-उतार, साठवणूक तसेच वाहतूक करणे सुरु असणे, त्यामुळे हवेत मोठया प्रमाणात धुळीकण साठून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, चेंबूर येथील कोळश्याचा साठा हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीच्या रिफायनरी शेजारी असल्याने कोळशास आग आगल्यास मोठ्या प्रमाणात स्फोट होण्याची भिती, परिणामी जिवितहानी होण्याची शक्यता, त्यामुळे या प्रकरणी शासनाने तात्काळ करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

...3.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

:: **निवेदनानंतर** ::

प्रा.शरद पाटील : सभापती महोदया, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे.मार्केटर लाईन्स लिमिटेड कंपनी आणि मे.कोस्टल एनर्जी प्रा.लि.कंपनीस मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हाजीबंदरात कोळशाची जढ-उतार करण्यास "ना हरकत दाखला" देण्यात आला आणि नंतर तो रद्दही करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून त्यांना फक्त दोन कोटी रुपयांचा कोळसा उतरविण्याची परवानगी देण्यात आली होती. परंतु त्यापेक्षा जादा प्रमाणावर त्यांनी कोळसा उतरविण्याचे काम चालू ठेवल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक 18 ऑक्टोबर 2005 रोजी कायमस्वरुपी हाजीबंदरवर कोळसा उतरविण्यास बंदी घातली गेली. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घालण्यात आलेली बंदी सचिवांनी कोणत्या आधारावर उठविली ? प्रदूषण नियंत्रण मंडळ हे तांत्रिक खाते आहे, त्यांच्याकडे तांत्रिक माणसे असताना सुध्दा त्यांना डावलून, सचिवांनी कोणत्या कारणासाठी हा निर्णय घेतला ?

श्री.गणेश नाईक : महोदया, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मेंबर सेक्रेटरी आणि त्यांच्या तंत्रज्ञांनी अभ्यास केल्यानंतर मे.मार्केटर आणि मे.कोस्टल या कंपन्यांना कोळसा उतरविण्यास आणि वाहतूक करण्यास परवानगी दिली होती. वाहतूक करताना आणि कोळसा भरताना जे निकष ठरवून दिले होते त्या निकषाचा भंग केल्यामुळे त्यांना नंतर परवानगी नाकारली आहे. पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव, मुंबई महानगरपालिकेचे मुख्य अभियंता आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांची यासंदर्भात एक बॉडी असते. महाराष्ट्र नियंत्रण मंडळाने एखादा निर्णय घेतला आणि तो एखाद्या घटकाला नामंजूर असला तर या बॉडीकडे अपिल करता येऊ शकते. अपिल केल्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतलेल्या निर्णयाला त्यांनी स्थगिती दिली आहे.

प्रा.शरद पाटील : महोदया, हा निर्णय घेण्यापूर्वी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मत काय आहे ? कशासाठी ही बंदी घातली याबाबत त्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे काय ?

श्री.गणेश नाईक : महोदया, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ज्या अधिकाऱ्यांनी बंदी घातली होती त्या अधिकाऱ्यांनी संबंधितांना विश्वासात घेणे आवश्यक होते. विश्वासात न घेतल्यामुळे चूक झाली आहे.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : महोदया, प्रदूषण रोखण्यासाठी पूर्वी पेट्रोलवर चालणाऱ्या टॅक्सीमध्ये सी.एन.जी. किट बसविण्याचे कम्पलसरी करण्यात आले. तरीसुध्दा आज प्रदूषण होताना दिसत आहे. लोकप्रतिनिधी आणि एन.जी.ओ. नी तक्रारी केल्या आहेत की, हाजीबंदरावर कोळसा उतरविण्याचे आणि वाहतूक करण्याचे बंद असताना सुध्दा ते चालू ठेवण्यात आले आहे त्याचे कारण काय ?

श्री.गणेश नाईक : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळने काही अटी व शर्तीसह कोळसा उतरविण्यास आणि वाहतूक करण्यास परवानगी दिली होती. त्यामध्ये हवेमध्ये कोळशाचे कण अडता कामा नये, वाहतूक करताना बंदीस्त स्वरुपात करण्यात यावी अशा त्या अटी व शर्ती होत्या. सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींकडून यासंदर्भात तक्रार आल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने त्या ठिकाणची पाहणी केली आणि त्यांच्या असे लक्षात आले की, संबंधित कंपन्यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मला असे आठवते की, या विषयाच्या संदर्भात विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली होती आणि या व्यवसायामुळे त्या ठिकाणी प्रदूषण होणार असल्यामुळे परवानगी दिली जाणार नाही असा निर्णय झाला होता. जगामध्ये थिकली पॉप्युलेटेड अशी एक कोटीच्या आसपास शहरे आहेत.त्या ठिकाणी लोक कशा पध्दतीने राहतात याची आपल्याला कल्पना आहे काय ? ज्याला टी.बी.चा प्रथम प्रादूर्भाव म्हणतो अशा आजाराने जवळजवळ 40 टक्के मुले आजारी आहेत.मुंबई शहर हे वेगळया अर्थाने ज्वालामुखीच्या तोंडावर उभे असलेले शहर आहे.अशा वेळी आय.ए.एस. असलेले प्रधान सचिव त्याचा विचार करीत नाहीत. या निमित्ताने माझा असा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मुंबई शहरामध्ये चेंबूरमध्ये ओ.एन.जी.सी. आहे तेथे रिफायनरीज आहेत व त्यांना आग लागण्याची शक्यता आहे. त्या परिसरात दाट लोकवस्ती आहे.शासनाच्या पूर्वीच्या काही मत्र्यांनी बेकायदेशीर रेशन कार्डस दिल्यामुळे काही लोकांनी बेकायदेशीरपणे त्या भागात वस्ती केलेली आहे. प्रदूषण मंडळाने हरकत घेतलेली असतांनासुध्दा या अधिका-यांना या व्यवसायाला परवानगी देण्याच्या बाबतीत अशी कोणती तातडी वाटली होती ?असा कोणता जीवन मरणाचा प्रश्न तेथे निर्माण झाला होता ? कोळसा उतरविण्याची परवानगी दिली नसती तर मुंबईचे जीवनमान उद्‌ध्वस्त होणार होते काय ? नागरिकांच्या कष्टात वा हालात भर पडणार अशी काही स्थिती यामुळे निर्माण होणारी नव्हती तेव्हा या व्यवसायाला पुन्हा परवानगी देण्याची या अधिका-याला कोणतें कारण वाटले होते ?

लोकांना त्रास होईल आणि प्रदूषणामध्ये भर घातली जाईल अशा प्रकारचा व्यवसाय करण्यास या अधिका-याने रात्री सात आठ नंतर म्हणजे कार्यालयीन वेळ संपल्यानंतर परवानगी देण्याचे कारण काय होते ? त्या अधिका-याच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ? आणि हा व्यवसाय त्वरित थांबविण्यात येणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक :मुंबई पोर्ट ट्रस्टच्या धक्क्यावर हा कोळसा उतरविला जातो.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई पोर्ट ट्रस्टला नोटीस दिली होती की, तुमच्या या ॲक्टीव्हीटीज बंद करण्यात याव्यात. त्या संदर्भात त्यांनी असे सांगितले होते की, ही बाब तुमच्या अखत्यारात येत नाही. तेव्हा ही बाब आमच्या अखत्यारात कशी येते या संदर्भात आम्ही त्यांना सिध्द करुन दाखवले होते. त्याचबरोबर वॅपकोस नावाची एक संस्था आहे आणि एखाद्या भागात हवेचे आणि पाण्याचे प्रदूषण होते किंवा नाही याची पाहणी करुन ती संस्था निर्णय देत असते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक ....

त्या वॅपकोस संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती.परंतु वॅपकोसची नियुक्ती मुंबई पोर्ट ट्रस्टने केलेली असल्यामुळे त्यांच्या संदर्भात ही संस्था पारदर्शकतेने निर्णय देईल की नाही अशी शंका वाटल्यामुळे निरी या संस्थेला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्यास सांगितलेले आहे.निरीने अहवाल सादर केल्यानंतर त्या ठिकाणी प्रदूषण होत आहे असे स्पष्ट झाले तर त्या ठिकाणी कोळसा उतरविण्याचे बंद केले जाईज आणि त्यांनी जर सकारात्मक उत्तर दिले तर तेथे कोळसा उतरविण्याची प्रक्रिया सुरु राहील.

श्री.नितीन गडकरी : वॅपकोस या संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे आणि ही ंसस्था केन्द्र सरकारची आहे तसेच .निरी संस्था सुध्दा केन्द्र सरकारची आहे.असे असतांना नीरी या संस्थेची नेमणूक करुन शासनाने काय नवीन साध्य केलेले आहे ?

श्री.जयंत प्र.पाटील :या दोन संस्थामध्ये फरक आहे.निरी ही संस्था सिानिअर आहे.

श्री.नितीन गडकरी : माननीय मत्रिमहोदयांनी त्याचे उत्तर द्यावे. या दोन्ही केन्द्र सरकारच्या संस्था आहेत. तेव्हा एका संस्थेवर आपण विश्वास ठेवतो आणि दुस-या संस्थेवर विश्वास ठेवत नाही तेव्हा हे बरोबर नाही. वॅपकोस या संस्थेचा अहवाल शासनाकडे आलेला आहे काय ? आणि त्यात त्यानी काय म्हटलेले आहे

श्री.गणेश नाईक : वॅपकोस ही टाटाची कन्सलटन्ट संस्था आहे. हा कोळसा टाटा कंपनीकडे जातो. वॅपकोस संस्थेच्या मार्फत जे तंत्रज्ञ प्रदूषणाची तपासणी करणार आहेत त्यांचे मत पारादर्शक येईलच असे म्हणता येणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, टाटाची कन्सलटन्सी वॅपकोस कंपनीकडे आहे.मुंबई पोर्ट ट्रस्टने त्यांची नेमणूक केलेली आहे. महामंडळाने किंवा पर्यावरण खात्याने ही नेमणूक केलेली नाही.जो दर्जा निरीला आहे तो दर्जा वॅपकोसला नाही त्याचप्रमाणे निरी ही सिनिअर संस्था असल्यामुळे निरीला जास्त महत्व दिले गेले आहे.

नंतरश्री.सुंबरे

s

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ D/ RJW/ श्री. गायकवाड नंतर --- 15:25

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी या लक्षवेधी सुचनेद्वारा जो प्रश्न येथे उपस्थित केला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनीही सांगितले की, मुंबई ही ज्वालामुखीच्या तोंडावर उभी आहे आणि तिला वाचविण्यासाठी हा जो प्रश्न विचारण्यात आला आहे की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे. मार्केटर लाईन्स लि. या कंपनीस मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हाजी बंदरामध्ये कोळशाची चढउतार करण्यास अगोदर परवानगी दिली होती. नंतर ती रद्द करण्यात आली आणि त्यांनी अपील केल्यावर प्रधान सचिव,पर्यावरण विभाग यांनी त्यांचे अपील मंजूर करून त्यांना पुन्हा परवानगी दिली. पण प्रदूषण होते आहे किंवा नाही हे ठरविण्याबाबतीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ही महत्त्वाची संस्था आहे, महाराष्ट्र शासनाचे ते एक महत्त्वाचे मंडळ आहे. असे असताना अशा प्रकारे अपील मंजूर करून पुन: परवानगी देण्यापूर्वी विभागाच्या प्रधान सचिवांनी या प्रदूषण मंडळाशी चर्चा वा विचारविनिमय केलेला नाही असे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे येथे मान्य केले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद. पण यापुढे तरी अशी प्रकरणे आल्यास, प्रदूषण नियंत्रण मंडळाला विश्वासात घेतल्याशिवाय कोठलीही परवानगी दिली जाणार नाही याची खबरदारी घेतली जाणार आहे का ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, ही ॲथॉरिटी स्वतंत्र आहे आणि त्यांना अशी परवानगी देण्याचे अधिकार आहेत. तसेच खात्याचे जे प्रधान सचिव आहेत त्यांनाही अशा प्रकारे अपील केल्यावर निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. मात्र तो निर्णय घेताना प्रदूषण नियंत्रण मंडळाचा देखील त्यांनी सल्ला घेणे गरजेचे होते असे मला वाटते.

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, पर्यावरणवादी संस्थेकडून एखादी तक्रार आल्यानंतर मग त्याबाबत गांभीर्याने दखल घेतली जाते. आता देखील हाजी बंदर येथील कोळशाची जी चढउतार होते, वाहतूक होते त्यातून मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होते आहे, त्यामुळे त्या भागातील रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झालेला अशा प्रकारे शासनाला पर्यावरणवादी संस्थेने कळविले आहे. तेव्हा त्या पर्यावरणवादी संस्थेचे ते म्हणणे खोटे आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, पर्यावरणवादी संस्थेने असा अर्ज केल्यानंतरच त्या ठिकाणी आपले निरीक्षकांनी जाऊन निरीक्षण केले आहे आणि तेथे हवेमध्ये कोळशाचे कण प्रमाणापेक्षा जास्त आहेत व त्यामुळे तेथे मोठ्या

.... डीडी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक ...

प्रमाणात प्रदूषण आहे असे सिद्ध झाल्यामुळेच तेथील कोळशाची चढउतार आणि वाहतूक बंद केली होती. पण संबंधित वाहतूक कंपनी वरच्या ॲथॉरिटीकडे गेली आणि त्यांनी त्याबाबत स्टे घेतला.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, नामदार मंत्री महोदय येथे कबूल करीत आहेत की, प्रदूषण नियंत्रण मंडळाने तेथे कोळशाच्या चढउतार आणि वाहतुकीमुळे त्या भागामध्ये प्रदूषण होत आहेत, हवेमध्ये मोठ्या प्रमाणात कोळशाचे कण मिसळले जात आहेत हे मान्य केले आहे तेव्हा त्या भागामध्ये होणारी कोळशाची चढउतार व वाहतूक शासन बंद करील काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, आपण या संबंधात निरी या संस्थेला अभ्यास करून अहवाल देण्याचे काम दिलेले आहे आणि त्यांचा अहवाल आल्यानंतर त्यातून स्पष्ट झाले की, हवेमध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे तर ताबडतोब त्यावर बंदी घातली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, उद्या त्यांच्याकडून अहवाल आला की, प्रदूषण होत नाही तर आपण नरीमन पॉईन्ट आणि गेटवे ऑफ इंडिया येथेही कोळशाची चढउतार व वाहतूक करण्यास परवानगी देणार का ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, हे हाजी बंदर अशा गोष्टींची चढउतार आणि वाहतूक करण्यासाठीच ठेवले आहे. त्यामुळे नरीमन पाईंट व गेटवे ऑफ इंडिया येथे यासाठी परवानगी देण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, हा सगळा एरिया मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ताब्यात आहे. तेव्हा त्यांनी कबूल केले की, हा पर्याय आहे की, हाजी बंदर येथे कोळशाची वाहतूक करू शकता वगैरे. तर शासन काय करीत आहे ? या ठिकाणी पर्याय असताना... उद्या आपण नवी मुंबई येथे मार्केट कशासाठी उभे केले ? तर येथे मार्केट असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक जाम होत होती म्हणूनच आपण मशीदबंदर येथील मार्केट नवी मुंबई येथे नेले. तेव्हा या ठिकाणी जेएनपीटीमध्ये कोळसा बंद केला असताना मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे कसा आपण उतरविता ? तेव्हा उद्या निरीचा अहवाल येईपर्यंत आपण तेथे हे काम चालू ठेवणार काय ?

( यानंतर श्री. सरफरे .... इइ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, मी आपणामार्फत सभागृहाला विनम्रपणे सांगू इच्छितो की, त्याठिकाणी पर्यावरणवादी संघटना व लोकप्रतिनिधींची तक्रार आहे की, त्याठिकाणी हवेतील प्रदूषण मानवी जीवनाला त्रासदायक आहे. ही बाब लक्षात घेऊन त्याठिकाणी निरी संस्थेची नेमणूक केली आहे. तेव्हा निरी या संस्थेचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाल्यानंतर व त्या अहवालामध्ये त्याठिक्‍ाणी असलेले प्रदूषण मानवी जीवनाला घातक आहे असे दिसून आल्यानंतर त्या ठिकाणी कोळसा उतरविण्यास व वहातूक करण्यास बंदी घातली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी इतक्या पोटतिडिकीने सांगितले असतांना मंत्रिमहोदयांचा आग्रह कशासाठी समजत नाही? निरी या संस्थेचा अहवाल येईपर्यंत आपण हे कामकाज बंद ठेवणार काय? ते बंद ठेवण्यामध्ये अडचण काय आहे? आपण सभागृहाच्या भावना लक्षात घ्या. माननीय सदस्य सर्वश्री विलास अवचट, गिडवाणी यांनी पोटतिडिकीने हा प्रश्न उपस्थित केला . तेव्हा निरीचा अहवाल येईपर्यंत आपण हे काम बंद ठेवणार काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, हा कोळसा टाटा पॉवर हाऊस व एम.एस.ई.बी. ला जातो. महाराष्ट्रामध्ये लोडशेडींगचा प्रश्न भेडसावीत आहे....

श्री. विनोद तावडे : त्यांना दुसऱ्या ठिकाणाहून कोळसा येणार नाही कां?

श्री. गणेश नाईक : अशा परिस्थितीत त्या वहातूक करणाऱ्या व कोळसा उतरविणाऱ्या संस्थांना दुसरी पर्यायी व्यवस्था करण्यासाठी पर्याय दिल्याशिवाय एकाएकी आपण बंदी घातली तर त्याचा निश्चितपणे परिणाम होईल. आणि म्हणून एक महिन्याचा कालखंड हा फार मोठा नाही. माननीय सदस्यांना मी खात्री देतो की, निरीचा अहवाल सकारात्मक आला तर ताबडतोब कोळसा उतरविण्यावर आणि वहातुकीवर बंदी घातली जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तज्ज्ञ मंडळी आहेत. कोणत्याही नागरिकांची राजकीय सोय करावी म्हणून आपण हे नियम केले आहेत. या मंडळाचे अध्यक्ष असतात ते तांत्रिक तज्ज्ञ असतात. त्यांनी सांगितले आहे की, याठिक्‍ाणी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, हवेमध्ये एक पंचमांश प्राणवायू आहे. तुम्ही आम्ही व मंडळाने जे सांगितले आहे त्यापेक्षा निरी वेगळे निकष लावणार आहे कां? आणि उद्या जर निरीच्या अहवालामध्ये दिसून आले की, त्याठिकाणी मोठया प्रमाणावर प्रदूषण होत आहे.तर मग आजपासून

श्री. मधुकर चव्हाण....

एक महिनाभर तेथील लोकांना प्रदूषणाला तोंड द्यावे लागणार आहे. आणि जर आपण आज बंदी घातलीतर आज तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे, त्यांची फुफ्फुसे खराब झाली आहेत ती पुरेसा प्राणवायू मिळाल्यामुळे क्लिअर होतील. आणि जर निरीने नकारात्मक रिपोर्ट दिल्यानंतर आपण नारळ वाडवून आनंद व्यक्त करा, व पुन्हा कोळसा उतरविण्यास सुरुवात करा. तोपर्यंत थांबण्यास काय हरकत आहे?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, सभागृहामध्ये आज लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे त्यावर माननीय सदस्यांना निश्चितपणे माहिती मिळाली पाहिजे. एक महिन्याच्या कालखंडामध्ये ते आपला पर्याय शोधतील.दुसरी गोष्ट अशी की, त्याठिकाणी आज निरीचे निरीक्षक मॉनिटरींग करीत आहेत. त्यांच्याकडून काही सकारात्मक रिझल्ट येणे आवश्यक आहे. तसेच, यासंबंधी आपण अपिल ॲडमिट केले आहे, त्याला स्थगिती देण्यात आली आहे. आणि आम्ही एक महिन्याच्या आत निर्णय घेणार आहोत असे सांगितले आहे. त्यामुळे एक महिन्याचा कालखंड हा जास्त नाही. मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, समाजाच्या आरोग्याला घातक असणारी कोणतीही गोष्ट शासन सहन करणार नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये हाजी बंदराविषयी आपले मत व्यक्त केले आहे. हे बंदर हॅजाड्र्स कार्गो असेल, परंतु त्या ठिकाणी जो माल उतरविण्यात येतो तो ड्रम, पॅकेजच्या स्वरुपात असतो. सुटया प्रकारच्या मालाची हाताळणी होत नाही. त्याठिकाणी कोळसा सुटया प्रकारामध्ये येतो. त्याच्या हँडलिंगमुळे त्या ठिकाणी प्रदूषण होते. प्रदूषण नियंत्रण मंडळावर प्रधान सचिव आहेत. त्यांनी यासंबंधी रिपोर्ट दिला आहे, शासनाच्या मान्यताप्राप्त संस्थेने रिपोर्ट दिला आहे. असे असतांना आपण हे काम सुरु ठेवायचे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/RJW/D पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:35

श्री.प्रकाश शेंडगे . . . .

मे.वॅपकोस या संस्थेचा रिपोर्ट आला म्हणून स्थगिती द्यावयाची हा संपूर्ण प्रकार संशयास्पद आहे. तर जी शासनाची संस्था आहे, शासनाचे प्रधान सचिव आहेत त्यांच्यावर विश्वास ठेऊन, त्यांच्या आदेशानुसार येथील कोळशाची वाहतूक बंद करावी आणि यासंदर्भात पाहणी करण्यासाठी निरी संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. तर त्या संस्थेचा पॉझिटीव्ह रिपोर्ट आला तर मग ही वाहतूक पुन्हा सुरु करावी. तसे शासन करणार आहे का ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदया, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी पुन्हा तोच प्रश्न विचारला आहे आणि मी याचे मघाशी उत्तर दिले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, शासनाने सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्यात.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदया, याबाबतीत कायदेशीर बाबी तपासून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

----

. . . .2 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

पृ.शी.: काटोल येथून भिष्णूर,नरखेड व खराळा या मार्गावर असणारी अपूरी बससेवा.

मु.शी.: काटोल येथून भिष्णूर,नरखेड व खराळा या मार्गावर असणारी अपूरी बससेवा याबाबत माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. ती त्यांनी मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो :-

सभापती महोदया, नागपूर जिल्हयातील काटोल तालुक्यातून भिष्णूर,नरखेड तसेच खराळा मार्गावर धावणाऱ्या अपूऱ्या बससेवेमुळे येथील विद्यार्थ्यांसह प्रवाशांची अत्यंत गैरसोय होत आहे. या मार्गावर मसली मार्गे 3 तर भिष्णूर मार्गे 5 अशा प्रतिदिन 8 बस फेऱ्या काटोलहून धावतात. दुपारी 4.30 वाजल्यानंतर रात्री 7.30 वाजता भिष्णूर मार्गे नरखेडला बस जाते. तीन तासांच्या अंतरात बस फेरी नसल्यामुळे या वेळेत प्रवास करणारे प्रवासी अवैध वाहतुकीच्या जीपगाडयांनी प्रवास करीत असतात. तसेच नरखेडहून पिंपळगावला येणारी सकाळी 7.00 वाजताची बसफेरी बंद केल्यामुळे पिंपळगाव येथील विद्यार्थ्यांचीही मोठी गैरसोय होत आहे. तेथील शालेय विद्यार्थ्यांना 2 कि.मी. पायी चालत जाऊन बस पकडावी लागते. यासंदर्भात एस.टी.महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक, आगार व्यवस्थापक यांना स्थानिक लोकांनी निवेदन देऊनही बसफेऱ्यांच्या वेळापत्रकात बदल केला गेला नाही अशी स्थानिक नागरिकांची तक्रार आहे. काटोल,भिष्णूर मार्गे नरखेड या मार्गावरील बसफेऱ्या वाढविण्यात याव्यात अशी तेथील नागरिकांची मागणी असून शासनाने उचित निर्देश देऊन, प्रवाशांची तसेच शालेय विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टाळावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती करीत आहे.

----

. . . .2 एफ-2





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुलुंड(पूर्व) भागातील हरिओम सोसायटी परिसरातील कचरा कांजूरमार्ग येथे नव्याने तयार झालेल्या डंपींग ग्राऊंडमध्ये टाकणे.

मु.शी.: मुलुंड(पूर्व) भागातील हरिओम सोसायटी परिसरातील कचरा कांजूरमार्ग येथे नव्याने तयार झालेल्या डंपींग ग्राऊंडमध्ये टाकणे याबाबत माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे, ती त्यांनी मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबईतील मुलुंड (पूर्व) भागातील हरिओम सोसायटी परिसरातील डंपींग ग्राऊंड मधील कचरा कांजूरमार्ग येथे नव्याने तयार झालेल्या डंपींग ग्राऊंडमध्ये टाकण्याचे आदेश न्यायालयाने देणे. न्यायालयाच्या आदेशानंतरही मुलुंड (पूर्व) परिसरातील डंपीग ग्राऊंडमध्येच हा कचरा टाकला जाणे, न्यायालयाच्या आदेशाचा होणारा अवमान, महानगरपालिका प्रशासनाचे याकडे होत असलेले अक्ष्यम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. म्हणून मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे याकडे लक्ष वेधू इच्छिततो. धन्यवाद. "

------

. . . .2 एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांची विशेष उल्लेखाची सूचना आहे. त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्या अनुपस्थित)

-----

. . . .2एफ-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी.: पेण तालुक्यातील कणे येथील खारबंदिस्तीची भिंत कोसळून अठरा गावांना निर्माण झालेला धोका.

मु.शी.: पेण तालुक्यातील कणे येथील खारबंदिस्तीची भिंत कोसळून अठरा गावांना निर्माण झालेला धोका या बाबत माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

डॉ.अशोक मोडक(कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पेण तालुक्यातील कणे नावाच्या गावी खारबंदिस्ती करणारी भिंत कोसळल्यामुळे अठरा गावांना उत्पन्न झालेला धोका."

सभापती महोदया, दि.25,26 व 27 जुलै रोजी जो जलप्रलय झाला, त्यामुळे पेण तालुक्यात कणे गावातील खारबंदिस्ती करणारा बंधारा वाहून गेला. मूळात आपण कणे गावाची परिस्थिती समजून घेतली तर तेथील हाहा:काराची कोणालाही कल्पना येईल. या गावाच्या एका बाजूला पूर्वेकडून भोगावती नदी आणि तिच्यावर बांधलेले हेटवणे धरण, दक्षिणेस शहापाडा धरण व त्या धरणाचे पाणी आणि उत्तरेस पाताळगंगा नदी. अशा प्रकारे तीनही बाजूला नदी, धरण असल्याने त्यादिवशी अत्यंत कमी वेळामध्ये आणि अतिशय वेगाने गावात पाणी शिरले आणि मघाशी म्हटल्याप्रमाणे खारबंदिस्तीच्या पाच कि.मी.लांबीच्या बंधाऱ्यापैकी अडीच ते तीन कि.मी.लांबीचा भाग वाहून गेला, तो भाग उध्वस्त झाला. परिणामत: कणे, बोर्झे,मोठे वढाव, वढाव, दीव, वाशी इ.अठरा गावातील पीकपाणी उध्वस्त झाले. मी त्याठिकाणी मुद्दाम दोन वेळा गेलो आहे. तेथील गावकऱ्यांकडून अशी माहिती मिळाली की, 29 जुलै रोजी सर्व गावकरी एकत्र आले आणि त्यांनी खारलॅण्ड ऑफीसरला आपली व्यथा सांगितली. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा बंधारा बांधण्यात आला. हा बंधारा चांगल्या स्थितीत बांधला आहे असे नाही पण त्यामुळे संकटाचा फटका थोडा कमी बसला.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (पुढे सुरु...

दु:ख असे आहे की, एका बाजुला त्या सगळया 130 मजुरांनी एकत्र येऊन आठ दिवस काम करुन एका अर्थाने त्या ठिकाणच्या गावातील लोकांचे प्राण वाचविले. त्या मजुरांना अजूनही रोजगार मिळालेला नाही, वेतन मिळालेले नाही, मोबदला मिळालेला नाही. मी स्वत: मामलेदारांना पत्र लिहिलेले आहे की, "कणे गावच्या माणसांचे शिष्टमंडळ मला भेटलेले आहे. आपल्यामार्फत सरकारला विनंती करत आहे की, या 130 मजुरांनी त्या गावच्या कल्याणासाठी बंधारा बांधलेलेला आहे, त्यांना वेतन कधी मिळणार आहे ? त्यांना सत्वर वेतन मिळावे, अशी विनंती आहे." मूळामध्ये बंधाऱ्याची 12 फूट लांबी, 12 फूट उंची आणि 13 फूटाचा पाया आहे. तो पाया वाढविला तरच गावचे जलाशयापासून रक्षण होणार आहे. तेव्हा 12 फूट लांब, 12 फूट रुंद आणि 45 फूट पाया असावा अशी गावकऱ्यांची मागणी आहे. त्या संबंधातील ग्रामस्थांनी निवेदन दिलेले आहे. त्या संदर्भात शासन वेळीच काळजी घेईल काय ? याबाबत आदेश द्यावेत. पायाची पुनर्भरणी करण्यात येणार आहे काय ? याबाबत मंत्री महोदयांनी अनुकूल अशाप्रकारचे उत्तर द्यावे, अशी विनंती करुन माझे बोलणे संपवितो.

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना गांभीर्याने घेतलेली आहे.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अध्यापक विद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत.

**मु.शी.** : अध्यापक विद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत श्रीमती संजीवनी रायकर,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर, यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर :: महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

"अध्यापक विद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतरांच्या मागण्यांसबंधात माननीय शालेय शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी दि.5 एप्रिल 2005 रोजी शिक्षक आमदार श्री.आर.डी.मोते, श्रीमती संजीवनी रायकर यांच्या उपस्थितीत निर्णय घेऊ असे ठामपणे सांगणे, दिनांक 1 जून 2005 पर्यन्त शासनाने काहीही निर्णय न घेणे, त्यामुळे दि.20 ऑक्टोबर,2005 रोजी वेतनासंबंधीची मागणी पूर्ण करु असे सांगणे, परंतु अद्यापपर्यन्त कोणतीही कार्यवाही न केल्याने डी.एड. कॉलेजमधील कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, दि. 5 डिसेंबर,2005 रोजी नागपूर येथे सुरु होणाऱ्या अधिवेशनापूर्वी मागण्या मान्य न झाल्यास दि.12-12-2005 पासून विधानभवन, नागपूर समोर मागण्या मान्य करेपर्यन्त संस्थगित आमरण उपोषण सुरु करण्याचा महाराष्ट्र स्टेट टिचर एज्युकेटर्स असोसिएशनने दिलेला इशारा. सदर विषय अत्यंत महत्वाचा व गंभीर असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखद्वारे उपस्थित करु इच्छिते."

सभापती महोदया, अध्यापक विद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी दिनांक 5 आणि 6 एप्रिलला बजेट अधिवेशनाच्यावेळी त्यांच्या मागण्या मंजूर होण्याच्या संबंधाने उपोषणास बसलेले होते. त्यावेळेस मंत्री महोदयांनी चर्चेला बोलाविले,आश्वासन दिले. त्यानंतर 5 जुलैला मंत्री महोदयांना शिष्टमंडळ भेटले, त्यावर मंत्रीमहोदयांनी त्यांना सांगितले की फाईल अर्थ विभागाकडे पाठविलेली आहे. परंतु प्रत्यक्षात फाईल पाठविलेली नव्हती. त्यानंतर पुन्हा पदाधिकारी मंत्री महोदयांना भेटले. मंत्री महोदयांनी सांगितले की, डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये त्यांना उपोषणास बसायला लावू नका. परंतु त्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे काही कार्यवाही झाली नाही. परंतु ही या ठिकाणी चर्चा चालू आहे, ते आजही उपोषणाला बसलेले आहेत. त्यांची प्रामुख्याने मागणी आहे की, सुधारित वेतनश्रेणी द्यायला पाहिजे. वास्तविक 12 वी पास झालेली मुले आहेत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रमती संजीवनी रायकर (पुढे सुरु...

डी.अेड.झालेली मुले आहेत, त्यांना पुढची वेतनश्रेणी मिळते. ते पुढच्या वर्गाला शिकवितात तरी देखील त्यांना पुढची वेतनश्रेणी दिली जात नाही. अशाप्रकारच्या त्यांच्या अनेक मागण्या आहेत, सगळया मागण्यांचा मी उल्लेख करत नाही. माझी विनंती राहील की, मंत्री महोदयांनी ते जे आज उपोषणाला बसलेले आहेत त्यांना आज नाही तर उद्या चर्चेसाठी बोलवावे, त्यांच्या तोंडाला आश्वासनाची पाने न पुसता ताबडतोबीने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी आणि त्यांना उपोषण सोडण्यास लावावे.

--

**विशेष उल्लेखासंबंधी**

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना आहे ती त्यांनी मांडावी.

(सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4...

पृ.शी. : विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या.

मु.शी. :विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आत्महत्त्येबाबत श्रीरामनाथ मोते, वि.प.स.यां□ दिलेली विशेष उल्ले□ाची सूच□.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदया, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्रात दररोज होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या" या विषयाच्या संदर्भात विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विचार मांडू इच्छितो.

सभ्ांपती महोदया, महाराट्रातील शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या या गंभीर विषय विशेष उल्लेखाच्चा माध्यमातून सभागृहात मांडू इच्छितो.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांची आत्महत्त्या हा आता नित्याचा विषय झाला आहे. अभ्यासाचे ओझे, स्पर्धेचे वातावरण, पालकांच्या अपेक्षा यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक संतुलन बिघडत असून विद्यार्थी आत्महत्येचा मार्ग स्विकारीत आहेत. पवई येथील प्रसिध्द आय.आय.टी. शैक्षणिक संस्थेत विजय नुकळा, वय 22 या विद्यार्थ्याने अभ्यासाच्या दबावामुळे गळफास लावून आत्महत्या केली. दहिसर येथे 19 नोव्हेंबर 2005 रोजी अर्चना नाडर वय 17स या विद्यार्थीनीने ओढणीने गळफास लावून आत्महत्या केली. सदर विद्यार्थीनी दोन वेळा नापास झाली होती. अभ्यासाचे ओझे वाढल्याने कमी गुण मिळाल्यास, आपण जगण्यास लायक नसून आईवडिलांच्या अपेक्षा पूर्ण करु शकणार नाही, या निराशेपोटी वसई येथील दहावीत शिकणाऱ्या दोन मुलींनी गळफास लावून आत्महत्या केली. अशा वेगवेगळया घटना दररोज कोणेत्या ना कोणत्या ठिकाणी घडत असून शालेय जीवनात विद्यार्थ्यांचे समुपदेशन होणे आवश्यक आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना आवश्यक असून समुपदेशनासाठी शासनाने शाळांमध्ये शासनाच्यावतीने समुपदेशक नियुक्त करावा व कोवळया जिवांच्या आत्महत्या थांबवाव्यात अशी अपेक्षा करतो. हे काम शाळा स्तरावरच चांगल्या प्रकारे व प्रभावीपणे समुपदेशकामार्फत होऊ शकते.शासनाने या गंभीर घटनेची दखल घेऊन उपाययोजना करावी अशी मी या विशेष उल्लेखच्या माध्यमातून सभापती महोदया, आपणातर्फे शासनास विनंती करतो. धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृशी.** : पुणे जिल्हयातील जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्यावरील शिवाई देवीच्या मंदिरात मौल्यवान दागिन्यांची चोरी होणे.

**मु.शी.** : पुणे जिल्हयातील जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्यावरील शिवाई देवीच्या मंदिरात मौल्यवान दागिन्यांची चोरी होणे.याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"पुणे जिल्हयातील जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्यावरील शिवाई देवीच्या मंदिराच्या पश्चिमेकडील लोखंडी दरवाजा तोडून मंदिरात घुसून देवीच्या गळयातील मोठे मंगळसूत्र, नथ व लहान मंगळासूत्र, तसेच राजमाता जिजाऊंच्या गळयातील मोठे मंगळसूत्र व नथ त्याचप्रमाणे चांदीच्या पादुका, भाविकांनी आर्पण केलेले नवसाचे चांदीचे पाळणे, व्हीसीडी आदि सुमारे 20 हजार रुपयांचा ऐवज, चोरीस गेल्याने भाविकात पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, सदर चोरीचा अद्याप तपासही पोलिसांना लागलेला नाही. अशा प्रकारे सोन्या-चांदीचा ऐवज असलेल्या ऐतिहासिक मंदिरात रखवालदार नसणे ही बाब आक्षेपार्ह व गंभीर असल्याने या प्रकरणाचा तातडीने तपास करुन याबाबतचे निवेदन शासनाने तात्काळ करावे, ही विनंती. "

सभापती महोदया, एका अतिशय दुर्लक्षित व ज्वलंत घटनेकडे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे. संपूर्ण महाराष्ट्राची अस्मिता असणारा शिवनेरी किल्ला आहे. त्याचेच नाव तालुक्याला द्यावे अशी मागणी सातत्याने नागरिकांकडून होत असते.या शिवनेरी किल्ल्यावर शिवाई देवीचे मंदिर आहे. दि. 4 डिसेंबर, 2005 रोजी हाती आलेल्या माहिती नुसार आणि दैनिक सामना पुणे, यांनी प्रकाशित केलेल्या सत्यघटनेनुसार प्रत्यक्ष देवीच्या अंगावरील मंगळसूत्र, नथ , लहान मंगळसूत्र, भाविकांनी अर्पण केलेले देवीचे पाळणे हे शिवनेरी किल्ल्यावरुन चोरीला गेलेले आहेत. अजूनही आरोपी सापडलेले नाहीत. शिवनेरी किल्ल्यावर विशेष म्हणजे मंदिरात रखवालदार नाहीत आणि पोलीस गस्तीची व्यवस्था नाही. या घटनेनंतर लगेचच जुन्नर बाजारपेठेतील 20 दुकाने एका रात्री फोडली आहेत. जुन्नर व्यापारी असोसिएशनने या घटनेचा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ RJW/ D/ प्रथम श्री.किल्लेदार... 15:45

डॉ. नीलम गोऱ्हे...

निषेध करुन 300 व्यापा-यांनी जुन्नर बंदचे आवाहन केले आहे. या खेरीज जुन्नर तालुक्यामध्ये चंदन चोरीच्या घटना वारंवार घडलेल्या असून त्याच्यामध्ये एक पोलीस सापडलेला आहे. त्या पोलिसाला पकडण्यासाठी दुसरे पोलीस तेथे गेले होते. या घटनेतील आरोपी हा पोलीस असल्यामुळे त्याच्यासंबंधीचा साक्षीपुरावा नष्ट होऊ नये म्हणून त्या पोलिसांनी त्याचे छायाचित्रण केलेले आहे. या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचे जतन करण्याच्या जाबाबदरीच्या संदर्भात मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधते. पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यावर शिवाई देवीच्या मंदिरामध्ये जी चोरी झाली त्यातील आरोपी त्वरित पकडले जावेत. पोलीस बंदोबस्त वाढवावा व पुज्य शिवाई देवीची प्रतिष्ठा आणि पावित्र्याचे रक्षण शासनाने करावे याकडे मी विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधीत आहे.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृशी.** : नेवासे येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर परिसर विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देणे.

**मु.शी.** : नेवासे येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर परिसर विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी एक विशेष ------------ उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडता :-

"ज्या अर्थी 2 जानेवारी 1997 रोजी नेसावे येथील श्री ज्ञानेशवर मंदिर परिसर विकासाची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री माननीय मनोहर जोशी यांनी नेवासे येथे केली. दिनांक 5 मार्च, 1998 रोजी विकास समिती गठीत करण्यात आली. तर 21 मार्च 1998 रोजी विकास आराखडयास प्रशासकीय मान्यताही देण्यात आली. दिनांक 25.07.2000 रोजी मुंबई येथे 2 काटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबतचे अश्वासन मुख्यमंत्री माननीय नामदार विलासराव देशमुख यांनी विधान परिषद सभागृहात दिले. आजपावेतो शासनाकडून या कामाकरिता अवघा रु. 2.50 लाख रक्कमेचा निधी उपलब्ध करुन देण्यांत आला आहे.

ज्याअर्थी अशा प्रकारे या कामी होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष व दिरंगाई यामुळे नागरिकांमध्ये व भाविकांमध्ये पसरलेला असंतोष.

ज्याअर्थी हे सभागृह याबबात तिव्र चिंता व खेद व्यक्त करीत आहे. "

सभापती महोदय, नेवासे येथे ज्ञानेश्वरांनी "ज्ञानेश्वरी" लिहिली हे संपूर्ण जगाला माहीत आहे. त्यासंदर्भात ज्ञानेश्वर मंदिर विकास आराखडा मंजूर करावा म्हणून दि. 27 मार्च, 2000 रोजी मंबई येथे अधिवेशन चालू असतांना आझाद मैदानावर महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर भक्त उपोषणाला बसले होते. त्याचवेळेला सभागृहाचे कामकाज चालू असल्यामुळे सभागृहात त्या

..5..





श्री. यशवंतराव गडाख...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

विषयावर आम्ही चर्चा घडवून आणली आणि तत्कालीन मुख्यमंत्र्यानी आश्वासन दिले की, "अंदाजपत्रकामध्ये 2 कोटी रुपयाची तरतूद केली जाईल आणि पैशाअभावी हे काम बंद पडू दिले जाणार नाही," असे आश्वासन सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी याच सभागृहात दिलेले आहे. मी हा विषय परत उपस्थित केला आणि त्यावेळी श्री. आर.आर.पाटील, ग्रामविकास खात्याचे मंत्री होते. त्यांनी असे उत्तर दिले की, "76 लाख रुपयाची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी आम्ही प्रस्तावित केले आहे. विकास आराखडयाच्या बाबतीत दोन कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिलेले आहे हे मान्य आहे." असे असतांना आतापर्यंत फक्त अडीच लाख रुपये गेल्या पाच वर्षात दिले गेले. या राज्याचे प्रमुख सभागृहात एक अत्यंत भावनाशील विषयावर निवेदन करतात, सभागृहात आश्वासन देतात, तेव्हा त्याची पूर्तता संबंधित खात्याच्या सचिवांनी करावयास पाहिजे होती. गेले चार-पाच वर्षे आम्ही या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करुनही ग्रामीण विकास खात्याने काहीही पाठपुरावा केलेला नाही किंवा बजेटमध्ये तरतूद करुन घेण्यासाठी जे प्रयत्न करायला पाहिजे होते ते प्रयत्न केले नाहीत. मागच्या महिन्यात नेवासा येथे सर्वपक्षीय मिटिंग झाली. आश्वासन देऊनही तरतूद होत नसेल तर नेवासे हे गाव बंद ठेवणे,नगर-औरंगाबाद रस्ता अडविणे अशा पध्दतीने लॉ ॲण्ड ऑर्डरचे प्रश्न निर्माण होणार आहेत. म्हणून सभापती महोदय, मी आपल्या मार्फत शानाचे लक्ष परत एकदा वेधू इच्छितो की, जे आश्वासन दिलले आहे त्याची पूर्तता या बजेटमध्ये शासनाने करावी. या ठिकाणी सहकार मंत्री तसेच शेती मंत्री बसलेले आहेत. सरकारच्या विश्वासार्हतेचा प्रश्न लोकांच्या मनात अशा पध्दतीने राहिला तर ते सरकारच्या दृष्टीने सुध्दा बरोबर नाही. तेव्हा त्यांनी यामध्ये लक्ष घालावे अशी विनंती आपल्या मार्फत मंत्र्यांना करु इच्छितो.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख.......

या ठिकाणी माननीय सहकार मंत्री आणि माननीय कृषी मंत्री देखील उपस्थित आहेत. म्हणून शासनाच्या विश्वासार्हतेचा हा प्रश्न असल्यामुळे आणि लोकांच्या मनात अशा प्रकारची शंका रहावी हे शासनाच्या दृष्टीने देखील बरोबर नाही. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे ही माझी विनंती आहे.

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाची नोंद शासनाच्या वतीने घेण्यात आलेली आहे.

--------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: डॉ. शिवाजी चोरमले (जि. अहमदनगर) यांच्या मुलाची विहीरीत टाकून केलेली हत्या.

**मु.शी.**: डॉ. शिवाजी चोरमले (जि. अहमदनगर) यांच्या मुलाची विहीरीत टाकून केलेली हत्या याबाबत श्री. प्रकाश शेंडगे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

सभापती महोदया, एका गंभीर प्रश्नाकडे मी आपल्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. डॉ. शिवाजी जगन्नाथ चोरमले, मु.पो. टाकळी मानूर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर यांच्या मुलाचा 19 डिसेंबर, 2004 रोजी विहीरीमध्ये टाकून खून करण्यात आला आहे. या एक वर्षाच्या काळात या मुलाच्या वडिलांनी पोलीस खात्याकडे रितसर तक्रार केली. संशयित आरापी कोा आहेत यासंबंधीची माहिती दिली. असे असतांना सुध्दा एक वर्षात मुलाच्या वडिलांना पाथर्डी पोलीस स्टेशन तसेच पोलीस अधीक्षक, अहमदनगर हे न्याय देऊ शकले नाही, साधा गुन्हा देखील नोंदविण्यात आला नाही. आरोपी नं. 1, 2, 3 व 4 पोलीस पार्टी तपासासाठी गावांत आल्यानंतर ज्यांच्या नांवाने फियाद आहे त्यांच्याच घरात व दुकानात बसून दारुच्या पाटर्या घेतात. अशा प्रकारची गंभीर तक्रार मुलाच्या वडिलांनी पोलिसांकडे केली परंतु आजपर्यंत देखील त्यांना न्याय मिळाला नाही आणि आरोपी मात्र बिनधास्त गांवात फिरतात. पोलीस पार्टी ज्यावेळी गावात येते त्यावेळी आरोपीला अगोदरच बातमी देण्यात येते आणि आरोपींना लंपास केले जाते. म्हणून या मुलाच्या वडिलांनी मंत्री महोदयांकडे व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दाद मागितली. पोलीस अधीक्षकांनी त्यांना आश्वासन दिले की, तीन दिवसात आरोपींना पकडून दाखवितो परंतु अद्याप कुठलीही कारवाई केलेली नाही. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांसमोर उपोषणाचा मार्ग त्या मुलाच्या आई-वडिलांनी अवलंबिला इतकेच नव्हे तर मागील विधानसभेच्या अधिवेशनाच्या वेळी जाळून घेण्याची धमकी सुध्दा दिली परंतु तरी देखील या भावनाशून्य शासनाला जाग आलेली नाही. म्हणून या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला मी विनंती करु इच्छितो की, पोलीस अधिकारी आरोपींशी हातमिळवणी करीत आहेत त्यांच्याकडून हा तपास काढून घ्यावा कारण त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. हा तपास सी.आय.डी. मार्फत करण्यात यावा व डॉ. शिवाजी चोरमले यांना न्याय द्यावा अशी मी विनंती करतो. ( यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ RJW/ (पूर्वी श्री. खर्चे ) 15:55

**पृ.शी.**: मुंबई शुश्रृषा-गृह नोंदणी (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XXIII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY NURSING HOMES REGISTRATION ACT, 1949.)

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्यमंत्री ) : सभापती महोदया, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 23- मुंबई शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, मुंबई नर्सिंग होम 1949 चा ॲक्ट आहे त्यामध्ये आम्ही काही सुधारणा करणार आहोत. या सुधारणेमध्ये नर्सिंग होमवर पब्लीक हेल्थ डिपार्टमेंटचा कंट्रोल असला पाहिजे, तसेच नर्सिंगच्या संदर्भातील संपूर्ण नोंदणी ही आवश्यक आहे. मुंबई नर्सिंग होम 1949 ॲक्ट हा पब्लीक हेल्थच्या माध्यमातून महानगर पालिका क्षेत्र, नगरपालिका क्षेत्रात तसेच ग्रामपंचायतीच्या लेव्हलवर सुध्दा लागू केलेला आहे. या विधेयकामध्ये कलम 2, 5, 6, 12 आणि 16 मध्ये सुसुत्रता आणण्यासाठी सुधारणा केलेल्या आहेत व या सर्व सुधारणा या बिलाच्या माध्यमातून आम्ही या ठिकाणी आणलेल्या आहेत. सुधारणा करण्याकरिता, नियंत्रण ठेवण्याकरिता, नोंदणी व्यवस्थित करुन ज्या काही चांगल्या संस्था असतात त्यांच्यामध्ये चांगल्या प्रकारचे समन्वय होऊ शकते. तसेच जे नॅशनल प्रोग्राम असतात ते सुध्दा या विधेयकान्वये सहभाग घेऊ शकतील. या विधेयकान्वये नर्सिंग होमची नोंदणी कंपलसरी करण्यात आलेली आहे. या विधेयकात नोंदणीची फी, खाटांची संख्या तसेच क्षेत्रफळ, तसेच विशेष तज्ञ सेवकांची सर्व बाबीच्या संदर्भात शुल्क आकारणीच्या संदर्भात व्यापक अधिकार शासनाला प्राप्त होणार आहे. कलम दोन मध्ये ज्या नगरपालिका आहेत त्या ठिकाणी आपण स्थानिक पर्यवेक्षक अधिका-यांना निर्देशित करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी नर्सिंग होम चालवले जातात त्या ठिकाणी काम करणा-यांची शैक्षणिक पात्रता पदवी, पदव्युत्तर असणे आवश्यक राहणार आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांना मला असे विचारावयाचे आहे की, नर्सिंग होमच्या संदर्भातील अधिकार आज कोणाकडे आहेत? हे अधिकार काढून राज्यशासन स्वत:कडे अधिकार घेत आहे तसेच या विधेयकामध्ये सुधारणा करुन घेण्याची कारणे काय आहेत?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, आज सुध्दा यासंदर्भातील अधिकार राज्य शासनाकडेच आहे. मुंबई नर्सिंग ॲक्टमध्ये जे कलम आहेत त्यामध्ये आपण सुधारणा करीत आहोत. सुधारणा का केली जात आहे यासंदर्भातील संपूर्ण माहिती विधेयकात देण्यात आलेली आहे. सेक्शन दोनमध्ये स्थानिक पर्यवेक्षक अधिकारी आहेत, महापालिकेमध्ये आरोग्य अधिकारी, नगर पालिका क्षेत्रात संबंधित जिल्हयाचा सिव्हील सर्जन असेल तो त्या ठिकाणी प्राधिकृत केला जाईल. महापालिकेच्या ठिकाणी आरोग्य अधिकारी, नगरपालिकेच्या ठिकाणी सिव्हील सर्जन तसेच इतर ठिकाणी जिल्हा आरोग्य अधिकारी ग्रामपंचायत लेव्हल पर्यंत असणार आहे. मुंबई नर्सिंग ॲक्ट प्रमाणे नर्सिंग होमचे रजिस्ट्रेशन कंपलसरी करण्यात आलेले आहे. नर्सिंग होमची संपूर्ण नोंदणी झ ाली तर आपले जे प्रोग्राम असतात त्यासंदर्भातील माहिती मिळू शकते. जन्म आणि मृत्यूची सुध्दा संपूर्ण माहिती मिळू शकते. नर्सिंग होमवर आज डायरेक्टली शासनाचे कोठलेही बंधन नाही. नोदणी केल्यामुळे आपण चांगल्या प्रकारचे कोऑर्डीनेशन करु शकतो. नोंदणी व्यवस्थित झाली तर संपूर्ण प्रकारची माहिती आपल्या आरोग्य डिपार्टमेंटला मिळू शकते. सेक्शन 5 मध्ये क्लॉज (ब) मध्ये नर्सिंग होममध्ये लागणारे पदवी किंवा पदव्युत्तर जे काही कॉलीफिकेशन आहे त्या प्रमाणेच त्यांना नर्सिंग होम काढता येईल. कंपाऊंडर किंवा पॅरामेडीकल स्टाफ नर्सिंग होममध्ये कोणत्याही प्रकारचा घेतला जातो. आताच्या सुधारणे प्रमाणे नर्सिंग होम मध्ये असलेला स्टाफ प्रशिक्षीतच असणार आहे. तसेच या विधेयकामध्ये आकारणीच्या संदर्भात, खाटांच्या संख्येनुसार स्टाफ असला पाहिजे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा....

हे आपण सेक्शन 7 मध्ये दिले आहे. आपण नूतनीकरणासंबंधीची कालमर्यादा ही 3 वर्षाची ठेवलेली आहे. आता त्यांना रजिस्ट्रेशनचे नूतनीकरण हे दर तीन वर्षांनी करावे लागेल. एखादे वेळी जर तो नूतनीकरण करू शकला नाही, तर दंड व शिक्षेची तरतूद देखील आहे. यामध्ये सहा महिन्याची शिक्षा व रुपये दहा हजार पर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. रजिस्ट्रेशन करण्यामध्ये जर विलंब लागला तर रोज 50 रुपये याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल. सदर तरतूद ही सेक्शन 12 मध्ये आहे. सेक्शन 16 मध्ये पूर्वी रजिस्ट्रेशनचा जो नमुना होता, त्यातील रजिस्ट्रेशन फीमध्ये देखील नूतनीकरण केलेले आहे. या अधिनियमामध्ये आपण असे नमूद केले आहे की, शुश्रूषागृहांमध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या, तिथे करण्यात येणारे विशेषोपचार या गोष्टी लक्षात घेऊन फीचे निरनिराळे दर विहित करता येतील. उदाहरणार्थ महानगरपालिका, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र येथील सुविधा व ऑपरेशन थिएटरचे दर हे वेगवेगळे असतात. तसेच इन्डोअर म्हणून येणाऱ्या रुग्णाकडून कशाप्रकारे शुल्क आकारणी करायची याचे अधिकारी स्थानिक क्षेत्रावरील सक्षम अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. अशाप्रकारे आपण सेक्शन 5,6,12 व 16 मध्ये सुधारणा सुचविली आहे. म्हणून मी सभागृहाची अनुमती मागते की हे बिल मंजूर करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 23 मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, 1949 यामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यासंबंधी मंत्रिमहोदयांनी हे विधेयक आणले आहे. सुरुवातीला मी सांगेन की, हे विधेयक आणण्यामध्ये शासन घाई करीत आहे. अपूर्ण अभ्यास, अपूर्ण माहिती याच्या आधारावर अधर्वट विधेयक शासनाने आणले आहे, असे मला प्रथमदर्शनी वाटते. थोडासा अभ्यास जास्त झाला असता, विषयाची माहिती घेतली असती तर मला बरे वाटले असते. एकदाच परिपूर्ण विधेयक आणले असते तर ते अधिक बरे झाले असते. पण येथे जे विधेयक मांडण्यात आले आहे, त्यात अनेक त्रुटी आहेत. जिल्हा रूग्णालय, उप जिल्हा रूग्णागलय इत्यादी व्यवस्थित असते तर आज नर्सिंग होम्सची गरजच लागली नसती. वाढती लोकसंख्या विचारात घेता व अपुरी उपचार पध्दती यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा मुंबई महानगरपालिकेचे दवाखाने, रुग्णालयामध्ये कोणी जायला बघत नाही या ठिकाणी असलेल्या अपुऱ्या सोयी सुविधांमुळेच नर्सिंग होम्स् उदयाला आली आहेत. सन 1949 साली कायदा झाला त्यापासून आजपर्यंत नर्सिंग होम्स्ची संख्या झपाटयाने वाढत आहेत. त्यामुळे शासकीय, महापालिका रुग्णालयाचे अवमूल्यन होत गेले. सभागृहामध्ये आपण हया रूग्णालयामध्ये अमूक एक गोष्ट अपूर्ण आहे, यासंबंधी चर्चा करतो. नर्सिंग होममध्ये लोकांना सोयी-सुविधा मिळत असल्यामुळे तेथे जातात. कालपरवा पर्यंत रूग्णालयांचा कारभार हा स्थानिक स्वराज्य संस्थाकडे मग त्यात नगरपालिका, महानगरपालिका सुध्दा आल्यात यांच्याकडे होता. पण आताच राज्य सरकारला जाग का आली आहे ? या सगळयांवर कंट्रोल एस्टाब्लिशमेंट करण्याचा का प्रयत्न करीत आहे ? हे माझ्या लक्षात अजून पर्यंत आलेले नाही. आज पर्यंत नर्सिंग होम रजिस्ट्रर्ड होत नव्हती का ? बायोगॅस प्रोडक्टसाठी आजसुध्दा रजिस्ट्रेशन करणे महत्त्वाचे आहे. असे रजिस्ट्रेशन हे मुंबई महानगरपालिका किंवा तत्सम नगरपालिकेकडे होते. असे असताना आजच राज्य शासनाला त्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज का भासली आहे ? मंत्रिमहोदयांनी सांगितले की, जन्ममृत्युची नोंद आम्हाला समजली पाहिजे. कोणत्या प्रकारच्या साथी आल्या आहेत, आजार आला आहे, यासंबंधीची माहिती कळत नसेल म्हणून कदाचित हे असू शकेल. पण हे एकमेव कारण होऊ शकत नाही. जन्ममृत्युची नोंद मुंबई महानरपालिकेच्या दस्तऐवजातून मिळते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

टी.व्ही.वर जन्ममृत्युची नोंद करा असे ऐकतो. कुपोषित बालकाचीं नोंद शासनाच्या नाकर्तेपणामुळे होत नाही. त्यासाठी हा काही पर्याय होऊ शकत नाही. आदिवासी भागात नर्सिंग होम्स कुठे आहेत ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.ओटवणेकर........ 16:05

डॉ.दीपक सावंत.........

आदिवासी भागात नर्सिंग होम नाहीत, ती तालुका आणि मोठ्या गावात आहेत. जी नर्सिंग होम चालविली जातात त्याचे ठिकठिकाणी रजिस्ट्रेशन होत असते. मला आता कळत नाही की, आज आपण हे रजिस्ट्रेशन आपल्याकडे घेण्याचा अट्टाहास कशासाठी करीत आहात ? हे रजिस्ट्रेशन आपल्याकडे घेतल्यानंतर त्यासाठी आपण काही पॅरामीटर लावणार आहात काय ? मेडिकल नर्सिंग होमसाठी इतके इतके बेडस् असावेत, गायनॉकॉलिजीसाठी इतके इतके बेडस् असावेत याचे काही पॅरामीटर ठरविणार आहात काय ? आपण रजिस्ट्रेशन स्वत:कडे ठेवून फक्त रेव्हेन्यू गोळा करीत आहात आणि बाकीची सर्व धुणी महानगरपालिका, नगरपालिकांनी करायची हे काही बरोबर नाही. स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नगरपरिषदा व नगरपालिका यांना काही अधिकार आहेत. त्याठिकाणी नर्सिंग होमची नोंद होत होती. मला सरकारला विचारावयाचे आहे की, रजिस्ट्रेशन आपल्याकडे असावे असे का वाटते ? राज्य शासनाकडे रजिस्ट्रेशन आल्यानंतर जी अवैध नर्सिंग होम आहेत ती बंद होणार आहेत का ? अमूक अमूक नर्सिंग होममध्ये अमूक अमूक तज्ज्ञ डॉक्टर असले पाहिजेत असे आपण पॅरामीटर लावणार आहात का ? लोकांना चांगल्या सुविधा मिळतात म्हणून लोक नर्सिंग होममध्ये जातात ही गोष्ट बरोबर आहे. प्रत्येक डॉक्टर आपले शिक्षण आणि अनुभव व त्या विषयातील तज्ज्ञ यानुसार फी आकारीत असतो. आज लोकही इतके मूर्ख नाहीत की, कोणत्याही डॉक्टरने किती आकारली आणि ती त्यांनी द्यावी. लोक आता हुशार झाले आहेत. कोणता डॉक्टर कोणत्या रोगाच्या बाबतीत तज्ज्ञ आहे हे चार लोकांना विचारुनच त्या डॉक्टरकडे जात असतो. पण डॉक्टरने किती फी आकारावी यालाही काही मर्यादा आहेत. मागच्या अधिवेशनात सन्माननीय मंत्रिमहोदयांनी अशाच बिलावर उत्तर देताना सांगितले होते की, डॉक्टर त्यांचे शिक्षण आणि अनुभव यानुसार फी आकारीत असतो. हे माझ्या चांगले लक्षात आहे. आपण मागील रेकॉर्ड पहावा. तो जर चुकीचा असेल तर मी माझे शब्द मागे घेतो. सभापती महोदया, नर्सिंग होममध्ये किती बेडची संख्या असावी, डे केअर सेंटर बाबत कोणता निर्णय घेणार आहात ? कारण त्याठिकाणी फक्त एका दिवसांत रोगनिदान करण्यात येते. पेशंटला सकाळी बोलावून संध्याकाळी परत पाठविले जाते अशा नर्सिंग होममध्ये फक्त एक-दोन बेड असतात. अशा नर्सिंग होमसंबंधी कोणते पॅरामीटर लावणार आहात ?

..2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.ओटवणेकर........ 16:05

डॉ.दीपक सावंत......

सभापती महोदया, कलम तीनमधील क-3 मध्ये असे म्हटलेले आहे की, "शुश्रृषागृह, शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या स्वत:च्या मालकीचे आहे किंवा त्याच्या व्यवस्थापनाखाली आहे." याचा अर्थ सन्माननीय मंत्रिमहोदयांनी समजून सांगावा. तसेच नर्सिंग होमचे क्षेत्र विहीत क्षेत्रापेक्षा किती कमी आहे याचे पॅरामीटर आपण कसे लावणार आहात ?

यानंतर श्री.बोर्डे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.... 16:10

डॉ.दीपक सावंत ....

आजपर्यंत आपण कोणते पॅरामिटर्स लावले आहेत ? 10-15-50 खाटांच्या रुग्णालयाच्यासंदर्भात आपल्याकडे काही पॅरामिटर्स आहेत काय ? अमूक बेडसाठी किती क्षेत्रफळ लागेल याची तरतूद करण्यात आलेली नाही. आपण नर्सिंग होमच्या परिचारिकांबाबत काही तरतूद केली आहे काय ? या सर्व मुद्यांबाबतची माहिती माननीय मंत्रिमहोदयांना भाषणातून सांगता आली असती. परंतु त्यांनी याबाबत काहीही सांगितलेले नाही. आजपर्यंत अध्यादेश काढून आपण हे काम करीत होता. मग नेमकी आजच राज्य सरकारला अंडरटेकिंगची काय गरज भासली ?

या विधेयकातील उद्देश व कारणे यातील क्र.5 मध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे की, "शुश्रूषा-गृह ज्या क्षेत्रामध्ये आहे ते क्षेत्र, तिथे उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या, तिथे करण्यात येणारे विशेषोपचार, इत्यादींच्या आधारे, निरनिराळया शुश्रूषा-गृहांकरिता फी चे निरनिराळे दर विहित करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असतील." महोदय, कालपर्यंत केवळ एक खाटीक होता, परंतु आता या तरतुदीन्वये एक राज्य सरकार आणि दुसरा स्थानिक स्वराज्य संस्था असे दोन खाटीक होणार आहेत. आपण मला सांगा की, तुम्हाला भ्रष्टाचार वाढवावयाचा आहे की, कमी करावयाचा आहे ? जर भ्रष्टाचार कमी करावयाचा असेल तर येथे दोन-दोन अथॉरिटी कशासाठी हव्यात ? दर विहित करण्याचे अधिकार राज्य सरकारकडे आहेत. हे अधिकार राज्य सरकार कोणत्या बेसेसवर स्वत:कडे घेणार आहे ? यासाठी आपण काय पॅरामीट लावणार आहात ? मुंबई, पुणे किंवा तालुका प्लेसचे जी नर्सिंग होम्स आहेत त्यांचा ओव्हर एक्स्पेंडीचर वेगळा आहे. त्यामुळे निरनिराळया ठिकाणचे दर ठरविण्याबाबत आपण कोणते निकष लावणार आहात ? मला वाटते माननीय मंत्रिमहोदयांनी हे विधेयक मागे घ्यावे किंवा ते संयुक्त समितीकडे तरी पाठवावे. कारण या विधेयकावर सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे. शुश्रूषा-गृहाचे क्षेत्रफळ, शुल्क, तज्ञांची नेमणूक आणि त्याची नोंदणी कोणाकडे असावी यासंदर्भात सर्वंकष विचार होणे अगत्याचे आहे. जे नर्सिंग होम चालवितात त्यांचे सुध्दा या विधेयकाच्या अनुषंगाने मत घ्यावे आणि त्यानंतर परिपूर्ण असे विधेयक या ठिकाणी आणावे. नोंदणी व्हावी, शुल्क निश्चिती या मतांशी मी सहमत आहे. परंतु घाईघाईने विधेयक आणून, ते पास करण्यास माझा विरोध आहे. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी यासंदर्भात विचार करुन, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे किंवा नवीन व परिपूर्ण असे विधेयक या ठिकाणी मांडावे अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. जयहिंद जय महाराष्ट्र |

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, आज नियम 97 अन्वये ऊसाच्या प्रश्नावर चर्चा आहे. या चर्चेला वेळ लागणार आहे. परंतु राज्यात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या 750 ते 800 विधवा आणि त्यांचे कुटुंबिय यांनी धरणे धरलेले आहे. त्यामुळे आम्हाला त्या ठिकाणी जावयाचे आहे. आम्ही पुन्हा या ठिकाणी चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी येणार आहोत. कदाचित जर आम्हाला येण्यास विलंब झाला तर सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी ज्या भावना व्यक्त करतील त्या भावनांशी आम्ही सहमत राहणार आहोत. आमच्या पक्षातर्फे चर्चेच्या वेळी सदस्य उपस्थित राहणार आहेत.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ( नामनियुक्त ) :सभापती महोदया, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 23 - मुंबई शुश्रृषा ॸ गृह नोंदणी ( सुधारणा ) विधेयक माननीय आरोग्य मंत्र्यांनी या ठिकाणी मांडलेले आहे त्या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदया, माननीय मंत्र्यांनी जे विधेयक आणले आहे त्या विधेयकाचे मी मन:पूर्वक स्वागत करतो.या विधेयकावर बोलत असतांना माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी असे सांगितले आहे की, घाई घाईने हे विधेयक आणण्यात आलेले आहे. मला असे वाटते की, या ठिकाणी जे सुधारणा विधेयक आणण्यात आलेले आहे ते आणण्यामध्ये उशीर झालेला आहे. वास्तविक पाहता या अगोदरच हे विधेयक आणावयास पाहिजे होते.1949 मध्ये जेव्हा यासबंधीचा कायदा करण्यात आला होता. तेव्हा आपल्या राज्यामध्ये नर्सिंग होमचे कल्चर पाहिजे तेव्हढे डेव्हलप झालेले नव्हते. परंतु आता देशामध्ये किंवा राज्यामध्ये मुंबईसारखे जे मेट्रोपोलिटियन सिटीज आहेत किंवा नागपूर, पुणे या सारखी जी मोठी शहरे आहेत त्या शहरामध्ये नर्सिंग होमची व्यवस्था केली जात आहे. परंतु आज लोकांमध्ये आरोग्याच्या संदर्भात मास अवेकनींग झाले आहे त्यामुळे राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात खाजगी नर्सिंग होमची संख्या दिवसेदिवस वाढू लागली आहे. नर्सिंग होममध्ये आज ज्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या नावाखाली पेशंटसचे तसेच त्यांच्या नातेवाईकांचे मोठया प्रमाणावर शोषण केले जाते. तसेच तेथे जे गैरप्रकार चालत आहे. त्या गैरप्रकारांना या विधेयकाच्या माध्यमातून जो कायदा तयार होणार आहे त्यामुळे प्रतिबंध बसणार आहे.

सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी मांडलेल्या विधेयकाच्या उद्देश आणि कारणामध्ये असे म्हटलेले आहे की, "अलीकडे, राज्य शासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, काही खाजगी शुश्रृषा- गृहे भरमसाठ रुग्णांना दाखल करुन घेणे, आवश्यक अर्हता धारण न करणा-या व्यवसायींकाकडून अशी शुश्रृषा गृहे चालविणे, पुरेशा प्रमाणात परिचारिकांची नियुक्ती न करणे इत्यादीसारख्या अनुचित प्रकारांमध्ये गुंतली आहेत म्हणून उक्त अधिनियमात योग्य त्या सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते. " त्यामुळे माननीय आरोग्य मंत्र्यांनी या ठिकाणी हे विधेयक आणलेले आहे. सभापती महोदया, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक चांगली गोष्ट या ठिकाणी सांगितली आहे. सरकारची काही रुग्णालये आहेत मग ती महानगरपालिकेची रुग्णालये असोत, नगरपालिकेची रुग्णालये असोत, ग्रामीण रुग्णालये असोत, रुरल हॉस्पिटल्स असोत त्या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ....

`ठिकाणी उत्कृष्ट पध्दतीची  आरोग्य सेवा प्रदान करण्यात आली असती तर नर्सिंग होमचे जे पेव सध्या फुटलेले आहे ते कदाचित  फुटले नसते आणि नर्सिंग होमची आवश्यकता वाटली नसती. परंतु दुर्देवाने आज शासनाच्या माध्यमातून जी काही रुग्णालये सुरु आहेत ती सरकारचे असोत नगरपालिकेची असोत  वा  सारकारच्या अधिपत्याखाली  कोणत्या ना कोणत्या संस्थेच्या मार्फत सुरु असलेली रुग्णालये असोत  त्यामध्ये दुर्देवाने उत्कृष्ट सेवेचा प्रचंड अभाव असल्यामुळे गरीब माणूस सुध्दा खाजगी नर्सिग होमकडे वळत असतांना दिसत आहे.हे चित्र जर बदलावयाचे असेल तर ज्या प्रमाणे  आपण खाजगी नर्सिग होमच्या बाबतीत ज्या सुधारणा आपण करीत आहोत त्याप्रमाणे शासनाच्या अधिपत्याखाली जी रुग्णालये आहेत त्या ठिकाणी उत्कृष्ट प्रकारच्या सुधारणा कशा करता येतील. सर्व सामान्य माणसाला  आरोग्याच्या सुविधा  चांगल्या प्रकारे कशा उपलब्ध करुन देता येतील.याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे . शासकीय रुग्णालयामध्ये काम करणा-या डॉक्टर्सना खाजगी प्रॅक्टीस करण्याची परवानगी देण्यात आली आहे त्यामुळे शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्स चांगल्या प्रकारे सेवा देत नाहीत. त्यामुळे जो गोर गरीब वर्ग आहे ज्याला फी देणे परवडत नाही तो वर्ग  सुध्दा खाजगी नर्सिग होमकडे जात आहे.तेव्हा शासकीय रुग्णालयात  काम करणा-या डॉक्टरांना खाजगी प्रॅक्टीस करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्याचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता आहे. असे मला सांगावेसे वाटते.1949 साली जो कायदा करण्यात आला होता त्यात सुधारणा करण्यासाठी हे विधेयक मांडलेले आहे त्याबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो.या संदर्भात अनेक उदाहरणे देता येतील. या विषयाच्या बाबतीत सकाळी प्रश्न आला होता परंतु माननीय सदस्य अनुपस्थित असल्यामुळे त्यावर चर्चा होऊ शकली नाही.त्यामुळे तो प्रश्न बारगळला होता.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ...

सभापती महोदया, गरीब माणसांच्या किडण्या चोरून काढून त्या दुसऱ्या विकण्याचे प्रकार देखील अनेक यापूर्वी झालेले आहेत आणि त्या विषयावर काही चित्रपट देखील आलेले आहेत. तेव्हा अशा प्रकारचे गैरप्रकार होऊ नयेत, सामान्य गरीब माणसाची पिळवणूक, शोषण होऊ नये साठी हे विधेयक सरकारने आणलेले आहे. खाजगी नर्सिंग होम्स जी आहेत त्या ठिकाणी उत्कृष्ठ तज्ज्ञ डॉक्टांची सेवा सर्वसामान्य रूग्णांना मिळाली पाहिजे, तेथील नर्सिंग स्टाफ देखील उत्कृष्ट असला पाहिजे, प्रशिक्षित असला पाहिजे, तेथील यंत्रसामग्री देखील उत्कृष्ट आणि अद्यावत असली पाहिजे या दृष्टीकोनातून या विधेयकामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. जेणे करून खाजगी नर्सिंग होम मध्ये जाणारा सामान्य गरीब माणसांची, रूग्णांची पिळवणूक होणार नाही, फसगत होणार नाही आणि त्यांना तेथे जास्तीत जास्त चांगले औषधोपचार मिळतील. तसेच प्रत्येक छोट्या मोठ्या नर्सिंग होमची नोंदणी करण्याची देखील सक्ती या विधेयकातून करण्यात आलेली आहे. पूर्वी मोठ्या संख्येने खाजगी दवाखाने होते, परंतु नर्सिंग होम्स नव्हती. परंतु आता खाजगी नर्सिंग होमस् ची संख्या देखील वाढत चालली आहे आणि म्हणूनच त्यांची नोंदणी होणे नितांत आवश्यक आहे. या विधेयकाने ही नोंदणी होणे सक्तीचे केले आहे. यापुढे कोणी अशी नोंदणी केली नाही, नोंदणी न करताच नर्सिंग होम चालवित असेल, मग ते लहान स्वरूपात असो वा लिलावती हॉस्पिटल सारखे मोठे हॉस्पिटल असो, त्यासाठी या विधेयकामध्ये जी शिक्षेची तरतूद केलेली आहे ती देखील उचित अशीच आहे. 6 महिने कारावास अथवा 10 हजार रूपये दंड किंवा कारावास व दंड अशी एकत्रित शिक्षा यामध्ये सुचविण्यात आली आहे ती योग्य अशीच आहे असे मला वाटते. या ठिकाणी अशा नर्सिंग होम्समध्ये आकारण्यात येणाऱ्या फी च्या संदर्भात येथे प्रश्न उपस्थित करण्यात आला आणि तो देखील उचित असाच आहे. नर्सिंग होमच्या ठिकाणी असणारी खाटांची संख्या, तेथे उपलब्ध करून देण्यात येणारी वैद्यकीय सेवा-सुविधा, तेथील यंत्रसामग्री, स्टाफ इत्यादी गोष्टींवर ही फी अवलंबून राहणार आहे. मात्र ही फी ठरविण्याचे अधिकार एखादी समिती नेमून तिच्याद्वारे निश्चित केले तर ते अधिक योग्य ठरेल असे मला वाटते. म्हणजे नर्सिंग होम्सचा दर्जा निश्चित करून दर्जा निहाय हे दर ठरविता येऊ शकतील आणि त्यामळे राज्यातील सर्वसामान्य जनतेचीही पिळवणूक होणार नाही, लुबाडणूक होणार नाही. तेव्हा सर्वसामान्य गरीब जनतेचे आरोग्य चांगलो रहावे

..... ओओ 2 ..

प्रा. कवाडे ....

आणि या नर्सिंग होम्सचे देखील आरोग्य चांगले रहावे यासाठी हे आवश्यक आहे, तरी याबाबत सरकारने विचार करावा आणि या ठिकाण हे उपयुक्त विधेयक आणल्याबद्दल शासनाला धन्यवाद देऊन मी आपली रजा घेतो.

****

...... ओओ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदया, या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी हे विधेयक सखोल विचारार्थ संयुक्त समितीकडे पाठवावे अशी जी उपसूचना या ठिकाणी मांडलेली आहे तिला पाठिंबा देताना मी माझे विचार या ठिकाणी मांडू इच्छितो. सभापती महोदया, आरोग्याच्या दृष्टीकोनातून, तांत्रिक दृष्टीकोनातून आणि कायद्याच्या दृष्टीकोनातून देखील पाहिले तर हे विधेयक संयुक्त समितीकडे अधिक विचारार्थ पाठविण्याची जी सूचना डॉ. सावंत यांनी येथे केली आहे ती उचित अशीच आहे असे मला वाटते. आपल्या मराठीमध्ये एक म्हण आहे, बैल गेला आणि झोपा केला. सभापती महोदया, हेच विधेयक 10 फेब्रुवारी 1949 मध्ये या विधीमंडळामध्ये त्यावेळेचे आरोग्य मंत्री डॉ. डी.बी. गिल्डर यांनी मांडले होते आणि त्यावर जी काही साधक बाधक चर्चा झाली होती त्यामध्ये श्री.हरिप्रसाद देसाई, डॉ. नातू आणि श्री. के.डी.अंत्रोलीकर यांनी भाग घेतला होता. ....

( यानंतर श्री. सरफरे .... पीपी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट...

आज या सभागृहामध्ये माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्यामागील उद्देश या ठिकाणी सांगितला आहे तोच प्रस्ताव त्यावेळी डॉ. के.बी. अंत्रोलिकर यांनी सभागृहामध्ये उपस्थित केला होता. मी आपल्या परवानगीने त्यातील काही त्रोटक भाग आपणास वाचून दाखवितो. डॉ. अंत्रोलिकर यांनी असे म्हटले होते की, "या बिलाप्रमाणे नर्सिंग होम्सवर सुपरव्हिजन करण्याचे काम म्युनिसिपालिटयांकडे दिलेले आहे. म्युनिसिपालिटी हया संस्थेला नांवे ठेवावी आणि त्या संस्थेच्या कारभाराबद्दल काही वेडेवांकडे बोलावे या उद्देशाने मी बोलत नाही. पण हल्ली ज्या कांही कांही गोष्टींची व्यवस्था पहाण्याचे काम म्युनिसिपालिटयांकडे सोपविलेले आहे त्या जितक्या चांगल्या प्रकारे व्हाव्यात अशी आपली इच्छा आहे तितक्या चांगल्या प्रकारे होत नाहीत असे दिसते. उदाहरणार्थ, शॉप्स असिस्टंटस कायद्याखाली जे गुन्हे होतील त्यांची तपासणी करण्यासाठी म्युनिसिपालिटीने एक इन्सपेक्टर नेमावा आणि या गुन्हयांच्या बाबतीत योग्य ती तजवीज करावी अशी शॉप्स असिस्टंट कायद्यांत तरतूद आहे. पण या बाबतीत मला मोठया खेदाने असे म्हणावे लागत आहे की, या कायद्याबाबतची अंमलबजावणी म्युनिसिपालिटया चांगल्या प्रकारे करीत आहेत असे कोणीही छातीठोकपणे म्हणू शकणार नाही. आज म्युनिसिपालिटयांचा कारभार सर्वसाधारणपणे सुधारत आहे यांत शंका नाही, पण नर्सिंग होम्सवर सुपरव्हिजन करण्यासारखे महत्वाचे काम म्युनिसिपालिटयांकडे सोपवावे हे मला योग्य वाटत नाही. या बाबतीत मी अशी सूचना करु इच्छितो की, नर्सिंग होम्सवर सुपरव्हिजन करण्याची ही जबाबदारी सिव्हिल सर्जनवर टाकून त्याच्या हाताखाली एखादा इन्सपेक्टर नेमावा व त्याच्यातर्फे हे काम करुन घ्यावे. असे केल्यास हे काम अधिक चांगल्या प्रकारे होईल असा मला विश्वास वाटतो". सभापती महोदया, 51, 52 वर्षापूर्वी या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा झाली होती. त्या संदर्भात मी मघाशी म्हटले आहे की, "बैल गेला नी झोपा केला". याठिकाणी महानगरपालिका आणि शासन असे वेगळे घटक कां दिलें? याठिकाणी एकच जबाबदारी कां देत नाही? याठिकाणी महानगरपालिकेला महसूल मिळतो म्हणून शासन स्वत:च्या हातात अधिकार घेऊन फक्त सुपरव्हिजनचे काम करणार असेल तर ते साध्य होऊ शकणार नाही. त्या संदर्भातील जबाबदारी एखाद्या यंत्रणेवर, संस्थेवर टाकली तर ते नीट काम करु शकतील असे मला वाटत नाही. म्हणून त्या शंकेचे निराकरण झाले पाहिजे. शुश्रृषागृहे काढण्याच्या बाबतीत आपण एकदा निकष ठरविले पाहिजेत. आणि जर निकष नसतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट...

तर आपण त्यांच्यावर कोणत्या आधारावर कारवाई करणार? आपण त्यांचे शुल्क सांगत आहात, परंतु त्यांनी जर त्याचे नूतनीकरण केले नाहीतर आपण त्यांच्यावर जी दंडाची आकारणी करणार आहात त्याची व्याप्ती कळणे आवश्यक आहे. त्याचे उदाहरण घ्यायचे झाले तर मुंबईच्या उपनगरामध्ये ज्या नवीन निवासी इमारती होत आहेत. त्याठिकाणी पहिल्या मजल्यावर दुकाने तर दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर नर्सिंग होम......

**तालिका सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना नियम 46 अन्वये तातडीने निवेदन करावयाचे असल्यामुळे माननीय सदस्यांनी आपले भाषण तात्पुरते थांबवावे अशी माझी विनंती आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 46 अन्वये निवेदन

पृ.शी. : राज्यातील मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकेतर पदांचे सुधारीत निकष विहित करणारा शासन निर्णय रद्द करणे.

मु.शी. : राज्यातील मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकेतर पदांचे सुधारीत निकष विहित करणारा शासन निर्णय रद्द करण्यासंबंधी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो .

"राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकांचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळांसाठी शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याकरीता सुधारीत निकष विहित करणेबाबतचा दिनांक 25 नोव्हेंबर 2005 रोजीच्या शासन निर्णयाबाबत आज दिनांक 12.12.2005 रोजी नियम 93 अन्वये सभागृहात चर्चा झाली.

या संदर्भात संबंधितांशी चर्चा करुन मी असे जाहीर करतो की, दिनांक 25 नोव्हेंबर 2005 रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात आलेला आहे".

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी योग्य निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. एक लहानसे क्लॅरिफिकेशन पाहिजे म्हणून मी विचारु इच्छितो की, या सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी "सर्व संस्था चालकांचे प्रतिनिधी, नामवंत शिक्षण तज्ज्ञ यांचेबरोबर बसून चर्चा करुन निर्णय घेतला जाईल" असे दि.11.12.2003 ला आश्वासन दिले होते. माझे असे म्हणणे आहे की, या बाबतीत यापुढे कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतांना संस्था प्रमुखांचे प्रतिनिधी, संबंधित संघटनांचे प्रतिनिधी व नामवंत शिक्षण तज्ज्ञ व त्यांचे प्रतिनिधींबरोबर चर्चा करुन निर्णय प्रक्रिया केली जाईल असे आश्वासन दिले जाईल काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई शुश्रृषा - गृह नोंदणी (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO.XXIII OF 2005.**

**( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY NURSING HOMES REGISTRATION ACT, 1949. )**

(चर्चा पुढे चालू)

श्री. विलास अवचट (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी याठिकाणी मघाशी शुश्रृषागृहांसाठी निकष लावणे आवश्यक आहे असे सांगितले आहे. महाराष्ट्रामध्ये, मुंबईच्या उपनगरामध्ये कुणीही वाटेल त्या ठिकाणी इमारतीमध्ये नर्सिंग होम आणण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण उपनगरामध्ये रहात आहात. बऱ्याचश्या इमारतीमध्ये तळमजल्यावर दुकाने असतात. तर पहिल्या, दुसऱ्या मजल्यावर नर्सिंग होम थाटलेले असते तर उर्वरित मजले हे रेसिडेन्शिअल असतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MHM पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:30

श्री.विलास अवचट . . . .

आरोग्याच्या दृष्टीने हे योग्य आहे का हेही ठरविण्याची वेळ आली आहे, असे मला वाटते. हे करीत असताना आज नर्सिंग होमचा सुळसुळाट का होत आहे? याचाही शासनाने विचार करणे गरजेचे आहे. हा विचार करीत असताना यासाठी शासनानेच प्रवृत्त केलेले आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. माझ्याकडे काही कात्रणे आहेत, त्यामध्ये म्हटलेले आहे की, शासकीय रुग्णालयामध्ये बुरशीयुक्त सलाईन, वाशी येथील रुग्णालयामध्ये निकृष्ट दर्जाच्या सुया, सलाईनच्या बाटल्या, जे.जे. हॉस्पीटल व वाडिया हॉस्पीटलमध्ये अनागोंदी कारभार, वैद्यकीय अधिकारी नसणे इत्यादी. या हॉस्पीटलमध्ये अशा प्रकारच्या कारभारामुळे खाजगी लॅबची दुकाने सुरु. या सर्व गोष्टींना आळा घालू शकलो तर महाराष्ट्रात, मुंबईत नर्सिंग होमची आवश्यकता नाही. पण आपण आपल्याकडे असलेली जबाबदारी पार पाडत नसताना नर्सिंग होमवर बंधन टाकत आहोत आणि तेथील कॉटच्या संख्येबाबतही विचार करतो, तेव्हा शासकीय रुग्णालयांमध्ये, महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये म्हणजे जे.जे.हॉस्पीटल, सेंट जॉर्ज, जी.टी.रुग्णालय येथील परिस्थिती पाहिली तर असे दिसेल की, दोन कॉटच्या मध्ये जी जागा असते, तेथील जमिनीवर देखील रुग्ण झोपलेले असतात. तर आपण यावर नियंत्रण ठेवणार आहोत का ? चॅरिटी बिगेन्स् ॲट होम याप्रमाणे आपण आपल्या रुग्णालयामधील खाटांच्या संदर्भात नियंत्रण घालू शकलो तरच आपल्याला नर्सिंग होममधील खाटांच्या बाबतीत नियंत्रण घालण्याचा अधिकार आहे. मी याठिकाणी जे प्रश्न मांडलेले आहेत, त्या दृष्टीकोनातून विचार करावयाचा झाला तर हे विधेयक चिकित्सा समितीकडे विचारासाठी पाठविणे योग्य आहे, असे मला वाटते. कारण 52 वर्षाचा काळ निघून गेला आणि आजच असे काय झाले की, याची ताबडतोब अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यापेक्षा सभागृहातील या विषयातील जे तज्ञ सन्माननीय सदस्य आहेत, डॉक्टर सदस्य आहेत त्यांची एक चिकित्सा समिती करावी व या समितीकडे हे बिल पाठवावे आणि तेथे याबाबत सखोल चर्चा व्हावी. त्यानंतर मार्च मध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये हे विधेयक आणले तर आपले उद्दिष्ट साध्य होईल असे मला वाटते. धन्यवाद.

----

. . . .2 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, याठिकाणी वेगवेगळया वेळी जी विधेयके मांडण्यात येतात, मी त्याच्या तपशिलामध्ये जाणार नाही. याचे कारण कायदा तयार करीत असताना, कोणत्याही अधिवेशनाच्या अगोदर त्या-त्या विषयाचा अभ्यास असणारे, त्या-त्या विषयामध्ये काम करणारे जे लोक असतात त्यांना विचारात घेणारी प्रक्रिया अस्तित्वात नाही. अनेक विभागामार्फत वेगवेगळी विधेयके सदनामध्ये आणली जातात आणि त्याबद्दल त्यांचे असे म्हणणे असते की, आम्ही लोकांची मते विचारात घेतलेली आहेत. पण प्रत्यक्षात कोणत्याही विषयाच्या बाबतीत लोकांच्या, जनतेच्या, तज्ज्ञांच्या मतांचे प्रतिबिंब त्यात पडेल अशा प्रकारची यंत्रणा आज आपल्याकडे पाहिजे त्या प्रमाणात नाही. या विधेयकाबाबत बोलावयाचे तर संपूर्ण आरोग्य क्षेत्रात लोकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीकोनातून, त्याचे प्रमाणीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून आपण काही विचार करीत आहोत का ? याचा विचार करता उलटपक्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर अतिक्रमण करणाऱ्या वेगवेगळया मार्गांचा शोध चालू आहे. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी विधेयकाच्या हेतूबाबत सांगितले. निदान माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या परीने भूमिका मांडण्याचा प्रयत्न तरी केला. पण वेगवेगळया अधिकारी वर्गाने विधेयकासंदर्भात दिलेला हेतू व कारणे तपासली तर असे दिसेल की, "शुश्रृषा-गृहाचे वैद्यक शास्त्रातील पदवी धारण केलेल्या व्यक्तीच्या व्यवस्थापनाखाली असावे आणि तेथे पुरेशा परिचारिका असाव्यात." यामध्ये "पुरेशा" हा शब्दच किती सापेक्ष आहे ? किती रुग्णांच्या तुलनेत परिचारिका असाव्यात याचे अनेक नॉर्म्स आहेत. म्हणजे परिचारिकांची कोणत्या प्रकारची गुणवत्ता किंवा त्यांचे किती प्रशिक्षण झालेले असेल,

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.श्रीमती नीलम गोऱ्हे (पुढे सुरु...

यानुसार गेली 10 वर्षे अनेक परिचारिका कॉल येण्याची वाट पहात बसलेल्या आहेत, प्रत्यक्षात त्यांना कॉल येत नाहीत. त्याबद्दल सी.ई.टी. लागू केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये आपण वेगवेगळे निकष लावतो, परंतु वस्तुस्थिती अशी की, सगळया निकषांचा परिणाम कोणत्या क्षेत्रावर होण्याची शक्यता आहे, याबद्दल आपण विचार न करता, अशापध्दतीची पावले आपण उचलावयास लागलो तर ज्यांना त्या परिचारिकांना ठेवायचे नाही, ज्या त्यांना नकोशा आहेत, त्या शुश्रुषागृहांच्या हातामध्ये कोलीत मिळणार आहे. मी पुढे जाऊन असे म्हणेन की, स्थानिक स्वराज्य संस्था शुश्रुषागृहांच्या संदर्भात मॉनिटरींग करतात काय ? त्याबाबत प्रत्यक्षात असे आपल्याला चित्र दिसेल की, त्यांना आरोग्यसेवेबद्दलचे कोणतेही स्टॅन्डर्डायझेशन नाही. दुसरा मुद्दा असा की आपल्याकडे एकूणच आरोग्य साक्षरता बेताची आहे. कोठेही शहरात, खेडयात जा, बहुतेक ठिकाणी पेशंट असे म्हणतात की, ताप कमी होत नव्हता, म्हणून आम्ही सलाईन लावून घेतले, त्यामुळे विकनेस कमी झाला. आपण नोंदणी आणि तपासण्या करणार आहोत, अशाप्रकारे सांगितलेले आहे. याचा अर्थ योग्य ट्रीटमेंट दिली की नाही, या संदर्भात तुम्ही सर्व गोष्टींवर नियंत्रण करु शकणार आहात काय ? जर तसे नियंत्रण करु शकणार नसू तर एका बाजूला आपण खुले धोरण स्वीकारलेले आहे. लायसन राज जावो आणि लोकांना नीटपणाने काम करता यावे, म्हणून केंद्र सरकारने वेगवेगळी पावले उचललेली आहेत. अशावेळेला नोंदणी आणि तपासणीच्या नावाखाली पन्हा नियंत्रण आणतो आहे की, ज्या नियंत्रणामधून करप्शन होते. मी पुढे जाऊन असे सांगेन की, अनेक विषयांमध्ये आपण नोंदणीची पध्दती आणतो आहे. औषधांच्या संबंधात आपण काय प्रमाणित करतो ? औषधांच्या संबंधात अनेक लक्षवेधी सूचना सदनामध्ये गाजलेल्या आहेत. भेसळ केलेली औषधे वापरली जातात, बॉम्बे मार्केटमधील औषधे मोठयाप्रमाणात अनेक हॉस्पिटलमध्ये वापरली गेलेली दिसतात. म्हणून इतर कोणताही निश्चित निकष न करता, आपण प्रमाणित करणाच्या दृष्टीने नोंदणी आणि तपासणी करण्याच्या संदर्भात सांगत आहोत. याचे कारण आपल्या हातामध्ये..मला तर पुढे जाऊन अशी शंका वाटते की, स्थानिक स्वराज्य संस्था या सत्ताधारी पक्षापेक्षा वेगळया राजकीय पक्षांच्या हातामध्ये आहेत. त्यांची त्या ठिकाणी सत्ता एकवटताना अनेक ठिकाणी असे दिसत की, जिल्हापरिषदा पंचायत समित्यांच्या निवडणुका पुढच्या काळामध्ये तोंडावर आहेत. अशावेळी जे काही नियंत्रण करण्याची माध्यमे असतील ती स्वत:च्या हातामध्ये काढून घ्यावीत या दृष्टीकोनातून महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांना आणि इतर

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.श्रीमती नीलम गोऱ्हें पुढे सुरु...

स्थानिक स्वराज्य संस्थांना, नगरपालिकांना वगैरे आपण विश्वासामध्ये न घेता या संदर्भामध्ये पावले उचललेली आहेत. दुसरे आपण शुश्रुषागृहाची नोंदणी न करण्याबद्दल असलेल्या शिक्षेमध्ये वाढ करण्याबाबत सांगितलेले आहे. याबाबतीत मी असे म्हणेन की, अनधिकृत जागांवर उभारलेली शुश्रुषागृहे आहेत, त्यांच्यावर खऱ्याअर्थाने बंधने आणावयाची असतील तर वैद्यकीय व्यवसायामध्येच अनेक प्रकारचे गैरप्रकार घुसलेले आहेत. त्याच्याविषयी नोंद केल्याशिवाय, त्यावर आपण कृती केल्याशिवाय त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येईल असे मला वाटत नाही. म्हणून आपण उद्देश आणि कारणे या ठिकाणी सांगिलेली आहेत. पण ते सांगत असतांना यामधील सोयी-सुविधेबद्दल आपण अपेक्षा धरली. आरोग्य विभाग आहे त्या ठिकाणच्या प्रमाणीकरणासाठी वेळ देणार आहे. मला तर असा प्रश्न विचारावासा वाटतो की, ज्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनेक आश्रमशाळांतील चित्र पाहिलेले आहे. आरोग्य केंद्रांमधील चित्र पाहिलेले आहे. तेथपर्यन्त लोक पोहोचू शकत नाहीत. म्हणजे स्वत:ची दैनंदिन असणारी कर्तव्ये आहेत, ती पूर्ण करण्यासाठी प्रशासनातील अडथळे असतांना, नवीन वेगळ्या प्रकारचा उद्योग पाठीमागे लावून घेता, ज्यामधून ना रुग्णांची सेवा होणार आहे, ना डॉक्टरांना कोणत्याही पध्दतीने मदत होऊ शकणार आहे. उलटपक्षी काटेकोरपणे तपासणीच्या जाचाखाली सगळे वैद्यक व्यावसायिक सापडणार आहेत. म्हणून घाईघाईने विधेयक आणण्यापेक्षा आमचे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी हे विधेयक संयुक्त चिकित्सा समिततीकडे द्यावे, त्यास मी अनुमोदन देते, आणि मा.मंत्री महोदय, आणि सदनातील काही सन्माननीय सदस्य,..यामध्ये आरोग्य मंत्री महोदयांबद्दल नाही. परंतु इतर सन्माननीय सदस्यांनी घाईघाईने हे विधेयक उरकून टाका. यामध्ये बोलण्यासारखे काय आहे ? असे सांगण्याचा प्रयत्न केला. मला कळत नाही की, प्रत्येक वेळी विधयकावर बोलताना अशाप्रकारचा अप्रत्यक्षरित्या दबाव का आणला जातो ? आता मी कठोर झ ाालेली आहे. कोणाच्याही म्हणण्याचा परिणाम माझ्यावर न होता, या संबंधातील आपले मुद्दे मांडले नाहीत तर बाहेरचे लोक असे म्हणतील की, सदनामध्ये चुकीची बीले पास होतात त्यावेळेस लोकप्रतिनिधी झोपा काढत होते काय ? म्हणून अशाप्रकारचे उत्तर आमच्याबद्दल ऐकून घेणे शक्य नाही, तेवढे आम्ही कोडगे नाही आहोत. त्यामुळे या विधेयकाबद्दल बोलणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

**तालिका सभापती** : बरोबर आहे. तुम्ही बोलायलाच हवे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, दोन दिवसापूर्वी हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आणि आज ताबडतोब कन्सिडरेशनसाठी घेऊन चर्चा करुन पास करण्याचा आग्रह धरण्यात येत आहे. या ठिकाणी जेवणाच्या सुटीची मागणी करण्यात आली पण तेही मान्य करण्यात आले नाही. एवढी हे विधेयक पास करण्याची घाई घालेली आहे. या ठिकाणी दुसरे मंत्रिमहोदय, बसले आहेत. पण त्यांचा इंट्रेस्ट साखरेमध्ये आहे. मी तीन दिवसापूर्वी बोललो होतो की, या देशात आरोग्य नांवाची गोष्ट शिल्लक आहे कां ? मला माहीत नाही. पण रोजच्या बातम्या ऐका. त्या बातम्यामध्ये आरोग्याबद्दल भयानक तक्रारी सांगण्यात येतात. मला वाटते स्वत:आरोग्य मंत्र्यांना त्याची जाणीव आहे. सरकारी अधिकारी किंवा सरकारी मंत्री महोदय म्हणून तुम्ही ते मान्य करणार नाही. पण ज्यावेळी वस्तुस्थिती स्वीकारण्याचा प्रसंग येतो त्यावेळी आपल्या महाराष्ट्राचे अनारोग्य मंत्री असे म्हणण्याचा प्रसंग सगळया जनतेवर आला आहे. बोगस औषधे आहेत. बोगस डॉक्टर्स आहेत. बोगस नर्सिकहोम्स आहेत. अशा प्रकारच्या बोगस गोष्टी जास्त आहेत. चांगले उपचार करुन, चांगली ट्रीटमेंट देऊन कमी पैशात योग्य सेवा देण्याची व्यवस्था आपल्या राज्यामध्ये कुठेही नाही. ज्यावेळी हे नवीन नर्सिंगहोम्स उभे राहतात त्यावेळी त्याच्या पाठीमागची प्रमुख कारणे हीच आहेत. हया सगळया गोष्टी अनारोग्याचे लक्षण आहेत. आरोग्याचे लक्षण नाहीत. मध्यंतरी कामकाज सल्लागार समितीच्या मिटिंगमध्ये मी सूचना केली होती की, एखादे विधेयक कंन्सिडरेशनसाठी मांडल्यानंतर सन्माननीय सदस्यांना कमीतकमी एक आठवडा त्या विधेयकासंबंधीची माहिती गोळा करण्यासाठी दिला पाहिजे. पण असे धडत नाही. विधेयक काल इंट्रोडयुस केले की, आज लगेच ते चर्चेला येते, असे चालले आहे. आणि त्यात सुध्दा घाई केली जाते. मला कळत नाही की, आज कोणते असे अनारोग्य झाले आहे? महाराष्ट्रावर कोणते संकट कोसळले आहे?.किंवा महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य खात्यावर संकट कोसळले आहे? की, हे विधेयक ताबडतोब मंजूर व्हावयाला पाहिजे. मला वाटते दोन-तीन दिवसापूर्वीच हे विधेयक येथे मांडण्यात आले आणि आज ताबडतोब ते चर्चेसाठी आले आहे. मध्ये दोन दिवस आठ/आठ तास सदनाचे काम चालू होते. या पाश्र्वभूमिवर आज हे विधेयक चर्चेसाठी आलेले आहे. ज्या सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे, अभ्यास करावयाचा आहे, काही सूचना मांडावयाच्या आहेत, काही विचार मांडावयाचे आहेत. त्यासाठी त्यांना वेळ मिळणे हे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

अतिशय आवश्यक आहे. कायदे बनविणे हा या सभागृहांचा उद्देश आहे. मग ती विधानसभा असो, विधान परिषद असो. ही प्रामुख्याने कायदे मंडळ आहेत. कायदे बनवितांना घईगर्दीत कायदे बनवू नयेत तर पूर्ण् विचार करुन कायदे बनवावेत. हा त्याच्या पाठीमागचा प्रधान हेतू आहे. 1949 साली आरोग्य खात्याचा हा कायदा तयार झाला. 1949 नंतर आता 52 वर्षे झालेली आहेत. 52 वर्षांनंतर त्या अधिनियमात काही दुरुस्त्या सुचविण्यात आल्या आहेत. म्हणजे 52 वर्षात ज्या गोष्टीची गरज लागलेली नाही त्या गोष्टीची गरज इतक्या तातडीने निर्माण झाली की, दोन दिवसात हे विधेयक चर्चेसाठी आलेले आहे.डॉ. विमलताई तुमच्याकडून ही अपेक्षा नाही. कारण तुम्ही आमच्याबरोबर काम करुन आता तिकडे गेला आहात. म्हणजे अनुभव घेऊन तुम्ही तिकडे गेला आहात. त्या प्रवाहात तुम्ही किती समरस झाला आहात याची मला कल्पना नाही. पण मला एक गोष्ट माहीत आहे की, ज्या प्रवाहातून मनुष्याचा जन्म होतो तो प्रवाह मनुष्य आयुष्यात कधीही विसरु शकत नाही. कितीही सुखसोई मिळाल्या, कितीही मोठी पदें मिळाली तरी ज्या प्रतिकूल परिस्थितीतून आपण संघर्ष करायला शिकतो त्या संघर्षातून मिळालेले यश हे सगळयात महत्वाचे यश असते. सन्माननीय मंत्रिमहोदय, डॉ. पतंगराव कदमांविषयी मी असे बोलणार नाही. कारण त्यांचा संपूर्ण उगमच त्या क्षेत्रातून झालेला आहे. त्यामुळे त्यांना आम्हा लोकांची परिस्थिती काय असते,जनतेची परिस्थिती काय असते याची पूर्ण कल्पना येत नाही, ही त्यांची मोठी अडचण आहे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माझा जन्म 812 लोकसंख्येच्या एका खेडयात झाला आहे. जिथे एक शिक्षकी शाळा होती. आणि मानवाची निर्मिती झाल्या पासून त्या गावचा पहिला मॅट्रीक मीच झालो आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अतिशय वाईट गोष्ट अशी की, मी जे बोललो त्याचा अर्थ समजण्यामध्ये माननीय मंत्रिमहोदय असमर्थता दाखवित आहेत, हे माझे दुर्दैव आहे. तुम्ही खरे म्हणजे शिक्षण क्षेत्रातील डॉक्टर आहात म्हणून मोठया शिक्षण संस्था चालविता. माझ्या बोलण्याचा अर्थ माननीय मंत्रिमहोदयांच्या राजकीय प्रवासाविषयी होता. ते कुठे जन्माला आले त्यासंदर्भात नव्हता.

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधूकर सरपोतदार .........

सभापती महोदया, हे जे विधेयक आणले आहे त्यासंदर्भात मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मुंबई शुश्रृषा गृह अधिनियम, 1949 हा जो मूळ कायदा आहे त्यात सुधारणा करण्यासाठी हे बिल आणलेले असून यामध्ये पुढील अनेक गोष्टी दिलेल्या आहेत. कलम 3 मध्ये "मुख्य अधिनियमाच्या कलम 5 मध्ये आपण कलम 1 मधील परंतुकामध्ये खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल असे म्हटले आहे. त्यात असेही म्हटले आहे की (ब) शुश्रृषा गृह, अशा व्यक्तीच्या व्यवस्थापनाखाली नाही की जिने वैद्यक शास्त्राची पदवी धानण केली आहे व जी अशा शुश्रृषा गृहामध्ये राहते किंवा शुश्रृषा गृहामध्ये कामावर नेमलेल्या अर्हतापात्र परिचारिकांची संख्या तिथे असलेल्या रुग्णांच्या संख्येच्या विहित प्रमाणानुसार नाही." मला जरा सविस्तर सांगितले पाहिजे. म्हणून मी क्लॉजवाईज जाणार आहे. कारण याची चिकित्सा होणे आवश्यक आहे, नंतर मी सूचना करणार आहे. हे विधेयक जर चिकित्सा समितीकडे शासन पाठविण्यास तयार असेल तर माझे भाषण मी तीन मिनिटांत संपविणार. ते जर आपण करणार नसाल तर मला क्लॉजवाईज बोलले पाहिजे. शेवटी आम्ही आमच्या कामाशी कुठल्याही तडजोड करु इच्छित नाही. शेवटी या चर्चेतून काय घडणार असेल ते घडेलच पण आमचे बोलणे रेकॉर्डवर आले नाही असे घडू नये म्हणून मला बोलणे आवश्यक आहे. त्यानंतर शुश्रृषा गृहाच्या जागेचे क्षेत्र हे विहित क्षेत्रापेक्षा कमी आहे, शुश्रृषा गृहामध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या विहित केलेल्या खाटांच्या संख्येपेक्षा अधिक आहे आणि शुश्रृषा गृह, शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याच्या स्वत:च्या मालकीचे आहे किंवा व्याच्या व्यवस्थापनाखाली आहे. पण यासंदर्भात आरोग्य खाते काय करते हे पाहिले तर अनारोग्याला सुरुवात येथूनच होते. शेवटी गरीब माणूस कुठे जाणार आहे ? आज मुंबई शहराची जी लोकसंख्या आहे तिच्या 50 टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्या झोपडपट्टयांमधून राहत आहे. त्यांची जनरल रुग्णालयाव्यतिरिक्त कुठल्याही चांगल्या नर्सिंग होममध्ये आयुष्यातही जाण्याची ऐपत नसते असे गरीब लोक मुंबईत राहतात. त्यांच्या आरोग्यासाठी शासन काय करीत आहे, हा महत्वाचा प्रश्न निर्माण होतो. मुंबई उपनगर जिल्हयाची निर्मिती 22 वर्षापुर्वी झाली असून या उपनगर जिल्हयामध्ये राज्याचा विचार केला तरी सर्वात जास्त लोकसंख्या म्हणजेच 98 लाख ते 1 कोटी एवढे लोक राहतात. या ठिकाणी एक शासकीय रुग्णालय व्हावे यासाठी गेल्या

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधूकर सरपोतदार .......

अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहोत पण अद्यापही शासन ही गोष्ट मनावर घेत नाही. हॉस्पीटल व्यतिरिक्त इतर सर्व गोष्टी होतात. पंचतारांकित हॉटेल्स तयार होतात, गगनचुंबी इमारती होतात पण आरोग्यासाठी हॉस्पीटल मात्र तयार होत नाही. या गोष्टींकडे आरोग्य खात्याने लक्ष दिले पाहिजे. दुसरी गोष्ट या बिलात म्हटलेली आहे की, हे प्रमाणानुसार नाही म्हणून बदल करावयाचा आहे. या ठिकाणी असेही म्हटले आहे की, "शुश्रूषा गृहाच्या जागेचे क्षेत्र हे विवक्षित क्षेत्रापेक्षा कमी आहे" हे आपल्याला आढळून आले. मला या निमित्ताने मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, मुंबई शहरात एकूण किती शुश्रूषा गृहे आहेत, याचे उत्तर कदाचित "नाही" असेच मिळेल. हा जनरल सर्वे आपण केला आणि त्याच्या आधारावर आपण ही सुधारणा सभागृहात मान्यतेसाठी आणलेली आहे, प्रॅक्टिकली त्याचा अभ्यास केलेला नाही असेच मला वाटते. ठीक आहे, आपण डिस्क्राईब करा की कमीत कमी इतकी जागा, अमुक इतके क्षेत्रफळ, अमुक एवढा स्टाफ, नर्सेस तसेच डॉक्टर्स हे प्रशिक्षित आणि सुशिक्षीत असले पाहिजेत" असे या कायदयात म्हटले आहे. शुश्रूषा गृहामध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या विहित केलेल्या खाटांच्या संख्येवरुन अधिक आहे, असे दिसून आले...

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) UU-1

SGJ/ SBT/ MHM/ (पूर्वी श्री. खर्चे ) 16:50

श्री. मधुकर सरपोतदार ......

सभापती महोदया, हॉस्पिटलला 10 खाटाची परवानगी असेल तर त्या ठिकाणी 20 पेशंट ठेवले जातात त्यामुळे त्या ठिकाणच्या पेंशट्सवर अन्याय होतो. जे. जे, आणि के.एम. हॉस्पिटलमध्ये आज काय चालू आहे त्या ठिकाणी एकदा भेट देऊन पहा म्हणजे आपल्याला सारी परिस्थिती समजून येईल.एखाद्या वॉर्डची कपॅसिटी 50 असेल तर त्या ठिकाणी 80-90 पेशंटसला ठेवले जाते. असे होण्याचे मुख्य कारण म्हणजे रुग्णालयांची कमी संख्या. संपूर्ण देशातील कॅन्सरचे पेशंटस हे मुंबईत उपचार करूण घेण्यासाठी येत असतात. परंतु जर आपण या ठिकाणी भेट दिली तर पेशंटसचे नातेवाईक वॉर्डच्या रस्त्यामध्येच पथारी मारलेले दिसतात. अशी सर्व परिस्थिती आपल्याला माहीत असतांना देखील आपण त्यावर काही सुद्धा उपचार करीत नाहीत. अशा हॉस्पिटलमध्ये जे डॉक्टर काम करतात ते त्या ठिकाणच्या पेशंटकडे लक्ष देत नाहीत तर आपल्याच हॉस्पिटलच्या पेशंटसवर लक्ष देतात. या विधेयकात आपण शासकीय वैद्यकीय अधिका-यांचा उल्लेख केलेला आहे. परंतु हे शासकीय वैद्यकीय अधिकारी कोण आहेत? कारण हे वैद्यकीय अधिकारी स्वत:च्या हॉस्पिटलमध्ये जास्त पेशंट कसे येतील याकडेच लक्ष देत असतात व ज्या ठिकाणी हे डॉक्टर काम करतात अशा ठिकाणच्या कामावर मात्र दुर्लक्ष करीत असतात. जास्तीत जास्त पेशंट आपल्या हॉस्पिटलमध्ये कसे येतील यादृष्टीने काम करीत असतात. विधेयकातील खंड 3 मधील कलम दोन मध्ये असे म्हटले आहे की, "या कलमान्वये दिलेले नोंदणी प्रमाणपत्र हे, कलम 7 च्या तरतुदींना आधीन राहून, ज्या दिनांकास ते देण्यात आले किंवा यथास्थिति, त्याचे नवीकरण करण्यात आले त्या दिनांकांच्या लगत येणा-या तिस-या वर्षाच्या 31 मार्च या दिनांकापर्यंत अंमलात राहील व तोपर्यंत ते वैध असेल." असे म्हटलेले आहे. नर्सिंग होमची नोंदणी झाली पाहिजे या मताचे आम्ही देखील आहोत. परंतु अशा प्रकारच्या नोंदणीमध्ये भ्रष्टाचार होणार नाही याकडे लक्ष दिले गेले पाहिजे. आपल्या आरोग्य खात्याच्या संदर्भात रोज मिडीयामधून माहिती येत असते की, अमुक अमुक रुग्णालयात औषधे नाहीत, पेशंटला जागा नाही. परंतु यासंदर्भातील माहिती आपल्या विभागाकडून गोळा केली जात नाही. लोकांना चांगल्या प्रकारची सुश्रृषा कशी मिळेल याकडे लक्ष दिले जात नाही. नोंदणीची सक्ती केल्यामुळे इन्स्पेक्टर राज येणार नाही याचीही काळजी आपण घेतली पाहिजे. खंड 5 मधील (क) मध्ये असे म्हटले आहे की, "पन्नास रुपये" या मजकुराऐवजी "पाच हजार रुपये" हा मजकूर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

दाखल करण्यात येईल. म्हणजे अगोदर नोंदणी करण्यासाठी 50 रुपये लागत होते परंतु आता नवीन नोंदणीसाठी 5 हजार रुपये लागणार आहेत असाच त्याचा अर्थ होतो. खंड 6 मध्ये मुख्य अधिनियमाच्या कलम 16, पोट-कलम(2), खंड (ब) मध्ये पुढील परंतु समाविष्ट करण्यात येईल असे म्हटलेले आहे. ज्या ठिकाणी परंतुक येते त्यावेळी काही तरी मेख आहे असे समजले जाते. त्याच्या पुढे असेही म्हटले आहे की, " परंतु, राज्य शासनास, शुश्रृषा-गृहाच्या नोंदणीकरिता ते शुश्रृषा-गृह ज्या क्षेत्रामध्ये आहे ते क्षेत्र, अशा शुश्रृषा-गृहामध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या, तिथे करण्यात येणारे विशेषोपचार या गोष्टी लक्षात घेऊन, फी चे निरनिरोळे दर विहित करता येईल." अशा पध्दतीची सुधारणा सूचविलेली आहे. 50 वर्षे झाली तरी सुध्दा या कायद्यात सुधारणा करण्यात आली नव्हती त्यामुळे आपल्याला या कायद्यामध्ये सुधारणा करण्याची जरुरी का पडली? या विधेयकाच्या संदर्भातील उद्देश आणि कारणे दिलेली आहेत ती योग्य वाटत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे जे अधिकार होते ते अधिकार काढून राज्य शासन रेव्हेन्यू वाढविण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून तर करीत नाही अशी ......

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

संशयाची पाल चुकचुकते. केवळ विचारांची देवाणघेवाण होण्यासाठी बिल इन्ट्रोडयूस करता कामा नये. कोणी तरी सदस्य उभे राहिले, 10-15 मिनिटे बोलले आणि निघून गेले व त्यांनी केलेल्या भाषणाबद्दल टाळया वाजून सर्वजण घरी गेले असे होता कामा नये. शेवटी आपण सभागृहामध्ये कशासाठी येतो ? जनतेच्या कामाला सभागृहाद्वारे न्याय मिळवून देण्यासाठी येतो. आपले काम जनतेला न्याय देणारे असले पाहिजे. जनतेला न्याय द्यायचा असेल तर जनतेच्या अडचणी समजल्या पाहिजेत. मी माझ्या भाषणाच्या सुरूवातीला जनतेला कोणत्या अडचणी आहेत, कोणता त्रास आहे, हे सर्व काही मांडलेले आहे. बोगस चाललेल्या राज्यकारभारामध्ये आपण फक्त अधिनियमामध्ये बदल करून काय साध्य करणार आहात ? शासनाचा महसूल वाढेल हे मला मान्य आहे. पण त्याच बरोबर मरणाऱ्या माणसांची देखील संख्या वाढेल. आपण आरोग्य सांभाळतो ते लोकांना मारण्यासाठी की, जीवदान देण्यासाठी ? या गोष्टीचा देखील कुठे तरी विचार होणे आवश्यक आहे. मी मध्यंतरी प्रश्न विचारला होता. काँग्रेस पक्ष हा 50 वर्ष राज्यकर्ता होता. आम्ही फक्त 4 वर्ष राज्य केले. माझा एकच साधा प्रश्न आहे. पण कोणाकडून देखील उत्तर मिळत नाही. श्री.पतंगरावांना शक्य झाले तर त्यांनी त्या संबंधीचे उत्तर भविष्यात केव्हाही द्यावे. कारण त्यांना अनुभव आहे. त्यामुळे त्यांची झेप आणखी पुढे जाईल. माणसाने आयुष्यात झेप घ्यायला शिकले पाहिजे. त्याशिवाय यश देखील मिळत नाही. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 58 वर्ष झाली, हे आपण मान्य करतो. ज्या कारणासाठी आपण स्वातंत्र्यासाठी लढलो, आमच्या पूर्वजांनी फाशीची शिक्षा भोगली, आयुष्य उद्ध्वस्त केले, तो उद्देश सफल झाला आहे का ? परवा संयुक्त महाराष्ट्राचा विषय होता. त्यावर मी माझे विचार मांडले. त्यामध्ये आम्ही आमचे संपूर्ण आयुष्य झोकून दिले. त्यात विद्यार्थी देखील मारले गेले. हया सगळया आंदोलनातून आपण काय मिळविले ? आजही बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर हे भाग महाराष्ट्राच्या बाहेर राहिले आहेत. आजही तेथे आंदोलने चालू आहेत. आमच्या संघटनेची 70 माणसे गोळयांनी मारली गेली आहेत. त्यावेळी काँग्रेसचे शासन होते. काँग्रेसने लोकांना काय दिले ? गोळया घालून माणसे मारलीत. (अडथळा) मी हे उदाहरण अशासाठी दिले की, श्री.पतंगराव कदम हे या सर्वाचे साक्षीदार आहेत. जो साक्षीदार असतो, त्याला एखादी गोष्ट सांगितली की, ते पटते. केव्हा तरी ते त्यांच्या ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

महान बुध्दीने मला उत्तर देतील असा मला विश्वास वाटतो. असो. आमच्या देशातील लोकांना सुरूवातील चांगली आरोग्य, वीज, पाणी, शिक्षण सुविधा पुरविल्यात का ? आजही आपल्या महाराष्ट्रात कुपोषणाचे बळी जात आहेत. आरोग्य, वीज, पाणी व शिक्षण हया मूलभूत आपल्या महाराष्ट्रात मिळत नाहीत. महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे असा रोज डंका वर्तमानपत्राच्या माध्यमातून वाजवत असतो. त्यासाठी मोठमोठया जाहिराती दिलेल्या असतात. सन्माननीय आरोग्य मंत्री हे माझ्या समोर बसलेले आहेत. आरोग्याच्या बाबतीत महाराष्ट्र हे स्वयंपूर्ण राज्य आहे आणि महाराष्ट्रातील जनता सुखी आहे, असा दावा मंत्रिमहोदय करू शकतात का ? याचे उत्तर नाही असे आहे. या विधेयकाच्या माध्यमातून काही कलमांमध्ये बदल घडवून आणू पहात आहोत. या सुधारणांच्या पाठिमागे कुठला समाज आहे? हे तपासून पाहिले पाहिजे. म्हणून या ज्या सुधारणा आहेत त्या योग्य आहेत. परंतु, पूर्ण विचारांती त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे,अस माझे स्वत:चे मत आहे. आपण हे बिल सयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवत असाल मी लगेच बसायला तयार आहे,पण पाठवित नसाल तर मग मला जे काही बोलावयाचे आसेल ते बोलावे लागेल. भविष्यकाळामध्ये मला त्याचा आधार होईल. जुन्या आधाराचा कसा फायदा होतो ते सांगतो. श्री.आठले गुरूजी नावाचे कोकणातील लांजा येथील गुरूजी होते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

सभापती महोदया, मी या निमित्ताने एक गोष्ट सांगतो. श्री.आटले गुरुजी हे विधानसभा सभागृहाचे सदस्य होते. पूर्वी तगाई देऊन विहिर बांधण्याची पध्दत होती. या विषयावर त्यांनी सरकारला प्रश्न विचारला होता की, "तगाई घेतली, विहिर बांधली तर मग ती हिशोबात का दिसत नाही ? यावर शासनातर्फे " विहिर चोरीला गेली" असे उत्तर देण्यात आले होते. तेव्हा असे काही होऊ नये म्हणून हे विधेयक आणखी परिपूर्ण होण्यासाठी ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी माझी विनंती आहे. वाटल्यास आपण सयुंक्त समितीला हे विधेयक तीन महिन्यांत दोन महिन्यात पूर्ण करावे अशी मुदत द्यावी. जेणेकरुन आपल्याला अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक आणता येईल. खूप काही बोलण्यासारखे आहे. हे विधेयक आजच पास व्हावे असा आपल्यावर दबाव आहे काय ? असल्यास कोणाचा आहे ते सांगावे. पूर्ण विचारविनिमयाने हे विधेयक पास व्हावे अशी माझी इच्छा आहे. म्हणून मी पुन्हा एकदा विनंती करतो की, हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे. हे विधेयक आणल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. पण हे विधेयक आज मंजूर करण्याला माझा विरोध आहे एवढे बोलून मी माझ भाषण पूर्ण करतो.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदया, मुंबई शुश्रृषा -गृह नोंदणी यात सुधारणा करण्यासाठी मी विधेयक मांडलेले आहे. हे विधेयक मांडताना त्याची उद्देश व कारणे मी सुरुवालाच सांगिलेली आहेत. या विधेयकावर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत, श्री. मधुकर सरपोतदार, प्रा.जोंगेंद्र कवाडे, डॉ.नीलम गोऱ्हे तसेच श्री.विलास अवचट यांनी विचार मांडले. डॉ.दीपक सांवत यांनी त्यांचे विचार मांडत असताना असे सांगितले की, या सुधारणा आणायला उशीर का झाला ? तर दुसरीकडे असेही ते म्हणाले की, घाईघाईने हे विधेयक कशासाठी आणले ? त्याचप्रमाणे येथे सांगण्यात आले की, आपण महानगरपालिकेचे अधिकार काढून घेतले. मी याठिक्‍णी सांगू इच्छिते की, पूर्वीप्रमाणेच महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना अधिकार आहेत. जिल्हापरिषदेच्या कार्यक्षेत्रातील नर्सिंग होम आहेत त्याठिकाणचे अधिकारसुध्दा आरोग्य अधिकाऱ्यांना राहणार आहेत. यामध्ये आपण कोणतीही सुधारणा केलेली नाही. सुरुवातीला बृन्हमुंबई, पुणे, नागपूर आणि सोलापूर याठिकाणी नर्सिंग होम ॲक्ट लागू केला होता. त्यानंतर दिनांक 4.11.1993 रोजी रजिस्ट्रेशन संबंधी अधिसूचना काढली. गेल्या 55 वर्षाच्या कालावधीत आपण आरोग्याच्या बाबतीत बरीच प्रगती केलेली आहे. आज आपण प्राथमिक केंद्राचा अनुशेष ठेवलेला नाही. आपण बृहत आराखड्यामध्ये चांगले प्राथमिक आरोग्य केंद्र करु शकलो. जवळपास 27 सबसेंटर उभे केले. आपण ग्रामीण पातळीपर्यंत गेलेलो आहोत. आज आपल्याकडे पोस्ट ग्रॅज्युएट डॉक्टर्स आहेत. आज आपण लोकांना चांगल्या सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. याठिकाणी सर्वच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट आहे. हे मी नाकारु शकत नाही. पण त्यावर आम्ही कंट्रोल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. येथे सांगितले गेले की, जे कोणी नर्सिंग होम चालवितात त्याची नोंद झाली पाहिजे. आज आपल्याकडे महानगरपालिकेची चांगली हॉस्पीटल्स आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा....

ग्रामीण भागापर्यंत सबसेंटरच्या माध्यमातून आपण गेलो आहोत. महाराष्ट्र हेल्थ डेव्हलपमेंट प्रोजेक्टच्या, वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून चांगले जिल्हा रुग्णालय केलेले आहेत. श्रीनीवर्धिका या संस्थेचे 50 खाटांचे हॉस्पीटल 52 खाटांपर्यंत करु शकलो आहोत. 100 च्या आसपास बेडचे 24हॉस्पीटल करु शकलेलो आहोत. प्रत्येक जिल्हयामध्ये आपण ट्रॉमाकेअर युनिट करणार आहोत. सिटी स्कॅनसारख्या मशिन दिल्या आहेत, काही जिल्हयांमध्ये सी.आर.मशिन दिल्या आहेत. काही ठिकाणी 18 सोनोग्राफी मशिन आणि अनेक ठिकाणी एक्स-रे मशिन दिलेल्या आहेत. जिल्हा पातळीपासून ग्रामीण भागापर्यंत अत्याधुनिक टेक्नॉलॉजीची चांगली यंत्रणा असताना आपल्याकडे बोट दाखविल्यानंतर आपण तात्काळ सांगू शकतो की, येथे यंत्र नाही, हे बरोबर नाही. परंतु एखादा पेशंट नर्सिंग होममध्ये गेल्यानंतर त्या ठिकाणी सुविधा नसल्यामुळे प्रायव्हेट डॉक्टरकडे जावे लागते आणि तेथून उपचार घ्यावे लागतात. ती व्यक्ती नर्सिंग हॉस्पीटलमध्ये आहे त्या परिस्थितीमध्ये राहते. ॲज ए डॉक्टर म्हणून त्याची कोठेतरी काळजी घेतली गेली पाहिजे. आपल्या सर्वांना माहीत आहे की, साधे हॉटेल काढावयाचे असेल तर रजिस्ट्रेशन करावे लागते. हॉस्पीटलमध्ये चांगल्याप्रकारे उपचार दिला पाहिजे अशा प्रकारची यामागील भूमिका आहे. गोरगरीब जनतेला न परवडणारी फी आज त्या ठिकाणी वसूल केली जाते. आपल्याला माहीत आहे की, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट आहे. लिलावती हॉस्पीटल, बॉम्बे हॉस्पीटल किंवा अन्य हॉस्पीटलमध्ये 10 टक्के खाटा रुग्णांना मोफत देण्यासंदर्भात ॲक्टमध्ये तरतूद आहे. परंतु त्या दृष्टिकोनातून आतापर्यंत आपण काय केले ? तरतूद असताना सुध्दा त्या मोफत दिल्या जात नाहीत. त्यामध्ये आता आपण सुधारणा करण्याचा, कंट्रोल करण्याचा प्रयत्न करीत आहोत. माझा म्हणण्याचा उद्देश असा आहे की, डब्ल्यूओ, आणि आयएसओ च्या गाईडलाईनप्रमाणे प्रत्येकाला आरोग्याच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. ज्यावेळी सरकारी रुग्णालयाकडून चांगल्या गोष्टीची अपेक्षा करतो, त्यावेळी नर्सिंग होमच्या आकारणीनुसार सुध्दा हे केलेच पाहिजे. उदा. ग्रामीण भागामध्ये एखाद्या हॉस्पीटलमध्ये डॉक्टर उपस्थित नसेल तर कम्पाऊंडर रुग्णावर ट्रिटमेंट करतो. त्यामुळे असे जे प्रकार आहेत ते बंद करुन, योग्य प्रकारे व्यवस्था करावयाची असेल तर नोंदणी करणे महत्वाचे आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा....

या विधेयकाच्या माध्यमातून आपण तीन वर्षांनी रिन्युअल करण्यास सांगितलेले आहे. पूर्वी एक वर्षानंतर रिन्युअल करावे लागत होते. रिन्युअल केले नसेल तर दंड आकारण्याबाबत तरतूद यामध्ये आहे. सक्षम अधिकाऱ्याने योग्यप्रकारे नोंदणी केली नसेल किंवा नोंदणी करावयाचे फेटाळले असे जर त्याला वाटले असेल तर संबंधितास अपिल करण्याचा अधिकार आहे. आपल्याला माहीत आहे की, मागे मेडिकल एज्युकेशन डिपार्टमेंटने एक बील आणले होते. चांगले डॉक्टर्स मिळाले पाहिजेत, म्हणून त्याद्वारे मेडिकल प्रॅक्टीश्नल ॲक्ट जो कलम 37 आहे तो रद्द केला. या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी अतिशय चांगले बील आणल्याबद्दल अभिनंदन केले आहे. सन्माननीय सरपोतदारसाहेबांनी सांगितले की, या विधेयकाचे मी स्वागत करतो. परंतु रुग्णांची सेवा चांगल्याप्रकारे झाली पाहिजे असेही ते म्हणाले. महोदया, कायदा करुन प्रथम आपल्याला समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. ॲक्ट असल्याशिवाय आपण कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी करु शकत नाही. कोणाला कितीही अधिकार दिलेत तरी मानवतेच्या दृष्टिकोनातून स्टेप बाय स्टेप जावे लागते. मुंबई नर्सिंग ॲक्टच्या कलम 2, 5, 6, 12 आणि 16 मध्ये ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्या येथे आणलेल्या आहेत. त्यामुळे संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक न पाठविता आपण सर्वानुमते ते मंजूर करावे. हे विधेयक पास झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्या सूचनांचा विचार करुन त्यांचा विधेयकामध्ये अंतर्भाव करण्याच्या दृष्टिकोनातून जरुर प्रयत्न केले जातील. सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी रुग्णालय खाटांच्या संख्येनुसार असावे अशी केलेली सूचना असेल, शहरी आणि ग्रामीण भागातील फी आकारणी बाबत सूचना असेल किंवा आवश्यक असलेल्या तज्ञांसंदर्भातील सूचना असेल त्या सूचनांचा विचार करता येईल. आपण जर बघितले तर आज नर्सिंग होममध्ये प्रशिक्षित परिचारिका आढळत नाहीत. त्यामुळे आपण आज जर हे विधेयक मंजूर केले तर शिक्षेचा बडगा किंवा कायद्यामध्ये त्याबाबत तरतूद असल्यामुळे निश्चितप्रकारे चांगले वागण्याचा परिपूर्ण प्रयत्न होईल. सर्व व्यवहारामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टिकोनातून हे विधेयक आपण करीत आहोत. संपूर्ण आरोग्याच्या दृष्टिकोनातून रुग्णाला चांगली व्यवस्था मिळाली

..3..

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा....

पाहिजे यासाठी हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा आग्रह न धरता हे विधेयक मंजूर करावे अशी मी सदनाला विनंती करते व माझे दोन शब्द पुरे करते.

--------

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदया, या विधेयकाची किती आवश्यकता आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनी भावनाविवश होऊन सांगितले आहे.मी त्यांना बेसिक जे दोन तीन प्रश्न विचारले होते त्याची उत्तरे त्यांनी दिलेली नाहीत.मुंबईतील किंवा महाराष्ट्रातील नर्सिंग होम ही रजिस्ट्रेशन विरहीत सुरु होती काय ? मुंबई, नाशिक वा नागपूर येथे सुरु असलेल्या एकाही नर्सिंग होमचे रजिस्ट्रेशन केलेले नव्हते काय ? माननीय मंत्रीमहोदय अशा पध्दतीने सांगत आहेत की, आजपर्यन्त नर्सिग होमचे रजिस्ट्रेशनच होत नव्हते.माझ्या माहितीप्रमाणे प्रत्येक हॉस्पिटलचे रजिस्ट्रेशन हे मुंबई महानगरपालिका किंवा तत्सम स्थानिक स्वराज्य संस्थेकडे करावे लागते त्याशिवाय लायसन्स मिळत नाही. शॉप ॲन्ड एस्टॅब्लिशमेन्टचे लायसेन्स काढत असतांना विचारणा केली जाते की , तुम्ही नर्सिग होम ॲक्टनुसार रजिस्ट्रेशन केलेले आहे किंवा नाही ?असे असतांना पुन्हा शासनाकडे रजिस्ट्रेशन करण्याची आवश्यकता का निर्माण झाली आहे ?.दुसरी गोष्ट अशी की, जरी ही गरज निर्माण झालेली असली तरी इतक्या घाईने हे विधेयक का आणण्यात आलेले आहे.? परिचारिकांच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा केलेला आहे परंतु 1993 नंतर आपल्याकडे परिचारिकांची भरती झालेली नाही.1993 सालापासून परिचारिकांची भरती करण्याच्या बाबतीत बंदी घालण्यात आल्यामुळे भरतीच्या बाबतीत तेव्हा पासून वेटीग लिस्ट तशीच राहिलेली आहे.जर नोकर भरतीमध्ये बंदी आणली असेल तर शासनाला परिचारिका कशा मिळतील ?

माझी जर माहिति चुकीची असेल तर ती मी परत घेईन. नर्सिग होमचे क्षेत्रफळ किती असावे ते माहीत नाही. बेडच्या संख्येनुसार किती मॅनपॉवर लागणार आहे हे माहीत नाही.प्रत्येक भागाकरता वेगवेगळा खर्च लागणार आहे तेव्हा हा खर्च किती लागणार आहे हे माहीत नाही. निकष आपल्याला माहीत नाहीत. अशा प्रकारे घाई घाईने कायदा आणून आपण आरोग्याशी खेळ का खेळत आहात ? आरोग्याचा प्रश्न महत्वाचा असेल आणि नर्सिग होममध्ये ज्या काही गोष्टी चालतात त्या जरी ख-या असल्या तरी घाईने हे विधेयक आणणे बरोबर नाही 1949 साली या सबंधीचा कायदा करण्यात आला होता आणि त्यात आता आपण सुधारणा करीत आहोत. तेव्हा तीन महिन्यांनी काही सुधारणा केल्या तर त्यामुळे फारसा काही फरक पडणार नाही. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की,जर आपल्याला हा कायदा चांगल्या प्रकारे आणावयाचा असेल तर हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे.आम्ही आपल्याला काही सजेशन्स

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

देऊ तसेच बाकीच्या लोकांच्याकडूनसुध्दा शिफारशी मागवू आणि आपण एक चांगला सर्वकष कायदा करु.तेव्हा त्याबाबत मंत्रिमहोदयांनी विचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा अंतर्भाव करण्याच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिलेले आहे.

डॉ.दीपक सावत : सभापती महोदया, अशा प्रकारे सूचनांचा आंतर्भाव होणार नाही.ज्यावेळी एखादा कायदा बनतो त्यावेळी त्यातील त्रुटी वेळीच आपण दूर केल्या पाहिजेत.प्रत्येक वेळी अमेन्डमेन्ट करणे बरोबर नाही. त्यामुळे माझी आपल्याला विनती आहे की यामध्ये आपण पुढाकार घेऊन हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवून तेथे यासबंधी विचार करावा व पुन्हा तीन महिन्यानंतर हे विधेयक येथे आणावे .आपण हा प्रश्न प्रतिष्ठेचा करता कामा नये.आता पर्यन्त रजिस्ट्रेशन होत नव्हते काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, आजपर्यन्त रजिस्ट्रेशन होत असावयाचे परंतु त्यामध्ये आपण सुधारणा करीत आहोत. स्टेप बाय स्टेप आपण हे करीत आहोत.जानेवारी 2005 पासून आपण रजिस्ट्रेशन कंपलसरी करीत आहोत आणि ग्रामीण भागापर्यन्त असलेल्या नर्सिग होमच्या बाबतीत कंपलसरी करीत आहोत. रजिस्ट्रेशन करीत असतांना सध्या असलेल या पध्दतीत जर आपण सुधारणा केली नाही तर त्याला काही अर्थ राहणार नाही. त्यासंबधीचे निकष आपल्याकडे तयार आहेत. सन्माननीय सदस्यानी ज्या सूचना सांगितलेल्या आहेत किंवा जे विचार मांडलेले आहेत त्यांचा आंतर्भाव नियमांमध्ये करु.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांचा अंतर्भाव नियमांमध्ये केला जाणार आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री जोगेन्द्र कवाडे, विलास अवचट,मधुकर सरपोतदार , डॉ.श्रीमती नीलम गो-हे यांनीही दिलेल्या सूचनांचा विचार केला जाईल.

नतर श्री.सुंबरे

अग्रिम प्रत / अधिकृत नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, माझा एक प्रश्न आहे. आपण बोलताना लिलावती हॉस्पिटलचा उल्लेख केला. आपल्याकडे धर्मादाय आयुक्त आहेत आणि त्यांचे फंक्शनिंग कसे चालते हेही आपणा सगळ्यांना माहीत आहे. लिलावती हॉस्पिटलला परवानगी देताना 10 टक्के गरीबांना मोफत उपचार करावेत अशी अट घातलेली आहे आणि अशी तरतूद कायद्यामध्येच आहे. असे असताना आतापर्यंत या लिलावती हॉस्पिटलने 10 टक्के गरीब लोकांना मोफत औषधोपचाराची सोय दिलेली आहे काय ? कायदा असताना देखील कोणीही त्याकडे कधीही लक्ष दिलेले नाही. केवळ पैसा कमाविणे एवढाच उद्देश सगळ्यांचाच राहिला आहे. तेव्हा कोणत्याही कायद्याच्या बाबतीत अमलबजावणी हा भाग मोठा महत्त्वाचा असतो. सभापती महोदय, मी नामदार मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण कायदा योग्य प्रकारे आणि कडकरित्या राबविला असता तर मुंबईमध्ये, महाराष्ट्रभर बोगस डॉक्टर निर्माण झालेच नसते. हे मी अनुभवातून आपल्याला सांगतो आहे. लोकांचे कसे जीव घेतले जातात, लोकांना कसे फसविले जाते हे आपण लक्षात घ्यावे. तेव्हा आपण या निमित्ताने केवळ माझ्या एकाच प्रश्नाचे उत्तर द्यावे की, लिलावती हॉस्पिटलने 10 टक्के मोफत उपचार करण्याची जी कायद्यातील तरतूद आहे, तिची अमलबजावणी केली आहे काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदया, माझ्याकडे अशी जनरल माहिती नसली तरी अशा प्रकारचा कंट्रोल किंवा समन्वय वगैरे व्यवस्थित करण्यासाठीच आपण हे सुधारणा विधेयक आणलेले आहे. तेव्हा ज्या सूचना सर्वांनी येथे केल्या आहेत त्या सगळ्यांचाच विचार आपण करणार आहोत. म्हणून माझी विनंती की, आपण आता हे विधेयक मंजूर करावे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी या विधेयकावरील उत्तराचे जे भाषण केले त्यात थोडी दुरूस्ती करण्याची माझी इच्छा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी हे विधेयक आणण्यास उशीर केल्याचा उल्लेख आपण केला. परंतु डॉ.सावंत तसे म्हणाले नाहीत. किंबहुना डॉ.सावंत असे म्हणाले की, आपण इतकी घाई कशासाठी करीत आहात आणि मी म्हणालो होतो की, हे विधेयक आणण्यात विलंबच झालेला आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. अवचट, श्री. सरपोतदार यांनी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याची सूचना केली आहे. परंतु माझे त्यांना सांगणे आहे

...... झेडझेड 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ....

की, आता आपण या ठिकाणी ज्या काही सूचना केल्या त्या सर्व सुचनांचा आदर माननीय मंत्री महोदयांनी केलेला आहे आणि या संबंधात जे नियम केले जातील तेव्हा त्या सर्व सूचनांचा विचार करण्यात येईल आणि त्या नियमांमध्ये त्याप्रमाणे अंतर्भाव केला जाईल. तेव्हा हे विधेयक सभागृहाने आता मान्य करावे आणि आपण जे तीन महिन्याचे म्हणत होता, त्या तीन महिन्यांच्या कालावधीत आपण या विधेयकाचा परिणाम काय होतो ते पाहू अन्यथा पुन्हा याला सुधारणा आपल्याला आणता येणारच आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, सभागृहाने हे विधेयक मान्य करावे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदया, मी पुन्हा सभागृहाला सांगू इच्छिते की, आपण या ठिकाणी ज्या सूचना केल्या आहेत त्या सर्वांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. तरी आता आपण हे विधेयक संमत करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 23 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती :** सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 23 संमत झाले आहे.

*****

( यानंतर श्री. सरफरे ...3ए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : ऊसाला 1500 रूपये भाव मिळावा म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सुरू केलेले आंदोलन.

**मु.शी.** : ऊसाला 1500 रूपये भाव मिळावा म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सुरू केलेले आंदोलन. याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, कन्हैयालाल गिडवाणी, अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री सुरेश जेथलिया, श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अडीच तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे मा. सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी (विधानसभेने निवडलेले) : महोदया, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"ऊसाला पहिला हप्ता १५०० रुपये मिळाला पाहिजे या मागणीसाठी राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सुरु केलेले आंदोलन, शासनाने सुरुवातीला ऊसाची उचल देण्यासाठी ८५० रुपयांची अट घालून जे कारखाने नाबार्डच्या अटींचे उल्लंघन करतील त्यांचा गाळप परवाना रद्द करण्याची घेतलेली भूमिका, जादा उचल देण्यासाठी जिल्हा बँका व राज्य सहकारी बँका कर्ज देण्यास तयार नसणे, नाबार्ड व शासनाला पुढे करुन कारखाने आपली सुटका करुन घेत असल्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणे, यासंदर्भात दिनांक २१ ऑक्टोबर २००५ रोजी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन ऊसाला पहिल्या टप्प्यापोटी १५०० भाव द्यावा अशी मागणी केली असता आपण स्वत: या विषयाचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करु असे मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन, गतवर्षी साखरेचे भाव १७ ते १८ रुपये किलो असतांना राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना टनाला १३०० रुपयांपर्यंत भाव देण्यात येणे, सध्या साखरेचा भाव २० ते २१ रुपये असतांना व हाच भाव स्थिर राहिल असे केंद्रीय कृषीमंत्र्यांनी १० महिन्यांपूर्वी जाहीर केलेले असतांना या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्या तुलनेत १५०० रुपये भाव देण्याची मागणी शासनाने फेटाळून लावणे, परंतु आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन सुरुवातीची आपली भूमिका बदलून २ टप्प्यात उचल देण्यास मान्यता देणे, पहिली उचल सरकारी धोरणाप्रमाणे देऊन दुसऱ्या टप्प्यात उर्वरित रक्कम देण्याची जाहीर केलेली भूमिका व "हा प्रश्न सुटला" असल्याचे मुख्यमंत्र्यांनी दिशाभूल करणारे केलेले विधान, तथापि त्याबाबतही निश्चित असे आदेश न काढणे, त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी...

उत्पादक शेतकऱ्यांची झालेली फसवणूक, देशातील साखरेचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना गाळपासाठी पुरेसा ऊस उपलब्ध होण्यासाठी ऊसाखालील क्षेत्र वाढविण्याची आवश्यकता, मात्र ऊसाला योग्य भाव न मिळाल्यास शेतकरी नाऊमेद होऊन अन्य पिकाकडे वळण्याचा निर्माण झालेला धोका, त्यामुळे ऊस उत्पादकांचे व साखर उद्योगाचे होणारे प्रचंड नुकसान, यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याप्रकरणी हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदया, खरे म्हणजे या महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्याची पाळी आमच्यावर कां आली याची थोडक्यात पार्श्वभूमी याठिकाणी मांडणे आवश्यक आहे. जवळ जवळ दीड-दोन वर्षापासून पॅकेजबाबत चर्चा होत आहे. गेल्या सहा महिन्यापासून ज्या स्वरुपामध्ये पॅकेज जाहीर करण्यात आले त्यामध्ये काही अटी घालण्यात आल्या. त्यामध्ये 50 ते 55 साखर कारखान्यांचा समावेश होता. आज जवळपास 115 ते 120 कारखाने सुरु आहेत त्या सर्वांनी पॅकेजची मागणी केली आहे अशी माझी माहिती आहे. यामध्ये शासनाने ऊसाच्या दराबाबत अट घालण्याचे मुख्य कारण म्हणजे पॅकेज देणे. ही काही शासनाची मदत नाही तर फक्त नाबार्डच्या कर्जाची फेररचना करण्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना फार मोठा फायदा होणार आहे, किंवा यानंतर त्यांना संधी मिळणार नाही असे नाही. कारखान्यांवर जे कर्ज आहे ते फेडण्यासाठी मुदतवाढ देऊन त्या कर्जाची फेररचना करणे हा त्या मागील मुख्य भाग आहे. यामध्ये काही अटी घातल्या आहेत. नाबार्डच्या कर्जाला मुदतवाढ द्यावयाची आहे त्यासाठी कॅश फ्लो दिलेला आहे. त्यामध्ये जी मुदतवाढ देणार आहोत त्यामध्ये आपण कर्जाची परतफेड कशी करणार आहात? हा कॅश फ्लो दिला होता त्यामध्ये एस.एम.पी. म्हणजे केंद्र सरकारने 15 दिवसाच्या आत किमान हमी भाव ठरवून दिला पाहिजे. तो डोळयापुढे ठेवून त्यानंतर दुसरा हप्ता आम्ही देऊ, आम्ही तुम्हाला कॅश फ्लो देऊ व तुमचे कर्ज फेडून देऊ. असे दोधांच्या संमतीने तो करार झाला. परिणामी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने कर्ज फेडण्यासाठी अन्यायकारक भूमिका राज्य सरकारने घेतली. त्यामुळे हा उठलेला आवाज आहे. कारण ही परिस्थिती कां निर्माण झाली? कारखान्यांनी 5 वर्षामध्ये जे काही गैरव्यवहार केले, चुकीचे धोरण राबविले .त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. गेल्या पाच वर्षामध्ये राज्य सरकारने जे चुकीचे धोरण राबविले त्यामुळे आता ऊस कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून कमीत कमी दरामध्ये ऊस आपल्या पदरात पाडून घ्यावयाचा....

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी . . . .

माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची जी बैठक झाली, त्यामध्ये साखर आयुक्तांना निर्देश देण्यात आले. त्यामध्ये अट घालण्यात आली की, पहिला हप्ता 800 रुपये आणि दुसरा 850 रुपये अशा दोन हप्त्यामध्ये द्यावयाची असा शासनाने लेखी निर्णय कळविला. या निर्णयाचे कोणत्याही कारखान्याने उल्लंघन केले तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. असे आदेश दिल्यामुळे शेतकरी संघटना, वेगवेगळया संस्था, आम्ही सर्वांनी आवाज उठविला आणि या संदर्भात शेतकऱ्यांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी गेल्या दोन महिन्यापासून आंदोलनाची सुरुवात झाली. यासंदर्भात आम्ही, आमच्या नेतेमंडळीबरोबर आणि आमच्या काही खासदारांबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांना भेटून 31 तारखेला निवेदन दिले, तसेच ते माननीय मंत्री महोदयांना आणि शासनाच्या सर्व अधिकाऱ्यांनाही देण्याची व्यवस्था केलेली आहे. आमच्या शिष्टमंडळाला माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधात आश्वासन दिले होते की, नाबार्डची अट जाचक आहे आणि नाबार्ड हे केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे आणि त्यामुळे त्यांनीही याबाबतीत फेर विचार करावा अशी आम्ही देखील मागणी करावी आणि शासनही अशा प्रकारचे पत्र पाठवेल असे आम्हाला आश्वासन देण्यात आले होते. पण अजूनपर्यंत ते पत्र पाठविल्याचे दिसत नाही. कारण कालपर्यंत या विषयाच्या संदर्भात जी काही उत्तरे देण्यात आली होती, ती अशा प्रकारची होती की, "शासन प्रयत्न करीत आहे." खरे म्हणजे एक-दोन महिन्यापूर्वीच हे पत्र पाठवावयाचे होते. पण ते गेले नाही. हा अतिशय ज्वलंत विषय असताना अजून शासन प्रयत्न करीत आहे असे उत्तर दिले जात आहे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला असे आश्वासन दिले होते की, दोन दिवसाच्या आत पत्र पाठवू. ते पत्र केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहे की नाही याची आपण चौकशी करावी अशी मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे. दुसरा विषयाच्या बाबतीत मी थोडी पार्श्वभूमी सांगू इच्छितो. ही परिस्थिती का निर्माण झाली ? या अनुषंगाने मी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र पाठविले होते. तसेच गेल्या पाच वर्षात चुकीचे धोरण कसे राबविण्यात आले आहे ? आणि साखर उद्योग कसा अडचणीत आला ? यासंबंधात मी माननीय मंत्री महोदयांनाही 12 नोव्हेंबर रोजी पत्र पाठविले होते. जर साखर उद्योग अडचणीत आला नसता तर हे पॅकेज घेण्याची गरजच पडली नसती. साखर उद्योग हा महाराष्ट्रातील मोठा उद्योग आहे. याबाबतीत आपण जर कमर्शिअल अँगलने चुकीचे धोरण राबविले तर कोणताही उद्योग अडचणीत येऊ शकतो. मागच्या पाच वर्षात

. . . .3 बी-2

श्री.कन्हैयालाल गिडवाणी . . .

पाच चुकीचे निर्णय घेतलेले आहेत. हे 12 नोव्हेंबरचे पत्र आहे आणि हे पत्र केंद्र शासनाकडे पाठवावयाचे असल्याने इंग्रजीमध्ये लिहिलेले आहे. त्यामध्ये मी असे म्हटलेले आहे की, "The reason for the down fall of the sugar mills over the past 5 years is :

The crushing season 2001-2002; the State witnessed huge production of sugar, the Government was left with huge stock of sugar & the best option with the Government would have been to concentrate on export of sugar & obtain the best price while liquidating stock, but the Maharashtra State cooperative sugar federation, delayed the decision & after 1 year's delay took a meeting in Islampur & decided to export sugar at whatever price achievable." माननीय मंत्री महोदयांच्या माहितीसाठी मी या पत्रामध्ये चार मुद्दे दिलेले आहेत. दोन-तीन निर्णयामुळे सुरुवातीला 1118 कोटी रुपयांचे कसे नुकसान झाले आणि हे चुकीचे निर्णय कसे घेण्यात आले त्याबद्दल दिलेले आहे. या चुकीच्या निर्णयामुळे बाकीचे इतर परिणाम झाले आहेत. 2002 मध्ये 62 लाख टन इतके उत्पादन झाले होते आणि साखर ठेवण्यास जागा नव्हती. अशा वेळी ती साखर लिक्वीडेट कशी करावी, त्याचा साठा कसा करावा ? असे प्रश्न निर्माण झाले होते. त्यावेळेला आपल्याला ताबडतोब साखर निर्यात करणे गरजेचे होते. त्यावेळेला निर्यातीचे दर 1200 रुपये असताना, येथील साखरेचे लोकल दर 1400 रुपये होते. त्यावेळेला लोकल मार्केटमध्ये 1400 रुपये दर मिळत असताना कशासाठी साखर निर्यात करावयाची असा कारखान्यांनी विचार केला. पण यामध्ये कॅरी फॉरवर्ड स्टॉक, साठा ठेवणे यात 200-250 रुपये जातात. कारण आपल्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यात करावयाची असेल तर बाजारपेठेप्रमाणे चालावे लागते. पण आपण एक वर्ष उशीर केल्यामुळे नंतर ती साखर निर्यातीसाठी साडेदहा रुपयेप्रमाणे विकावी लागली म्हणजे जवळजवळ 20 लाख टन साखर निर्यात झाली आणि त्यात 200 ते 300 कोटी रुपये लॉस झाला. एक वर्ष विलंब झाल्याने एवढा तोटा झाला आहे. काही कारखान्यांनी यु.पी.च्या धर्तीवर म्हणजे दोन-तीन कारखान्यांनी चतुराईने कोर्टामध्ये जाऊन म्हणजे आम्हाला पाहिजे तेवढी साखर विकण्यासाठी परवानगी द्यावी अशी मागणी केली होती आणि त्याच्या आधारे महाराष्ट्रातील जवळजवळ 72 साखर कारखान्यांनी साखरेचा दर 14 रुपये असताना,-----

..3





श्री.कन्हैयालाल गिडवाणी . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोर्टातून ती विकण्याची जी परवानगी घेतली. यामध्ये कोर्टाने परवानगी देताना सक्ती केली नाही. तर ऑप्शन दिला होता की, तुम्हाला विकावयाची असेल तर विकू शकता. आपण जे धोरण राबवितो, ते आपल्या हिताचे आहे की नाही हे आपल्यालाच पहावयास पाहिजे.

(**सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.विलास अवचट**)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/ पूर्वी सौ.रणदिवे..... 17:30

श्री.कन्हैय्यालाल गिडवाणी (पुढे सुरु...

साखर कारखानदारीमध्ये शेतकरी सभासद आहेत. त्या कारखान्याची मॅनेजमेंट ही दर निश्चित करत असते. चुकीचे दर ठरविले तर त्याला जबाबदार बोर्ड ऑफ डायरेक्टर असतात. 72 साखरकारखान्यांनी 1400 रुपये क्विंटल दराने विकली जाणारी साखर शेवटी 1 हजार रुपये क्विंटल दराने विकण्याची वेळ त्यांच्यावर आली. 900 रुपये क्विंटलपर्यन्त दर गेला असता. सर्व कारखान्यांनी 1050 रुपये दराने कर्ज काढले होते. त्यांच्याकडे मार्जिन मनीला पैसे नव्हते. साखर विकण्यासाठी म्हणून ते थांबले. पुढे 20 लाख टन साखर ही 300 रुपये क्विंटने विकावी लागली. परिणामी त्याचे 600 कोटी रुपयांचे नुकसान झाले. यामध्ये पार्श्वभूमी सांगणे गरजेचे आहे. अशी परिस्थिती का निर्माण झाली ? त्याच्यानंतर गव्हर्नमेंट ऑफ इंडिया खरे तर रिलिज मॅकेनिझम कशासाठी लावते ? डिमांड आणि सप्लाय, गरज किती आहे आणि त्याची उपलब्धता किती आहे त्या प्रमाणात ऑर्डर रिलीज करत असतात. आपल्या महाराष्ट्रातील 72 साखरकारखान्यांनी चॅनेल करुन साखर विकली त्यामुळे दरामध्ये घसरण झाली, त्यामध्ये त्यांचे नुकसान झाले. दुसरे त्यावेळेस दीड-दोन महिन्यामध्ये साखरेची घसरण झाली. त्यावेळेला सहकार राज्यमंत्री श्री.बाबासाहेब कुपेकर होते. ते बोलता बोलता मला म्हणाले की, यातून कसे तरी बाहेर पडले पाहिजे. त्यावर मी त्यांना म्हणालो की, आपली धोरणे चुकीची आहेत, ती धोरणे सुधारण्याचे काम केले पाहिजे. देशामध्ये दोन संस्था आहेत. एक सहकार साखरकारखान्यांची देशपातळीवरील संस्था आणि दुसरी इस्मा म्हणजे प्रायव्हेट साखरकारखान्यांची संस्था. या दोघांची बैठक बोलावून धोरण राबवावे. म्हणजे जी काही घसरण चाललेली आहे त्यामध्ये फरक पडेल. त्यानंतर ही बैठक बोलाविली. साखर संघामध्ये मी स्वत: गेलो होतो. बैठकीचे माझ्याकडे मिनिट्स आहेत. इस्मा या बॉडीने त्या बैठकीचे मिनिटस् तयार केले. त्यानंतर घसरण्‍ीमध्ये फरक पडला. 1400 ते 1700 पर्यन्त वर दर गेलेला आहे. काल सन्मानीय सदस्य श्री. गडाख साहेबांनी प्रश्नोत्तराच्यावेळी बोलले की, साखरेची दरवाढ केली, त्याबाबत बोलले जाते. आम्ही 10 रु. किलो दराने साखर विकलेली आहे. त्या दराने त्यांना साखर कोणी विकायला सांगितली होती ? यावर नियंत्रण हे केंद्र सरकारचे आहे. त्याबाबत आपण उल्लंघन केलेले आहे. स्वत:च्या पायावर तुम्हीच धोंडा मारुन घेतला. 10 रुपये किलो दराने साखर विका अशी कोणीही मागणी केलेली नव्हती. कोर्टामध्ये जाऊनच आपण हे केलेले आहे. याबाबतचा मला खुलासा करणे गरजेचे वाटले,म्हणून मी बोललो. जे काही कारखान्यांना नुकसान झालेले आहे ते भरुन काढण्यासाठी जे मुद्दे समोर होते,



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

श्री.कन्हैय्यालाल गिडवानी (पुढे सुरु....

त्याप्रमाणे प्रयत्न केलेले गेले व हळूहळू परिस्थिती बदलली. आज अशी परिस्थिती आहे की, कारखान्यांना डिलिव्हरी दर 1200 ते 1700 रुपये ड्युटी विरहित आज मिळतो. म्हणजे आज 1600 ते 1700 रुपये कारखान्यांचे दर आहेत. पुढे अशी परिस्थिती येईल की, अजूनही दरामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. पण 1700 रु.च्या खाली दर येईल असे वाटत नाही. या संबंधाने आम्ही जेव्हा जेव्हा केंद्र सरकारकडे मागणी केलेली आहे, ती योग्य अशीच केलेली आहे. ती मागणी योग्य नसती तर केंद्र सरकारने त्यास मान्यता दिली नसती. जे काही आम्ही त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविले, ते विचारपूर्वक पाठविले. शेवटी केंद्राने त्याबाबतचा निर्णय करायचा आहे. येथेही कॉंग्रेस पक्षाचे सरकार आहे आणि केंद्रामध्येही कॉंग्रेस पक्षाचे सरकार आहे. आम्ही सांगितलेल्या गोष्टी चुकीच्या असतील तर त्या आपण फेटाळू शकता. जे काही आहे, ते केंद्र सरकारच्या संमतीने होते. साखर संघाच्या बाबतीत कोणा व्यक्तीबद्दल मला बोलायचे नाही. पण या संबंधीचे धोरण ठरविण्यासाठी ते जो सल्ला देतात, त्याचे परिणाम काय होतात, याचा देखील विचार करावा. मी पुणे येथे पत्रकार परिषद घेऊन या संबंधाने आरोप केला होता. तसा पत्रामध्ये उल्लेख केला. त्यांनी उत्तर दिले की, साखर संघ शासनाच्या अखत्यारित येत नाही. त्यांनी हस्तक्षेप करण्याची गरज नाही वगैरे वगैरे. ठीक आहे. पण राज्य शासन साखर संघा शिवाय चालू शकत नाही.याची आम्हाला पूर्ण माहिती आहे. ते जे काही सुचवितात, मग ते साखर आयुक्तांकडून किंवा सचिव ज्या ठिकाणी बसतात त्या ठिकाणाहून प्रस्ताव येत असतात, ते जे काही तयार करुन देतील त्यावर फक्त सह्या करुन पुढे पाठविले जाते. मला आठवते, सांगलीमध्ये अतिवृष्टी झाली त्यावेळेस केंद्र सरकाकडे मी पत्र पाठविले की, अतिवृष्टीमुळे ऊसाचे नुकसान झालेले आहे, यासाठी केंद्राने काही मदत करावी. केंद्र सरकारचा अबकारी कर तीनचार वर्षासासाठी त्या भागामध्ये माफ करावा. सरकारनेही तशी संमती दिली होती,परंतु यामध्ये व्यापाऱ्यांचा फायदा होईल,म्हणून साखर कारखान्यांनी विरोध केला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात....

डॉ. कन्हैयालाल गिडवाणी...

हा कर डायरेक्ट डयुटीसह नंतर आकारला जातो. माझी मागणी जरी योग्य असली तरी श्री. गिडवाणींची मागणी म्हणजे विरोधी पक्षातील सदस्यांची मागणी आहे असे जर काही डोक्यात ठेवून व्यवहार करण्यात येत असेल ते योग्य नाही. माननीय श्री. पवार साहेब केंद्र शासनात गेल्या नंतर गेल्या दहा वर्षापासून मी केंद्र शासनाकडे पत्र व्यवहार केलेला आहे. पण माझी आता जी मागणी आहे त्याचेच उत्तर मला आलेले आहे. आता पर्यंत श्री. पवारसाहेबांकडून कधीही उत्तर आलेले नाही. परंतु ही मागणी योग्य आहे म्हणून शासन त्यावर विचार करीत आहे असे त्यांचेही उत्तर आले आहे. म्हणजे केंद्र शासन विचार करीत आहे पण साखर संघ त्याला विरोध करीत आहे. ज्याच्यावर आपण अवलंबून आहात ते काहीही बोलले तर त्यावर शासनाने एकमत करणे योग्य होणार नाही. शेवटी ती बॉडी प्रत्येकवेळेला सल्ला देत असते. तिचा सल्ला घेत असतांना इतर लोकांचाही मनमानी सल्ला चालू नये याची दखल घेणे गरजेचे आहे. केंद्र शासनाने गेल्या दोन वर्षापूर्वी 602 कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले होते. आपल्याकडे 2002 मध्ये 62 लाख टन साखरेचे उत्पादन झाले. त्यावर टनामागे 100 रुपये म्हणजे 602 कोटी रुपये 6 टक्के व्याजाने दिले. ते पैसे कशासाठी दिले होते? बरेच कारखाने स्टॅटयुटरी मिनिमि प्राईज देऊ शकले नव्हते. शेतक-यांची ऊसाची थकबाकी देण्यासाठी हे 602 कोटी रुपये मिळाले होते.दोन टप्प्यत हे पैसे आलेले आहेत. त्याच्यातील पहिला हप्ता 50 टक्के दिला. सरसकट सगळया कारखांन्यासाठी हे पैसे वापरण्यात येत आहेत. 62 लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते त्या सगळयांनाच ऊसाची रक्कम दिलेली नव्हती. पण सगळयांनींच ते पैसे वापरले. आणि इतर व्ही.एस.आय.चे कर्ज असेल,शासनाची जी काही थकबाकी असेल, साखर संघाची जी फी असेल त्यासाठी मोठया प्रमाणात कापून घेऊन शेतक-यांना पैसे दिले जात आहेत. म्हणजे मिस युज आफ द फंड्स केलेला आहे.आणि हा क्रिमिनल ऑफेन्स आहे. केंद्र शासनाने जे एस.एम.पी. देऊ शकले नाहीत त्यांच्यासाठी हे पैसे दिलेले आहेत. ते पैसे शासनाला इतर ठिकाणी वापरता येणार नाहीत. याबाबतीत उद्या कुणी गुन्हा दाखल केला तर सर्व साखर कारखान्यांविरुध्द क्रिमिनल ऑफेन्स होणार नाही पण हे पैसे देणाऱ्यावर होईल. या पैशांचे डिस्ट्रिब्युशन चुकीचे केलेले आहे. अशा प्रकारे चुकीचे डिस्ट्रीब्युशन झ ालेले असेल तर ते पैसे परत करावयास पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गन्हैयालाल गिडवाणी ...

कारण हे 6 टक्के व्याजाचे पैसे आहेत. 2 टक्के साखर कारखाना, 2 टक्के शासन आणि 2 टक्के केंद्र सरकार अशा पध्दतीने हे व्याज दिले जाते. पण हे पैसे फक्त ऊसाच्या थकबाकीसाठी आहेत. बाकीच्या वसुलीसाठी नाहीत. सभापती महोदय, शुगरसेलची पॉलिसी ठरविण्यात आली आहे. 30-40 साखर कारखाने बंद होते आणि त्यांच्याकडे तीन-तीन वर्षाची साखर पडून होती. ती साखर गेल्या सहा महिन्यापूर्वी डॅमेजच्या नांवाखाली 17.00 रुपये किलो या भावाची साखर 10 ते 10.50 रुपये किलो या दराने विकण्यात येत आहे. म्हणजे डॅमेज साखर विक्रीची परवानगी मिळाली असली तरी डॅमेजच्या नांवाखाली 9 ते 10 रुपयाप्रमाणे ती साखर विकण्यात येत आहे. म्हणून या सगळया साखर कारखान्याच्या साखरेची विक्री ही इंटरनेटवर आणावी लागेल. म्हणजे त्यामध्ये पारदर्शकता राहील. नाबार्डने काही अटी घातल्या आहेत. परवा सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन यासंदर्भात मागणी केली होती. नाबार्डच्या अटी सर्वांना कळण्याची आवश्यकता आहे. त्यांनी कुठली अट घातली, ती योग्य आहे की नाही, हे कळले पाहिजे. नाबार्ड हे केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी .......

आणि त्याचा आधार घेऊन त्यांनी पॅकेज द्यावे किंवा ते देतांना त्यांच्यावर सक्ती जी घातली आहे ती सक्ती टेबल करावी कारण यामध्ये महत्वाचे म्हणजे कारखान्यासाठी भविष्यात आम्ही सूचना देऊ शकतो. शेवटी कारखाना चालू राहिला पाहिजे हाच त्यामागील आमचा उद्देश आहे. पण असा कुठलाही विचार न करता केवळ शासनाच्या पैशावरच हे सर्व चालले आहे आणि शेवटी केंद्रसरकार तरी मदत करते असे जे आजपर्यंत चालू होते ते दिवस आता राहिलेले नाहीत, म्हणून शासनाने याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपलेली आहे. या सर्व अटी ज्या आहेत त्या घातल्या असून त्या अटींमध्ये शेवटी नाबार्डला राज्यशासनाला हमी द्यावी लागते असे त्यांचे म्हणणे आहे असे बैठकीत ठरले आहे. परंतु अशी हमी देतांना शासनाने साखर कारखान्यांवर अटी घालणेही तितकेच आवश्यक आहे, हे विसरुन चालणार नाही. ऊसाचे दर जर कमी असतील तर हमी देण्याची गरज नाही आणि राज्यशासनाला तशी हमी द्यावयाची असेल तर आमच्या मागण्यांचा त्यात समावेश होणे आवश्यक आहे. कारखान्याच्या भविष्याच्या दृष्टीने आमची मागणी अशी आहे की, आपल्याला महाराष्ट्रामध्ये 800 लाख टन ऊस उत्पादित होऊन क्रशिंग होण्याची क्षमता आहे. त्यातून आपल्याकडे किमान 11 टक्के एवढी रिकव्हरी येते. म्हणजे 90 लाख टन ऊस उत्पादित करण्याची क्षमता आहे ती ऊसाचे दर दिले तर पूर्ण होऊ शकते. असे झाले तर साखरेच्या उत्पादनामध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर जाण्यास दोन वर्षे सुध्दा लागणार नाहीत. त्याच्या मागे कारण ऊसाचे दर आहे व ते दर देणे आवश्यक आहे. 850 रुपये ऊसासाठी जो दर दिला जातो त्यात पहिला हप्ता असेल किंवा माननीय मुख्यमंत्र्यांची कोल्हापूरला बैठक झाली व त्यानंतर शासनाकडून योग्य असा खुलासा न झाल्यामुळे तसेच तसा निर्णय होणे महत्वाचे असते परंतु तसा निर्णय न झाल्यामुळे पुन्हा जाहीर केले की, यासंबंधीचे धोरण ठरवून दर दिले जातील. पण साखर आयुक्तांना ज्या अटी घालून दिल्या असतील त्यावरच अवलंबून रहावे लागणार आहे. म्हणून शासनाने कारखान्यांवर अटी घातल्या पाहिजेत. दुसरे म्हणजे उत्तर प्रदेश सरकारने गेल्या दोन दिवसांपूर्वी सांगितले आणि कालच्या "बिझनेस सपोर्ट" या वृत्तपत्रातही ती बातमी आली, आपण देखील ते कन्फर्म करु शकता. या बातमीमध्ये 1200 रुपये एवढा दर मुलायमसिंग यांनी जाहीर केलेला आहे, असे म्हटले आहे. उत्तर प्रदेशची रिकव्हरी 9.5 टक्के

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ......

एवढी आहे आणि आपल्या राज्याची रिकव्हरी 11 टक्के आहे. एवढया मोठया प्रमाणात आपल्या राज्यात साखरेची रिकव्हरी असतांना आपण दर का देऊ शकत नाही, हेच मला समजत नाही. म्हणून आमची मागणी आहे की, 1200 रुपये किमान दर ऊसाला मिळाला पाहिजे आणि तसा खुलासा जर माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात केला तर ऊस उत्पादकांना त्याचा आपोआप फायदा मिळू शकेल.

महोदया, दुसरा मुद्दा म्हणजे स्टेट ॲडव्हायझरी प्राईज प्रत्येक राज्याने केलेले आहे. जसे वृत्तपत्रामध्ये पॅकेजचा विचार केला आहे. त्यामध्ये बाकीच्या विषयांसारखे पुन्हा आत्महत्यांचे सत्र आपल्या ऊसाच्या बाबतीत येऊ नये म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना येत्या तीन ते पाच वर्षासाठी प्रति मेट्रिक टनामागे दोनशे रुपये डायरेक्टली बोनस म्हणून देण्याची घोषणा केली तर 90, 80, 70 लाखावर आपले उत्पादन जाऊ शकते पण हे आपल्याला टिकविता आले पिाहजे. दोन वर्षानंतर 70 लाख टन झाले तरी नंतर त्यात घसरण सुरु होते व हेच धोरण टिकविले तर त्यासाठी 200 रुपये एसएपी ॲडिशनल प्रति टनामागे जाहीर करावे अशी माझी मागणी आहे. आम्ही फक्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी ही मागणी करीत आहोत. आपलेच कारखाने आहेत, निदान आमच्या पक्षाचा तरी कोणताच कारखाना नाही अथवा प्रपोझ देखील केलेला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी......

सभापती महोदय, नाबार्डचे जे रिस्ट्रीक्शन आहे ते शासनाने काढून टाकावेत. साखर कारखान्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे या मताचे आम्ही देखील आहोत. साखर कारखान्याच्या संदर्भातील आपले स्टेटमेंटा नेहमी वर्तमान पत्रात येत असतात परंतु आपल्या स्टेटमेंटवर कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी होंतांना आम्हाला दिसत नाही. साखर कारखान्याचे जे मॅनेजींग डायरेक्टर असतात ते राजकारणामध्येच क्वालीफाय असतात त्यामुळे हे मॅनेजींग डायरेक्टर इकॉनॉमिकली क्वालीफाइड असले पाहिजेत याही दृष्टीने विचार होण्याची आवश्यकता आहे. रिजनल डायरेक्टवर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे. शासन साखर कारखान्यांना हमी देत असते, नुकसान झाले तर शासन नुकसान भरुन देत असते. ज्या प्रमाणे सी.ए. इन्कमटॅक्सचे काम बघतो आणि त्याच्या कामामध्ये जर काही चूकीची माहिती आली तर सी.ए. चे लायसन्स रद्द होते तशाच प्रकारे प्रत्येक साखर कारखान्यावर एक शासकीय नॉमिनी डायरेक्टर म्हणून असला पाहिजे. रिजनल डायरेक्टरला 30-40 साखर कारखान्याचे काम बघावे लागते. त्यामुळे हा रिजनल डायरेक्टर प्रत्येक साखर कारखान्याकडे लक्ष देऊ शकत नाही त्यामुळे प्रत्येक साखर कारखान्यावर शासनाने आपला नॉमिनी नेमणे आवश्यक आहे. पारदर्शकता म्हणून लॉंग टर्म पॉलीसी राबविणे आवश्यक आहे. साखर कारखान्याच्या संदर्भात ज्या चुका झालेल्या आहेत त्या आता भरुन निघणार नाहीत. परंतु अशा चुका या पुढील काळात होणार नाही यासाठी लॉंग टर्म पॉलीसीची आवश्यकता आहे. अशा चुका पुढील काळात होऊ नये यासाठी साखर कारखान्यावर नियंत्रण असण्याची आवश्यकता आहे. साखरेच्या निर्यातीच्या संदर्भात मध्यंतरी काय प्रकार झाले याची आपल्याला माहिती आहे. 21 कारखान्यांनी साखर निर्यातीच्या संदर्भात घोटाळा केला होता याची माहिती आम्ही मध्यंतरी काढली होती असे असतांनाही या 21 कारखान्यापैकी आपण एकाही कारखान्यावर खटला भरलेला नाही. हायकोर्टामध्ये आपल्या टिपार्टमेंटने ॲफिडेवीट केलेले आहे. यासंदर्भात ॲडव्होकेट जनरलेने यासंदर्भात सांगितले आहे की, आम्ही या संदर्भात ॲक्शन घेवू. यासंदर्भात मीच पीआयएल दाखल केली होती. यासंदर्भात निकाल लागून आता एक वर्ष होऊन गेले तरीही या कारखान्यांवर अजून कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. या 21 कारखान्यांपैकी 1-2 कारखान्यांकडून दीड

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी......

दोन कोटी रुपयेच वसूल झालेले आहेत. अजून सुध्द 40-50 कोटी रुपये वसूल व्हावयाचे बाकी आहेत. व्यापारी आणि कारखानदार यांच्या संगनमतानेच अशा प्रकारचे घोटाळे निर्माण होत असतात. यासंदर्भात कोठल्याही कारखान्यावर ॲक्शन झालेली नाही. आपल्याकडे 90 टक्के फ्रिसेल आहे पूर्वी 60-70 लेव्ही होती परंतु नंतर लेव्हीचा रेषो बदलत गेला. मध्यंतरी खुल्या साखरेपेक्षा लेव्हीच्या साखरेचे दर जास्त होते. आता 10 टक्के हा केंद्रशासनाचा विषय आहे. आता 90 टक्के फ्रिसेल व 10 टक्के लेव्ही आहे. त्यामुळे फ्रिसेल साखरेच्या संदर्भात राज्यशासनाने केंद्राशी संपर्क करुन 90 टक्के फ्रिसेल जे आहे ते 100 टक्के करुन घ्या. 10 टक्के लेव्ही बंद करा असे आमचे म्हणणे नाही 10 टक्के लेव्ही सुरु ठेवली पाहिजे. परंतु केंद्रशासनाने यासंदर्भातील अधिकार राज्यशासनाला देऊन त्यांनी ती खरेदी करुन जे काही नुकसान झाले असेल तर ते नुकसान शासन भरुन देत असते. नाही तरी आता लेव्हीची साखर उचलली जात नाही समजा ही साखर उचलली गेली तर ही साखर काळयाबाजारात 70 टक्क्यापर्यंत विकली जाते. म्हणजे साखर उपलब्धही राहत नाही आणि आपल्याला त्याचा दरही कमी मिळतो. त्यामुळे यासंदर्भातही केंद्रशासनाकडे प्रस्ताव पाठवावा. मला शासनाकडे मागणी करावयाची आहे की, नाबार्डकडून 6 टक्क्याने कर्ज मिळत असते. नाबार्डकडून ते पैसे राज्यसरकारी बँकेत जातात व नंतर राज्यसरकारी बँकेकडून ते पैसे जिल्हा मध्यवती बँकेकडे व तेथून ते स्थानिक बँकेकडे जात असतात. 6 टक्क्याचे व्याज हे शेवटी 14-15-16 टक्क्यावर जात असते. व्याजामध्ये बरेच कारखाने बंद पडलेले आहेत. आज मोठया प्रमाणात पैसे पडून आहेत. त्यामुळे साखर मॉर्गेज करुन साखर कारखान्यांना उपलब्ध करुन दिले तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. 15-17 टक्के एवढया मोठया व्याजाचे पैसे जर साखर कारखान्यांनी घेतले तर हे कारखाने कधीच वर येऊ शकणार नाहीत. त्यामुळे जास्तीत जास्त 7-8 टक्के व्याजानेच कारखान्यांना पैसें मिळाले पाहिजेत. साखर कारखान्यांना लावण्यात येणा-या व्याजाचा दर 7-8 टक्क्यापेक्षा जास्त नसावा अशी आमची मागणी आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी...

असे केले तर कारखान्यांना मदत होईल. कारखान्याला मदत करीत असताना त्यावर नियंत्रण ठेवणे देखील महत्त्वाचे आहे. सहकार क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार आहे हे आपण स्वत: कबूल केले आहे. तो थांबविण्याची वेळ आलेली आहे. आज सभागृहामध्ये बोलण्यासाठी वेळ मिळाला आहे. तेव्हा या सगळया गोष्टीचा आपण विचार केला पाहिजे. महाराष्ट्र शुगर इंडस्ट्री ही देशाला चालना देणारी आहे. देशामध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक असला पाहिजे. आज देशामध्ये दर वर्षाला 10लाख टन कन्झमशन वाढले आहे. त्यामुळे 160 लाख टनावरून 200 लाख टनापर्यंत आपले प्रोडक्शन गेले पाहिजे. त्यामुळेच महाराष्ट्राचा वाटा मोठा असावा अशी माझी व आमच्या पक्षाची भूमिका आहे. साखर उद्योगातून केंद्र शासनालासुध्दा महसूल मिळतो. म्हणून मी ज्या काही मागण्या केल्या आहेत, त्याचा गंभीरतेने विचार करावा व त्याची अंमलबजावणी करावी. असे जर आपण केले तर आम्हाला दरवर्षी पॅकेजसुध्दा मागण्याची गरज नाही. तसे केले नाही तर मग आम्हाला विरोध करावा लागेल. उत्तर प्रदेश, तामिळनाडू या राज्यांमध्ये खाजगी कारखाने आहेत. पण त्यांनी कधी पॅकेज मागितल्याचे ऐकले आहे का ? महाराष्ट्र सोडून अन्य कुठल्याही राज्यातील खाजगी कारखान्यानां पॅकेज मिळत नाही. हे फक्त आपण मागत आहोत. कारण यामध्ये आपली काहीच लागत नाही. समजा मला स्वत:चा व्यापार सुरू करावयाचा असेल तर मी 70 टक्के बँकेकडून लोन घेईन आणि 30 टक्के माझे मार्जिन मनी असेल. म्हणजे यात जबाबदारी माझी असते.आपल्या **इथे** जे काय आहे काय ते शासनाचे. त्यामुळे चालले तर आपले, बंद पडले तर ते शासनाचे अशी भूमिका असते मूळात अशी भूमिका असता कामा नये. त्यामुळेच निष्काळजीपणा वाढला. म्हणून यापुढे काळाजीपूर्वक नियंत्रण करण्याची वेळ आलेली आहे. ते शासनाने करावे. श्री.पतंगराव कदम आपल्याला 50 कारखान्यांचा अनुभव आहे. त्यासाठी बोल्ड निर्णय घेतला पाहिजे. यासाठी मी काही जास्त काही सांगण्याची आवश्यकता नाही. आम्ही ज्या काही सूचना दिल्या आहेत, त्या भविष्याच्या दृष्टीने दिलेल्या आहेत. त्याचा शासनाने जरूर विचार करावा. साखर आयुक्त सुध्दा ऑफिसर लॉबीमध्ये बसले आहेत. याकडे शासनाने गंभीरतेने पाहिले पाहिजे हे देखील त्यांना माहिती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी...

शासनाने 850 रुपयाची अट घातली आहे. ती घालण्याची आवश्यकता नाही. ही अट नाबार्डमुळे घातली आहे. तसेच, साखरेला किमान 1200 दर मिळेल अशी घोषणा केली तरी चालेल. या बरोबरच शेतकऱ्यांना 200 रुपये अधिकचा बोनस मिळाला पाहिजे अशी घोषणा केली तर जास्त बरे होईल. यामुळे ऊसाच्या लागवडीसाठी फार मोठी मदत होणार आहे. 150 कोटी रुपये निर्यातीसाठी शासनाने घेतलेले आहेत. 100 रुपये प्रति क्विंटल निर्यातीसाठी शासनाने मागच्या वर्षी दिले होते. यासाठी शासनाने अनुदान दिलेले आहे. याबाबत मीच मागणी केली ती ताबडतोब मान्य झाली. शासन स्वत:च्या हिताची मागणी ताबडतोब मान्य करते. म्हणून शेतकऱ्यांच्या हितासाठी देखील तसा निर्णय करावा. शेतकऱ्यांच्या हितासाठी 200 रुपये भाव देण्याचा निर्णय आपण सभागृहात जाहीर करावा अशी मी मागणी करीत आहे. विदर्भासाठी जसे पॅकेज जाहीर केले आहे, तसे ऊस उत्पादक शेतकऱ्यासठी पॅकेज जाहीर केले तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. माणसावर अन्याय झाला, तो दुखावला गेला की मग तो रस्त्यावर येतो आणि हातामध्ये दगड घेतो. अशी भावना पुन्हा त्याच्यामध्ये निर्माण होऊ नये म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी शासनाने पॅकेज जाहीर करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, एका चांगल्या विषयावर बोलण्यासाठी आपण मला संधी दिल्याबद्दल आपला आभारी आहे. आजच्या चर्चेच्या निर्णयातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडे काही तरी मेसेज जावा अशी अपेक्षा व्यक्त करून मी आपली रजा घेतो.

....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी ऊसाला पहिला हप्ता म्हणून 1500 रुपये द्यावेत या विषयासंबंधी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यांचा या क्षेत्रातील अभ्यास चांगला आहे. मी त्यांना अनेक वर्षापासून ओळखतो. ऊसाला 1500 रुपये पहिला हप्ता मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलने केली. शेतकरी रस्त्यावर आले. शेतकऱ्यांनी एक प्रकारचा असंतोष दाखविला यामध्ये त्यांची चूक नाही. कारण गेल्या तीन चार वर्षामध्ये महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ, ऊसावर पडलेला लोकरी माव्यासारख्या रोगाचा प्रादूर्भाव यामुळे शेतकरी हैराण झ ाले होते. एकीकडे या संकटाला तोंड देत असताना दुसरीकडे खतांचे वाढलेले भाव, डिझेल दरवाढ, शेतकऱ्यांना मिळणारे एकरी उत्पन्न, या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर शेतकऱ्यांना हा दर परवडत नव्हता. म्हणून आपल्याला शेतकऱ्यांचा असंतोष मान्य केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी येथे काही चांगल्या सूचना केल्या आहेत. त्यांनी सांगितले की, केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात अबकारी कर माफ केला पाहिजे. भरमसाठ व्याजाचे दर कमी केले पाहिजेत. राज्य शासनाने शेतकऱ्यांना 200 रुपये बोनस द्यावा. मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, नाबार्डने पॅकेज देत असताना त्यामध्ये पहिला भाव हा 850 रुपये आणि त्यानंतर साखर कारखान्यात ज्याप्रमाणे ऊस विकला जाईल त्याप्रमाणे कारखान्यांच्या ऐपतीप्रमाणे भाव द्यावा अशा अटी घातल्या होत्या. ऊसाला दरवाढ मिळावी एवढाच मुद्दा याठिक्ाणी आहे. साखर कारखान्यांतील गैरव्यवहारामुळे साखर कारखाने अडचणीत आले त्यामुळे नाबार्डला पॅकेज आणावे लागले असे येथे सांगण्यात आले. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, तीन वर्षापूर्वी महाराष्ट्रात अतिरिक्त साखरेचे उत्पादन झाले होते. सगळी गोदामे साखरेने भरली होती. एक-दोन लाख टन साखर बाहेर उघड्यावर ठेवावी लागली होती. कारखान्यांनी ज्या बँकाकडून पैसे उचलले होते त्याचे व्याज भरमसाठ वाढले. जास्त उत्पादन झाल्यामुळे साखरेच्या किंमती भराभर खाली उतरल्या. दहा रुपये किलोने साखर विकली गेली. प्रोडक्शन कॉस्ट जास्त असतानासुध्दा प्रोडक्शन कॉस्ट निघत नव्हती. अशा चक्रांमधे साखर

श्री.यशवंतराव गडाख.........

कारखाने अडकले होते. साखरेचे उत्पादन जास्त झालेले असताना सुध्दा साखरेची आयात करण्यात आली. याचा सर्व परिणाम साखर कारखान्यांवर झाला. आपण याचा निश्चितपणे विचार केला पाहिजे. आज साखर कारखान्यांना कर्जाचे हप्ते पाडून दिलेले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 18:00

श्री.यशवंतराव गडाख....

कोणाला 5 वर्षासाठी, कोणाला 7 तर कोणाला 10 वर्षांसाठी मिळाले. व्याजामध्ये 3 टक्क्यांची सूट मिळाली. याचा एवढा गवगवा केला गेला की, "साखर कारखान्यांना कोटयावधी रुपयांचा मलिदा" अशा ठळक बातम्या वर्तमानपत्रामध्ये छापण्यात येऊ लागल्या. अशा परिस्थितीत एकंदरीत महाराष्ट्रातील साखर कारखानदारी आणि साखर कारखान्यामध्ये चोर, बदमाश मंडळी आहेत अशा प्रकारचे चित्र रंगविण्यात आले. यादृष्टिकोनातून आपण काही विचार करणार की नाही ? महाराष्ट्रातील आर्थिक प्रगतीच्या खोलामध्ये मी जात नाही. परंतु महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील चित्र बदलण्यामध्ये निदान खारीचा वाटा या कारखानदारांनी उचललेला आहे हे तुम्हा आम्हाला मान्य करावेच लागेल. कारण साखर कारखानदारांनी आज शिक्षण संस्था काढलेल्या आहेत. ही इंडस्ट्री स्थापन झाल्यापासून या इंडस्ट्रीने 50 हजार कोटी रुपये कराच्या रुपाने राज्य आणि केंद्र सरकारला दिलेले आहेत. दरवर्षी 17 हजार कोटी रुपये राज्य सरकारला याद्वारे मिळतात. या सर्व परिस्थितीत कारखानदारी अडचणीत आलेली असताना आपण अशा पध्दतीने नीट विचार केला नाही. कारखाने नीट न चालविल्यामुळे जे कारखाने अडचणीत आले त्या कारखान्यांना माननीय पंतप्रधान, केंद्रीय कृषी मंत्री, माननीय मुख्यमंत्री, सहकारी मंत्री यांनी पॅकेजच्या माध्यमातून मदत दिलेली आहे. हे पॅकेज दिल्याबद्दल मी मनापासून त्यांचे अभिनंदन करु इच्छितो. साखर कारखानदारीला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्याचे काम या सर्वांनी केलेले आहे. नाबार्डने ज्या अटी घातल्या आहेत त्या अटींना शासनाने बांधिल राहीलेच पाहिजे. ज्यांनी कारखाने चांगले चालविले आहे ते 850 हप्ता देऊ शकतात, तो पैसा त्यांना द्यावा लागतो. महोदय, जे पॅकेज घोषित केले आहे त्या पॅकेजचा माझ्या मोणा कारखान्याला काहीच उपयोग नाही. त्यामुळे मला राज्य सरकारच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या महाराष्ट्रात ज्यांनी चांगल्याप्रकारे कारखाने चालविले आहेत त्यांना या पॅकेजचा काहीच फायदा नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे जे कारखाने तोटयात गेले, त्यांच्यासाठी हे पॅकेज योग्य आहे. परंतु ज्यांनी कारखाने चांगल्याप्रकारे चालविले नाही त्यांनासुध्दा नाबार्डचा फायदा दिला जात आहे. त्यामुळे ज्यांनी कारखाने चांगल्याप्रकारे चालविलेत त्यांना राज्य सरकार शाबासकी देणार आहे काय ? त्यांना आर्थिक मदत देणार आहे काय ? हे मी या चर्चेच्या निमित्ताने राज्य सरकारला विचारु इच्छितो. साखर निर्यात करावयास पाहिजे असे सन्माननीय सदस्य श्री.गिडवाणी यांनी सांगितले. महोदय, प्रथमच

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 18:00

श्री.यशवंतराव गडाख....

ही परिस्थिती राज्यात निर्माण झालेली आहे. परंतु निर्यातीसंदर्भातील मेकॅनिझम सहकार क्षेत्राकडे नाही. पांगुळगाडा घेऊन चालणारी ही पध्दत आहे. राईट ऑफ शुगरसाठी एक कमिटी नेमली गेली. त्या दृष्टिकोनातून मेकॅनिझम तयार करण्यात आलेले आहे. जशी पध्दत बदलेल तसे मार्केटींग कमिटीला बदलावे लागणार आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांना नाबार्डच्या माध्यमातून मदत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. साखर कमीतकमी 20 रुपये किलोने विकण्याची आवश्यकता आहे. मागे माझ्याकडे एकदा एक अधिकारी आले होते. त्यांनी जाहीर सभेत सांगितले की, मी ज्यावेळेला 20-25 वर्षांपूर्वी नोकरीवर लागलो होतो त्यावेळी मला 1500 रुपये महिन्याला पगार होता. परंतु आज 20-25 वर्षानंतर 30 हजार रुपये पगार आहे. म्हणजेच एकंदरीत सर्व परिस्थिती पाहिली तर साखरेचे भाव 20, 25 नव्हेतर 30 वर्षांपासून प्रती किलो 10, 12, 13 रुपयांच्या वर गेलेले नाहीत.

नंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख..

साखरेचे दर आणि लेव्ही साखरेचे दर पाहिले तर शेतक-यांचा हा साखर उद्योग लवकरच संपणार आहे अशी स्थिती निर्माण झाली आहे. आज जवळ जवळ एक हजार कोटी रुपयांची साखर 100 कोटी जनतेला लागते. 30 वर्षा पूर्वीचा काळ असा होता की, त्यावेळी महाराष्ट्रातील जनतेला गुळाचा चहा प्यावा लागत असे व त्यावेळी रेशन दुकानातूनच साखर मिळत असे.परंतु आज मोठया प्रमाणावर राज्यामध्ये साखरेचे उत्पादन होत आहे. सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यानी आणि शेतक-यांनी सरकारच्या मदतीने एवढी मोठी प्रगती साखरेच्या उत्पादनामध्ये केलेली आहे.तेव्हा हा साखर उद्योग या पुढे चांगल्या प्रकारे जगला पाहिजे या दृष्टीकोनातून समोपचाराने हे सगळे प्रश्न सुटले तर अधिक बरे होईल असे मला वाटते. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम उपस्थित आहेत.मी त्यांना सांगू इच्छितो की, मागच्या वर्षी सरकारने असे जाहीर केले होते की ,साखरेवरील परचेस टॅक्स माफ करण्यात येईल.परंतु दोन तीन दिवसांपूर्वीच मला असे समजले आहे की, महाराष्ट्रातील साखर कारखानदारांचे खाते सील करण्याकरता राज्य सरकारने एक ऑर्डर काढलेली आहे.तेव्हा ही गोष्ट बरोबर नाही असे मला वाटते.साखरे वरील परचेस टॅक्स माफ करण्यात येईल असे मागच्या वेळी जाहीर करण्यात आले होते परंतु असे असतांना खाती गोठविण्याच्या बाबतीत जर सरकार नोटीस काढणार असेल तर ते योग्य नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रकरणात लक्ष घालावे अशी माझी त्यांना विनंती आहे. त्या नंतर मला दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे साखर कारखान्यांना रस्ता अनुदान मिळत नाही तेव्हा त्यादृष्टीने देखील सरकारने त्यांना मदत करावी अशी माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. ऊसाचे क्षेत्र काम ठेवण्यासाठी,साखरेचे उत्पादन अधिक वाढविण्यासाठी सध्या जी काही सरकारी मदत दिली जात आहे त्या पेक्षा अधिक मदत देण्याच्या बाबतीत सरकारने भूमिका स्वीकारली पाहिजे. त्याचबरोबर साखरेच्या भावाच्या बाबतीत लोकांनी आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. साखरेचा भाव 20 रुपयापेक्षा खाली येता कामा नये तरच महाराष्ट्रातील शेतक-यांच्या ऊसाला प्रती टन 1200 ते 1400 रुपये भाव मिळू शकेल.या ठिकाणी माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे या चर्चेच्या निमित्ताने माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचना जर रास्त असेल तर त्याचा सरकारने जरुर विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून राज्यातील ऊसकरी शेतक-यांच्या संदर्भात तसेच साखर कारखान्याच्या संदर्भात जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्याबद्दल मी प्रथम त्यांना धन्यवाद देतो. ऊसकरी शेतकरी आणि साखरेच्या उद्योगाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी चिंता व्यक्त केलेली आहे व त्याबद्दल त्यांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे. देशात साखरेचे उत्पादन मोठया प्रमाणावर वाढले पाहिजे. त्याचबरोबर गाळपासाठी पुरेसा ऊस उपलब्ध होण्याकरता ऊसाखालील क्षेत्र वाढले पाहिजे, शेतक-यांच्या ऊसाला योग्य भाव मिळाला पाहिजे. ऊस पिकविणारा शेतकरी नाऊमेद होऊन तो दुस-या पिकाकडे वळता कामा नये. तसेच आज साखर उद्योगाचे आणि ऊस उत्पादक शेतक-यांचे प्रचंड नुकसान होऊ घातलेले आहे. त्याबद्दल सन्माननीय सदस्यांनी जी चिंता व्यक्त केलेली आहे ती रास्त आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी या ठिकाणी उत्कृष्ट पध्दतीने साखर कारखानदारीचे चित्र या ठिकाणी उभे केलेले आहे.आपल्या राज्यामध्ये सहकारी तत्वावर जे साखर कारखाने सुरु आहेत त्यातील काही सहकारी साखर कारखाने हे अत्यंत आदर्श पध्दतीचे आहेत असे म्हणता येईल. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांचा मुळा सहकारी साखर कारखाना, श्री.विखे पाटील यांचा प्रवरा सहकारी साखर कारखाना आणि श्री.नागनाथ नाईकवडे यांचा हुतात्मा किसन वीर सहकारी साखर कारखाना असे तीन सहकारी साखर कारखाने हे उत्कृष्ट पध्दतीने चालविले जात आहेत. आपला कारखाना उत्कृष्ट पध्दतीने चालविणारी ही मंडळी आपल्या राज्यात आहेत.परंतु सहकारी तत्वावर चालविल्या जाणा-या काही साखर कारखान्यांची परिस्थिती मात्र दिवसेंदिवस बिघडत चालली आहे.

नंतर श्री.सुंबरे .

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

आणि ज्या कारखान्यांची अवस्था बिघडत चालली आहे त्या कारखान्यांचे संचालक मंडळ मात्र श्रीमंत होत चालले आहे आणि कारखान्याचा ऊस उत्पादक मात्र डबघाईला येत असतो. हे का होते याचा विचार करणे गरजेचे आहे. ऊस उत्पादक शेतकरी आहे त्यांना लागणाऱ्या खताचे वाढणारे भाव, त्यांना लागणाऱ्या बियाणे, एकरी उत्पादन आणि सतत वाढणारा उत्पादन खर्च या सगळ्या बाबी लक्षात घेऊन शासनानेअशा प्रकारची हमी ऊस उत्पादकांना दिली तर त्यांचे बरेचसे प्रश्न आपल्याला सोडविता येतील. सभापती महोदया, काल या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी विदर्भातील शेतकऱ्यांसाठी म्हणून पॅकेज जाहीर केले. सुमारे 1075 कोटी रूपयांचे हे पॅकेज विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी म्हणून घोषित केलेले आहे. विदर्भातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहेत आणि आता हे पॅकेज जाहीर झाल्यानंतरही 15 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या बातम्या येत आहेत. विदर्भातील धान उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यासाठी ज्या उपाय योजना करायला पाहिजे होत्या त्या का करण्यात आल्या नाहीत हा यातील महत्त्वाचा भाग आहे. भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या ठिकाणचा जो आमचा धान उत्पादन करणारा शेतकरी आहे त्याचा देखील विचार या पॅकेजमध्ये करण्यात आला असता तर बरे झाले असते. पण आपण हे पॅकेज जाहीर केले आहे त्याबद्दल जरूर सरकारला मी धन्यवाद देतो. त्याच धर्तीवर ऊस पिकविणारा जो शेतकरी आहे, मग तो पश्चिम महाराष्ट्रातील असो वा विदर्भातील असो, त्याच्यासाठी सुद्धा पॅकेज जाहीर केले तर त्यांचे जीवनही आपल्याला सुखाचे करता येईल. सभापती महोदया, मध्यंतरी वर्तमानपत्रातील बातम्यामध्ये आम्ही वाचले की, शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन केले. त्यांनी राज्याचे अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांच्या घरावर जाऊन आंदोलन केले, सत्याग्रह केला. काही ठिकाणी दगडफेक देखील झाली. शेतकऱ्यांचा हा जो असंतोष आहे त्याला आम्हाला डिफ्यूज कसे करता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे असे मला वाटते. काल परवा कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे जो महापूर आला... मला वाटते् कुरूंदवाड जवळ श्रीदत्त साखर कारखाना आहे, श्री.घाडगे यांच्या तो खाजगी कारखाना आहे. हा कारखाना खाजगी असूनही अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने चालतो आहे आणि मग खाजगी तत्त्वावर चालविला जाणारा हा साखर कारखाना चांगल्या प्रकारे चालू शकतो तर सरकारची अनेक पद्धतीने मदत मिळूनही सहकारी तत्त्वावरील साखर

..... 3के 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

कारखाने का चालू शकत नाही याचे संशोधन, विश्लेषण करणे आवश्यक आहे असे मला वाटते. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गिडवाणी तसेच श्री. गडाख यांनी सांगितले की, आमच्या देशामध्ये लक्षावधी टन साखरेचे उत्पादन झाले आहे असे असतानाही विदेशातून साखर आयात करण्यात आली. आमची गोदामे साखरेने भरलेली असतात, अतिरिक्त उत्पादन झालेले असताना विदेशातून साखर आयात आम्ही करतो आहोत या मागील गणित काही समजून येत नाही. त्यामुळे आमच्या महाराष्ट्रात साखरेचे भाव 10 रूपये राहतात. सतत महागाई वाढत आहे, लोकांचे पगार वाढत आहेत, दरडोई उत्पन्न वाढते आहे परंतु साखरेचे भाव पाहिजे त्या प्रमाणात वाढत नाहीत. त्यामुळे साखरेच्या बाबतीतही हा प्रश्न सहकारी साखर क्षेत्र आमच्या राज्यातील एक गौरवपूर्ण उद्योग आहे. ज्याने पश्चिम महाराष्ट्रात संपन्नता आणली, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण असे कार्य या सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून झालेले आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 3एल 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

हे होत असतांना देखील आज साखर कारखान्यांचे जे मॅनेजर्स आहेत, संचालक आहेत They are political Managers ते इंडस्ट्रिअल मॅनेजर्स झाले तर अत्यंत उत्कृष्टपणे संचालन करतील.आणि तोटयात चालणारे साखर कारखाने निश्चितपणे उत्कृष्टपणे चालविता येतील असे मी आवर्जून सांगतो. ऊसकरी शेतकरी आणि साखर उद्योगांचे होणारे प्रचंड नुकसान यामध्ये माननीय सदस्य श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी हे तज्ज्ञ आहेत. त्यांचा कारखाना नसला तरी साखर कारखाना व साखरेच्या संदर्भात अत्यंत पोटतिडिकीने त्यांना बोलतांना आपण बघतो. साखर कारखान्याच्या बाबतीत अतिशय सक्षमपणे भूमिका मांडतांना माननीय सदस्य श्री. गडाख यांना आपण वारंवार बघितले आहे. साखर कारखाने व ऊस उत्पादक यांचा समन्वय साधता आला तर राज्यातील साखर कारखानदारी जास्त फायदेशीर होईल. साखर कारखाने फायद्यात चालले तर ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना चांगले पैसे देता येतील. सर्वांच्या जीवनामध्ये गोडी निर्माण करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या जीवनातील कटुता दूर करण्यासाठी साखरेच्या माध्यमातून केंद्र सरकारची मदत घेऊन, नाबार्डची मदत घेऊन जी यंत्रणा असेल त्या सर्वांची मदत घेऊन साखर कारखानदारी सक्षम, मजबूत व फायदेशीर कशी होईल व त्या माध्यमातून ऊस पिकविणाऱ्यांचे जीवन जास्तीत जास्त सुखी, वैभवशील, संपन्न कसे करता येईल यासाठी शासनाने विचार करावा. अशी या चर्चेच्या माध्यमातून माननीय नामदार डॉ. पतंगराव कदम साहेबांना विनंती करतो व आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय भीम.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख करुन मी साखर कारखान्यांची बाजू नेहमीच सभागृहामध्ये उचलून धरतो असे सांगण्यात आले. मी साखर कारखान्यांची बाजू लावून धरीत नाही. ही जी इंडस्ट्री आहे, त्यामध्ये असलेल्या चांगल्या व्यवस्थेची, चांगल्या गोष्टींची या ठिकाणी नोंद घेतली जावी. माननीय सदस्य श्री. गिडवाणी साहेबांना माहीत आहे की, साखर घोटाळा प्रकरणामध्ये दोषी व्यक्तींवर कारवाई झाली पाहिजे अशी मी मागणी केली आहे. तेव्हा मी सर्व कारखान्यांबाबत नाहीतर या संपूर्ण सिस्टिमबद्दल बोलतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गडाख साहेबांचा गैरसमज झ ाला आहे. ते उत्कृष्ट पध्दतीने आपला साखर कारखाना चालवितात त्याबाबत गौरवपूर्ण उल्लेख मी केला आहे. तसेच, ते केवळ कारखान्यांवर बोलत नाहीत तर संपूर्ण महाराष्ट्रातील साखर उद्योगांबद्दल बोलतात. साखर उद्योग वाढावा आणि शेतकऱ्यांचे भले व्हावे या दृष्टीकोनातून वारंवार ते आपली भूमिका मांडतात असे मी सांगितले आहे.

श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गडाख साहेबांनी साखरेच्या दराबाबत याठिकाणी सूचना केली की, साधारणपणे साखरेचा दर 30 रुपये किलो असावा. तो दर लावला तर बरेच प्रश्न सुटतील. म्हणजेच कारखान्यांना 20 रुपये हा दर मिळाला पाहिजे. ही बाब राज्य सरकारच्या अखत्यारीत नाही तर ती केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहे. केंद्र सरकार किती दर रिलिज करते त्यावर अवलंबून आहे. केंद्र सरकारने त्या दृष्टीने पाऊले उचलली तर आमची हरकत नाही. केंद्र सरकारकडून एकदम हे मान्य होणार नाही. केंद्र सरकारने एकदम 20 ते 25 रुपये दर दिला तर तो कुणीही सहन करणार नाही. त्यामुळे ही गोष्ट एका दिवसात होणार नाही. साखरेचे दर केंद्र सरकार ठरवीत असल्यामुळे प्रत्येक महिन्याला ते दर रिलिज होतात. त्याप्रमाणे राज्य सरकारने आपली भूमिका ठरवावी.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:20

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी नियम 97 अन्वये जी चर्चा उपस्थित केली आहे, त्याला सहमती दर्शविण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील साखर उद्योग हा महत्वाचा आणि हजारो कोटी रुपयांचा महसूल मिळवून देणारा आहे. हा उद्योग आज अडचणीत आलेला आहे. त्याची जी विविध कारणे आहेत, त्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली आहे. पण मला असे वाटते की, महाराष्ट्र राज्य सहकार संघाचे ढिसाळ नियोजन याला कारणीभूत आहे आणि शासनाची नियोजन शून्यता हे देखील याचे एक कारण आहे. त्यामुळे साखर उद्योगाला उतरती कळा लागल्याचे दिसून येते. संपूर्ण भारतामध्ये ऊस उत्पादनाच्या बाबतीत आणि साखर उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे पहिल्या क्रमांकाचे होते, पण आज त्याचा क्रमांक घसरलेला दिसून येतो. महाराष्ट्रात याबाबतीत योग्य व्यवस्थापनाचा आणि नियोजनाचा अभाव नसता तर आज जो गरीब शेतकरी रस्त्यावर आलेला आहे, तो रस्त्यावर आला नसता. आजही पश्चिम महाराष्ट्राचा उल्लेख झ ााल्यावर सदनात देखील चर्चा होते की, हा भाग सुजलाम् सुफलाम् आहे.याचे कारण म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात पांढरा हत्ती होतो म्हणजे ऊसाचे उत्पादन जास्त होते. पण हा गैरसमज आहे. यावर्षी नाबार्डने साखर कारखान्यांचे कर्ज फेडण्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी पहिल्या हप्त्यापोटी द्यावयाची जी रक्कम जाहीर केलेली आहे ती आणि त्यासंदर्भातील अटी या जाचक आहेत आणि शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या आहेत. त्यामुळे हा हंगाम शेतकऱ्यांना अतिशय वाईट ठरलेला आहे. सहकार क्षेत्रात साखर कारखाने हा अत्यंत महत्वाचा उद्योग आहे आणि त्याचा केंद्रबिंदू शेतकरी आहे. पण अशा वेळी ऊस उत्पादकांचाही विचार होणे गरजेचे आहे. त्याला कोणताही लाभ होऊ नये अशीच परिस्थिती निर्माण झाल्याचे आपल्याला दिसून येते. केंद्र शासनाने जी किमान आधारभूत किंमत जाहीर केली, त्याला राज्य शासनाने सुध्दा मान्यता दिली आहे. खरे म्हणजे हा सरळसरळ शेतकऱ्यांवर अन्याय आहे. आज आपण पाहतो की, ऊसाचे उत्पादन कमी-कमी होत आहे आणि त्याची काही कारणे आहेत. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाखसाहेबांनी सांगितले त्याप्रमाणे डिझेलचे भाव, मजुरीमध्ये झालेली वाढ आणि त्याचबरोबर ऊसाच्या पिकावर कधीकाळी रोग पडेल आणि त्यामुळे शेतकरी भरडला जाईल असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते. पण गेली पाच वर्षे पाहिले तर ऊसाच्या पिकावर पांढरा लोकरी....

. . . .3 एम-2

श्रीमती कांता नलावडे . . . .

मावा पडला आणि शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे हे पीक घ्यावे की न घ्यावे या संभ्रमात शेतकरी पडलेला आहे. मावाग्रस्त झालेला ऊस जाळून टाकण्याशिवाय शेतकऱ्यांकडे काही पर्याय नाही. कारण तो ऊस गुरांना देखील खावयास देता येत नाही. त्यामुळे आज या भागातील ऊसाचे क्षेत्र कमी होत चालले आहे. आपण पाहिले तर आपल्याला दिसेल की, सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर, पुणे, सोलापूर इ.परिसरात हेक्टरी जवळजवळ 6,61,543 इतके क्षेत्र ऊसाच्या पेरणीचे आहे. त्यातील 1 लाख 43 हजार 93 हेक्टरमधील शेती पांढऱ्या लोकरी मावा रोगाने ग्रस्त झालेली आहे आणि त्यामुळे फार मोठे नुकसान झालेले आहे. अशा वेळी शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहीले पाहिजे. त्यांना आधार दिला पाहिजे की, जर या मावा रोगामुळे ऊसाच्या उत्पादनावर परिणाम होत असेल तर राज्य शासन तुम्हाला मदत करील अशा प्रकारचा विश्वास शासनाने त्यांना देणे गरजेचे आहे. आज आपण पाहतो की, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी ऊसाच्या पिकाऐवजी दुसऱ्या पिकाकडे वळलेला आहे. सोयाबीनसारख्या पिकाकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष गेल्याचे आपल्या लक्षात येईल. म्हणून मला असे वाटते की, याठिकाणी केंद्र शासनाने भाव घोषित केलेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु..

राज्य शासनाची जबाबदारी म्हणून 200 रुपयाचे अनुदान द्यावे. सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेबांनी सांगितले की, 20 रु.किलो प्रमाणे साखर कारखान्यांना साखरेसाठी दर मिळावा, त्यांच्या मागणीला मी पाठिंबा देते. त्यानंतर झोन बंदी, गुऱ्हाळ बंदी आणण्याचा विचार केला जात आहे. झोन बंदी आणि गुऱ्हाळ बंदी आपण उठविली पाहिजे. ऊसाला 850 रु. दर देण्याबाबत आपल्यामध्ये सुध्दा मतभेद होते. काहींना ऊसाला 1 हजार रुपये दर मिळावा असे वाटते, परंतु 850 रुपये दर द्यावा लागलेला आहे. अशावेळी खरे म्हणजे महाराष्ट्राच्यादृष्टीने ऊसाचे पीक महत्वाचे आहे. त्यामुळे हा महत्वाचा साखर कारखान्याचा उद्योग आहे, अशावेळी पुन्हा एकदा देशामध्ये पहिला क्रमांक आणि जगामध्येसुध्दा आपल्या देशाचा क्रमांक जरुर उंच केला पाहिजे. महाराष्ट्र हे पहिल्या पाच क्रमांकामध्ये आले पाहिजे, अशादृष्टीने खरे म्हणजे विचार केला पाहिजे. ऊस उत्पादक शेतकऱ्याला ऊस लावण्यामध्ये उदासिनता आलेली आहे, त्याला ऊसाचे बेण जवळपास मिळत नाही. त्यासाठी त्याला 100 कि.मी.दूर जावे लागते. त्यांना सहजासहजी ऊसाचे बेणे मिळाले तर ऊस लावण्यास शेतकरी तयार होतो. यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न केला पाहिजे, अशीही मागणी मी या चर्चेच्या माध्यमातून करते. अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्याच मुद्यांची मी द्विरुक्ती करत नाही. धन्यवाद.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्रीमती नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिडवाणी यांनी ऊसाला भाव मिळण्याच्या संदर्भात चर्चा उपस्थित केलेली आहे, त्याचे मी समर्थन करते. गेल्या तीन-चार वर्षापासून ऊस उत्पादक शेतकरी आपल्या अनेक मागण्यांसाठी आंदोलने करत आहेत. त्यांचे सुख-दु:ख समजून घेण्याचा आम्ही प्रयत्न करतो. आपण स्वत: म्हणत असतो की, जरी त्या भागामध्ये जन्मलो नसलो तरी त्या भागाचे प्रतिनिधित्व करत असतो. विदर्भामध्ये अधिवेशन होत असताना, पश्चिम महाराष्ट्रातील नेते असणारे लोक संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करुन, त्याबद्दलची भूमिका घेत असतात. त्याबद्दलचे चांगले, वाईट निर्णय घेत असतात. आज ही चर्चा उपस्थित झाल्यानंतर मला खरोखरच आश्चर्य वाटते की, माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब आणि डॉ.पंतगराव कदम साहेब सांगली जिल्ह्यातील आहेत. डिग्रस येथे आंदोलन झाले. त्यानंतर निवडणूक झाली आणि पुन्हा त्यांना कौल मिळालेला आहे. दहा वर्षानंतर केंद्र आणि राज्य सरकारे एकाच पक्षाची सत्तेवर आहेत. दोन्ही ठिकाणी शेतकऱ्यांची मुले म्हणविणारे केंद्र आणि राज्यामध्ये नेतृत्व करत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेबांनी सुंदर अशाप्रकारचा सल्ला दिलेला आहे. परंतु त्यांचा सल्ला शासन ऐकत का नाही ? त्यामध्ये राजकारण आहे की काय ? अशाप्रकारची आम्हाला शंका येते. मी स्वत:ला ऊस उत्पादक शेतकरी म्हणून म्हणविणारी नाही. मला निरीक्षणाने आणि अभ्यासाने, ऊसाच्या संदर्भात आपल्यासारखी तज्ज्ञ मंडळी, बऱ्याच राजकारणातील लोकांचे निरीक्षण केल्यानंतर अशी गोष्ट लक्षात आली की, ऊस उत्पादक शेतकऱ्याला चांगला भाव मिळणार नाही असे म्हणारे शेतकरी, असे म्हणणारे साखर कारखान्याचे संचालक, असे म्हणणारे नेते एका बाजूला आणि स्वत: जे काही गैरव्यवहार होतात, जे अकार्यक्षम नेते आहेत, त्या अकार्यक्षमतेवर पांघरुन घालून, पॅकेजकडे वळणारे लोक यांच्यामध्ये वेगळयाप्रकारचे सत्ता-संघर्ष होतो. या संदर्भात मांजराच्या गळ्यामध्ये घंटा कोण बांधणार ? सगळयांनी एकमेकांना सांभाळून राजकारण करायचे, असा प्रकार चालला आहे. जे लोक या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे काम करतात, ते बाजूला फेकले जातात. जे लोक लांड्या लबाडया करतात, त्या कारखाना क्षेत्रातील शेतकऱ्यांनी त्यांना विश्वासाने निवडून दिलेले असते, त्यांच्या बंगल्यावर त्यांना दगडफेक करण्याची वेळ येते. माननीय मुख्यमंत्र्यांनी एक स्टेटमेंट केलेले आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

की, जर कां आम्ही ऊसाचा भाव वाढवून दिला तर ऊसाची पळवापळवी होईल. म्हणून मला खरा प्रश्न असा उपस्थित करावासा वाटतो की, मग गाडे कुठे अडले आहे? जर साखर कारखान्यांची भाव द्यायची तयारी आहे, शेतक-यांची मागणी आहे, अशा वेळेला त्यांना भाव देता येत नाही, ही खरी कोंडी आहे. याचे राजकीय उत्तर द्यायचे झाले तर त्यांना दुखवावे लागेल आणि त्यांना दुखवायची शक्ती आणि क्षमता या सगळया राजकीय गटबंधनात आहे की नाही याचा विचार करावा लागणार आहे. विरोधी पक्षानी अनेक वेळा हा प्रस्ताव आणलेला आहे. आणि जेव्हा जेव्हा ऊस उत्पादक शेतक-यांच्या प्रश्नावर आम्ही आवाज उठवितो त्यावेळी आम्हाला हा प्रश्न विचारला जातो आणि लोकशाहीमध्ये असा प्रश्न विवचारणे स्वाभाविक आहे. ज्या वेळी वरवणला दोन वर्षापूर्वी श्री. बबनराव पाचपुते यांच्या गाडी समोर शेतकरी आडवे पडले. त्यावेळी पुण्याच्या पोलीस अधीक्षकांनी आम्हाला प्रश्न विचारला होता की, त्यालोकांमध्ये तुमचे काही समर्थक आहेत काय? तुम्ही त्यामध्ये कशासाठी पडता ? डिग्रसला शेतकरी तुडविले गेले. त्या आंदोलनामधील माणसे आमचे नातेवाईक नव्हते. शेतक-यांच्या प्रश्नावर सगळा महाराष्ट्र एक आहे. मग तो कपूस उत्पादक शेतकरी असो, धान उत्पादक शेतकरी असो किंवा ऊस उत्पादक शेतकरी असो, या शेतक-यांना न्याय मिळाली पाहिजे ही आमच्या पक्षाची भूमिका आहे आणि म्हणूनच 29 नोव्हेंबरला शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष श्री. उध्दवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली उरळीकांचन येथे फारमोठा सत्याग्रह झाला. त्यावेळी श्री. उध्दवजी ठाकरे यांनी जे स्टेटमेंट केले होते त्यावर वर्तमानपत्रातून टीका झाली. ते स्टेटमेंट असे होते की,"शेतक-यांच्या हिताशी जे खेळतील त्यांना आम्ही ऊसाच्या दांडक्याने मारु." (अडथळा) ते तुम्ही शोधू शकता. असे म्हणण्यामागे हेतू हा होता की, ऊस उत्पादक शेतक-यांना काही वेडे कुत्रे चावलेले आहे कां की, दर मोसमामध्ये कारण नसतांना येऊन दगडफेक करतात, कारण नसतांना हिंसाचाराकडे जातात. आम्हाला असे वाटते की, त्यांच्या ज्या आर्थिक अपेक्षा आहेत त्या पूर्ण करण्यामध्ये शासनाचे नियोजन कमी पडत आहे.म्हणून प्रत्येक वेळेला शेतकरी संघटनेवर आंदोलन उभे केल्यावर, तेथे हिंसाचार झाल्यावर शिवसेना आणि विरोधी पक्षाच्या आंदोलनामध्ये निम्म्ी माणसे तुमच्याच पक्षाची माणसे असतात. कॉग्रेस आणि एनपीसीचे लोक झेंडे बाजूला ठेवून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आंदोलन करण्यासाठी येत आंदोलन करण्यासाठी येत असतात. याचाच अर्थ असा की, त्या शेतक-यांना न्याय देण्यामध्ये शासन कमी पडत आहे. डिग्रसच्या आंदोलनानंतर डॉ. पतंगराव कदम अतिशय समतोल भूमिका घेऊन, सगळयांचे ऐकून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. कारण आम्हाला ऊसाला एवढा भाव देता येणार नाही, आणि एवढाच भाव देता येईल अशा प्रकारचे उत्तर देण्याची जबाबदारी परत त्यांच्यावर आहे. म्हणून ऊसाच्या भावाच्या संदर्भातील जसा प्रश्न आहे तसाच पुढच्या काही वर्षात ताडतोबिने काही पावले उचलण्याचा प्रश्न आहे, असे मला वाटते. साखर संचालकांना ज्या पध्दतीने हलविले गेले, त्यामध्ये मी कुठल्याही व्यक्तिचे समर्थन करणार नाही पण ज्या पध्दतीने चांगल्या अधिका-यांबद्दल भूमिका घेतली जाते, त्यामुळे नियोजन होऊ शकत नाही, ही देखील परिस्थिती आहे. म्हणून श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी या प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहे, त्याचे मी मनापासून समर्थन करते आणि श्री. गुरुनाथ कुलकर्णींनी त्यांचे शंका निरसन सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर श्री. उध्दवजी ठाकरेंना फोन करुन करुन घ्यावे, असे सांगते. धन्यवाद.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-यांच्या विविध समस्यांवर आपण या सभागृहात चर्चा केलेली आहे. कापूस उत्पादक शेतकरी आणि धान उत्पादक शेतकरी यांच्या समस्यांबद्दलही चर्चा केली आणि आज आपण ऊस पत्पादक शेतक-यांबद्दल चर्चा करीत आहोत.सभापती महोदय, 21 व्या शतकार प्रवेश करीत असतांना निश्चितपणे शेतमालाचे भाव हे आंतरराष्ट्रीय बाजारातील भावाशी जुळले गेले आहेत.एकीकडे गहू, तांदूळ, कापूस, ज्वारी यांचे भाव कमी होत असतांना जगाच्या मार्केटमध्ये साखरेचे भाव तुलनात्मकदृष्टया चांगले आहेत. त्यामुळे स्वाभाविकपणे आपल्या देशातून साखर निर्यात करु शकतो. साखरेची जी सायकल ठरलेली आहे त्या प्रमाणे पुढील तीन-चार वर्षे साखरेसाठी चांगले आहेत. अर्थात एक गोष्ट खरी आहे की, जसे आपण सहकार क्षेत्रात 1:9 अशा प्रमाणात सूतगिरण्या दिल्या. तशाच पध्दतीने 1:9 या प्रमाणे साखरकारखाने देखील सहकार क्षेत्रात या राज्यात निर्माण केले. ही सगळीच साखर कारखानदारी वाईट आहे आणि त्या सगळयांवरच भ्रष्टाचाराचा आरोप केला तर हे अन्यायकारक होईल. ही गोष्ट खरी आहे की, या राज्यामध्ये या धोरणाचा फायदा घेऊन खरोखरच उत्तमरीतीने आपले साखर कारखाने उभे करुन काही मंडळींनी महाराष्ट्राचे लौकिक वाढविलेला आहे.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ........

विशेषत: पश्चिम महाराष्ट्राचे जे ग्रामीण अर्थशास्त्र आहे, जे कृषी अर्थशास्त्र आहे त्याला चालना देण्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांची फार महत्वाची भूमिका आहे. जसे आपण म्हणतो की, शेतकऱ्यांना व्हॅल्यू ॲडिशन जोपर्यंत लागू करीत नाही तोपर्यन्त त्यांना फायदा मिळणार नाही आणि याचे चित्र आज पश्चिम महाराष्ट्रामध्ये पहायला मिळत आहे. हे सर्व आलबेल आहे असे जे म्हटले जाते ते खरे नाही. या सर्व प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आतच सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई यांनी उल्लेख केला की, सांगलीमध्ये डॉ. पतंगराव कदम आणि श्री. जयंत पाटील या दोन मंत्री महोदयांच्या घरावर गोटमार झाली होती. त्या गोटमारीमागे आर.आर.पाटलांचा नक्कीच हात नसेल, त्यांचा दुरान्वयाने देखील संबंध नसेल असा माझा विश्वास आहे. पण सांगली जिल्हयामध्ये ही परिस्थिती का निर्माण व्हावी याचे कारण मी माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो. सरकार म्हणून विचार करीत असतांना आपण कारखानदारांचा विचार करणार की शेतकऱ्यांचा ? खरे म्हणजे या दोघांच्याही बाबतीत विचार करणे आवश्यक आहे. पण या दोघांचा विचार करीत असतांना सरकार म्हणून प्रथम शेतकऱ्यांचा विचार करणे तितकेच महत्वाचे आहे. युतीच्या काळात आम्ही अगोदरच अस्तित्वात असलेली झोनबंदी उठविली होती. एका बाजूला आपण लिबरल धोरण स्वीकारतो, लिबरल इकॉनॉमीचा विचार करतो, प्रायव्हेट, पब्लिक इनव्हेस्टमेंटच्या गप्पा मारतो, असे तत्व मान्य करतो तर दुसरीकडे मात्र झोन बंदी आणण्याचा विचार का करावा हे मला समजत नाही. शेवटी या क्षेत्रात आपल्याला शक्तीवान बनायचे असेल तर त्यासाठी स्पर्धा ही अटळ आहे, ती स्पर्धा करावी लागल्यामुळे स्वाभाविकपणे शेतकऱ्यांचा फायदा होत असेल तर नेमके त्याच वेळी शासनाने अशा प्रकारचे रिस्ट्रीक्शन आणावयाचे हे बरोबर नाही. ऊस उत्पादकांना ऊसाचा भाव देण्याच्या बाबतीत 1500 रुपयेपर्यंत मागणी झाली. त्यातील परिस्थिती वेगवेगळी आहे ती म्हणजे काही कारखान्यांचे सर्व कर्ज फिटलेले आहे, त्यांच्यावर कुठलेही व्याज देण्याची जबाबदारी नाही अशा कारखान्यांनी 1500 रुपये प्रति टनामागे भाव दिला पाहिजे, त्यामुळे त्यांना काही फरक पडणार नाही, ते देण्यास तयार आहेत. जसे माननीय मुख्यमंत्र्यांचा कारखाना चांगल्या स्थितीत आहे, माननीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेबांचा कारखाना, माननीय श्री. विनय कोरे यांचाही कारखाना चांगल्या स्थितीत चालू आहे,

......2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .......

अशा काही कारखान्यांची हा भाव देण्याची तयारी असतांना त्यांच्यावर मात्र 850 रुपये एवढाच भाव प्रति टन द्यावा अशा प्रकारचे बंधन का टाकावयाचे ? जे कारखाने देऊ शकतात त्यांना तो दर देण्यास मज्जाव करु नये. परंतु ज्यांची आर्थिक परिस्थिती नसेल, जसे, विदर्भामध्ये या दोन वर्षात कारखान्यांची वाईट परिस्थिती आहे, मागच्या वर्षी पाऊस पडला नाही म्हणून कारखाने बंद पडले. अशा कारखान्यांना व्हायेबल नाही, आर्थिकदृष्टया त्यांची ऐपत नाही पण ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी हे सूत्र लावण्यास का मनाई करण्यात येते ?

सभापती महोदय, माझा तिसर मुद्दा असा आहे की, शेतकऱ्यांचे सरकार, शेतकऱ्यांचे पुत्र अशा वल्गना हे सरकार नेहमीच करते, आम्ही सगळे शहरी होतो, माननीय श्री. शरद पवार साहेब म्हणत होते की, भारतात अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी नांवाचे शेतकरी कोणी ऐकलेत काय. पण मला सांगावयाचे आहे की, डॉ. पतंगराव कदम, माननीय आर.आर.पाटील, माननीय जयंत पाटील हे शेतकऱ्यांचे पूत्र म्हणून म्हणतात तर यांनी काय दिवे लावले. या देशात शेतकरी कसा सुखी होणार यासाठी आपण काहीही केले तरी दिल्लीतील सरकार तूमचे काही ऐकते काय ? मी तरी अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात अमेरिकेत गेलो होतो त्यावेळी मी इथेनॉलचा प्रकल्प आपल्या राज्यात आणला. आताचे पेट्रोलियम मंत्री श्री. मणिशंकर अय्यर यांनी तो प्रकल्प पहिल्यांदा हाणून पाडला. आमच्या काळात केंद्रीय पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी इथेनॉल प्रकल्प आणला होता. 35 कोटीचा प्रकल्प आम्ही तयार केला, त्यासाठी बँकेचे व्याज मी भरीत आहे. 1.20 लाख प्रतिदिन एवढी या प्रकल्पाची क्षमता आहे आणि डायरेक्टली ऊसाच्या रसापासून इथेनॉल बनविण्यासाठी असलेल्या प्रकल्पाला खीळ घालण्यात आली. मी अटलबिहारीजी पंतप्रधान असतांना त्यांना म्हणालो होतो की, देशाचे सर्वात हिंमतवान पंतप्रधान होऊन देशातील लोकांना तूम्ही सांगा की, आम्ही इथेनॉलवर गाडया चालवू शकतो त्यामुळे कुठल्याही प्रकारे पेट्रोल आणि डिझेल आपल्याला आयात करावे लागणार नाही, यावर ते म्हणाले की, हे शक्य आहे काय ? मी म्हणालो की होय जरुर शक्य आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, 1930 सालापासून ब्राझीलमध्ये अल्कोहालवर कार चालतात आणि अजून सुध्दा आपल्याकडे एकही गाडी इथेनॉलवर चालत नाही किती मोठा फरक ब्राझील आणि आपल्यामध्ये आहे? शाहू,आंबेडकरांचे नाव मिनीटामिनीटाला घ्यायचे पण करायचे मात्र काहीच नाही असे तुमचे काम आहे. आपण शेतक-यांसाठी काही सुध्दा कामे केली नाहीत. काँग्रेसचे सरकार दिल्लीत आल्यानंतर पहिले कार्य पेट्रोलियम मंत्री श्री. मणिशंकर अय्यर यांनी कोणते केले असेल तर त्यांनी प्रथम इथेनॉल बंद केले. आम्ही शेतक-यांच्या विरोधी आहोत आणि तुम्ही मात्र शेतक-यांचे कैवारी, तुम्ही शेतक-यांचे नेते, असे वातावरण आपण तयार करता. तुम्हाला शेतक-यांचा फार कळवळा आणि आम्ही मात्र शेतक-यांचे विरोधी? आता जाणता राजा कृषी मंत्री झाले आहेत. सभापती महोदय, ज्यावेळेस माननीय शरद पवार साहेब दिल्लीमध्ये कृषीमंत्री झाले त्याच वेळेस शेतकरी तयार करु शकेल असे जे इथेनॉल आहे ते बंद पाडले.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी अटलबिहारी वाजपेयी यांनी शेतक-यांची कामे केली, भाजपाने काय काय कामगिरी केली ते सांगत आहेत परंतु भाजपाचे जेव्हा दिल्लीत सरकार होते त्यावेळेस शेतीसाठीचे बजेट 84 हजार कोटी रुपयांचे होते परंतु आता तो 1लाख 15 हजार कोटी पर्यंत फायनांशिअल आऊट ले झालेला आहे.

श्री. नितीन गडकरी : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी आकडेवारी दिलेली आहे त्याच्या संदर्भात जाहीर आवाहान करु शकतो. आपल्या सरकारने शेतक-यांचा विश्वासघात केलेला आहे. कोठले कर्ज, कोठले बजेट घेऊन बसला आहात? आपल्या महाराष्ट्र शासनाच्या कॅबिनेटमध्ये जे निर्णय झालेले आहेत त्यातील 70 टक्के निर्णयांची तुम्ही अंमलबजावणी केलेली नाही. उगाच कशाला आमच्या केंद्रसरकारने हे केले आणि ते केले असे म्हणता? दिल्लीमध्ये काय चालले आहे? माननीय पंतगरावांच्या कारखान्यात काय चालले आहे याची आपल्याला माहिती नसावी. माननीय पतंगराव कदमांच्या सांगली जिल्हा बँकेने 9 लाख रुपये कर्जाचे 72 लाख रुपये वसूली केलेली आहे. दहा पटीने पैसे वसूल करीत असल्यामुळेच आज शेतकरी आत्महत्या करीत आहे हे विसरु नका. ऊसाच्या रसापासून इथेनॉल तयार करण्याचे प्रकल्प आम्ही घेतले परंतु

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.............

आपण ते बंद केलेले आहे. दोन वर्षापासून आपल्याकडील सर्व इथेनॉलचे प्लँट बंद पडलेले आहेत. खरे म्हणजे माननीय शरद पवार कृषी मंत्री झाल्यामुळेच इथेनॉलचे कारखाने बंद पडलेले आहेत. माननीय मणीशंकर अय्यर यांनी माननीय शरद पवारांच्या द्वेषा करिता इथेनॉल बंद केले. आज आमच्या इथेनॉलचा एक थेंब सुध्दा घेतला जात नाही. यासंदर्भात आपल्या मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी आणि सहकार मंत्र्यांनी आतापर्यंत काय केले आहे? को जनरेशन मध्ये पॉवर प्रोजेक्ट टकायला सांगितले परंतु तुम्ही पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट 2-2 वर्षे केले नाही. माननीय सदस्य श्री. प्रकाश आवाडे यांनी प्लँट उभा केल्यानंतर पीपीए करण्यासाठी किती वर्षे लागले? माननीय पवार साहेबांना या करिता मी दोष देत नाही. माझ्या प्लँटच्या पीपीए साठी माननीय पवार साहेब सांगून सांगून थकले परंतु इथेनॉलचे प्लँट काही सुरु झाले नाही. माननीय गुरुनाथ कुलकर्णी साहेब आम्ही आपले विरोधी नाहीतर तर आमच्यापेक्षा तुम्हाला जास्त पाण्यात पाहणारे दिल्लीतील कॉँग्रेसवाले आहेत. मी एकदा दिल्ली येथे दोन खासदारांबरोबर गेलो होतो. त्यावेळेस ते सांगायला लागले This Ethanol lobby belongs to Shri Sharad Pawar and NCP. Ultimately, this is going to strengthen the hands of BJP and NCP. आपल्या महाराष्ट्राचा इतिहास आहे की, जसे मिर्झाराजे जयसिंग औरंगजेबाच्या दरबारातच सरदार आणि मनसबदार बनले. मिर्झाराजे जयसिंग हे औरंगजेबाच्या दरबारातच महादेवाची पुजा छत्रपती शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी करीत होते. आम्ही प्यूअर छत्रपती शिवाजी महाराज आहोत. तुम्ही मिझ ार्राजे जयसिंग असल्यामुळे तुमचा दिल्लीच्या तख्ताला कुर्नीसात चालू आहे. जशी अवस्था मिझ ार्राजे जयसिंग याची होती तशीच अवस्था आज तुमची झालेली आहे. त्यामुळेच इथेनॉलचे प्लँट पेट्रोलियम मंत्री श्री. मणीशंकर अय्यर यांनी बंद केलेले आहेत. महाराष्ट्रात इथेनॉलचे 70 कारखाने आहेत. जेव्हा ऊसाच्या रसापासून इथेनॉल तयार होईल तेव्हाच ख-या अर्थाने महाराष्ट्रातील शेतक-याचा फायदा होईल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

शेतकऱ्याला भाव केव्हा मिळेल. जेव्हा ऊसाच्या रसापासून इथेनॉल तयार होईल तेव्हा. जेव्हा चिपाडापासून वीज तयार होईल तेव्हा. जेव्हा साखरेला चांगला भाव मिळेल तेव्हा. तेव्हाच शेतकऱ्याला चांगला भाव मिळेल. पण याकरिता आपण आता काय प्रयत्न केले आहेत ? आपल्या शासनाने दिल्लीत साधे पत्र देखील लिहिले नाही. पत्र लिहिल्याचे आपल्याला आठवते का ? मला माफ करा.... साधे पत्रसुध्दा महाराष्ट्रातून गेले नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा फायदा केव्हा होईल ? Main product is power and by-product is ethanol and sugar.

अध्यक्ष महाराज, मला सरकारला एक विनंती करावयाची आहे. जेव्हा कारखाने चांगले चालतील तेव्हा शेतकऱ्याला चांगले भाव मिळतील. कारखाने केव्हा चांगले चालतील, जेव्हा त्यांना चांगले दोन पैसे मिळतील तेव्हा. आज माझा कारखाना सुरू झाला आहे. पण डॉ.पतंगराव आपण पेपरमध्ये जाहीर करून टाकले की, विदर्भातील सगळे साखर कारखाने बंद होणार. आपण काही तरी शुभ बोलायला पाहिजे होते. आपण इथे आलात आणि सगळया बँका बंद करून टाकल्यात आणि कारखाने देखील बंद करून टाकलेत. आपण म्हणतात की, विदर्भामध्ये एकही कारखाना चालू शकणार नाही. आपण आमच्या कारखान्याकरिता कोणती मदत केली आहे ? शासनाच्या फतव्यामुळे आम्हाला कोणीही कर्ज देण्यास तयार होत नाहीत. जिल्हा सहकारी बँकेची वाट लागली. 150 रुपयांचा घोटाळा झाली आणि बँक संपली. आता तर महाराष्ट्रातील अर्ध्या बँका लुटून फस्त झाल्या आहेत. डॉ.पतंगराव कदम आपण सहकार मंत्री आहात. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये 7000 रुपयाचे डिपॉझिट आहे. या महाराष्ट्रातील शेतकऱ्याचे, जिल्हा अर्बन बँकांचे पैसे आहेत. या बँकेच्या उपाध्यक्षांनी काय केले ? गृह निर्माणकरिता कर्ज योजना राबविली., ती सुध्दा शहरी भागामध्ये. म्हणजे पैसे शेतकऱ्याचे आणि शहरातील गृहनिर्माणासाठी ते पैसे देणार. मग शेतकऱ्यांनी काय करायचे ? शेतकऱ्यांसाठी कर्ज नाही. पुन्हा इथे आले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.फुले आणि शाहू महाराज यांच्या गोष्टी करायच्यात. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही शेतकऱ्यांची आहे. शेतकऱ्यांची मुले शहरामध्ये आलीत म्हणून त्याला गृहनिर्माण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3R 2

BGO/ SBT/ MHM/ 18:45

श्री.नितीन गडकरी...

करण्यासाठी कर्ज पुरवठा करण्यास सुरूवात केली हे बोलायला काहीही हरकत नाही. आपण असे अवश्य बोलावे. उद्या आपण मर्सिडीजला कर्ज पुरवठा करा. ट्रॅक्टरला 14 टक्के दराने कर्ज पुरवठा करा आणि मर्सिडीजला 6.5 टक्कने कर्ज पुरवठा करा आणि म्हणा ते शेतकऱ्यांचेच वंशज होते. म्हणून या उद्योगपतीला आम्ही 6.5 टक्के दराने कर्ज दिलेले आहे.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रामध्ये ऊस वाढला पाहिजे. विदर्भामध्ये कापूस लंबा झाला.. कापसाला 2700 रुपये भाव देऊ अशी कबुली दिली होती. पण आता 1700 रुपये देत आहेत. 15-16 तास लोड शेडींग सुरू आहे. त्यामुळे भाजीपाला घेता येत नाही. आमच्या काळात सोयाबीनची किंमत 1900 रुपये क्विंटल होती. ती आता 950 रुपयावर आली आहे. त्यामुळे देखील शेतकऱ्यांची वाट लागली आहे. आमच्यकडे धरणे आहेत, पाणी आहे. आमच्या भागामध्ये ऊस लागला पाहिजे असे मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले. आपण देखील आवाहन कराल. ऊसाशिवाय पर्याय नाही. सध्या इंटरनॅशनल मार्केट चांगले आहे. पण यात तुमचा सहभाग किती आहे ? विदर्भामध्ये ऊस लागला पाहिजे म्हणून 5-10 रुपयांची बियाणांची योजना सुरू केली का ? नाही. आपली सगळे पॅकेजेस् ही कोल्हापूरहून सुरू होतात आणि नगरला संपतात. त्यामुळे आपण विदर्भ आणि मराठवाडयाची देखील आठवण ठेवावी.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

कारखान्यासाठी केंद्र सरकारने पॅकेज दिलेले आहे. त्या पॅकेजचा फायदा मलाही झालेला आहे. पण त्याच्या ऑर्डर्स निघालेल्या नाहीत. त्यातही घोळ झालेला आहे, प्रायव्हेट कारखाने फायनान्स बाय अर्बन को-ऑप.बँक असा निकष आहे. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदय श्री.बबनराव पाचपुते, श्री.बबनराव चौधरी व मी आणि इतर केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांना भेटलो आणि आमचे म्हणणे मांडले त्यावर ते म्हणाले तुमचे म्हणणे योग्य आहे व तुमचे काम होणार आहे असे सांगितले. कारखान्याकरिता पॅकेज आवश्यक होते. केंद्र सरकारकडे एकही पैसा न मागता राष्ट्रीयकृत बँकांचा व्याजाचा दर फक्त दहा टक्के राहणार. त्यामध्ये दोन वर्षाचे रिशेड्युलमेंट केलेले आहे. कारखान्याकरिता केंद्र सरकारने जी भूमिका घेतली त्यात त्यांनी राष्ट्रीयकृत बँकांना सांगितले की, आम्हाला तुमचे पैसही नकोत. आम्ही त्यांना डायरेक्ट बेनिफीट देऊ. त्यामुळे मी पॅकेजला काही विरोध करीत नाही. पॅकेज आले हे चांगले झाले. प्रश्न असा आहे की, यामध्ये महत्वाचा घटक जो शेतकरी आहे त्याच्यासाठी काय आहे ? काल मी तुमच्याशी चर्चा केली त्यावेळी तुम्हाला सांगितले की, जिल्हा सहकारी बँक, भूविकास बँक, सरसकट सगळ्या शेतकऱ्यांच्या संस्थांना........ आज आर.आर.पाटील येथे उपस्थित नाहीत. त्यांच्या भागातील सोसायटी आहे. बेदाणे, द्राक्षे करणारी सोसायटी आहे. त्यासंबंधी लोकसत्ता वर्तमानपत्रात पहिल्या पानावर बातमी आहे. 9 लाख रुपयांचे कर्ज 72 लाख रुपयांपर्यंत केले.दुनियेमध्ये सगळे उद्योगपती ओ.टी.एस.चा फायदा घेत आहेत. या महाराष्ट्रात तुमच्यासारखा सहकार मंत्री होतो तेव्हा तुमच्याकडून लोकांच्या अपेक्षा वाढतात. तेव्हा आपण एका दणक्यात निर्णय घ्यावा की, महाराष्ट्रातील ग्रामीण बँका असतील, भूविकास बँका असतील, जिल्हा सहकारी बँका असतील, कोणत्याही बँका असतील, रिझर्व्ह बँकेचे व नाबार्डचे जे नॉर्म्स आहेत ते सरसकट व पॅकेज टू पॅकेज को-ऑप.कमिशनर........सभापती महोदय, सहकार विभागाची अवस्था इतकी वाईट आहे की, त्यांच्या कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी खुर्ची नाही, त्यांचेकरिता टेबल नाही. माझी डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये 13 स्टोअर्स आहेत. जवळपास 25 कोटींचा टर्नओव्हर आहे. भरपूर सेल आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

चांगले नाव आहे. आयुष्यात पाप केले म्हणून ती दुकाने को-ऑप.मध्ये केली. आयुष्यात पुन्हा को-ऑप.रजिस्ट्रारकडे जाणार नाही आणि कोणतीही संस्था रजिस्ट्रर करणार नाही. सगळी पब्लिक लिमिटेड करतो कारण ज्याला एक रुपयाचे देणेघेणे नाही तो आपल्याला ज्ञान शिकवितो. त्यांचेकडे कोणतेही काम घेऊन जा, त्याचे ते पैसे मागतात. तुमच्या विभागाची अवस्था इतकी वाईट आहे की, एकदा तेथील कर्मचाऱ्याने माझ्याकडे ऑफीससाठी टेबल मागितले. मी त्यांना टेबल क्लॉथ व टेबल पाठविले. हनुमान नगरला ते ऑफीस होते. त्यांनी मला सांगितले तुमचे काम होईल पण तुम्ही मला टेबल पाठवा. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाकडे ते काहीना काही मागत असतात. ते बरेच काही मागतात पण ते याठिकाणी सांगता येत नाही. इतके सेवाभावी लोक आहेत की, स्वत:साठी मागण्याऐवजी प्रथम सहकार विभागाकरिता मागत आहेत. कर्मचाऱ्यांना बसायला खुर्ची नाही. बील न भरल्यामुळे दूरध्वनी कट केलेला आहे. अशा अवस्थेत सहकार विभागाचे अधिकारी कर्मचारी काम करतात. डॉ.पंतगराव कदम यातील तुमच्यापर्यंत काय पोहोचते हे मला माहीत नाही. त्यामुळे जेवढे नियंत्रण तुम्ही घालाल तेवढे घेणारे वाढतात. केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांचे आपण ऐकले नाही. त्यांनी तुम्हाला सांगितले होते की, " को-ऑप.ॲक्ट पब्लिक लिमिटेड ॲक्टला जोडा." पण तुम्ही त्यास विरोध केला. श्री.शरद पवार यांचे दुर्दैव असे की, त्यांनी जरी चांगले सांगितले तरी लोकांना असे वाटते की, यामध्ये काही तरी प्लॅन आहे. काही वेळा ते असे करतात की, जे बोलतात ते करीत नाहीत आणि जे करतात ते बोलत नाहीत. त्यांच्या मनात एक आणि कृतीत एक असते. त्यामुळे लोकांना असे वाटते की, यांनी काहीतरी नवीन आणले आहे. त्यांनी को-ऑप.ॲक्टमध्ये सुधारणा करण्याची मागणी केली. मी त्यांच्या म्हणण्याला सपोर्ट केला होता. पण दुसरीकडून उत्तर आले की, को-ऑप.ॲक्ट आम्ही बदलणार नाही. कारण ते श्री.पवार यांनी सांगितले म्हणून. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी जादुची किल्ली सांगतो. तुम्हाला जर काँग्रेसपक्षाकडून काम करुन घ्यावयाचे असेल तर "तुम्हाला जे काही करावयाचे असेल त्याच्या उलट करायला सांगा असे तुम्ही श्री.शरद पवार यांना सांगा. ते काही

..3..



AJIT/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.ओटवणेकर.......... 18:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

बोलले तर त्याच्या उलट काम करण्यास हे सगळे तुटून पडून ते काम होऊ देत नाही. म्हणून माझ ी आपणास विनंती आहे की, तुम्ही या ठिकाणी दोन गोष्टी कराव्यात. एक म्हणजे तुम्ही शेतकऱ्यांचे नुकसान करु नका. दुसरी गोष्ट म्हणजे विदर्भ व मराठवाडा याठिकाणी जेथे पाणी आहे, तेथे ऊस लागावा म्हणून योजना जाहीर करा. येथे जर ऊस निर्माण झाला तर आज जो कापसाचा प्रश्न उपस्थित होतो तो होणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

Diversification of agriculture towards energy and power sector. ही पहिली गोष्ट आहे. दुसरी गोष्ट अशी की, शेतकऱ्यांचे डायव्हर्शन ऊस पिकाकडे करा. त्यामुळे या संपूर्ण भागासाठी कार्यक्रम आखला पाहिजे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ज्या बँका कर्ज देत नाहीत त्यांच्याकडून कर्ज मिळण्यासंदर्भात आपण प्रयत्न करा. जे कर्ज घेतलेले आहे ते रि-शेडयुल्ड करा. कारण डॉ.कदमसाहेब आपण काढलेल्या जी.आर.ची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे आपण ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर ऊसासाठी पुढील तीन वर्षे चांगली राहणार आहेत. ऊसाला चांगली किंमत राहणार आहे. यामुळे कृषि क्षेत्रातील अर्थक्षेत्र बदलणार आहे. सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख, माननीय आर.आर.पाटील व पतंगरावसाहेब तुम्ही खऱ्या अर्थाने मोठे सावकार आहात. सांगली जिल्हयामध्ये 9 लाख 73 हजार रुपयांची वसूली करणारे कोण प्रायव्हेट सावकार आहे ? महोदय, ही वसुली करणारे डॉ.पतंगराव तुम्ही आणि आर.आर.पाटील साहेब आहात. भू-विकास बँका, जिल्हा बँका तुमच्या अखत्यारित आहेत. या बँकांवर प्रशासक तुम्ही नेमणार आहात आणि तुम्हीच त्यांना काढणार आहात, त्यासाठी नियमही तुम्हीच करणारे आहात. त्यामुळे सांगली येथे मोठया प्रमाणावर सुरु असलेली वसुली तुम्ही बंद करा, शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून आपण निरनिराळया योजना आखून, सवलती देऊन त्यांना मदत करा.

शेवटी सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी ऊसाला 200 रुपयांची सबसिडीची जी मागणी केली आहे ती मागणी ताबडतोब पूर्ण करा. कारण येणारी दोन-तीन वर्षे शेतकऱ्यांसाठी फायद्याची आहेत त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करुन, आपण योग्य तो निर्णय घ्यावा एवढेच या निमित्ताने सांगून माझे भाषण संपवितो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 97 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असताना माननीय मंत्रिमहोदयांना काही गोष्टी मला स्पष्ट शब्दात सुचित करावयाच्या आहेत. माझ्याकडे "सकाळ", "लोकसत्ता", "महाराष्ट्र टाईम्स" अशा निरनिराळया वर्तमानपत्रांची कात्रणे आहेत. त्यातील एका वर्तमानपत्रातील दिनांक 26 ऑक्टोबर, 2005 रोजीच्या अंकामध्ये " काहीही झाले तरी कारखानदारी मोडायची नाही अशी सद्‌भावना ठेवून आजवर शेतकरी सर्वकाही सहन करीत आहे. "नव्या-जुन्या" कर्ज प्रकरणाच्या चक्रात त्याला किती काळ तुम्ही अडकवून ठेवू शकाल ? शेतकऱ्यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा किती घ्यायचा हे ठरविण्याची वेळ आली आहे. आज तो धाकात असेलही, पण उद्या तुम्ही त्याला निष्कांचन केले, तर तो तुम्हालाही सोडणार नाही. तशी वेळ येऊ द्यायची का ? " अशी बातमी आली होती. सर्व ठिकाणी टीकेचा सूर उमटलेला आहे. महाराष्ट्र सरकार ऊस उत्पादक शेतकऱ्यांची निराशा करीत आहे. तीन वर्षापूर्वी ऊस उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर होते. परंतु तेच राज्य आज पाचव्या क्रमांकावर फेकले गेलेले आहे. पहिल्या क्रमांकावर उत्तर प्रदेश, दुसऱ्या क्रमांकावर गुजरात, त्यानंतर तामिळनाडू, कर्नाटक आणि नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. आपल्याकडून ऊठसूठ मोदी सरकारवर टीका केली जाते, ऊठसूठ आपण मोदींना भूत म्हणता. परंतु त्याच गुजरात राज्याने कापूस उत्पादनामध्ये पहिला तर ऊस उत्पादनामध्ये दुसरा क्रमांक पटकाविलेला आहे. सहकारी बँकांनी महाराष्ट्राला मोठी ताकद दिली होती. परंतु तेच महाराष्ट्र आज दिवसेंदिवस खालच्या क्रमांकावर चालले आहे. 19 लाख टन एवढे ऊसाचे उत्पादन महाराष्ट्रात झालेले आहे. ऊसाच्या संदर्भात जे आंदोलन झाले ते हिंसक झाले. गेल्या वेळेस साखरेचे भाव 15-16 रुपये होते त्यावेळी ऊसाला 1200 ते 1300 रुपये भाव मिळाला होता. आज साखरेचे भाव वाढलेले असताना सुध्दा ऊसाला कमी भाव देण्याची भूमिका शासनाने का घेतली ?

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आजच्या भावाच्या बाबतीत या ठिकाणी एक विषय मांडलेला आहे . तसेच "नॅशनलचे फ्युचर्स बोर्ड" आहे तेथे तो रेट एप्रिलपर्यन्त आपण कोट करु शकतो.त्याचबरोबर इंटरनॅशनल लेव्हलला फ्युचरमध्ये साखरेचे दर तेजीत राहतील. हे आपल्याला 18 महिने अगोदर कळते.आज इंटरनॅशनल लेव्हलला साखरेचे रेटस चांगले आहेत.महाराष्ट्रात साखरेचा किती स्टॉक आहे याची आपल्याला कल्पना आहे.महाराष्ट्रामधील साखर कारखानदारांना सगळी साखर विकता येत नाही आपल्याकडे रिलीज कोटा सिस्टीम आहे. व त्या सिस्टीमनेच त्यांना साखर विकावी लागते.रिलीज कोटा सिस्टीमने साखर विकत असतांना जर फ्युचरमध्ये साखरेचे रेटस डाऊन झाले तर साखर कारखाना अडचणीत येऊ शकतो या एका गोष्टीची आपण काळजी करीत कोठे तरी साखरेचे भाव वाढत असले तरी ऊस उत्पादकांना मारण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असतो.मला शासनाला असे विचारावयाचे आहे की,ऊस उत्पादकांना पहिली प्रॉयारिटी म्हणून अधिकाधिक बेनिफिट मिळावा यासाठी काय प्रयत्न केले आहेत ?याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.हे शासन कशासाठी हवे असते ? कल्याणकारी शासन ही संकल्पना कोणासाठी आहे ? शासन या संकल्पनेचा केन्द्रबिंदू हा सर्वात गरीब माणूस किंवा खेडयात राहणारा शेतकरी असला पाहिजे.तेव्हा शेतकरी, ऊस तोडणी कामगार, प्रोसेसिंग मधील कामगार आणि त्यानंतर कारखानदार आणि सरकार अशा पध्दतीची प्रायारिटी ठरविण्या ऐवजी माननीय मंत्रीमहोदयांना मला असे सांगावयाचे आहे की, पहिला क्रमांक हा ऊस कारखानदाराचा असतो. माझा मतदारसंघ सांभाळणारी माझी व्यक्ती म्हणून साखर कारखानदार ही पहिली प्रॉयारिटी असते. लोकसत्ता या वर्तमानपत्रात लिहिलेले आहे की," 40 कोटी रुपयांचे कर्ज असतांना 230 रुपयापर्यन्त व्याज वाढले आहे"हे कशामुळे झाले आहे ? कारखाना चालविण्याच्या सदर्भात राजकीय विचार करुन ऊस उत्पादक शेतक-यांना मारण्याचे काम वर्षानुवर्षे केलेले आहे. तेव्हा आज सुध्दा आपण या विचारातून बाहेर पडणार आहोत काय ? आणि महाराष्ट्र राज्याला पुढे घेऊन जाणार आहोत काय ? महाराष्ट्राला जर पुढे घेऊन जावयाचे असेल तर माननीय मंत्रिमहोदयांनी महाराष्ट्राचा स्टॉक किती आहे.याची आम्हाला आकडेवारी द्यावी. तसेच फ्युचर रेट अमुक इतका कोट करु शकतो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

12-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3U 2

श्री.श्रीकांत जोशी ....

याबाबतीत आम्हाला सांगण्यात यावे आणि तो रेट कोट करण्यासाठी शासन म्हणून तुम्ही काही जबाबदारी घेणार आहात काय ?महाराष्ट्र सरकारने ही जबाबदारी घेतली पाहिजे असे मला वाटते. ही जबाबदारी शासनाने घेतली तर रिलीज मेकॅनिझममधून पुढच्या आठ नऊ महिन्यात जो कोटा रिलीज होणार आहे त्या कोटयावर हायपोथिकेशन मिळवून आपण ऊस उत्पादक शेतक-यांना डायरेक्ट जास्त भाव देण्याचे मेकॅनिझम वर्क आऊट करु शकतो.साखर कारखानदार हे पैसे कोठून देणार आहेत ? त्याची प्रोसेसिंग कॉस्ट आणि ट्रानसपोर्टेशनची कॉस्ट काढल्यानंतर उरलेले पैसे त्या कारखानदारांला ऊस उत्पादक शेतक-यांना देण्यामध्ये काय अडचण आहे ?परंतु आज भावाची गॅरन्टी कोणीही घेत नाही त्यामुळे या संधीचा कारखानदार फायदा घेत ऊस उत्पादक शेतक-यांना खिंडीत गाठत असतो. सध्याची सगळी परिस्थिती माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांनी विषद केली आहे. ती लक्षात घेऊन मंत्रिमहोदयांनी सरकार म्हणून काही तरी विचार करावयास पाहिजे. आपल्याकडे साखर संचालनालय आहे, वसंत दादा शुगर रिसर्च इन्स्टिटयूट आहे. त्या करता शेकडो कोटी रुपये सरकारने दिलेले आहेत.त्या ठिकाणी किती डायरेक्टर्स आहेत आणि किती आय.ए.एस अधिकारी आहेत या सगळयांची यादी दिलेली आहे.तेव्हा या सगळयांना पगार देऊन आपण फुकट पोसावयाचे काय ?ही सगळी रचना आणि सहकार खाते शेतक-याला दोन रुपये जादा भाव देणार नसेल तर कशासाठी या सगळया गोष्टी करावयाच्या ? यावर खर्च केल्यानंतर सरकारच्या तिजोरीत जर काही रक्कम उरली असतांना 100-200 कोटी रक्कम खर्च करण्यास सुध्दा शासन तयार नाही .याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी सागितलेले आहे.महाराष्ट्र राज्य हे ऊसाच्या बाबतीत पुढे जाणार आहे किंवा नाही याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्थ्ा ) सभापती महोदय,या प्रस्तावाच्या संदर्भात मी जास्त बोलणार नाही मला फक्त एकाच मुद्दा मांडावयाचा आहे. मघाशी एक मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.बॅन्केने अर्बन एरियामध्ये फायनान्स केला होता त्यामुळे प्रिन्सीपली ती डिफॉल्ट झाली होती.मला असे वाटते की, बॅन्का ज्या डिपॉझिटस घेत असतात ते डिपॉझिटस विविध ठिकाणी बॅन्का इनव्हेस्टमेन्ट करीत असतात. त्याचा सी.डी.रेषो असतो तो सी.डी.रेषो मेन्टेन करण्याकरता डिपॉझिट वाढविले तरी बॅन्कांना तोटा होत असतो. म्हणून सी.डी.रेषो कमी असेल तर हा रेषो 72 ते 74 टक्याच्या दरम्यान मेन्टेन करण्यासाठी बॅन्कांना स्वत:चा अतिरिक्त निधी कोणत्याही क्षेत्रात ॲडव्हान्स म्हणून देण्याची परवानगी आहे. हाऊसिंग हे100 टक्के प्रायारिटी सेक्टर आहे.त्यामुळे त्यांना ते पैसे दिले तर ते चुकीचे होईल असे मला वाटत नाही. स्वत:चे फंडस आणि अतिरिक्त निधीसंबंधी एवढेच मला सांगावयाचे होते .

श्री.नितीन गडकरी : राज्य सहकारी बॅन्क ही शेतक-यांची बॅक आहे. शेतक-यांचा हा पैसा आहे. तो पैसा अर्बन बॅन्कामध्ये वा को-ऑपरेटिव्ह बॅन्कामध्ये दिला तर माझी हरकत नाही.परंतु 7 हजार कोटी रुपयांचे जे डिपॉझिट राज्य सहकारी बॅन्केत आहेत ते पैसे हौसिंगला फायनान्स देण्याकरता वापरण्यात येणार आहेत असे श्री.दुरुडकर साहेब यांनी सांगितले आहे तेव्हा हे पैसे शेतक-यांना फायनान्स देण्याकरता वापरण्यात यावेत. ही बॅन्क शेतक-यांची आहे व हे पैसे शेतक-यांचे आहेत तेव्हा ते पैसे शेतक-यासाठी देण्यात यावेत असे माझे म्हणणे आहे..

-- नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी या विषयावर बरीचशी चर्चा झालेली आहे. शेतकऱ्यांना 1500 रूपये भाव द्यायला पाहिजे अशा भावना जवळपास सर्वच सन्माननीय सदस्यांनी येथे व्यक्त केल्या आहेत आणि शेतकऱ्यांच्या आंदोलनाला नैतिकदृष्ट्या पाठिंबा देखील दिलेला आहे. मी सुद्धा या आंदोलनाला माझा जाहीर पाठिंबा देतो. सभापती महोदय, मला या संदर्भात असे समजले आहे की, काही कारखानदार हे भाव द्यायला तयार आहेत परंतु सरकारने भावबंदीचा एक नवीन बडगा उगारून त्याला मज्जाव केलेला आहे. शेतकऱ्यावर या सगळ्या बंद्या आहेत. मला हे कळत नाही की, कारखानदारांवर काय बंदी आहे ? सहकारी कारखाना उभारल्यानंतर तो एखाद्या कुटुंबाच्या ताब्यात असेल तर तो तसा राहू नये या दृष्टीने कोठे तरी बंदी आणण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. कारण जोवर हे सगळे बंद होत नाही तोपर्यंत त्या कारखान्याची बिघडलेली हालतही सुधारणार नाही. आज महाराष्ट्रात जे साखर कारखाने बंद पडले आहेत त्यातील निम्म्यापेक्षा जास्त कारखाने हे मिसमॅनेजमेंटमुळे बंद पडलेले आहेत हे उघड सत्य आहे. मिसमॅनेजमेंटमुळे असे बंद पडलेले कारखाने आहेत तरीही निवडणुकांमध्ये मात्र कोट्यवधी रूपयांचा चुराडा होत असतो आणि शेतकऱ्यांना थापा ठोकून पुन्हा पॅनेलच्या पॅनेल निवडून आणले जात आहे. तरीही पुन्हा तो कारखाना बंदच, ही परिस्थिती महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीची आहे. सभापती महोदय, माझी या निमित्ताने एकच विनंती आहे की, 1500 रूपये भाव शेतकऱ्यांना देणे योग्य आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी एखादी समिती आपण नेमावी. एक टन ऊस उत्पादनासाठी किती खर्च येतो याचा अंदाज बांधून कारखान्याला देखील किती नफा मिळाला पाहिजे हे लक्षात घेऊन हे भाव ठरवून दिले पाहिजेत. मघाशी या ठिकाणी सांगण्यात आले की, जेव्हा 1300 रूपये भाव दिला गेला होता तेव्हा काही कारखाने 1100 रूपये भाव देत होते. आता सुद्धा काही कारखाने 1500 रूपये भाव देण्यास तयार आहेत. पण भावबंदीमुळे ते एवढा भाव आपल्या शेतकऱ्याला देऊ शकत नाहीत. तेव्हा अशा ज्या बंद्या आहेत, उदाहरणार्थ, झोनबंदी, गुऱ्हाळबंदी, भावबंदी वगैरे अशा ज्या बंद्या आहेत त्या महाराष्ट्र सरकारने उठविल्या पाहिजे. इतकेच नव्हे तर जे कारखाने डिस्टिलरी चालवितात, कोजनरेशन करतात, मोलॅसिसवर उत्पादन घेतात, बग्यास मधून उत्पादन घेतात असे जोडधंदे करणारे कारखाने आहेत, असे बाय-प्रॉडक्ट घेणारे जे कारखाने आहेत त्यांना सरकारने बंधन

....... 3व्ही 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेंडगे .....

घातले पाहिजे की, त्यातील थोडा वाटा तुम्ही शेतकऱ्यांना दिला पाहिजे. अशा कारखान्यांनी आपल्या शेतकऱ्यांना-सदस्यांना भाव वाढवून दिले पाहिजे. या दृष्टीने आपण प्रयत्न केला तरी यातून खूप काही होऊ शकेल. सभापती महोदय, बाकी सगळे विषय या ठिकाणी आले असल्याने मी त्यावर अधिक न बोलता, आपण मला जो वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

*****

..... 3व्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, कन्हैयालाल गिडवाणी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर या ठिकणी चर्चा घडवून आणली आहे. या चर्चेला सुरूवात करताना माननीय सदस्य श्री.गिडवाणी यांनी प्रदीर्घ असे भाषण केले. त्यांचा या क्षेत्रातील अनुभव मोठा आहे आणि या विषयातील निरनिराळ्या प्रश्नांसंबंधात त्यांनी आपले मत येथे व्यक्त केलेले आहे. तसेच ज्यांनी अत्यंत यशस्वीरित्या सहकारी साखर कारखाने चालविले आहेत, जे या क्षेत्रात गेली अनेक वर्षे काम करीत आहेत ते सन्माननीय श्री.गडाख साहेब यांनी देखील या महाराष्ट्रात साखर कारखानदारी केव्हा व कशी सुरू णाली आणि महाराष्ट्रात त्यामुळे परिवर्तन कसे झाले, त्यामध्ये कोणते प्रश्न आहेत हे या ठिकाणी मांडण्याचा, सांगण्याचा प्रयत्न केला. प्रा. जोगेंद्रजी कवाडे म्हणाले की, या साखर कारखानदारीमध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विचार होणे गरजेचे आहे आणि त्यादृष्टीने आपण प्रयत्न केले पाहिजेत. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे म्हणाल्या की, साखरेचे दर 20 रूपये केले तरी माझी हरकत नाही पण शेतकऱ्याला चांगला दर मिळाला पाहिजे. या पध्दतीचे आपले विचार त्यांनी येथे मांडले आहेत.

( यानंतर श्री. सरफरे ..... 3डब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ RJW/ पूर्वी श्री. सुंबरे.... 19:10

डॉ. पतंगराव कदम..

माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे म्हणाल्या की, पुढील वर्षीचे साखरेचे धोरण जाहीर करणार काय? तसेच, या सदनाचे माजी विरोधी पक्षनेते व भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष, आमचे मित्र व आपले सर्व अधिकार माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांना देऊन गेले व परत आले. उशिरा कां होईना त्यांचे मौलिक मार्गदर्शन ऊस उत्पादकांबाबत थोडे आणि राजकारणावर अधिक झाले. अशाप्रकारे या प्रस्तावावर या सर्व सन्माननीय सदस्यांनी जे विचार व्यक्त केले त्यांचा मी मनापासून आभारी आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी 1962 साली कॉग्रेस पक्षाच्या शिबिरामध्ये महाराष्ट्रामध्ये कृषि औद्योगिक समाज रचना आणणे अतिशय आवश्यक आहे असे धोरण जाहीर केले. त्या धोरणानुसार महाराष्ट्रात साखर उद्योग, सूत गिरण्या, बँका, दूध सोसायटया अशा कृषि पूरक उद्योगांच्या अनेक संस्था निघाल्या. पहिला साखर कारखाना प्रवरेला निघाला त्यावेळी वर्तमानपत्रात चर्चा झाली की, धोतरवाले साखर कारखाना चालविणार? यांचे धोतर पट्टयात अडकले तर तो चालू शकणार नाही. त्यावेळी कारखान्याचे पहिले चेअरमन कै. धनंजयराव गाडगीळ झाले. पुढे पद्मश्री विखे पाटील झाले. त्यानंतर वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार झाले, तात्सासाहेब कोरे झाले असे अनेक महर्षि अध्यक्ष झाले. श्री. यशवंतराव मोहिते यांनी साखर कारखान्यावर शास्त्रशुध्द पाया रचला. कै. यशवंतराव चव्हाण याच्या विचाराने महाराष्ट्र वाढला व फोफावला. मी माझ्या गावात पहिल्यांदा मंगरुळचा आलेला ट्रक पाहिला. त्या नंतर या कारखान्यांच्या माध्यमातून अनेक ट्रॅक्टर आले, जीप आल्या, मोटर सायकल आल्या, शाळा कॉलेज निघाले असे जबरदस्त परिवर्तन या उद्योगामुळे झाले. दुर्दैवाने एवढी सुबत्ता या उद्योगामध्ये येतांना माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख म्हणाल्याप्रमाणे 50 हजार कोटींचा टॅक्स केंद्र सरकारला राज्य सरकारकडून देत असतांना आजची या राज्यातील कारखानदारीची परिस्थिती काय आहे? गेल्या तीन-चार वर्षांचा विचार केला तर सातत्याने पडणारा दुष्काळ, त्यानंतर पाऊस पडल्यानंतर मावा आला, ठिकठिकाणी महापूर आले, वाढत्या पाण्यामुळे शेतात ऊस कुजला. अशा अनेक नैसर्गिक कारणांमुळे ऊस उत्पादन क्षेत्र सातत्याने बाधित झाले. माननीय सदस्य श्री. गडकरी म्हणाल्याप्रमाणे या उद्योगांवर ज्या गोष्टींचा परिणाम होतो त्यामध्ये केंद्राचे धोरण, नैसर्गिक आपत्ती आणि तिसरे गैरव्यवस्थापन या सर्वांचा या धंद्यावर परिणाम होतो. यामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ RJW/ पूर्वी श्री. सुंबरे.... 19:10

डॉ. पतंगराव कदम..

तिसरे कारण म्हणजे गैरव्यवस्थापन. माननीय सदस्य श्री. गडकरी म्हणाल्याप्रमाणे मॅनेजमेंटमध्ये आज चोर, लबाड घुसले आहेत. काही मॅनेजमेंट चांगल्या आहेत परंतु त्यामध्ये काही अपप्रवृत्ती निश्चितपणे शिरल्या आहेत. त्या अपप्रवृत्ती बाजूला काढण्यासाठी आम्ही काही निर्णय घेतले. पर्चेसमध्ये जो गोंधळ होता त्यासाठी आयुक्तांना आदेश काढण्यास सांगितले की, 5 वर्षाचे पर्चेस रेट त्यांनी आपल्या अहवालामध्ये छापले पाहिजे. आणि अशा कारखान्यांना दीड कोटी रुपयापर्यंत पर्चेस करावयाचे असेल तर त्यांना परवानगीची गरज नाही. त्यांना 25 लाखापर्यंतचे स्क्रॅब मटेरिअल्स विकायचे असेल तर त्यासाठी शासनाच्या परवानगीची गरज नाही. म्हणून ज्या चांगल्या संस्था आहेत त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम शासनाने केले आहे. महाराष्ट्रातील एकूण कारखान्याच्या परिस्थितीबाबत माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी राजकीय भाषण केले आहे. विदर्भातील कारखाने बंद आहेत. मी येथील कारखान्यांची बैठक बोलाविली आहे. त्यामध्ये राज्य सहकारी बँकेचे अधिकारी, आमच्या खात्याचे अधिकारी, नाबार्डचे अधिकारी यांनाही बोलाविले आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्तेबाबत चर्चा झाली आहे. त्यांना आत्महत्तेपासून वाचविण्यासाठी या शेतकऱ्यांना ऊसाचा किंवा सोयाबीनचा पर्याय आपण दिला पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/RJW पूर्वी श्री.सरफरे . . . . 19:15

डॉ.पतंगराव कदम . . . .

आणि हे कारखाने बंद का आहेत ? यांचे प्रश्न काय आहेत ? यांच्या अडचणी काय आहेत ? फक्त 20 पैकी 1 कारखाना सहकारामध्ये सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या कारखान्याबद्दल मला कमिशनर यांनी वेगळया पध्दतीने सांगितले की, साहेब, मी आज काही परत येत नाही. गडकरीसाहेबांचा कारखाना, त्यावर मी म्हटले की, त्यांना माझ्या शुभेच्छा द्या. कमीत कमी एक तरी कारखाना व्यवस्थितरित्या सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी चालविला तर तो लोकांसमोर आदर्श होईल. त्यांना माझ्या शुभेच्छा द्या या हेतूने मी सांगितले. पण तुम्हाला सगळे वेगळेच दिसावयास लागले आहे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

इन्सेन्टीव्हच्या बाबतीत असे आहे की, प्रायव्हेट कारखानदारी काढली. त्यांनी मघाशी उदाहरण सांगितले. पण तुम्ही काही वाईट वाटून घेऊ नका. कारण पुणे येथे कै.एस.एम.जोशी यांनी भांडार काढले होते. श्रीमती इंदूताई टिळक यांनीही काढले होते पण ते बंद झाले, आमचे कमिशनर श्री.पळनीटकर यांनीही काढले होते, तेही बंद झाले. डॉ.ए.यु.शेख यांनी काढले होते, तेही बंद झ ाले. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे भांडार बंद झाले तर त्यात काही विशेष वाटण्याचे कारण नाही.

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : माझे व्यवस्थित चालू आहे. माझी नागपूरात 13 स्टोअर्स् आहेत आणि 25 कोटीचा टर्न ओव्हर आहे.

डॉ.पतंगराव कदम : तुम्हाला माझ्या शुभेच्छा आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पण ते को-ऑपरेटीव्हमध्ये आहे. मी आता तुम्हाला हात जोडले आहेत की, एकदा काढले, पुन्हा को-ऑपरेटीव्हमध्ये जाणार नाही.

(सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात)

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, भारती भांडार उत्तम प्रकारे सुरु आहे. भारती बँक उत्तम प्रकारे सुरु आहे आणि महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची माझी सूत गिरणी आहे. तो काही प्रश्न नाही. ऊस नसताना सुध्दा गेल्या वर्षी मी 1220 रुपये दर दिलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आमचा हाच हरकतीचा मुद्दा आहे. भारती विद्यापीठ उत्तम, भारती बँक उत्तम, भारती भांडार उत्तम आणि माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांचे महाराष्ट्रातील सहकार डिपार्टमेंट एकदम खाली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : नाही, ते खाली जात नाही. चिंता करु नका. आपण खाली बसा. म्हणून विदर्भातील कारखानदारी संबंधी आम्ही सातत्याने आणि गांभीर्याने विचार केला. नंतर मुंबई येथे माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घेतली आणि मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब म्हणाले की, तुम्ही आजपर्यंत काय केले ? अहो, गेल्यावेळेस तुम्हाला ऊस लावण्यासाठी पैसे दिले. विदर्भातील कारखान्यांना दोन-दोन कोटी रुपये ऊस लावण्यासाठी दिले. महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणत्याही भागासाठी दिले नाहीत. कारण येथे सुबत्ता आहे, जमीन चांगली आहे, पाणी आहे.

श्री.नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदय, मला मिळाले नाहीत, मी एक छदामही घेतला नाही पण ज्यांना मिळाले, त्यांचे मागचे 16 हप्त्यात कापून घेतले. ही कोणती योजना आहे?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, कशाचे पैसे कापून घेतले ? ऊस लावण्यासाठी पैसे दिले . . . .

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : आपण याबाबतीत माहिती घ्यावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आम्ही ऊस लावण्यासाठी पैसे दिले आणि आम्ही त्यांना सांगितले की, परत देखील ऊस लावण्यासाठी, बियाणासाठी आपल्याला मदत करावी लागेल आणि त्यासाठी स्वतंत्रपणे विचार करावा लागेल. पुन्हा त्यासाठी केंद्र शासनाला, माननीय पंतप्रधान, माननीय वित्त मंत्री, माननीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार यांना सांगावे लागेल आणि पॅकेज घ्यावे लागेल. पॅकेज म्हणजे दहा टक्क्याने रेट ऑफ इंटरेस्ट होईल अशा पध्दतीचा आमचा प्रयत्न आहे. तेव्हा सातत्याने अशी भावना आणि भूमिका व्यक्त होत आहे की, विदर्भासाठी वेगळे, पश्चिम महाराष्ट्रासाठी वेगळे, मराठवाडयाचे वेगळे, या राज्याचे पहिले मुख्यमंत्री माननीय कै.यशवंतराव चव्हाण यांनी या महाराष्ट्रातील जनतेला शब्द दिलेला आहे की, महाराष्ट्रामध्ये सर्वांना बरोबर घेऊन सर्वांचा विकास करण्याची भूमिका घेतली जाईल आणि ते ज्यावेळी दिल्लीला गेले तेव्हा कै.कन्नमवार यांना बसविले, कै.कन्नमवार यांच्यानंतर कै.वसंतराव नाईक यांना बसविले. त्यामुळे अशी भूमिका नाही, कारण . . . .

श्री.मधुकर चव्हाण(खाली बसून) : तुमची अशी इच्छा आहे की, तुमचे नाव त्या रांगेमध्ये यावे.

डॉ.पतंगराव कदम : येईल,येईल. चिंता करु नका.

. . . .3 एक्स-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : श्री.नारायण राणे यांच्यामुळे काही फरक पडणार नाही का ?

डॉ.पतंगराव कदम : काहीही फरक पडणार नाही. देर है लेकिन अंधेर नाही. सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रात म्हणजे नाशिक, नगरसह 92 पैकी 29 कारखाने आजारी आहेत. मराठवाडयात 40 पैकी 24 आजारी आहेत. खानदेश व विदर्भ म्हणजे एकदम विदर्भाचेच दिसू नये म्हणून आम्ही त्यात मुद्दाम खानदेश शब्द घातलेला आहे, तेव्हा खानदेश व विदर्भामध्ये 29 पैकी 19 आजारी आहेत. अशा प्रकारे महाराष्ट्रातील 165 कारखान्यापैकी 72 कारखाने आजारी आहेत. साखर कारखान्यांनी कोटयावधी रुपये खर्च केलेले आहेत, गेल्या वर्षी तर 174 पैकी 101 कारखाने सुरु झाले आणि त्यामध्ये एकंदर 42 टक्के सुध्दा ऊस मिळाला नाही. 160 दिवसाच्या ऐवजी 77 दिवस कारखाने चालले. पुढच्या वर्षीची जी परिस्थिती आहे ती पाहता ऊसाची लागवड आणि त्याची वाढ एवढी जबरदस्त झालेली आहे की, हे सगळे साखर कारखाने सुरु ठेवले तरी सुध्दा आपण हा सगळा ऊस गाळू शकणार नाही. म्हणून लिक्वीडेशनमध्ये किती कारखाने काढावयाचे ? किती कारखाने आजारी पाडावयाचे ? नाबार्डने किती आणि राज्य सहकारी संघाने किती या मुद्याच्या बाबतीत महाराष्ट्रात मोठया प्रमाणात गैरसमज होत आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (पुढे सुरु..

राज्य सहकारी साखरकारखान्याने विनंती केली की, आम्हाला दराच्याबाबतीतील पाहिला हप्ता...मी आपल्याला पुन्हापुन्हा सांगतो की, पहिला हप्ता आजच्या नंतर दोन दिवसांनी 1200,1500 त्याही पेक्षा जास्त देण्याची साखरकारखान्यांची ताकद असेल तर त्यांना अडविलेले नाही. असे ठरविलेले आहे की, पहिला हप्ता हा 850 रुपये त्यांनी द्यावा आणि आठ-पंधरा दिवसांनी त्यापेक्षा त्यांना जास्त दर द्यावयाचा असेल तर त्यांनी तो द्यावा. कारण ऊस पळवापळीवीचे प्रकार होतात, आजारी साखर कारखान्याच्या परिसरातील ऊस पळविला जातो, असे झाले तर ते साखरकारखाने कायमचे बंद होतील. साधरणपणे सुरुवातीच्या काळामध्ये अंतिम दर हा धोरण ठरविल्याप्रमाणे द्यायचा असे ठरविलेले आहे. उत्तर प्रदेशमध्ये ऊस तोडणी आणि वाहतूक खर्च एकदाच दर ठरविला जातो, म्हणून आपण पहिला हप्ता ठरविलेला आहे.

श्री.कन्हैय्यालाल गिडवानी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री महोदयांनी आता मूळ चर्चेला सुरुवात केलेली आहे. ऊसाच्या दराविषयीची चर्चा आहे. त्याबाबत आता सांगण्यात आले की, सुरुवातीला 850 रुपयाचा पहिला हप्ता द्यावा आणि दुसरा हप्ता त्यांनी कितीही द्यावा, असे आता मंत्री महोदयांनी सांगितले.

डॉ. पतंगराव कदम : होय.

श्री.कन्हैय्यालाल गिडवानी : साखर आयुक्तांनी सगळया कारखान्यांना तशा लेखी सूचना दिलेल्या आहेत काय ?

डॉ.पतंगराव कदम : सगळया साखरकारखांना साखर कमिशनरनी सांगितलेले आहे, सहकार मंत्र्यांनी जाहीर सभेमध्ये सांगितलले आहे. पहिला हप्ता हा 850 रुपयाचा साखर कारखान्यांनी द्यावा आणि त्याच्या पुढे त्या साखरकारखान्याच्या कुवतीप्रमाणे, ताकदीप्रमाणे भाव द्यावा. माझ्या कारखान्यामध्ये मी दुसरा हप्ता हा 1200 रुपये भावाप्रमाणे दिलेला आहे.

श्रीमती कांता नलावडे : त्या कारखान्यांनी तसा भाव दिला तर त्या कारखान्याचे लायसन रद्द होणार असे सांगितले गेलेले आहे, तसे होणार नाही ना ?

डॉ.पतंगराव कदम : त्यांना जास्त भाव देण्याबाबत आयुक्तांनी परवानगी देण्याची गरज नाही. त्यांनी लेखी आदेश काढलेले आहेत की, पहिला हप्ता हा साखरकारखान्यांनी 850 रुपये भावाने द्यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

श्री.कन्हैय्यालाल गिडवाणी : मंत्री महोदय दिशाभूल करत आहेत. नाबार्डचे पॅकेज आहे. त्यामध्ये अशी अट आहे की, दुसरा हप्ता....

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी माझे भाषण पूर्ण झाल्यानंतर प्रश्न उपस्थित करावेत,त्या प्रश्नांना मी उत्तरे देईन. महत्वाचा प्रश्न असा की, साखर विक्रीच्या संबंधात ट्रान्सरन्सी असावी, म्हणून इंटरनेटवर साखर विक्रीचा दर जाहीर करणे बंधनकारक करण्यात येईल. तो दर सर्वांना समजला जाईल. सभापती महोदय, सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी मुद्दा उपस्थित केला त्याच्याशी मी सहमत आहे. केंद्र सरकारने इथेनॉल घेण्याचे बंद केलेले होते. ते पुन्हा घेण्याचे आदेश काढलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी : रेकॉर्डवर चुकीचे राहू नये. त्यांनी जुने टेंडर काढले. त्याप्रमाणे 18.75 रु. असा दर मनमोहन सिंग यांनी ठरविलेला आहे. 60 लाख रुपयाचे इथेनॉल माझ्याकडे वर्षभर पडलेले आहे. आपण घेत असाल तर मी द्यायला तयार आहे.

डॉ.पतंगराव कदम : डिस्टीलरी, को जनरेशन हे महाराष्ट्रामध्ये निश्चित सुरु करावे लागतील. या प्रश्नाबद्दल केंद्राकडे निश्चितपणे कायमस्वरुपी प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा करणे आवश्यक आहे. एस.एम.पी.च्यासंबंधातील प्रश्न आहे. पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे आभार मानले पाहिजेत. तसेच सन्माननीय श्री.वाजपेयी साहेबांचेही आभार मानले पाहिजेत. श्री.वाजपेयी साहेब पंतप्रधान असतांना त्यांनी आम्हाला 300 कोटी रुपये दिलेले आहेत. त्यांना धन्यवाद देतो. त्यानंतर पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी 300 कोटी रुपये दिलेले आहेत. अशाप्रकारे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत दिलेली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून 25 टक्के रक्कम मा.मुख्यमंत्री फंडामध्ये नैसर्गिक संकटासाठी कापून घेतलेली आहे. त्यानंतर सन्मानीय मंत्री श्री.जयंत पाटील आणि माझ्या सांगली येथील घरावर दगडफेक करण्याच्या संबंधात सांगितले गेले. मी आणि श्री.जयंत पाटीलही सांगलीमध्ये राहत नाही. चार पोरे त्याठिकाणी आली आणि चार दगड मारले, त्यानंतर त्या पोरांना पकडले गेले. ते शिवसेनेचे असल्याचे त्यांनी सांगितले. याला मला महत्व देण्याचे कारण नाही. परंतु माझ्या घराच्या खिडकीच्या दोन काचा फुटल्या. त्याची भरपाई म्हणून 25 रुपये सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी दिलेली नाही. कारण संरक्षण करण्याचे त्यांचे काम आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : आर.आर.पाटील यांनी ते पैसे कां द्यावे?

डॉ. पतंगराव कदम : कारण संरक्षण करण्याचे काम त्यांचे आहे. सभापती महोदय, मी पी. चिदंबरम यांना पत्र लिहिले आहे की, कशासाठी नाबार्डला मध्ये घालता. पुढच्या वर्षीचे शासनाचे धोरण असे राहील की, बँका आणि साखर कारखांन्यानी किती दर द्यायचा हे त्यांनी ठरवावे. सरकार त्यामध्ये कुठलिही भूमिका घेणार नाही. पुढच्या वर्षी साखर कारखान्याच्या बाबतीत या पध्दतीचे धोरण राहील. हा उद्योग वाढवायचा असेल तर अनेक कारणाने साखर कारखानदारीतील जे भाग आजारी पडलेले आहेत त्यांना थोडे वाचविण्याचा या वर्षी प्रयत्न केलेला आहे.याठिकाणी गैरव्यवहाराचे काय करणार याबाबतीत अनेक वेळा चर्चा झाली. या गैरव्यवहाराच्या बाबतीत कुणाचाही मुलाहिजा राखला जाणार नाही. जे जे प्रकरणे पुढे येतील त्यांच्यावर कठोरपणाने कारवाई केली जाईल मग तो भाजपचा आहे, राष्ट्रवादीचा आहे की, कॉन्ग्रेसचा आहे याचा विचार न करता त्याबाबतीत कडक निर्णय घेतले जातील आणि त्यासंदर्भातील कारवाई होईल. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब यांनी वनटाईम सेटलमेंटचे काय केले यासंबंधीचा मुद्दा मांडलेला आहे. तसेच श्री. आर.आर.पाटील आणि माझ्या नावाने आपण खूप चांगली घोषणा केली. ती पेपरमध्ये आल्यामुळे सांगली बँकेच्या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. राज्य बँक, जिल्हा बँक, भूविकास बँक, अर्बन बँक आणि पथसंस्था यांच्या बाबतीत वन-टाईम सेटलमेंटचा निर्णय घेतलेला आहे. फक्त तो एक लाख रुपये मूळ कर्जाच्या संदर्भात घेतलेला आहे. इतर बाबतीत काय करता येईल याबाबतीत नाबार्ड आणि रीझर्व बँकेबरोबर चर्चा करुन निर्णय घेता येईल.पण एक लाख रुपयापर्यंत च्या मूळ कर्जावार वन टाईम सेटलमेंट करण्याचा सर्व संस्थांमध्ये निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. गिडवाणीसाहेब म्हणाले तशा पध्दतीने ऊसाच्या दराच्या बाबतीत पहिला हप्ता,नाबार्डच्या पॅकेजमुळे राज्य सहकारी संघाच्या विनंतीमुळे असला तरी दुसरा हप्ता आठ दिवसात द्यायचा कां दुस-याच दिवशी द्यायचा कां पंधरा दिवसात द्यायचा याला आमच्या खात्याचे कसलेही बंधन राहणार नाही. शासन त्या संबंधात लेखी आदेश काढेल.(अडथळा) शासनाने कुणाचेही लायसन रद्द केलेले नाही. कारण शेवटी कारखानदारी वाचवायची आहे. या परिस्थितीतून त्यांना बाहेर काढावयाचे आहे. कारण या कारखानदारीने महाराष्ट्रामध्ये अतिशय महत्वपूर्ण परिवर्तनाची भूमिका बजावलेली आहे. म्हणून जे गैर असतील, चुकीचे असतील त्यांनांही शासन सोडणार नाही. शेतक-यांच्या बाबतीत सन्माननीय श्री. गिडवाणी साहेब म्हणाले की, ...

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : श्री. बबनराव पाचपुते, श्री. बबनराव चौधरी यांनी प्रायव्हेट लिमिटेड साखर कारखाने काढले आहेत. साखर कारखानदारी आणि ऊसाचे उत्पादन वाढले पाहिजे, कारखानदारी टिकली पाहिजे. मंत्रिमहोदयांचे विचार चांगले आहेत. म्हणून सगळयां साखर कारखान्यांना सवलती द्या.

डॉ. पतंगराव कदम : श्री. नितीन गडकरी माझे तुमच्या साखर कारखान्याकडे लक्ष आहे. कारण शेतक-यांना तत्वज्ञान सांगून, पुस्तके लिहून उपयोगाचे नाही. हा कारखाना कसा चालला आहे हे तो डोळयाने बघतो, (अडथळा) विदर्भातील सगळया साखर कारखान्यासंबंधी एक बैठक माननीय मुख्यमंत्र्यांसोबत झालेली आहे. पुन्हा एकदा एक बैठक होईल. आणि करोडो रुपये खर्च करुन येथे जे साखर कारखाने उभे केले आहेत ते कसे चालतील या बाबतचा निर्णय निश्चितपणाने घेतला जाईल. (अडथळा) पर्चेस टॅक्सच्या बाबतीत वित्त विभागाला शासनाने मागेच लिहिलेले आहे. हा विषय त्यांच्या अखत्यारीत येतो. जरुर परत वित्त विभागारोबर या संदर्भात चर्चा करु आणि पर्चेस टॅक्सची मागणी मान्य करता येण्यासारखी आहे की नाही यासंबंधीचा विचार करु. पण वित्त विभागाच्या सल्ल्याशिवाय एकदम जाहीर करणे योग्य होणार नाही.

श्री. यशवंतराव गडाख : सरकारनेच ते जाहीर केलेले आहे. आणि तुम्ही आता हे कारखाने अकाऊन्सील केलेले आहेत.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, तपासून पाहण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.गिडवाणी यांनी या ठिकाणी एक मुद्दा सातत्याने मांडला.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम .....

हा विषय प्रथम समजून घेतला पाहिजे अशी माझी माननीय सदस्यांना विनंती आहे. सहकारी साखर कारखान्यामध्ये जे शेतकरी सभासद असतात तेच डायरेक्टर बोर्डाला निवडून देतात आणि बोर्ड जर नालायक असेल तर त्याला हाकलूनही देता येते. बोर्डाच्या अध्यक्षांना 14-15 हजार सभासद निवडून देत असतात. लोकशाहीमध्ये जर त्यांनी निवडून दिले तर मग त्यावर बंधन कोण घालणार आहे ? अशा ठिकाणी बोर्ड जर बरोबर नसेल तर त्याला हाकलून देण्याचे अधिकार देखील आपल्याकडे आहेत. सहकार कायदयातील कलम 88 प्रमाणे बोर्डाने जर गैरकारभार केला तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करता येते तसेच सहकार कायदयाचा आधार घेऊन दहा वर्षानंतर चेअरमन म्हणून राहता येत नाही, म्हणून याबाबत एवढा बाऊ करण्याचे कारण नाही. शेवटी शेतकरी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या ऊसाचे दर, त्यासाठी टनेज आपल्याला वाढविले पाहिजे, शेतकऱ्यांना ऊसाचं बेणं दिले पाहिजे, फर्टिलायझर्स उत्पन्न करुन दिले पाहिजे, तसेच पाण्याची व्यवस्थाही करणे आवश्यक आहे, असे अनेक प्रश्न या कारखान्याशी तसेच सहकार खात्याशी रिलेटेड आहेत, या सर्व प्रश्नांचा विचार सरकारला करणे आवश्यक आहे. ऊसाच्या दराच्या बाबतीत सांगावयाचे तर शेतकरी आज काही अडाणी राहिलेला नाही. शेवटी कोणता कारखाना आपल्याला चांगला दर देतो हे त्यांना समजते व ते त्याच कारखान्यांना ऊस घालतात. आम्ही झोनबंदी जी केली आहे ती राज्याबाहेर ऊस जाऊ नये यासाठी केलेली आहे, राज्यात शेतकरी कुठल्याही कारखान्यात आपला ऊस देऊ शकतो, त्यावर बंधन नसते. अशा प्रकारे फायनल दर ज्यावेळी बाहेर येतात त्याच कारखान्याला शेतकरी ऊस घालतात. अशा प्रकारे फायनल दर काही कारखान्यांचे तर 1500 च्या वर सुध्दा निघालेले दिसून येतात. म्हणून आज मी फायनली काही जाहीर करु इच्छित नाही परंतु 850 रुपये एवढा पहिला हप्ता द्यावा व त्यानंतर कारखान्याने किती दर द्यावा याला कुठलेही बंधन नाही आणि पुढच्या वर्षी बँक आणि कारखान्यांनी देखील कोणते दर द्यावेत यावर सुध्दा आमची कुठलीही आडकाठी राहणार नाही. तसेच इथेनॉलच्या बाबतीत हे सरकार लवकरच बंदी उठविणार आहे. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण दिल्लीला जाऊ व याबाबत संबंधितांशी सविस्तर चर्चा करु, त्यालाही आमची तयारी आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : महोदय, मी मागणी केली होती, ती मान्य होईल अथवा नाही हा शासनाचा अधिकार आहे, परंतु त्याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे. आमची मागणी अशी होती की, 850 रुपयाच्या वर ऊसाला दर द्यावेत अशी जी मागणी आहे त्यासंबंधीचे आदेश मंत्री महोदय याच अधिवेशनात काढणार काय ? आणि काढल्यास उद्या सदस्यांच्या पिजन होलमध्ये वितरित केले जातील काय ?

डॉ. पतंगराव कदम : विधानसभेच्या फ्लोअरवर हे आश्वासन मी देत आहे तसेच आमचे साखर आयुक्त देखील उपस्थित आहेत, ते देखील हे ऐकत आहेत. मी सांगितले की, पहिला हप्ता 850 रुपये एवढा द्यावा, त्यानंतर कुठलेही बंधन नाही. तसेच नाबार्डच्या बाबतीत ज्या अटींचा उल्लेख केला त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, याबाबत नाबार्डला कन्व्हीन्स करु आणि दुसरा हप्ता कारखान्यांनी किती द्यावा हे त्यांनी ठरवावे, असे आदेश देण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : राज्यशासनाने आणि साखर संचालकांनी नाबार्डसमोर हे मान्य केले आहे की, यावर्षी ऊसाचा दर किती द्यावयाचा त्यासंदर्भातच नाबार्डने अट टाकलेली आहे, जोपर्यंत ही अट नाबार्ड मागे घेत नाही, तोपर्यंत मंत्री महोदयांनी सांगितले आणि ठरविले तरी त्यासंबंधीचे आदेश माननीय मंत्री महोदयांना काढता येणार नाहीत. केवळ "बाजारात तुरी आणि भट भटणीला मारी" असा जो प्रकार सध्या आहे, त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी कितीही आश्वासन दिले तरी त्याला काहीच अर्थ नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

आज सभागृहात तुम्ही जे काही सांगत आहात त्याच्या संदर्भात हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर तुम्ही ताबडतोब आदेश काढणार आहात काय? या आदेशासाठी तुम्ही नाबार्डची परवानगी घेतलेली आहे का? नाबार्डच्या विरोधात तुम्ही आदेश काढणार आहात काय?

डॉ. पतंगराव कदम : अनेक कारखान्यांनी नाबार्डचे पॅकेज घेतलेले नाही. नाबार्डने ऊसाचा दर 850 रुपये ठरविलेला नाही. जे साखर कारखाने आहेत त्या ठिकाणचा ऊस दुस-या कारखान्यांनी पळवून नेऊ नये तसेच सगळे कारखाने टिकावेत हीच यातील महत्वाची भूमिका आहे. परंतु दुसरा हप्ता किती द्यावा यामध्ये नाबार्डचा काहीही संबंध नाही. दर किती द्यावा हा साखर कारखान्यांचा संबंध आहे. साखर कारखाने दर देतील.

श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी : अध्यक्ष महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. नाबार्डने स्वत: डिक्लेअर केले आहे की, जे कर्जाचे हप्ते आहेत त्या कर्जाचे हप्ते भरल्यानंतर, कर्जाची जी काही फेर रचना होणार आहे त्यामध्ये कर्जाची फेर रचना हप्ता भरल्यानंतर दुसरा हप्ता द्यावयाचा अशी त्यामध्ये अट आहे. तुम्ही खड्डे इतके तयार केलेले आहेत की, दुसरा हप्ता शेतक-याना मिळू शकत नाही. म्हणजे कर्जाचा शिल्लक हप्ता दिल्यानंतर दुसरा हप्ता द्यावयाचा आहे.

डॉ. पतंगराव कदम : आज सुध्दा अनेक साखर कारखान्यांनी आपापल्या पध्दतीने चेक्स देण्यास सुरुवात केलेली आहे. साखर कारखाने किती रक्कम देतात याची आम्ही चौकशी सुध्दा करीत नाही. नाबार्डचे बंधन पहिल्या हप्त्या पुरते आहे. नाबार्डचा पॅकेज पुरताच संबंध आहे. तसेच शासनाने नाबार्डला लिहिले आहे की, याबाबतीतील अट तुम्ही कमी करावी. याबाबतीत बँक आणि कारखाना यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. मी आणि माननीय आर.आर.पाटील आम्ही दोघे एका कारखान्यात होतो. न परवडणारे दर दिल्यामुळे आम्हाला हा कारखाना दुस-याला चालवायला द्यावा लागला आहे. शेवटी कारखाना आणि बँक ठरवेल.

श्री. नितीन गडकरी : आताच सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, वाढीव दराच्या संदर्भातील निर्णय बँक आणि कारखाना घेणार आहे. जर बँक आणि कारखाना दराच्या संदर्भात निर्णय घेणार असतील तर मग आपण या ठिकाणी घोषणा कशासाठी करीत आहात?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : मी सांगितले की, हा विषय पहिल्या हप्त्यापुरता आहे.

श्री. नितीन गडकरी : माननीय मंत्रीमहोदयांनी सुरुवातीला असे सांगितले की, पुढील वर्षाकरिता काहीही अट राहणार नाही. पहिला हप्ता 850 चा राहणार आहे व नंतर तुम्हाला जेवढा दर द्यावयाचा असेल तेवढा द्या असे महाराष्ट्र शासनाने जाहीर केले. आता माननीय मंत्री महोदय म्हणतात की, दर वाढविण्याचा निर्णय बँक आणि कारखान्याचा आहे त्यामध्ये संबंध नाही असे म्हणत आहेत. त्यामुळे यामध्ये आम्ही खरे काय समजायचे?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, दुस-या हप्त्याच्या बाबतीत आमची काहीही अडचण नाही.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : शेतक-यांच्या ऊसाला दर टनामागे 200 रुपये राज्य सरकारने अनुदान द्यावे अशी मी मागणी केलेली आहे त्याबद्दल मंत्रीमहोदय आपण एक शब्द देखील बोलले नाहीत. इतर राज्य दर टनाला एसएपी 200 देत आहे त्यामुळे तशा प्रकारे 200 रुपये दर टनाला शासनाने द्यावे अशी माझी मागणी आहे. तसेच प्रत्येक कारखान्यावर शासनाचा नॉमिनी असला पाहिजे. आपल्या रिजनल डायरेक्टरला 40 कारखाने सांभाळावे लागतात.

डॉ. पतंगराव कदम :प्रत्येक कारखान्यावर शासनाच्या वतीने तज्ज्ञ डायरेक्टर नेमण्याची कार्यवाही केली जाईल.शेतक-याला 200 रुपये एस.ए.पी. देण्याच्या संदर्भातील बाब तपासून पहाण्यात येईल. परंतु ते मिळण्याची शक्यता नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.विलास अवचट)** : अल्पकालीन चर्चा संपलेली आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 13 डिसेंबर 2005 रोजी, सकाळ 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 40 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 13 डिसेंबर 2005 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही